12-06-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

KBS/ 12:00

06-12-2005 " ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A 1

KBS/ D/ RJW. 12:00

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**नियम 289 अन्वये दिलेल्या सुचनेबाबत...**

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : माननीय सभापती महोदय, आम्ही आपल्याला नियम 289 अन्वये आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबतच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्यासंबंधात मला आपल्या परवानगीने बोलावयाचे आहे. सभापती महोदय, हे आघाडी सरकार या राज्यामध्ये सत्तेवर आले तेव्हा या सरकारने या राज्यातील कापूस उत्पादक, धान उत्पादक शेतकऱ्यांना शब्द दिला होता की, आमचे सरकार राज्यात सत्तेवर आले तर तुमच्या कापसाला 2700 रूपये भाव देऊ, तुमच्या धानाला 1 हजार रूपये भाव देऊ तसेच तुम्हाला वीज बिल माफ करू तसेच शेतकऱ्याच्या कर्जावरील व्याज माफ करू. अशा प्रकारची आश्वासने या सरकारने शेतकऱ्यांना सत्तेवर येण्यापूर्वी दिली होती. परंतु या सरकारला सत्तेवर येऊन 13 महिने झाले आहेत पण यातील एकही आश्वासन सरकारने पाळलेले नाही. याचा परिणाम असा झाला आहे की, या राज्यामध्ये आघाडी सरकारच्या मागील 6 वर्षाच्या कालखंडामध्ये 1045 आणि गेल्या 6 महिन्यांच्या कालावधीत 143 शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्या आहेत. सभापती महोदय, आपले हे नागपूर येथील हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी यवतमाळ जिल्ह्यातील, दारव्हा तालुक्यातील भुलाई गावच्या श्री.भगवानदीन शितल पत्रीया नावाच्या शेतकऱ्याने, त्याने भूविकास बँकेचे कर्ज घेतले होते. जिल्हा सहकारी बँकेचे कर्ज घेतले होते आणि नापिकीमुळे तो ते कर्ज फेडू शकला नाही. त्याच्या पाच एकरामध्ये केवळ 5 क्विंटल कापूस झाला. परिणामत: त्याला त्यातून कर्जफेड करता आली नाही. म्हणून मग त्याने आत्महत्या केली. ज्या दिवशी त्याने आत्महत्या केली त्याच्या आदल्या दिवशी या कर्जफेडीसंबंधात संबंधित बँकेचे तीन रिकव्हरी ऑफिसर्स त्याच्या घरी गेले होते आणि त्यांनी त्याला सांगितले होते की, ते कर्जाचे पैसे दिले नाहीत तर तुझे घर आणि सारे सामान जप्त केले जाईल. त्यांच्या या धमकीमुळे त्या शेतकऱ्याने घाबरून जाऊन आत्महत्या केली आणि आत्महत्या करताना त्याने एक पत्र लिहून ठेवले आहे. ते पत्र मी आपल्याला देत आहे. त्या पत्रामध्ये त्याने त्याच्या घरी आलेल्या त्या तिन्ही रिकवरी अधिकाऱ्यांची नावे स्पष्टपणे लिहून ठेवली आहेत. ....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या मृत्यूचा विषय येथे मांडला जात असताना आमचे समोरचे सदस्य हसत आहेत ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या शेतकऱ्याने आपल्या पत्रात लिहिलेले आहे ते मी आपल्याला वाचून दाखवितो. .... त्याने तेथील पोलीस इन्स्पेक्टरच्या नावाने हे पत्र लिहिलेले आहे. त्यात त्याने म्हटले आहे की, माननीय इन्स्पेक्टर, दारव्हा पोलीस ठाणे, जिल्हा यवतमाळ यांच्या सेवेसी, .. मी ही आत्महत्या कोणाच्याही कारणामुळे, त्रासामुळे करीत नाही. माझ्या घरी माझा एक कर्ता मुलगा आहे. गेल्या चार वर्षापासून पीक बरोबर होत नाही. नापिकी झालेली आहे. त्यातून कर्ज फेडता आलेले नाही. दरवर्षी दुष्काळ पडतो आहे. या सर्व परिस्थितीमुळे मला काही पिकलेले नाही. शेती करण्यासाठी बाहेरील लोकांकडून, बँकेकडून मी कर्ज घेतले आहे पण ते फेडू शकलो नाही. त्यामुळे मी आत्महत्या करीत आहे. एकच विनंती की, माझ्या घरच्या लोकांना कोणत्याही प्रकारचा त्रास आपण देऊ नका म्हणून विनंती अर्ज हा लिहित आहे. माझ्या घरी कोणत्याही लोकांचा, मुलांचा, सुनेचा वगैरे मला त्रास नाही असेही त्याने यात लिहून ठेवले आहे. तसेच घरी आलेल्या रिकवरी अधिकाऱ्यांची नावे देखील त्याने या पत्रात लिहिलेली आहेत. सभापती महोदय, एका शेतकऱ्याने आत्महत्या करून हा प्रकार संपलेला नाही. .....

( यानंतर श्री. सरफरे ..... बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, या सरकारची संवेदना संपली आहे. त्या दारव्हयामध्ये शेतकऱ्याचे प्रेत पडले होते. आणि याठिकाणी राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी संध्याकाळी 4 वाजता चहापान व मिठाई खाण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. आम्हा विरोधी पक्षाला आमंत्रण होते परंतु आम्ही ठरविले की, एका बाजूला या सरकारची संवेदना संपली आहे परंतु विरोधी पक्षाची संवेदना संपली नाही. आम्ही तुमच्या चहापानाच्या कार्यक्रमाला येणार नाही, तुमची मिठाई खायला येणार नाही असे त्यांना सांगितले. आम्ही विरोधी पक्षाचे सर्व सदस्य मिळून त्या शेतकऱ्याच्या अंत्ययात्रेला गेलो. ज्या ठिकाणी ते प्रेत पडले होते त्याच्या बाजूला त्या शेतकऱ्याची गरीब वृध्द 70 वर्षाची आई बसली होती, त्याला एक सून व दोन नातू होते, बाजूला पडलेले प्रेत होते. अशा स्थितीत तो शेतकरी जुनी मॅट्रीक परिक्षा उत्तीर्ण होता, तो काही अडाणी नव्हता, अशिक्षित नव्हता. परंतु त्या शेतकऱ्याने हे पत्र शासनाला लिहून ठेवले. कालपरवा आणखी एक घटना घडली, आजच्या वर्तमानपत्रामध्ये बातमी आल्याप्रमाणे अमरावती जिल्हयामध्ये एका शेतकऱ्याने आत्महत्या केली.सभापती महोदय, मी याठिकाणी 15 दिवसामध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची आकडेवारी सांगणार आहे. या विदर्भातील यवतमाळ, बुलढाणा, अमरावती, अकोला, वर्धा जिल्हयातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नावानिशी माहिती सांगणार आहे. यवतमाळ जिल्हयात प्रदीप दत्तात्रय शिरपूरकर, खडका, भारत मारोतीराव चोधरी, दहेली, घाटंजी, यवतमाळ, यांनी 27 तारखेला आत्महत्या केली. तारासिंग नागो राठोड, यवतमाळ यांनी 28 तारखेला आत्महत्या केली, तुळशीराम उध्दव परचाके, सोनापूर, वणी, जिल्हा यवतमाळ यांनी 28 तारखेला आत्महत्या केली, सुभाष नारायणराव मामडीवार, केळापूर यांनी 30 तारखेला आत्महत्या केली, मुरबाळ सुखराम, केळापूर यांनी 30 तारखेला आत्महत्या केली, विठ्ठल गोपाळराव बंडे, हा यवतमाळ जिल्हयातील आहे, याने देखील 30 तारखेला आत्महत्या केली. भगवानदिन शितलदिन पतरीया याने 30 तारखेला आत्महत्या केली. विनोद गोविंदा भोसले, दारव्हा याने 2 तारखेला आत्महत्या केली, राजेश बिंदूजी दुमनाके याने 4 तारखेला आत्महत्या केली.सभापती महोदय, यवतमाळ जिल्हयातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नावे मी आपल्याला सांगितली. परंतु मी ज्या बुलढाणा जिल्हयातून आलो आहे त्या जिल्हयातील गोपाळ सुफळा बाजोळे, मोमिनाबाद, तालुका नांदूरा याने 23 तारखेला आत्महत्या केली, अरुण पुंडलिकराव लोखंडे, पळखेडे याने 28 तारखेला आत्महत्या केली, देसिंग त्र्यंबक जाधव, या चिखली तालुक्यातील शेतकऱ्याने 4 तारखेला आत्महत्या केली. अमरावती जिल्हयात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ RJW/ 12:05

श्री. पांडुरंग फुंडकर...

एकंदर 6 शेतकऱ्यांनी या दहा दिवसात आत्महत्या केल्या. विश्वनाथ हरिभाऊ सोळंके, पिंपळोद, जिल्हा अमरावती याने 23 तारखेला आत्महत्या केली, किसनराव देवगिरे, ता. अचलपूर याने 23 तारखेला आत्महत्या केली, विनोद वामनराव चौधरी, चिंचखेड याने 25 तारखेला आत्महत्या केली, ज्ञानदेव नारायण लहाने याने 2 तारखेला आत्महत्या केली, महादेव रामाजी गणेश याने 5 तारखेला आत्महत्या केली. सभापती महोदय, अकोला जिल्हयात पूर्णाजी ज्ञानदेव आवारे, हिंगणा, ता. अकोट याने 23 तारखेला आत्महत्या केली, गजानन शालीग्राम ताले, ता. बाळापूर याने 24 तारखेला आत्महत्या केली. वर्धा जिल्हयात दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. राजू नामदेव गुलांडे, ता. देवळी याने 24 तारखेला आत्महत्या केली. रुपचंद वामनराव पाटील, याने 30 तारखेला आत्महत्या केली. सभापती महोदय, 15 दिवसामध्ये एवढया शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. आपल्या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला त्यांनी आत्महत्या केल्या. आपले अधिवेशन सुरु झाले त्या दिवशी शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. हे सरकार संवेदनाशून्य झाले आहे. या सरकारला शेतकऱ्यानी केलेल्या आत्महत्येसंबंधी काही वाटत नाही. गेली 6 वर्षे आम्ही सांगत आहोत, आम्ही मागणी केल्यानंतर शासनाने टाटा कमिशन बसविले. त्यानंतर इंदिरा संशोधन केंद्राकडे माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रकरण दिले. त्यांचेकडून रिपोर्ट आले. त्यांनी रिपोर्टमध्ये सांगितले की, 92 टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या नापिकी व कर्जबाजारीपणामुळे झाल्या आहेत. एका बाजूला दोन इंस्टिटयुटमार्फत अशाप्रकारचा अहवाल दिला जातो, आणि दुसऱ्या बाजूला या राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री सांगतात की, शेतकरी वेडसर झाला आहे, तो व्यसनाधीन झाला आहे, त्याने दारु पिवून आत्महत्या केली. अमरावती जिल्हयातील सोनटक्के नावाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. या सरकारला काय म्हणावे ते समजत नाही. त्या शेतकऱ्याचे वय 65 वर्षे होते असे तहसिलदार व जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे. या सरकारचे म्हणणे असे की, त्याचे एका 60 वर्षे वयाच्या बाईवर प्रेम होते. त्याच्या प्रेमाला त्या बाईने नकार दिला म्हणून त्याने आत्महत्या केली. या सरकारला काय म्हणावे हे कळत नाही. हे सरकार कशापध्दतीने चालले आहे? हे सरकार शेतकऱ्याच्या मालाला भाव देत नाही, राज्यातील कापूस एकाधिकार योजना 35 वर्षे चालू आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अधिकृत प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

1972 पासून कोणतेही वर्ष असे गेले नाही की, मागच्या वर्षीपेक्षा पुढच्या वर्षी भाव कमी दिलेला आहे. पण हे वर्ष असे आहे की, मागच्या वर्षीपेक्षा 600 रुपयांनी भाव कमी दिला आहे. मागच्या वर्षी 2100 रुपये दराने खरेदी केली होती आणि यावर्षी 1779 रुपये या भावाने खरेदी करण्याची घोषणा केली. पण त्या भावाप्रमाणे कोणाचाही कापूस खरेदी केला नाही, तर 1700 रुपयाप्रमाणे खरेदी केला. विदर्भ, मराठवाडा, खानदेश हे कापसाचे भाग आहेत. पण तेथे खरेदी केंद्रे सुरु केली नाहीत.शेतकऱ्याचा कापूस विकला जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी सावकाराकडून घेतलेले कर्ज फिटत नाही. तसेच सहकारी बँकेकडून, भूविकास बँकेकडून घेतलेले कर्ज फिटत नाही.माननीय मंत्री महोदय डॉ.पतंगराव कदम यांनी सभागृहात कबूल केले होते की, आम्ही वन टाईम सेटलमेंट लागू करु. पण ते अजूनही झालेले नाही. दामदुप्पटीपेक्षा जास्त रक्कम घेता येत नाही असा सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला असताना सुध्दा दामदुप्पटीपेक्षा चौपट, पाचपट रक्कम. . . . .

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी येथे सांगू इच्छितो की, कबूल केल्याप्रमाणे भूविकास बँकेच्या बाबतीत वन टाईम सेटलमेंटचे आदेश काढलेले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सहकारी बँकेच्या . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याला आव्हान देतो. तुमच्या आदेशाप्रमाणे झाले असेल तर मी माझ्या पदाचा राजीनामा देण्यास तयार आहे, नाहीतर तुम्ही द्यावा. एक लाख पेक्षा जास्त शेतकरी आहेत, त्यांना नोटीस आलेल्या आहेत. माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशाचे पालन होत नाही. तुमच्या आदेशाला केराची टोपली दाखविली जाते. ते तुमचे आदेश स्विकारीत नाही. तुमचा आदेश स्विकारला असेल तर मी माझा राजीनामा देण्यास तयार आहे. तुम्ही माझे आव्हान स्विकारावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : कृपया सर्वांनी खाली बसावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माझे आव्हान स्विकारावे.

. . . .सी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : आम्ही वनटाईम सेटलमेंटचे आदेश काढलेले आहेत. याची कार्यवाही होते की नाही हे आम्ही तपासून पाहू.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मला माफ करावे. तुम्ही माझे मित्र आहात. पण याबाबतीत तुम्ही स्वत: सिरिअस नाही का ? की तुमचे मित्र काम होऊ देत नाहीत का ? यामध्ये फाटे टाकतात का ? हे मला माहिती नाही. मागच्या अधिवेशनामध्ये माननीय सभापतींनी या विषयाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना लावली होती. त्यांनी याबाबतीत मत प्रदर्शन केले आणि त्यांच्या चेंबरमध्ये बैठक बोलविण्याचे आश्वासन दिले. पण मला माफ करा, तुमच्यात एवढीही संवेदनशीलता नाही की, तुम्ही मागच्या तीन महिन्यात माननीय सभापतींच्या केबिनमध्ये बैठकही घेतली नाही. तुम्ही बैठकीला आला नाहीत.

**सभापती** : यासंबंधात जी बैठक घ्यावयाचे ठरले होते, ती माझ्या चेंबरमध्ये घ्यावयाची ठरली होती.पण ती बैठक झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. पण माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे येण्यापेक्षा मी ती बैठक घेऊ शकलो नाही हे मला मान्य आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, पण माननीय सहकार मंत्र्यांकडे तुमचे आदेश पोहोचल्यावर त्यांनी याबाबतीत स्वत:हून तुमच्याकडे यावयास पाहिजे होते. आपण वयाने मोठे आहात, आपला मान मोठा आहे. मी आपला गौरव करतो आणि मी आपले आभार मानतो. पण हे कळल्यावर ताबडतोब बैठक झाली पाहिजे,याबाबतीत अहवाल केला पाहिजे ही संवेदनशीलता या सरकारने दाखविली का ? पण तसे काही होत नाही.

**सभापती** :आज आपल्यासमोरचा जो विषय आहे तो . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे हाच विषय आहे.

**सभापती** : आजचा विषय महत्वाचा आहे आणि हा विषय कसा महत्वाचा आहे हे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी मला पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझे ऐकून घ्यावे. अशा दुष्ट चक्रामध्ये या राज्यातील शेतकरी सापडला आहे. मागच्या अधिवेशनामध्ये विरोधी पक्षनेते श्री.नितीन गडकरी यांनी मागणी केली होती, त्यावेळेला इंदिरा गांधी इन्स्टीटयुट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च यांच्याकडे काही

. . . .सी-3



श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकरणे पाठविण्यात आली. त्यांनी जो रिपोर्ट दिला, त्यानुसार 2001 मध्ये 64, 2002 मध्ये 131, 2003 मध्ये 180, 2004 मध्ये 524 आणि 15 नोव्हेंबर 2005 पर्यंत 142 आत्महत्या झालेल्या आहेत. जेव्हा हा रिपोर्ट आला, तेव्हा मग या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी परवा संध्याकाळी मान्य केले. पण ही गोष्ट सहा वर्षापूर्वी मान्य केली नाही की, या राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. माननीय उप मुख्यमंत्र्यांसारखे जबाबदार नेते "लोकसत्ता" या वर्तमानपत्रामध्ये लेख लिहितात की, शेतकऱ्यांचे डोके फिरलेले आहे, शेतकरी व्यसनाधीन झालेला आहे. लाज वाटावयास पाहिजे. ज्या शेतकऱ्यांची मते घेऊन तुम्ही येथे बसता, ज्यांच्या मतावर तुम्ही येथे राज्य करता.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे चालू....

त्यांची अशा पध्दतीने आपण दिशाभूल करता..

**सभापती** : आपल्याला आपला मुद्दा डेव्हलप करण्यासाठी मी संधी दिली. या विषयावर ज्यावेळेस चर्चा होईल, त्यावेळेस बाकीच्या सगळ्या गोष्टी आपण बोलाव्यात.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझे म्हणणे आपण ऐकून घ्यावे. जनतेचे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येवरील लक्ष दुसरीकडे डायव्हर्ट व्हावे म्हणून राज्याचे उप मुख्यमंत्री शेतकऱ्यांची सावकारांमुळे आत्महत्त्या होत असल्याचे सांगत आहेत. परंतु इंदिरा गांधी इन्स्टीट्युट आणि टाटा या संस्थेने शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या कशामुळे होत आहेत संदर्भातील अहवाल दिलेला आहे, तो तुम्ही खोटा ठरवू शकता काय ? आत्महत्त्या या कर्जबाजारी, शेतकऱ्यांच्या शेतात काही पिकले नाही, यामुळे त्यांना कर्ज फेडता आले नाही. परिणामी त्या शेतकऱ्यावर सक्तीची कर्जवसुली झाली म्हणून या 92 टक्के आत्महत्त्या झाल्याचा रिपोर्ट आहे,हे रिपोर्ट खोटे आहेत काय ? जनतेचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी सावकारांची कोपरापासून ढोपरापर्यन्त साले काढा, अशाप्रकारचे स्टेटमेंट मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडून केले जाते. सभापती महोदय, आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या राज्यातील खरे सावकार मा.सहकार मंत्री श्री.पतंगराव कदम आपण आहात. जिल्हा सहकारी बँक, भूविकास बँक, राज्य सहकारी बँक, सोसायट्या या आपल्या ताब्यात आहेत. नाबार्ड 5 टक्के व्याजाने कर्ज देते, त्यावर 3 टक्के व्याज राज्य सहकारी बँक आकारते, त्यानंतर 3 टक्के जिल्हा बँक व्याज आकारते आणि त्यानंतर सहकारी सोसायट्या या 3 टक्के व्याज आकारतात, असे मिळून शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जावर 14 टक्के व्याज लावले जाते.

**सभापती** : ज्यावेळेस या विषयावर चर्चा होईल, त्यावेळी बोलण्यासाठी काहीतरी आपण शिल्लक ठेवावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : गेल्या 15 दिवसामध्ये 25 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. अधिवेशन चालू असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत आहेत, म्हणून अशा या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर नियम 289 खाली सर्व कामकाज बाजूला ठेवून चर्चा झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय,माझी एवढीच विनंती आहे की, हा विषय गंभीर आहे..

(सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड बोलण्यासाठी उभे रहातात.)

श्री.नितीन गडकरी : आपल्या ठाणे जिल्ह्यात आत्महत्त्या झालेल्या नाहीत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे पाहून बोलावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, नियम 289 प्रमाणे प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर चर्चा करावी, अशाप्रकारची मागणी विरोधी पक्षनेत्यांनी केलेली आहे. याला सरकार जबाबदार आहे, हे तातडीने आम्हाला सिध्द करावयाचे आहे. शेतकऱ्यांच्या सातबाराच्या उताऱ्यावर बँकेचे कर्ज लिहिलेले असल्यामुळे आता कोणतीही बँक 95 टक्के कर्ज शेतकऱ्यांना देऊ शकत नाही. याबाबत विदर्भातील मंत्री श्री.रणजित कांबळे यांना विचारावे, कोणाही विदर्भातील सन्माननीय मंत्र्यांना याबाबत विचारावे. सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांना विचारावे. सन्माननीय सदस्य श्री.आदिक साहेबांनी तर अभ्यास केलेला आहे, त्यांनी सत्य सांगितले. परंतु त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी आपल्याला वेळ नाही. शेतकऱ्यांना सावकाराकडे का जावे लागते, याचे कारण असे की, शेतकऱ्यांच्या सातबाराच्या उताऱ्यावर कर्जाचा उल्लेख असल्यामुळे त्यांना कोणतीही बँक पैसे देत नाही. सभापती महोदय, मागच्या वर्षी याच अधिवेशनामध्ये सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी आपल्या उपस्थितीत आश्वासन दिलेले होते की, कापूस उत्पादक क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असेल त्या ठिकाणच्या कर्ज वसुलीला आम्ही स्थगिती देत आहोत. माफ करा. मला सांगतांना संकोच होतो आहे. कर्ज वसुलीला स्थगिती नाही, काही नाही. परवापासून बँकांकडून जबरदस्तीने शेतकऱ्यांच्या घरी जाऊन त्यांची भांडीकुंडी जप्त करणे सुरु आहे. सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील काय सांगतात, ते मा.मंत्री श्री.पतंगराव कदम यांना ऐकू येत नाही, सन्माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम काय करतात, हे मा.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांना माहीत नाही. हे तिघे काय करतात, त्यावर मा.उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील हे लेख लिहितात. म्हणजे सरकारमध्ये काय सुरु आहे,हे समजत नाही. मा.मंत्री श्री.पतंगराव कदम साहेबांना मी जबाबदारीने विनंती करतो की, नाबार्डकडून 5 टक्क्यानी कर्ज मिळते,त्यावर 3 टक्के राज्य सहकारी बँक व्याज आकारते, 3 टक्के जिल्हा बँक व्याज आकारते आणि 3 टक्के सोसायट्या व्याज आकारतात. म्हणजे 14 टक्के व्याज आकारले जाते. मर्सिडीज गाडी घेण्यासाठी बँका 14 टक्क्यांनी कर्ज देतात, घर बांधणीसाठी बँका 7 टक्क्यांनी कर्ज देतात आणि शेतकऱ्याला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

ऊस, कापूस, धान, सोयाबीन लावण्यासाठी, ट्रॅक्टर घेण्यासाठी 14 टक्के व्याज आकारले जाते. सभापती महोदय, माझ्याकडे सुप्रीम कोर्टाचे जज्जमेंट आहे की, 10 हजार रुपये मुद्दल असेल तर 10 हजार रुपये व्याज घेता येते. सन्माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम साहेब आपणच सांगितले होते की, या संदर्भातील आदेश काढले. लाखो शेतकऱ्यांनी 10 हजाराचे 80 हजार, 90 हजार रुपये भरले यांचे नाव, पत्ते यासह मी पुरावे द्यायला तयार आहे. अध्यक्ष महाराज, या आत्महत्त्येकरिता सरकार जबाबदार आहे,म्हणून ही गंभीर बाब आहे. 1024 आत्महत्त्या सरकारने स्वीकारलेल्या आहेत, खोटे पंचनामे केले, खोटी माहिती दिली. हा रेकॉर्ड आहे. रिपोर्ट वाचून दाखविणार आहे. म्हणून या सर्व आत्महत्त्येला सर्वश्री पंतगराव कदम, विलासराव देशमुख आर.आर. पाटील हे खरे जबाबदार आहेत. म्हणून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा टाकायचा असेल तर या तिघांवर टाकला पाहिजे,ज्यांच्यामुळे आत्महत्त्या होत आहेत. याला सरकार जबाबदार आहे. माझी विनंती आहे की, आपण प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा, यापेक्षा मोठा विषय असू शकत नाही. सगळे कामकाज स्थगित करुन या विषयावरील चर्चा सुरु करावी आणि आमचे म्हणणे ऐकून घ्यावे. शेतक-यांना न्याय मिळाला पाहिजे. न्याय मिळणार नसेल तर आम्हाला यांची मिठाई खाण्यात स्वारस्य नाही. आपण शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आजचे इतर कामकाज ताबडतोब स्थगित करुन या विषयावर चर्चा सुरु करावी, अशी विनंती आहे.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहासमोरील आजच्या कामकाजाला सुरुवात करण्याआगोदर नियम 289 अन्वयेच्या तीन सूचना माझ्यासमोर आलेल्या आहेत. त्यापैकी पहिली सूचना विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर, श्री. मधुकर सरपोतदार आणि श्री. नितीन गडकरी व इतर सदस्यांची आहे. दुसरी सूचना श्री. कन्हैयालाल गिडवाणी, श्री. अनंत तरे व इतर सदस्यांनी "राज्यातील ऊस उत्पादक शेतक-यांचे आंदोलन" याबाबतीत दिलेली आहे. तिसरी सूचना श्री. जयंत प्र.पाटील, प्रा. शरद पाटील, श्री. अनंत तरे यांनी दिलेली आहे. आणि त्याचबरोबर काल नियम 97 अन्वये श्री. जितेंद्र आव्हाड यांनी "महाराष्ट्र कर्नाटक सीमा तंटा" याबद्दल सूचना दिलेली आहे. नियम 289 अन्वये माझ्यासमोर ज्या एकूण तीन सूचना आलेल्या आहेत ते तीनही विषय अत्यत महत्वाचे आहेत. पहिला विषय शेतक-यांच्या जिव्हाळयाचा आणि भवितव्याचा आहे. सर्वसामान्य शेतकरी कसा वाचेल यादृष्टीने पोटतिडिकेने चर्चा करुन निर्णय घेण्याच्यादृष्टीने याबाबत चर्चा होणे आवश्यक आहे आणि त्यदृष्टीने आपण ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या भावनांशी मी स्वत: सहमत आहे. याबाबतीत चर्चा करीत असतांना तांत्रिकदृष्टया नियम 289 खाली हया चर्चेला परवानगी द्यावयाची असेल तर प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन हया चर्चेला परवानगी द्यावयाची
का ? मला वाटते या तीनही विषयाला न्याय देण्याच्यादृष्टीने या तिन्ही विषयाला वेगवेगळी अडीच तासाची अल्पकालीन चर्चेला परवानगी देण्याच्यादृष्टीने मी गांभीर्याने विचार करीत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि श्री. नितीन गडकरी साहेब यांचे याबाबतीतील मत असे आहे की, आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन या प्रश्नाला न्याय द्यावा. माझे मत असे आहे की, या तीनही विषयांना न्याय देणे आवश्यक आहे आणि त्यादृष्टीने प्रश्नोत्तराचा तास पूर्ण केल्या नंतर त्यावर अल्पकालीन चर्चा करण्यात यावी, ..

श्री. नितीन गडकरी : त्यांना वेगळी चर्चा देण्यात यावी.

**सभापती** :या चर्चेचा त्याच्याशी संबंध नाही. ती चर्चा वेगळी होईल. याबाबतीतील मी माझे मत मांडलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आपल्याला याबाबतीत काही सांगावयाचे असेल तर आपण बोलावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, नियम 289 च्या आधीन राहून आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे त्या प्रस्तावावर प्रथम प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन शेतक-यांच्या आत्महत्तेचा प्रश्न चर्चेसाठी घ्यावा अशी आमची सूचना आहे. कारण एकदा प्रश्नोत्तराचा तास सुरु झाला की, नियमित कामकाजाला सुरुवात होते. म्हणून आम्ही तातडीने यासंदर्भात आमच्या भावना व्यक्त करु इच्छितो. विदर्भात जे ज्वलंत प्रश्न आहेत ते सोडविण्यासाठी विदर्भात अधिवेशन घेतले जाते. त्यानंतर इतरही विषयाची चर्चा या अधिवेशनात होते.पण प्राथम्य हे विदर्भातील शेतक-यांना आणि विदर्भातील प्रश्नांना दिले पाहिजे अशी या पाठिमागची भूमिका आहे. यासाठी येथे अधिवेशन भरते. असे असतांना आज विदर्भात रोज आत्महत्या होतात. या आत्महत्त्येमागील एकमेव कारण असे आहे की, हे शासन मुर्दाड आहे. या शासनाला कसल्याही प्रकाकरची काळजी राहिलेली नाही. कोणी मरो, कोणी जीवंत राहो या शासनाच्या चहापाटर्या चालल्या आहेत. यांचे बंगले सजविण्याचे काम चालले आहे. रविभवन या सगळया ठिकाणी भरमसाठ पैसे खर्च करण्यात येत आहेत. शेतक-यांकडे लक्षदेण्यासाठी या शासनाला अजिबात वेळ नाही. ऐषाराम पाहिजे. चैन पाहिजे आणि नवीन माणसे आणून त्यांच्यामार्फत रोज नुसते होर्डिंग्स लावावयाचे आणि तमाशा साजरा करावयाचा, अशा प्रकारे खुषी करण्यासाठी हे सरकार येथे आलेले आहे. आमचा त्याला विरोध आहे म्हणून मी अतिशय मुद्देसूद याठिकाणी बोलणार आहे. बाकी सगळया विषयाच्या बाबतीत ज्यावेळी बोलायची वेळ येईल त्यावेळी मी जरुर बोलेन. पण सभापती महोदय, या सभागृहाच्या माध्यमातून माझी आपणाला विनंती आहे की, कुठच्याही परिस्थितीमध्ये सभागृहासमोरील दुसरे कोणतेही कामकाज न होता नियम 289 अन्वये आजचा प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या चर्चेला आपण ताबडतोब सुरुवात करावी, अशी माझ ी विनंती आहे. धन्यवाद.

-----

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहासमोर नियम 289 अन्वये ज्या सूचना आल्या त्या योग्य आहेत पण शेतकऱ्यांचा प्रश्न जेवढा महत्वाचा आहे तेवढाच महत्वाचा प्रश्न असलेल्या महाराष्ट्रातील प्रलंबित बेळगांव-कर्नाटक सीमा प्रश्नासंबंधीची नियम 97 अन्वये सूचना मी काल दिलेली आहे. त्या भागातील मराठी भाषिक दुखावलेला आहे. महाराष्ट्राची अस्मिता त्याप्रकरणी तपासण्याची गरज आहे. बेळगांव, कारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे ही गेल्या 50 वर्षांची घोषणा आहे. त्या ठिकाणी आंदोलन झाल्याबरोबरच बेळगांव महापालिका कर्नाटक सरकारने बरखास्त केली. तेथील महापौरांना मारहाण झाली. अशा प्रकारे मराठी भाषिकांवर अन्याय होणे हया सर्व घटना मराठी हृदयावर जखमा देऊन गेलेल्या आहेत. आमच्या भावना या प्रश्नाच्या बाबतीत अतिशय तीव्र आहेत आणि यामध्ये विरोधी पक्ष आणि सत्तारुढ पक्ष असा भेदभाव नसून संपूर्ण मराठी जगतालाच या घटनेच्या वेदना झालेल्या आहेत. म्हणून आमची सूचना आहे की, या सूचनेचा प्राथम्याने विचार करावा आणि मराठी भाषिकांवर झालेला अन्याय आणि बेळगांव-कारवार-निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ही मागणी वास्तव स्वरुपात उतरावी म्हणून केंद्रशासनाच्या कानावर ही मागणी पडण्यासाठी आम्ही सर्वपक्षीय सदस्य तसेच राज्यातील जनता बेळगावातील मराठी भाषिकांच्या बरोबर आहोत, या गोष्टीचा गांभीर्याने विचार करुन या प्रश्नाबाबत प्राथम्यक्रमाने चर्चा करण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------

..........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सीमा प्रश्नाबाबत अनेक वेळा या सदनात चर्चा झालेली आहे. सर्वोच्च न्यायालयात देखील यासंदर्भात शासनाच्या वतीने आणि एकीकरण समितीच्या वतीने केस दाखल केलेली आहे. परंतु आजची परिस्थिती अशी आहे की, बेळगांवचे महापौर बंगलोरला गेले असता कन्नड भाषिक संघटनेने त्यांच्यावर हल्ला केला, त्या घटनेचे पडसाद बेळगांवमध्ये उमटले होते. त्याचबरोबर कर्नाटक सरकारने मराठी भाषिक महापौर असलेली बेळगांव महापालिका बरखास्त केली, त्यादृष्टीने आपल्या शासनाचे काय धोरण आहे ? आपल्या शासनाची काय भूमिका आहे, केंद्रशासनावर यासंदर्भात कुठल्या प्रकारे दबाव आणणार आहात ? याबाबत शासनाकडून तातडीने निवेदन झाले पाहिजे आणि यासाठी प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या विषयावर चर्चा करावी अशी आमची मागणी आहे. एवढे बोलूून मी माझे भाषण पूर्ण करतो.

------------

.......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : अध्यक्ष महाराज, माझी अशी.......

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या विषयाची तीव्रता आम्ही देखील मान्य करतो, तसेच त्यावर चर्चा जरुर झाली पाहिजे. पण आमची एकच विनंती आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांचा विषय जो आहे त्यावर आजच चर्चा करावी, त्यानंतर सीमा प्रश्नासाठी एक दिवस आणि ऊसावरील चर्चेलाही वेळ द्यावा कारण त्यांच्या भावनांशी आम्हीही सहमत आहोत म्हणून यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी आम्हाला सहकार्य करावे, अशी मी विनंती करतो.

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महाराज, मा. विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच मा. श्री. नितीन गडकरी यांनी जो विषय मांडला आहे तो विषय जेवढा महत्वाचा आहे तेवढाच बेळगांव-कारवारचा विषय देखील महत्वाचा आहे. तेवढाच ऊसाचा प्रश्नही महत्वाचा आहे. या विषयांना वेगवेगळा वेळ द्यावा अशी सूचना माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी केली ती खरोखरच स्वागतार्ह आहे. मात्र एवढीच विनंती आहे की, ज्यावेळी या विषयांच्या संदर्भात चर्चा होईल त्यावेळी सभागृहात संबंधित मंत्री महोदयांनी चर्चा ऐण्यासाठी व उत्तर देण्यासाठी हजर रहावे, अशी सूचना करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : नियम 289 खाली प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन कापूस आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या या विषयांच्या संदर्भात चर्चा घेण्यात यावी अशी सूचना माननीय विरोधी पक्षनेत्यांनी येथे केलेली आहे. आपणा सर्वांची मागणी तशीच असेल असे मला वाटते. म्हणून यासंदर्भात शासनाचे काय मत आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने मा. मंत्री महोदय श्री. अजित पवार यांनी शासनाच्या वतीने आपली भूमिका मांडावी.

श्री. अजित पवार (जलसंदा मंत्री) : सभापती महोदय, मा. विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि श्री. नितीन गडकरी तसेच बाकीच्या मान्यवरांनी जो विषय मांडला आहे ते सगळेच विषय राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत आणि त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन देखील चर्चा सुरु करण्यास शासनाची तयारी आहे.

श्री. नितीन गडकरी : महोदय, ही चर्चा सुरु असतांना संबंधित मंत्र्यांनी सभागृहातून बाहेर निघून जाणे योग्य नाही. ते सभात्याग करुन बाहेर गेले किंवा कसे हे मला माहिती नाही परंतु सभागृहातून गेले एवढे मात्र खरे आहे.

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना मी ऐकलेल्या आहेत. त्या अनुषंगाने मी माझ ाा निर्णय आता देत आहे.

माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आपल्या भावना या ठिकाणी मांडलेल्या आहेत.......

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

या ठिकाणी मानननीय विरोधी पक्षनेते तसेच अन्य सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात आपल्या भावना या ठिकाणी मांडलेल्या आहेत. त्याच बरोबर सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी अजून दोन विषयाच्या बाबतीत आपल्या भावना या ठिकाणी मांडलेल्या आहेत. सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सीमा प्रश्नाचा उल्लेख केलेला आहे. मा. मंत्री श्री. अजित पवार साहेबांनी या विषयाच्या संदर्भात शासनाची भूमिकाही सांगितलेली आहे. त्यामुळे मी या विषयाच्या बाबतीत निर्णयाप्रत पोहचलो आहे की, नियम 97 अन्वये पहिली जी चर्चा आहे त्यामध्ये कापसाला 2300 रुपये भाव द्यावा, शेतक-यांना मोफत वीज देण्यात यावी तसेच ऊस, सोयाबीन, धान आदी पिकांना भाव द्यावा व आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटूंबियांना शासनाने मदत द्यावी तसेच या प्रश्नाच्या बाबतीत शासनाने दाखविलेली उदासीनता या बाबीसंबंधी विषय आहेत. त्या अगोदर नियम 97 खाली अडीच तासाची चर्चा या ठिकाणी होणार आहे. परंतु यावर मतदान होणार नाही. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी महाराष्ट्राच्या सीमा प्रश्नाच्या बाबतीत जो विषय उपस्थित केलेला आहे त्या विषयाच्या बाबतीत सुध्दा अडीच तासाची चर्चा घेण्यात येईल परंतु या विषयाच्या संदर्भातील चर्चा नंतर घेण्यात येईल तसेच ऊसाच्या विषयाबाबतची चर्चा कधी घेण्यात येईल हे मी आता सांगत नाही. परंतु ज्यावेळी वेळ मिळेल त्यावेळी या विषयाला देखील जरुर न्याय देण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, कापूस, धान, ऊस, लोडशेडींग तसेच सीमा प्रश्नाच्या संदर्भात चर्चा केव्हा घ्यावी यासंदर्भात आपण गटनेत्यांची बैठक आपल्या दालनात आयोजित करावी त्या बैठकीमध्ये या विषयांच्या चर्चेला वेळ द्यावा. या सर्व प्रश्नावर चर्चा झाली तर या सर्व प्रश्नांना न्याय मिळेल असे मला वाटते.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी सूचित केल्या प्रमाणे महत्वाचे जे प्रश्न आहेत त्याबाबत सुध्दा सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांशी विचार विनिमय करुन या अधिवेशनामध्ये सदर 4-5 प्रश्नांवर सखोल चर्चा होईल. आता ठरलेल्या विषयावर चर्चा घेण्याच्या दृष्टीने सभागृहाची बैठक मी 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे. सभागृहाच्या स्थगितीनंतर अडीच तासाच्या चर्चेला सुरुवात होईल.

( सभागृहाचे कामकाज दुपारी 12.32 ते 12.48 वाजेपर्यंत स्थगित झाले. )

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

**<u>सभापती स्थानी मा.उप सभापती</u>**

श्री.अजितदादा पवार (बसून) : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर लेईंगसंबंधीचे जेवढे म्हणून कामकाज दाखविण्यात आले आहे ते आपण घ्यावे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन चर्चा घ्यावी अशी नोटीस दिलेली आहे. त्यामुळे लेईंगसंबंधीचे कामकाज आपल्याला आता घेता येणार नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते बरोबर आहे. माननीय सभापतींच्या दालनात गट नेत्यांची बैठक सुरु असल्यामुळे मी सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 12 वाजून 50 मिनिटांनी दहा मिनिटांकरिता स्थगित झाली. )

यानंतर श्री.बोर्डे.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी मा.उपसभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: सभापती तालिका नामनिर्देशित करणे.

**उपसभापती** : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित केल्याचे घोषित करतो :-

1) श्रीमती सुधा जोशी
2) श्री.जगन्नाथ शेवाळे
3) श्री.विलास अवचट
4) श्रीमती कांता नलावडे

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 97 च्या प्रस्तावाबाबत</u>**.

श्री.पांडूरंग फुंडकर ( विरोधी पक्षनेता ) : सभापती महोदय, आम्ही महाराष्ट्र विधानपरिषद नियम 97 अन्वये एका अतिशय ज्वलंत आणि महत्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणण्याबाबत जी मागणी केली होती, ती मागणी मान्य करुन आपण चर्चेस परवानगी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो. सभागृहात शेती, शेतकरी आणि महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची अशी चर्चा या ठिकाणी हो आहे. परंतु या चर्चेशी संबंधीत असलेले माननीय मंत्री मात्र या ठिकाणी उपस्थित नाहीत. कृषी, सहकार आणि पुनर्वसन खात्याचे मंत्री या ठिकाणी उपस्थित असणे आवश्यक होते. परंतु या ठिकाणी त्या खात्याचा एकही मंत्री उपस्थित नाही. त्यामुळे ते मंत्री सभागृहात येईपर्यंत ही चर्चा थांबवावी असे मला वाटते. या सरकारला अतिशय महत्वाच्या अशा प्रश्नाचे गांभीर्य नाही. जर मंत्रीच या ठिकाणी उपस्थित नसतील तर आम्ही या चर्चेवर कोणासमोर बोलावे. म्हणून माझी विनंती आहे की, या खात्यांचे मंत्री येईपर्यंत सभागृह स्थगित करावे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय प्रा.वसंतराव पुरके, माननीय श्री.गणेश नाईक आणि मी स्वत: उपस्थित आहे. संबंधित मंत्रिमहोदयांच्या वतीने आम्ही नोटस् घेणार आहोत. संबंधित मंत्रिमहोदय सुध्दा थोडयाच वेळात उपस्थित होतील. त्यामुळे चर्चेस सुरुवात करावी अशी माझी विनंती आहे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, संबंधित विभागाचे मंत्री येथे येईपर्यन्त आपण सभागृहाची बैठक तहकूब करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सभागृहाची बैठक तहकूब करण्याची आवश्यकता नाही .ही चर्चा सुरु करण्यात यावी. तोपर्यन्त मंत्री महोदय येथे येतील. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची आम्ही नोंद घेऊ आणि आवश्यकता वाटल्यास त्याची उत्तरे देऊ.

**उपसभापती** :सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी चर्चेला सुरुवात करावी तोपर्यन्त संबंधित विभागाचे मंत्री येथे येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सहकार, पुनर्वसन, महसूल,पणन,कृषी विभागाचे मंत्री येथे येणार नाहीत तोपर्यन्त आम्ही चर्चा करणार नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सरकारने या प्रश्नाकडे ज्या गांभीर्याने पहावयास पाहिजे होते त्या गांभीर्याने सरकार पाहत असल्याचे दिसत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खालचे सभागृह स्थगित झालेले आहेत आणि संबंधित विभागाचे माननीय मंत्रीमहोदय त्यांच्या कॅबिनमध्ये बसलेले आहेत परंतु ते या ठिकाणी येत नाहीत.

श्री.नितीन गडकरी : शेतक-यांच्या आत्महत्या हा विषय महसूल विभागाशी सबंधित आहे. कापसाचा विषय पणन विभागाशी सबंधित आहे. जिल्हा सहकारी बॅन्का आणि भू विकास बॅन्कांचा विषय सहकार विभागाशी संबंधित आहे व कृषी विभागाचासुध्दा येथे संबंध येतो. खालचे सभागृह स्थगित झालेले आहे, या महत्वाच्या विषयाच्या बाबतीत सरकार मधील मंत्री जबाबदार आहेत आणि ते संवेदनशील असले पाहिजे. तेव्हा ते या विषयाला महत्व देतील.दोन मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करावी व मंत्रीमहोदयांना येथे बोलावून घ्यावे. तोपर्यन्त मंत्रीमहोदय येतील. आम्ही जे काही महत्वाचे म्हणणे मांडणार आहोत ते म्हणणे त्यांनी येथे येऊन ऐकले पाहिजे.शेतक-यांनी ज्या आत्महत्या केलेल्या आहेत त्या विषयाच्या बाबतीत त्यांनी निर्णय घेतला पाहिजे.मंत्री महोदय जर येथे उपस्थित नसतील तर आम्ही कोणाशी बोलावयाचे ?सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांची खूप इच्छा आहे. परंतु त्यांच्या हातामध्ये काहीही नाही.त्यामुळे ते काय करणार आहेत ? त्यांनी जे काही सांगितलेले आहे ते मंत्रीमहोदय ऐकत नाहीत.त्यांनी आमची बाजू मांडली तर अडचण येते.

( माननीय महसूल मंत्री सभागृहात येतात )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय महसूल मंत्री सभागृहात आलेले आहेत तेव्हा आता चर्चेला सुरुवात करण्यात यावी.

श्री.नारायण राणे : चर्चेच्या संदर्भात उत्तरे देणे ही सामुदायिक जबाबदारी आहे. मी सगळया खात्याच्या संदर्भातील उत्तरे देतो.

श्री.नितीन गडकरी :आता माननीय महसूल मंत्री येथे आलेले आहेत. परंतु संबंधित इतर खात्याच्या मंत्र्यांनी येथे उपस्थित राहणे आवश्यक आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर :पाच मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदयांनी मघाशी निर्णय दिला होता की, या चर्चेच्या वेळी संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित राहतील. आत्महत्तेचा विषय फक्त महसूल खात्याशी संबंधित नाही तर कापसाचा विषय सुध्दा या चर्चेमध्ये आहे आणि तो विषय पणन विभागाशी ंसबंधित आहे.

श्री.नारायण राणे : त्या संबंधीचे मुद्दे मी लिहून घेतो आणि त्याचे उत्तर सबंधित विभागाचे मंत्री देतील.

श्री.नितीन गडकरी :खालचे सभागृह स्थगित झालेले आहे आणि मंत्री महोदय कॅबिनमध्ये बसलेले आहेत.शासनाला या विषयासंबंधी गांभीर्य आहे की नाही ? आजच्या दिवसाचे सगळे कामकाज बाजूला ठेऊन आपण या विषयावर चर्चा घेत आहोत. तेव्हा या चर्चेशी ंसबंधित मंत्रीमहोदय येथे उपस्थित राहत नाहीत. ही गोष्ट बरोबर नाही.सभागृहाची बैठक स्थगित करावी.

श्री.अनिल देशमुख :पणन विभागाचे राज्यमंत्री येथे उपस्थित आहेत.

श्री.पांडुरंग फुडकर : अन्य विभागाचे मंत्री येथे उपस्थित नाहीत त्यामुळे पाच मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी.माननीय सभापतींनी जो निर्णय दिला होता त्या निर्णयाचे पालन करणार आहात की नाही ?

श्री.नितीन गडकरी : जोपर्यन्त संबंधित विभागाचे मंत्री येथे उपस्थित राहणार नाहीत तो पर्यन्त आम्ही चर्चा करणार नाही.

श्री.नारायण राणे : राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत उत्तर देणे ही सामुदायिक जबाबदारी असते आणि असे पहिल्यांदाच होत आहे असे नाही.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर :एखादा दुसरा प्रश्न असेल आणि त्यावेळी उत्तर देण्याच्या बाबतीत सामुदायिक जबाबदारीच्या संदर्भात सांगण्यात आले असते तर ते मी समजू शकतो परंतु हा विषय संपूर्ण राज्यातील शेतक-यांच्या संदर्भातील आहे. एक हजार शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

श्री.नितीन गडकरी : महसूल मंत्री श्री.राणे यांना मी सांगू इच्छितो की, या सबंधीची मागणी तुम्ही आम्ही मी अशी दोघांनी मिळून केलेली होती . आता तुम्ही तिकडे गेलेला आहात हे पाप त्यांचे असून त्यांचे पाप तुम्ही कशाला आपल्या अंगावर घेत आहात ? कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे अशातला हा प्रकार आहे. हे पाप डॉ.पतंगराव कदम यांचे आहे आणि त्याचे ओझे मात्र श्री.नारायण राणे यांच्या खांद्यावर आलेले आहे.

**उपसभापती** : पणन मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांना बोलाविण्यात यावे. आता सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रस्ताव मांडावा.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी : सक्तीच्या कर्जवसुलीमुळे शेतक-यांनी मोठया प्रमाणावर केलेल्या

आत्महत्या

मु.शी : सक्तीच्या कर्ज वसुलीमुळे शेतक-यांनी मोठया प्रमाणावर केलेल्या आत्महत्या या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,मधुकर सरपोतदार नितीन गडकरी, विनोद तावडे,डॉ. नीलम गो-हे,श्री. मधुकर चव्हाण,डॉ. दीपक सावंत, श्रीमती कांता नलावडे,श्री.अरविंद सांवत यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी अनौपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी अडीच तास वेळ दिलेला आहे. सूचना देणारे माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

ज्या अर्थी, कापसाला 2700 रुपये भाव, शेतक-यांना मोफत वीज अशा घोषणा देऊन आघाडी शासन सत्तेवर आलेले आहे,

ज्या अर्थी, या घोषणांच्या विपरित कृती करुन आघाडी शासनाने शेतक-यांची घोर फसवणूक केलेली आहे,

ज्या अर्थी, कापसाला 2700 रुपये भावा ऐवजी जास्तीत जास्त 1980 रुपये भाव देऊन क्विंटल मागे 700 रुपयांचे शेतक-यांचे नुकसान केलेले आहे, 1980 रुपये भाव देण्यासाठी देखील पुरेशी कापूस खरेदी केन्द्रे सुरु केलेली नाहीत आणि या हंगामातील तसेच गत वर्षाच्या कापसाचे चुकारे अद्यापपावेतो दिलेले नाहीत,

ज्या अर्थी, शेत मालाला तुटपुंजा भाव, सिंचनाची अपुरी व्यवस्था, सततची नापिकी, प्रचंड भारनियमन, सक्तीची कर्ज वसुली, यामुळे शेतक-यांनी मोठया प्रमाणावर आत्महत्या केलेल्या आहेत,

ज्या अर्थी, कापसाप्रमाणेच ऊस, सोयाबीन,धान आदी पिकांना भाव देण्यातही शासनाने शेतक-यांची घोर फसवणूक केलेली आहे,

ज्याअर्थी, आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना मदत देण्यात शासनाने अक्षम्य उदासिनता दाखविलेली आहे आणि त्यामुळे आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या संख्येत सतत वाढ होत आहे,

4..



ज्याअर्थी,शेतक-यांकडून केल्या जाणा-या कर्ज वसुलीला तातडीने स्थगिती देण्याची तसेच आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची व आत्महत्या रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याअर्थी, या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी सभागृहा समोरील सर्व कामकाज स्थगित करुन या गंभीर विषयावर चर्चा करण्यात यावी.

यानतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/RJW/MHM/D. श्री.गायकवाड नंतर --- 13.10

श्री. फुंडकर ....

सभापती महोदय, हा विषय या राज्यातील शेतकऱ्यांच्या जीवनाशी अत्यंत निगडित असा आहे. महाराष्ट्र राज्य असे आहे की, या राज्यामध्ये कापूस, ऊस आणि धान या पिकांचे साधारणपणे तीन भाग आहेत, त्यांचे तीन निरनिराळे विभाग आहेत. विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि उत्तर महाराष्ट्राच्या काही भागामध्ये कापूस होतो., पश्चिम महाराष्ट्राच्या भागामध्ये ऊस होतो तर गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा आणि कोकणचा काही भाग यामध्ये धानाचे उत्पादन होते. असे या तीन पिकांचे साधारणपणे तीन विभाग महाराष्ट्रात पडतात. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून आणि या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून खरे म्हणजे या देशातील आणि राज्यातील शेतकऱ्यांची उपेक्षाच सत्तारूढ असलेल्या जवळपास प्रत्येक शासनाने केलेली आहे. या देशामध्ये आणि राज्यामध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून मध्यंतरी पाच वर्षाचा एनडीए सरकारचा कार्यकाल आणि पाच वर्षे युती सरकारचा कार्यकाल सोडला तर पूर्णपणे काँग्रेस पक्षाच्या हाती सत्ता होती. हा देश आणि हे राज्य यदेखील तसे पाहिले तर कृषी प्रधान आहे आणि तरीही या राज्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्येस प्रवृत्त होत आहेत ही एक मोठी शोकांतिका म्हणावी लागेल. या देशातील आणि राज्यातील देखील 70-75 टक्के लोक शेती करीत आहेत किंवा शेतीवर त्यांचे जीवनमान अवलंबून आहे. सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा पूज्य महात्मा गांधी यांनी राज्यकर्त्यांना असा संदेश दिला होता की, या देशाचा विकास करावयाचा असेल तर आपण हे पाहिले पाहिजे की, खरा हिंदुस्थान हा खेड्यामध्ये राहतो आहे, शेतीमध्ये राहतो आहे. म्हणून शेतीला प्रमुख उद्योगाचे स्थान द्या तसेच शेतकऱ्याने उत्पादन केलेल्या मालाचा भाव ठरविण्याचे अधिकार शेतकऱ्याला द्या, शेतीमालाच्या विक्रीची व्यवस्था करा त्याचबरोबर शेतीसाठी अल्पदराने कर्ज उपलब्ध करून द्या, शेतीमालावर आधारित कारखानदारी तालुका स्तरापर्यंत करा. परंतु महात्मा गांधींचे कोणीही ऐकले नाही. या देशातील तसेच राज्यात देखील शेतीला उद्योगामध्ये प्रमुख स्थान दिले गेले नाही तर शेती ही नेहमीच कनिष्ठ दर्जा म्हणून ओळखली गेली, वागविली गेली. 11 पंचवार्षिक योजना या देशामध्ये खर्ची पडल्या पण कोठल्याही योजनेमध्ये 10 टक्के पेक्षा अधिक रक्कम शेतकऱ्याच्या शेतीसाठी दिली गेली नाही. त्याचे परिणाम असे झाले की, कापूस, ऊस आणि धान पिकविणारा शेतकऱ्याला योग्य न्याय केव्हाच मिळाला नाही. त्याच्या मालाला योग्य भाव दिला गेला नाही. त्याच्या शेतीसाठी सिंचनाची व्यवस्था झाली नाही. त्याला पुरेशी वीज

..... एल 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

मिळाली नाही, त्याला अल्प दरामध्ये कर्ज पुरवठा झाला नाही. आणि आज शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या मोठ्या संख्येने होत आहेत त्यामागील प्रमुख कारणे हीच आहेत. महाराष्ट्र हा कापूस पिकविणारा प्रदेश आहे. 1972 यनंतर या राज्यामध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांपासून, सावकारांपासून संरक्षण दिले पाहिजे यासाठी तत्कालीन सहकार मंत्री माननीय श्री.यशवंतराव मोहिते यांनी कापूस एकाधिकार खरेदी योजना सर्वानुमते आणली. ही योजना म्हणजे त्यांचे एक स्वप्न होते. त्यामागे त्यांची संकल्पना अशी होती की, कापूस उत्पादनापासून कापडापर्यंतच्या सर्व प्रक्रियेचा मालक शेतकरी झाला पाहिजे. .....

( यानंतर श्री. सरफरे ..... एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, गेली 33 वर्षे सुरु असलेल्या या कापूस एकाधिकार योजनेचे काय झाले? कापसापासून कापडापर्यंत, जिनिंग प्रेसिंगपर्यंत शेतकरी या योजनेचा मालक आहे. या योजनेमध्ये सरकारने काय केले? सरकारने फक्त कापूस खरेदी करुन व त्याचे जिनिंग करुन त्याच्या गाठी बांधून त्या विकण्याचे काम केले. नंतर या कापूस एकाधिकार खरेदी योजनेच्या कायद्यामध्ये दुरुस्ती करुन नफा आला तर तो शेतकऱ्याचा आणि तोटा आला तर तो सरकारचा असे धोरण ठरविले. असे असतांना ही योजना तोटयात असल्यामुळे ती बंद करण्याचे सरकारचे कटकारस्थान चालू आहे. कापूस एकाधिकार खरेदी योजना ही राज्यातील शेतकऱ्याला कामधेनूप्रमाणे वाटत आहे, त्याच्या कापसाला संरक्षण देणारी ही योजना आहे. एका बाजूला त्याच्या कापसाला हमी भाव केंद्र सरकार ठरवीत होते, आणि त्या भावाप्रमाणे शेतकऱ्याला खरेदी भाव दिला जात होता. तसेच, बोनसच्या स्वरुपामध्ये त्या शेतकऱ्याला मदत दिली जात होती. मागील वर्षीपर्यंत त्याला बोनस दिला गेला. परंतु यावर्षी काय केले? यावर्षी तुम्ही जाहीर केले की, कापूस एकाधिकार खरेदी योजनेमध्ये जो शेतकरी कापूस घालील त्याला हमीभावापेक्षा एक छदामही देणार नाही. मागील वर्षी 2100 रुपये भाव दिला यावर्षी 1700 रुपयेपर्यंत भाव कमी केला. एका बाजूला तुम्ही सांगता की, आम्ही शेतकऱ्याच्या कर्जावरील व्याज माफ करु, परंतु तुम्ही ते केले नाही, नापिकी झालेल्या भागातील शेतकऱ्याच्या कर्जाचे हप्ते पाडले नाही. एका बाजूला तुम्ही त्याच्या कापसाला जेमतेम भाव देता, दुसऱ्या बाजूला त्या शेतकऱ्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर चढतो. नापिकीमुळे शेतातील उत्पन्न कमी झाल्यामुळे त्याच्या डोक्यावरील कर्जाचे प्रमाण दिवसें दिवस वाढत जाते. दुसऱ्या बाजूला खताचे भाव वाढले, बियाण्यांचे भाव वाढले, किटकनाशकाचे भाव वाढले. मजुरीचे दर वाढले, व्याजाचे दर वाढले. अशा परिस्थितीत तो शेतकरी उध्वस्त झाला. शेतावरील उत्पादन खर्चामध्ये वाढ झाली, परंतु त्या प्रमाणात त्याच्या शेतमालाच्या भावामध्ये वाढ झाली नाही. सभापती महोदय, मी फक्त एकच उदाहरण आपणास देतो की, 1972 साली सोन्याचा भाव 10 ग्रॅमला 200 रुपये होता व कापसाच्या खरेदीचा भावही 200 रुपये क्विंटल होता. याला बराच कालखंड लोटून गेला. आज सोन्याचा भाव साडे सात हजार रुपये आहे व कापसाचा भाव तुम्ही 1900 रुपये जाहीर केला. आपण शेतकऱ्याला मूर्ख समजता काय? 1900 भाव हा आपण कोणत्या कापसाच्या जातीला जाहीर केला? आमच्या अधिकाऱ्याना विचारले असता त्यांनी सांगितले की, एच 4 या जातीला 1900 रुपये भाव जाहीर केला. सभापती महोदय, बीटी कापूस आणि एच 4 कापूस हा किती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

एकरात होतो? हा कापूस या राज्यामध्ये फक्त 50 एकरामध्ये होतो त्याला आपण 1900 रुपये भाव देणार. आणि जो प्रचंड प्रमाणात लाखो क्विंटल कापूस शेतकरी टाकतात त्याला 1700 रुपये भाव देणार. अशाप्रकारे आपण शेतकऱ्यांना न्याय देणार काय? 2100 रुपये भावावरुन 1700 रुपये भावापर्यंत तो कमी करीत आणला. तुम्ही योजनेला आलेल्या तोटयाचे कारण सांगता. साडे पाच हजार कोटींचा तोटा असल्यामुळे ही योजना पुढे चालविण्याच्या मनस्थितीत सरकार नाही. अजूनपर्यंत खरेदी केंद्रेही सुरु झालेली नाही. माननीय पणन मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी लवकरच 100 केंद्रे सुरु करतो असे जाहीर केले. आणि पुढील 50 दिवसात राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये केंद्रे सुरु होतील असे सांगितले. आज आपण जावून पहा, राज्याच्या कापूस उत्पादन होणाऱ्या एकाही जिल्हयात एक किंवा दोन केंद्रावर केंद्रे सुरु झालेली नाहीत. मागील आठ दिवसात उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील जिल्हयामध्ये चौकशी केली, परंतु कोणत्याही जिल्हयामध्ये अजून केंद्रे सुरु झाली नाहीत. यावेळी माननीय पणन मंत्र्यांनी केंद्रावर काय व्यवस्था केली आहे? प्रत्येक केंद्रावर एक कर्मचारी राहील. तुम्ही केंद्रावर कापूस आणा, तुम्हीच त्याचे जिनिंग व प्रेसिंग करा, गाठी बांधा, आम्ही त्या गाठी विकत घेवू. कोणता जिनिंगवाला या गाठी विकत घेणार आहे? या सरकारची आज पत राहिलेली नाही. जिनिंग व प्रेसिंगवाल्यांनी जाहीर केले की, तुमच्या सरकारची पत जिनिंग प्रेसिंगवाल्याजवळ राहिली नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

जिनिंग-प्रेसिंगवाल्यांनी जाहीर केले आहे की, जोपर्यंत आमचे मागच्या वर्षीचे पैसे देणार नाही, तोपर्यंत पणन महासंघाची एक बोंडही जिनिंग करु देणार नाही आणि कापूस खरेदी न करण्याचे हे खरे कारण आहे. म्हणजे एका बाजूला कापूस खरेदी करणार नाही, शेतकऱ्याला कमी भाव देणार. त्यामुळे त्याचे कर्ज फिटणार नाही आणि ते दामदुप्पट,तिप्पट,चौपट होणार, मग त्याच्या कर्जाची वसूली होणार. त्यावेळी त्याच्या घरातील सामान काढून त्याला रस्त्यावर आणणार. अशा वेळी शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करणार आहे ? असे दुष्टचक्र सुरु झालेले आहे.या शेतकऱ्यांना सरकारने प्राधान्य दिले नाही. आतापर्यंत जेवढया शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्यापैकी किती लोकांना शासनाने मदत केली आहे ? टाटा सोशल इन्स्टीटयूट आणि इंदिरा गांधी इन्स्टीटयूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च यांनी यासंबंधात जो अहवाल दिलेला आहे, तो मी मघाशी वाचून दाखविला. त्यांनी आपल्या अहवालात सांगितले आहे की, या राज्यातील 92 टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या नापिकी आणि कर्जामुळे झालेल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. परवा आम्ही दारव्हा येथे गेलो होतो, तेव्हा तेथील शेतकऱ्यांच्या मुलाने सांगितले की, 5 एकरात फक्त 5 क्वींटल कापूस झाला आणि तुम्ही त्याला 1700 एकर भाव देणार. आज एका एकराला महागडे बियाणे, महागडे खत आणि इंजिन वापरावयाचे असेल तर एकरी तीन ते चार हजार रुपये खर्च येतो. सध्या बियाणांचे भावही वाढलेले आहेत. सध्याच्या परिस्थितीत बीटी-कॉटन हे बियाणे वापरावयाचे असेल तर एका क्वींटल साठी 3 लाख रुपये द्यावे लागतात. अशा प्रकारचे महागडे बियाणे वापरल्यानंतर जर निसर्गाने लहरीपणा केला, पिकावर "लारा" नावाचा रोग आला आणि शेतकऱ्यांचे पीक उध्वस्त झाले तर त्या शेतकऱ्याची काय अवस्था होईल ? महागडे बियाणे, महागडी खते, शिवाय बँकेकडून घेतलेले कर्ज यातून त्या शेतकऱ्यांची सुटका होत नाही आणि त्याचा परिणाम असा होतो की, त्याला आत्महत्या करावी लागते. मघाशी सांगितल्याप्रमाणे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. तोपर्यंत त्यांनी काही जाहीर केले नाही. ते आतापर्यंत असे सांगत होते की, एवढया आत्महत्या झाल्या नाहीत. विरोधी पक्षाने वेळोवेळी शासनाच्या ही बाब निदर्शनास आणली होती की, राज्यात एवढया प्रमाणात आत्महत्या झाल्या आहेत. यासंदर्भात "देशोन्नती", "दैनिक सकाळ" यासारख्या वर्तमानपत्रांनी देखील राज्यात एवढया आत्महत्या झालेल्या आहेत याची माहिती दिली होती. आतापर्यंत ग्रामीण भागातील लोक

. . . .एन-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

पेपर उघडल्यानंतर वरली-मटक्याचे आकडे पहात होते.पण आता पेपर उघडल्यानंतर हे आकडे पहात नाहीत, तर राज्यात किती आत्महत्या झाल्या आहेत हे पाहतात ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्र हे एक अग्रगण्य राज्य आहे असे म्हणून आम्ही आपली पाठ थोपटून घेतो. पण या राज्यातील शेतकऱ्यांना मदत करीत नाही आणि इतर राज्यांमध्ये काय स्थिती आहे ? मी आंध्र प्रदेशाबाबत सांगेन की, तेथील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यावर या देशाचे माननीय पंतप्रधान तेथे भेट देण्यासाठी जातात. तेथील शेतकऱ्यांसाठी पाच हजार कोटीचे पॅकेज जाहीर करतात. आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना 2 लाख रुपयांची मदत करतात. पण आपल्या राज्यात उलट स्थिती आहे. आपल्या राज्यातील माननीय मुख्यमंत्र्यांना याची चिंता नाही. पण आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांनी जेव्हा आत्महत्या केली, तेव्हा तेथील माननीय मुख्यमंत्र्यांनी दिल्लीला जाऊन माननीय पंतप्रधानांना सांगितले की, आमच्या राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, तेव्हा त्यासाठी काही मदत करावी, शेतकऱ्यांना मदत करा. मात्र आपल्या राज्यात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना महत्व नाही. परंतु येथे दंगल झाली, घरे पेटविली गेली, तलवारी निघाल्या, गोळीबार झाला तर त्यामध्ये मृत झालेल्यांच्या कुटुंबियांना 2 लाख रुपयांची मदत लगेच दुसऱ्या दिवशी घरपोच दिली जाते. या राज्यात दंगलखोरांना दोन-दोन लाख रुपये दिले जातात पण जो अन्नदाता शेतकरी आहे, जो जगाला अन्न देणारा शेतकरी आहे, काळया आईची सेवा करणारा जो शेतकरी आहे, त्यासाठी आपले रक्त आटवणारा शेतकरी आहे, तो जेव्हा आत्महत्या करतो, तेव्हा त्याच्या कुटुंबियांना मदत दिली जात नाही. तर त्याच्या मरणाची खिल्ली उडविली जाते आणि त्याच्या बाबतीत असे सांगितले जाते की, हा शेतकरी दारु पित होता, तो व्यसनाधीन झाला होता, याला आजार झाला होता अशी वाटेल तशी कारणे दिली जातात आणि हे प्रकरण आत्महत्तेचे होऊ नये यासाठी तहसिलदारापासून ते कलेक्टरपर्यंत प्रयत्नशील असतात. त्यामुळे शेतकरी मदतीपासून वंचित होतो. मी अशी अनेक उदाहरणे तुमच्यासमोर देऊ शकतो. ज्या शेतकऱ्यांकडे राज्य सहकारी बँकेचे, भूविकास बँकेचे, ग्रामीण बँकेचे कर्ज आहे, ते कर्ज फिटले नाही म्हणून या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या राज्यात केवळ शेतकरीच आत्महत्या करीत नाहीत तर शेतकऱ्यांची मुलेही आत्महत्या करीत आहेत. आठ दिवसापूर्वी "लोकसत्ते" मध्ये मराठवाडयामध्ये घडलेल्या प्रकरणाबाबत माहिती आली होती. त्यामध्ये म्हटले होते की, त्या शेतकऱ्याला तीन मुली

. . . .एन-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

होत्या. त्या उपवर झाल्या होत्या. या शेतकऱ्याकडे पाच एकर शेती होती. त्यात 25 क्वींटल कापूस झाला. तो कापूस त्याने फेडरेशनला विकल्यावर त्याचे शेतकऱ्याला पैसे दिले गेले नाहीत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

बापाला मुलीचे लग्न करावयाचे होते, मुलीचे लग्न ठरले, वराकडून हुंडा मागितला गेला, परंतु हुंडा देता आला नाही म्हणून मुलीचे लग्न मोडले. यामुळे बाप रडायला लागला. मुलीला ते दु:ख सहन झाले नाही, त्यामुळे मुलीने विहिरीमध्ये उडी टाकून आत्महत्त्या केली. याला कोण जबाबदार आहे ? त्या शेतकऱ्याच्या कापसाचे पैसे तीन हप्त्यामध्ये न देता एकदम नगदी पैसे दिले असते तर त्याच्या मुलीचे लग्न झाले असते. मुलगी उपवर झाली. मुलीने स्वत: चिठ्ठी लिहून ठेवली की, "माझ्या लग्नासाठी माझ्या बापाला आत्महत्त्या करण्याची पाळी येणार असेल तर मी माझे जीवन संपविते". अशाप्रकारे त्या मुलीने आत्महत्त्या केली. अशाप्रकारे पुढे शेतकऱ्याच्या कुटुंबाला आत्महत्त्या करावी लागेल. शासनाने कापसाचे पैसे दिले नाहीत म्हणून शेतकरी आपल्या मुलाला मेडिकल, इंजिनियरींग कॉलेजचे शिक्षण देऊ शकत नाही. तेवढी फी भरण्याची शेतकऱ्याची कुवत नाही. शेतकऱ्याची मुलाला शिक्षण देण्याची इच्छा असूनही उच्च शिक्षण देऊ शकत नाही, मुलीचे लग्न करु शकत नाही, घर बांधू शकत नाही, अशाप्रकारची शेतकऱ्यांची अवस्था सरकारने करुन टाकलेली आहे. 1 हजार आत्महत्त्या झाल्याचे सरकारने मान्य केलेले आहे. मला या निमित्ताने सरकारकडे मागणी करावयाची आहे की, 1,042 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे साहेब, आपण युतीच्या काळामध्ये मुख्यमंत्री होता. युतीच्या काळामध्ये राज्यामध्ये दोन शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या होत्या. मला आठवते की, त्यावेळेस आपण मुख्यमंत्री असतांना त्या शेतकऱ्यांच्या घरी जाऊन प्रत्येकी दोन लक्ष रुपयाची मदत दिलेली आहे. या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले आहे की, 1046 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या या नापिकामुळे आणि कर्जामुळे झालेल्या आहेत. आता आमची मागणी आहे की, या आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना किती दिवसामध्ये किती रुपयाची आपण मदत देणार आहात ? याचा खुलासा करावा. आंध्र प्रदेशमध्ये काँग्रेस पक्षाचे सरकार आहे. तेथील सरकार दोन लक्ष रुपयाची मदत देऊ शकते] त्याप्रमाणे महाराष्ट्र सरकार येथील शेतकऱ्यांना 2 लक्ष रुपयाची मदत देणार आहे काय ? ज्याप्रमाणे आंध्र प्रदेशला देशाच्या पंतप्रधांनी पॅकेज जाहीर केले, तसे या महाराष्ट्र राज्यालाही मिळाले पाहिजे. तशी पत महाराष्ट्र सरकारची केंद्राकडे आहे. केंद्रामध्ये काँग्रेसचेच सरकार आहे. या देशाचे कृषी मंत्री मा.शरदचंद्र पवार साहेब यांच्याबद्दल आदर आहे. परंतु ते दिल्लीला गेल्यानंतर त्यांनी साखरकारखान्यांसाठी 5 हजार कोटीचे पॅकेज जाहीर केले. परंतु कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ते विसरले. त्यांच्यासाठी पॅकेज जाहीर केले नाही. काय चुकले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

माहीत नाही. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्यादृष्टीने कारखान्यांनी भाव जाहीर करण्याच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांनी कारखान्यांनी 800 रुपये क्विंटलच्या वर भाव दिला तर कारखान्यांची लायसन्स रद्द करु, याद राखा, अशाप्रकारचा दम कारखान्यांना दिलेला आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या कारखाना परिसरामध्ये ऊस घालण्याच्या संदर्भात झोन बंदी केली होती ती नंतर उठविली गेली. आता पुन्हा झोन बंदी करण्याच्या विचारात सरकार आहे. तसेच गुऱ्हाळ बंदी करण्याच्या विचारात आहे. शेतकऱ्यांनी आपल्याला निवडून दिलेले आहे त्यांचा विचार सरकार करत नाही. त्यांच्यासाठी गेल्या सहा वर्षापासून कोणतेही धोरण आखत नाही. म्हणून 1 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. तसे अधिकृत आकडा रेकॉर्डवर आलेला आहे. वर्तमानपत्रामधून आत्महत्त्येचा 1,200 चा आकडा आहे. सहा वर्षात 1,200 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. श्री.राणे साहेब, आपण दबाव तंत्राचा वापर करता. तसा दबाव तंत्राचा वापर केला नाही तर  वर्षामध्ये 365 आत्महत्त्या होतील. पुढे तासाला एक या प्रमाणे् आत्महत्त्या होतील, पुढे असेच चालू राहिले तर मिनिटाला शेतकऱ्याला मरावे लागेल.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

इतक्या प्रकारची गंभीर स्थिती या राज्यामध्ये झालेली आहे. या राज्यात मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशात कापूस पिकविणारा शेतकरी आहे. तो कापसाला पांढरे सोने मानतो. कापसाला नगदी पीक समजतो. त्या कापूस उत्पादक शेतक-यांची आज अशी उवस्था झालेली आहे. मी आजच वर्तमानपत्रात वाचले की, विदर्भात सिंचनाची टक्केवारी पाच ते सात टक्क्यावर नाही. या राज्याचे मुख्यमंत्र्यांनी विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील शेतक-यांना एक प्रेमाचा सल्ला दिला आहे. काय सल्ला दिला ? म्हणे आता विदर्भ आणि मराठवाडयातील शेतक-यांनी कापसाचे पीक घेणे सोडून द्यावे आणि ऊसाचे पीक घ्यावे. येथे ऊसाचे पीक कसे येईल? ऊसाचे बीन पाण्याचे बेणे माननीय मुख्यमंत्र्यांनी आणून दिले तर आम्ही शेतक-यांना सांगू की, हे बीन पाण्याचे बेणे आहे. पाऊस आला नाही तरी हे बेणे उगवते अशा प्रकारचे एखादे संशोधन माननीय मुख्यमंत्र्यंनी केले असेल तर ते आम्हाला सांगावे. आम्ही ते शेतक-यांना सांगू. तुम्ही असले कसले सल्ले देता? जे नगदी पीक आहे. विदर्भातील शेतकरी, मराठवाडयातील शेतकरी, खानदेशातील शेतकरी पिढयांपिढया कापूस पिकवितो, पांढरे सोने पिकवितो. त्या शेतक-याला तुम्ही हा सल्ला देता.? कापसाला भाव देता येत नाही म्हणून हा सल्ला देता ? भाव देता येत नाही म्हणून कापूस खरेदी करता येत नाही म्हणून शेतक-याचे लक्ष डायव्हर्ट करता ? कर्जावरील व्याज माफ करता येत नाही म्हणून डॉ. पतंगरावजी तुम्ही डायव्हर्ट करता की, हे आमचे पाप नाही.या राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, शेतक-यांच्या आत्महत्या हया बँकेच्या कर्जामुळे, राज्य सहकारी बँकेच्या कर्जामुळे, जिल्हाबँकेच्या कर्जामुळे, भूविकास बँकेच्या कर्जामुळे झालेल्या नाहीत. तर मग हया कोणामुळे झालेल्या आहेत ? तर म्हणे हे आत्महत्त्येचे पाप आमचे नाही, हे पाप सावकाराचे आहे. या निमित्ताने मी जाहीर करणार आहे की, टाटाचा इंदिरा इन्स्टिटयुटच्या रिपोर्टमध्ये त्यांनी 92 टक्के आत्महत्त्या कर्जामुळे झाल्या असे सांगितले आहे. जेवढया आत्महत्त्या झाल्या आणि आत्महत्त्येचा जो आकडा शासनाने जाहीर केला आहे त्या आत्महत्त्येपैकी सावकाराच्या कर्जापोटी किती आत्महत्त्या झाल्या हे डॉ. पतंगराव आपण सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहात काय? याही प्रश्नाचे उत्तर द्यावे. सावकाराला बदनाम करता? कोपरापासून ढोपरापर्यंत त्याची साल काढा असे सांगता. उलट तुम्ही आता शेतक-यांच्या आत्महत्त्या वाढविणार आहात. माझा दावा आहे की, तुम्ही सावकाराचे दरवाजे बंद केले. एका बाजूला बँकेत शेतकरी डिफॉल्टर झाला.दुस-या बाजूला त्याची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

बाजारात पत राहिलेली नाही. तिसरा सावकार होता, जो अडत्या होता तो हंगामाच्या करारावर शेतक-याला पैसे देत होता. पैसे घे. हंगामात कापूस आला की, तो माझ्याकडे आण. त्या कापसातून तुला दिलेले पैसे कापून घेईन. शेतक-याला तो एक आधार होता. तोही आधार शासनाने बंद केला.हा कायदा कडक केला तर शेतक-यांच्या आत्महत्त्येत वाढ होणार आहे.आपले पाप दुस-यावर ढकलू नका. हे मान्य करा की, हे आमच्यामुळे घडले. जर 1042 शेतक-याच आत्महत्या तुम्ही मान्य करता तर हेही मोकळयामनाने मान्य करा की, ठीक आहे. आमचे चूकीचे धोरण होते. आम्ही कापसाला भाव दिला नाही. आम्ही शेतक-याच्या कर्जावरील व्याज माफ केले नाही. आम्ही वीज दिली नाही,आम्ही त्याच्या सिंचनाची व्यवस्था केली नाही, त्याच्या मालाला भाव दिला नाही म्हणून शेतकरी मेला हे खरे आहे एवढे तर मान्य करा. ज्वारीची काय अवस्था आहे. आज ज्वारी खरेदी केंद्र सुरु झाल्याचे नाटक केले.प्रत्येक ठिकाणी लोक प्रतिनिधींना बोलावून येथील ज्वारीचे खरेदी केंद्र सुरु केली असे सांगितले. त्या ज्वारीला 550 रुपये भाव दिला. डॉ. पतंगराव कदम आपण जसा भूविकास बँकेचा आदेश तपासून पाहाणार आहात तसा हाही आदेश तपासून पहा.

डॉ. पतंगराव कदम ( सहकार, पुनर्वसन व मदत ) : भूविकास बॅकेंच्या संदर्भात वनटाईम सेटलमेंटची कायद्यात दुरुस्ती केलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : तुमचे एक सर्क्युलर गेलेले आहे की,ज्वारी खरेदी केंद्र सुरु करा पण एकरी 8 क्वीन्टलच्यावर ज्वारी खरेदी करु नका. जर शेतक-याच्या शेतात एकरी 25 क्विन्टल ज्वारी पिकली असेल तर त्यापैकी फक्त 8 क्विन्टल ज्वारी शासन घेणार बाकीची ज्वारी त्या शेतक-याने कोणाला द्यावयाची ? व्यापा-याला ? एकदा ज्वारी खरेदी केंद्र सुरु केल्या नंतर जेवढी ज्वारी पिकली असेल तेवढी घेण्याची शासनाची जबाबदारी आहे. मक्याची खरेदी सुरु नाही आणि सोयाबीनची अवस्था वाईट झालेली आहे. माननीय मुख्यमंत्री शेतक-यांना सल्ला देतात.

विदर्भातील शेतकरी कापसाऐवजी सोयाबीनचे पीक घ्यावयास तयार आहे पण सोयाबीनच्या खरेदीची काय अवस्था आहे? सोयाबीनच्या खरेदीची व्यवस्था नाही. तीन वर्षापर्वी या देशात केंद्रात अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार होते. सभापती महोदय, धोरण बदलले. आयात शुल्क वाढविले. परदेशातील तेल येऊ दिले नाही....

यानंतर श्री. खर्चे...

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फंडकर .......

आयात शुल्क वाढविले आणि परदेशातील तेल आपल्या देशात येऊ दिले नाही म्हणूनच आपल्या देशातील सोयाबीनला 1800 रुपयेपर्यंत भाव मिळाला होता आणि कापसाला सुध्दा चांगला भाव दिला होता. गॅट करारामुळे कदाचित हा माल येतो असे जरी म्हणालात तरी शेवटी आयात शुल्क आपल्या हातात आहे. म्हणून शेतकऱ्याने पिकविलेल्या कापसाला जर भाव द्यावयाचा असेल तर 60 टक्के आयात शुल्क लावले पाहिजे, जेणेकरुन बाहेरचा कापूस राज्यात येणार नाही. पण गिरणी मालकांना हे सरकार चुचकारायला लागले आहे. त्याचा परिणाम म्हणून परदेशातील स्वस्त कापूस आयात करायचा आणि हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना आत्महत्त्या करायला भाग पाडायचे, म्हणून माझे म्हणणे असे आहे की, या शासनाने आत्मचिंतन करण्याची वेळ आलेली आहे. एकीकडे दंगलखोरांना दोन लाख रुपये दिले जातात आणि जो शेतकरी आपल्याला अन्न खायला घालतो त्याला मात्र छदाम फेकून मारायचा नाही ही या राज्यातील स्थिती आहे. म्हणून या राज्यातील शेतकऱ्यांना अत्यल्प दराने कर्जपुरवठा केला पाहिजे अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. परंतु "पतिव्रतेच्या गळयात धोंडा आणि वेश्येला मणिहार" अशा प्रकारे हे शासन राज्यातील जनतेशी वागत आहे. जो मारतो, तलवारी काढतो त्याला दोन लाख रुपये आणि अन्नधान्याचा पुरवठा करणा-याला मात्र काहीच मिळत नाही, त्याच्या कापसाला भाव देखील देत नाही. आपल्या राज्यात शेतकऱ्यांना आज किती टक्क्यांनी कर्जपुरवठा करण्यात येतो याचा खुलासा मंत्री महोदयांनी केला तर बरे होईल. कारण नाबार्डकडून मुळात 5 टक्क्याने जिल्हा सहकारी बँकेला पैसे देण्यात येतात. जिल्हा बँक 3 टक्क्याच्या फरकाने कर्जाचा पुरवठा सोसायटयांना करते, व सोसायटया शेतकऱ्यांना 3 टक्क्याच्या फरकाने कर्जाचे वाटप करतात. अशा प्रकारे ही थ्री टायर सिस्टीम असून या सिस्टीममार्फत शेतकऱ्यांना कर्ज दिले जाते. त्यात प्रोसेसिंग फी वगैरे ॲड केली जाते. नाबार्डबाबत मी समजू शकतो की, बँकेचा खर्च वगैरे त्यात असतो परंतु एक टक्क्याने जर हा कर्ज पुरवठा केला तरी त्यात 3 टक्के वाढ होऊन केवळ 7 टक्क्यानेच शेतकऱ्यापर्यंत कर्जपुरवठा होऊ शकतो, असे केले तर काय बिघडणार आहे. परंतु जो सध्याचा 14 टक्के कर्जाचा व्याज दर आहे त्या दराने कर्ज फेडणे जर शेतकऱ्याला शक्य झाले नाही तर ते 18 टक्क्याने थकित म्हणून वसुली करण्यात येते व त्याची रक्कम वाढत जाते. असे म्हणतात की, या जगात कुठलीही वस्तू थांबते, माणसाचे हृदय थांबते, इंजिन देखील थांबते परंतु व्याजाचा दर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फंडकर .......

हा कधीच थांबत नाही, तो अव्याहतपणे सुरुच असतो व अशा व्याज दरापुढे शेतकरी कसा टिकेल हा माझा प्रश्न आहे. म्हणून माझी सूचना आहे की, या कर्जपुरवठयाच्या संदर्भात जी थ्री टायर सिस्टीम शासनाने सुरु केली आहे त्याऐवजी टू टायर सिस्टीम सुरु करावी व शेतकऱ्यावरील व्याजाचा दर कमी करावा. एकीकडे स्कोडासारख्या ऐषआरामी गाडया खरेदी करण्यासाठी 7 टक्के व्याजाने कर्जपुरवठा होण्याची व्यवस्था आहे, घरबांधणीसाठी कमी व्याजाचा म्हणजेच 8 टक्क्याने कर्ज उपलब्ध होऊ शकते परंतु शेतकऱ्याला मात्र 14 टक्क्याने कर्ज आणि ते जर थकले तर त्याचे रुपांतर 18 टक्क्यात होऊन त्यात प्रोसेसिंग फी, वसुली अधिकाऱ्याचा खर्च आणि सरचार्ज अशी रक्कम होऊन हा व्याज दर 20 टक्क्यापर्यंत जातो. याबाबत शासनाकडून सांगण्यात येते की, सावकाराकडून 10 टक्क्यांनी कर्ज शेतकरी घेतात, पण किती सावकार असे कर्ज देणारे आहेत, उगाच सावकाराला बदनाम करु नका तर त्याच्या पापाचे वाटेकरी, त्याला जबाबदार हे शासन आहे अशी कबूली मंत्र्यांनी दिली पाहिजे, जशी कबुली मा. मुख्यमंत्र्यांनी काल दिली त्याप्रमाणे आपण देखील मान्य करावे. म्हणजे मंत्री महोदय, जे बोलले ते केले पाहिजे अशी माझी सहकार मंत्र्यांना विनंती आहे. कारण तुमचा जो जाहीरनामा होता त्याप्रमाणे आपले प्रयत्न नसून त्या जाहीरनाम्याची एक प्रकारे खिल्ली उडविण्याचे काम आपण करीत आहात. मागील अधिवेशनात मी मा. मुख्यमंत्र्यांना विचारले होते की, 2700 रुपये क्विंटलप्रमाणे भाव देण्याबाबत आपण जाहीरनाम्यात म्हटलेले आहे काय, त्याला मुख्यमंत्र्यांनी "होय" असे उत्तर दिले. त्यावर मी विचारले की, मग त्यानुसार कापसाचा भाव का देत नाहीत, तर मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, ते भाव मागील मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते म्हणून ते देण्याची जबाबदारी आमची नाही. माननीय उपमुख्यमंत्र्यांना विचारले असता त्यांनी देखील 2700 रुपये भाव देण्याबाबत "हो" असे उत्तर दिले होते. आम्ही त्यांना म्हटले की, जर भाव देत नाहीत तर मग कबूल कशाला केले ? त्यावर त्यांनी सांगितले की 2700 रुपये भाव याच वर्षात दिला पाहिजे असे कुठे आहे, 5 वर्षात कधीही तो देऊ. अशा प्रकारे 2100 चा भाव या शासनाने 1700 वर आणला आहे, ही खेदाची बाब आहे. शासनाने कापसाला जर 2700 रुपये भाव द्यावयाचा नव्हता तर कबूल कशाला केले. राज्यातील शेतकऱ्यांचा विश्वासघात केला, शेतकऱ्याशी दगाबाजी केली आणि दगाबाजी करुन सत्ता मिळविली व पुढच्या बाकावर जाऊन बसले, अशा प्रकारे शेतकऱ्याचा विश्वासघात करणे या शासनाला महाग

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

पडणार आहे. म्हणून निदान राज्यातील शेतकऱ्यांचा विचार करुन बोलल्याप्रमाणे वागा, कापसाला 2700 रुपये भाव द्या. विजेच्या संदर्भात आज मी बोलणार नाही. राज्यात विजेचे कनेक्शन्स सर्व ठिकाणी तोडणे सुरु आहे. एका बाजूला राज्यात अनेक जिल्हयात दुष्काळी परिस्थिती आहे. बुलडाणा, धुळे, जळगांव सारख्या ठिकाणी दुष्काळ पडलेला आहे, या दुष्काळी परिस्थितीत देखील विजेचे कनेक्शन्स तोडणे सुरुच आहे.

( यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडूरंग फुंडकर.....

सभापती महोदय, ज्यावेळेस निवडणूका जाहीर झाल्या त्याच्या एक महिना आधी या सरकारने शेतक-यांना झीरोचे वीज बील दिले होते त्यावेळेस गरीब, भाबडया शेतक-याला वाटले की, या सरकारने वीज बील माफ केले आहे. परंतु निवडणूकीनंतर पवार साहेबांनी सांगितले की, शेतक-यांना वीज बील माफ करता येणार नाही. सभापती महोदय, आंध्र सरकारने तसेच पंजाब सरकारने शेतक-यांसाठी वीज बील माफ केलेले आहे. तेथे सुध्दा कॉंग्रेसचेच सरकार आहे. त्यांना हे करता येते तर मग तुम्हाला का करता येत नाही? तेथील शेतक-याला दोन लाख रुपये अनुदान दिले जाते. परंतु महाराष्ट्र राज्यात वीज बील माफ केले जात नाही तसेच शेतक-यांना 2 लाख रुपये अनुदान सुध्दा दिले जात नाही. सभापती महोदय, या राज्यात आघाडी सरकार आहे त्यामुळे आपापसात पटत नसावे परंतु येथील सरकारने दोघांनाही मते दिलेली आहे. त्यांच्या मतामुळेच आज तुम्ही सत्ताधारी बाकावर बसलेले आहात हे आपण विसरु नका. आपण एकमेकांशी सहमत झाला नाही तरी चालेल परंतु शेतक-याच्या प्रश्नाच्या संदर्भात तरी आपण सहमत व्हा, शेतक-यांना मदत करा. शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या पाहिजेत. हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांचा आहे. संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी जास्त आत्महत्या करतात ही बाब तरी आता घडू देऊ नका. यासाठी तरी किमान आपण एकत्र या. आज महाराष्ट्र कुठल्या प्रगतीवर आहे तर आत्महत्येच्या बाबतीत तो अग्रेसर आहे. त्यामुळे आता तरी ही पाळी आपल्या महाराष्ट्रावर येऊ देऊ नका त्यामुळे याबाबतीत आपण गांभीर्याने विचार करावा. या सरकारने ऊसासाठी जसे पॅकेज दिले तसेच पॅकेज शेतक-यांनाही द्यावे. आपले सरकार दिल्लीमध्येही आहे आणि येथेही आहे. त्यामुळे दिल्लीच्या दरबारी आपले वजन वापरुन शेतक-यांसाठी विशेष पॅकेज द्या. दिल्लीमध्ये माननीय पवार साहेब हे कृषीमंत्री आहेत त्यामुळे आपण त्याचा उपयोग करुन महाराष्ट्रातील शेतक-यांना न्याय मिळवून द्यावा व महाराष्ट्रातील शेतक-यांसाठी पॅकेज द्यावे. माननीय पंतगराव साहेब आपण मुख्यमंत्री पदासाठी आपले वजन खर्ची घालता तसेच ते वजन आपण शेतक-यांसाठीही खर्ची घालावे. शेतक-यांसाठी जर वजन खर्ची घातले तर महाराष्ट्रातील शेतकरी आपल्याला आशिर्वाद दिल्याशिवाय राहणार नाही. आपण जर शेतक-यांसाठी 5000 कोटी रुपयांचे पॅकेज दिले, कापूस उत्पादक शेतक-याला 2700 रुपये भाव मिळवून दिला तर महाराष्ट्रातील शेतकरी जनता आपल्याला कधीही विसरणार नाही. आपल्याला सूपर्ण महाराष्ट्र डोक्यावर घेईल.

....2....

06-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) R-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडूरंग फुंडकर.....

शेतक-यांशी आपण जो विश्वासघात केलेला आहे तो डाग जर आपल्याला पुसायचा असेल तर कापसाला 2700 रुपये भाव आणि आत्महत्या करणा-या कुटूंबियाला 2 लाख रुपये हे अधिवेशन संपण्याच्या आत शेतक-याच्या घरी पोहचतील अशी व्यवस्था करावी एवढी मागणी करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ MHM/

श्री. नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदविधर ) : सभापती महोदय, आज या सभागृहात अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. शेतक-यांच्या आत्महत्या या विषयावर या सभागृहामध्ये 3 वेळा सभात्याग आणि 7 वेळा चर्चा उपस्थित झालेली आहे. या सभागृहामध्ये आम्ही शेतक-यांनी केलेल्या आत्महत्येच्या संदर्भात वेळोवेळी आकडेवारी दिलेली आहे. ज्या शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यांच्या कुटूंबियांना 1 लाख रुपये मदत द्यावी अशी मागणी आम्ही अगोदरच केलेली आहे. मागच्या सरकारमध्ये ज्यावेळी मा. विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री होते त्यावेळी ज्या शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यांच्या कुटूंबियांना 1 लाख रुपये मदत द्यावी अशी मागणी केली होती त्यावेळेस आमच्या सोबत मा. नारायणराव राणे हे सुध्दा आमच्या बरोबर होते. आम्ही मागणी केल्यानंतर सरकारने मान्य केले की, युतीसरकार प्रमाणे ज्या शेतक-यांनी आत्महत्या केल्या होत्या त्यांना 1-1 लाख रुपये मदत दिली होती तशीच मदत आम्ही सुध्दा देऊ. परंतु मा. विलासराव देशमुख दिलेल्या वचनाप्रमाणे वागले नाहीत. ज्या शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यांच्या कुटूंबियांना या सरकारने मदत दिली नाही. आतापर्यंत 1200 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यासंदर्भात मा. मुख्यमंत्र्यांनी पहिल्यांदाच मान्य केले आहे की, 1024 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात इंदिरा गांधी इन्स्टीटयू अँड डेव्हलपमेंट तसेच टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्स यांनी यासंदर्भात रिपोर्ट दिलेला आहे. हा जो रिपोर्ट आहे तो महाराष्ट्र सरकारने आणलेला नाही.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी : तालिका सभापती श्री.जगन्नाथ शेवाळे)**

श्री.नितीन गडकरी....

मुंबई हायकोर्टामध्ये चीफ जस्टीस यांच्या समोर रिट पिटीशन दाखल झाले. त्यावेळी मुख्य न्यायाधिशांनी दोन संस्थांना चौकशी करण्यास सांगितले. त्यासंबंधीच्या रिपोर्टची प्रत माझ्याकडे आहे. हा जो रिपोर्ट आहे, त्याचा श्री.नारायण राणे यांनी विचार केला पाहिजे. टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सच्या रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आले आहे की, "A Committee of eminent persons, representatives from the institute and voluntary organisation be set up to arrive at complete list of farmers who have committed suicide. This Committee may have specific time limit to submit a comprehensive list to the court. The court should direct the district officials to investigate the circumstances leading to farmers suicide. Our investigation report from activists in the filed show that suicide by farmers are not clearly registered and investigated." काय करावे या सरकारने ? हा अहवाल मिळाला नसता तर सर्व प्रकरण दडपले गेले असते. हा विषयच संपला असता. या प्रकरणी कलेक्टर आणि एस.पी.यांनी काय केले आहे...... ? आम्ही हजारो शेतकऱ्यांच्या याद्या दिल्या. सन्माननीय श्री.नारायण राणे साहेब यांना आठवत असेल की, ते आणि मी जेव्हा विरोधी पक्ष नेते पदी होतो तेव्हा माननीय राज्यपाल महोदयांना किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे, त्यासंबंधीची यादी दिली होती. पण या सरकारने त्याला केराची टोपली दाखविली. परंतु, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत होत्या हे वर्तमानपत्रात छापून येत होते. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. आता हायकोर्टाने समिती नियुक्त केली आहे. श्री.राणे साहेब आपल्या जिल्हाधिकाऱ्यांनी आणि श्री.आर.आर.पाटील साहेब यांच्या एस.पींनी जिल्हया जिल्हयामध्ये आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे खोटे पंचनामे तयार केले आहेत. त्यामुळेच हायकोर्टाने मुख्य सचिवांना ऑर्डर दिलेली आहे की, आपण यासंबंधी तीन आठवडयामध्ये चौकशी करा आणि निर्णय घ्या. यासंबंधी शासनाने काय अहवाल दिला ? दारूच्या अतिसेवनामुळे, मानसिक संतुलन बिघडल्यामुळे शेतकऱ्यांचा मृत्यु झालेला आहे. माझे तर असे म्हणणे आहे की, शेतकऱ्यांचे संतुलन बिघडले नसून मा.मुख्यमंत्री

....2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांचे संतुलन बिघडले आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी काय केले ते सांगतो. त्यांनी लोकसत्तामध्ये लेख लिहिला. तो मी वाचला म्हणून सांगू इच्छितो की, खोटे लिहिण्यालासुध्दा मर्यादा असते. बाकीच्या बाबतीत ते हुशार आहेत. एखादा विषय डायव्हर्ट कसा करावा हे त्यांना चांगले ठाऊक आहे. म्हणून मी त्यांना 'पोपटलाल' नाव ठेवू इच्छितो. या निमित्ताने मला "....नवीन पोपट हा लागला विठू विठू बोलायला...." या गाण्याची आठवण येते. महत्त्वाचा विषय आला की, ते बरोबर डायव्हर्ट करतात. सावकारी पाशामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असा उल्लेख त्यांनी केला आहे. श्री.राणे साहेब आपण महसूल मंत्री आहात. आजही विदर्भातील शेतकऱ्यांच्या 7/12 वर कर्ज असे लिहिले आहे. माझ्याही 7/12 वर कर्ज असे लिहिल्यामुळे एकही बँक मला कर्ज देण्यास तयार नाही. आमच्या 7/12 यवर कर्ज लिहिले असेल तर मग आम्ही कोणाकडे जायचे ? आमच्या मुलांचे लग्न करायचे असेल तर मग आम्हाला सावकाराकडे जावे लागते. या निमित्ताने सन्माननीय श्री.पतंगराव कदम यांना विचारू इच्छितो की, सावकारांवर कारवाई करण्यासंबंधीचा अधिकार कोणत्या विभागाला आहे ? माझ्या माहितीप्रमाणे सहकार विभागाला आहे. असे जरी असले तरी आज माननीय उप मुख्यमंत्र्यांना आपल्या विभागामध्ये घुसून शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय डायव्हर्ट करण्याचे कारण काय आहे ? श्री.पतंगराव कदम हे आपण सहन का करतात ?

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना आठवण करून देऊ इच्छितो की, युतीच्या काळात श्री.गोपीनाथ मुंडे हे उप मुख्यमंत्री होते. त्यावेळी जे विरोधी पक्ष नेते सांगत होते, तेच आता सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी सांगत आहेत. त्यामुळे ते नव्याने काही सांगत आहेत असे काही नाही.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : आपण श्री.नारायण राणे यांची बाजू मांडत आहात काय ? आपण श्री.राणे यांचे वकीलपत्र कशाला घेता ?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.नारायण राणे हे आघाडी सरकारचे महसूल मंत्री आहेत.

श्री.नितीन गडकरी : ज्यांची प्रॅक्टीस चालत नाही त्यांचे वकील पत्र नको. सभापती महोदय, सहकारी कायद्यामध्ये सावकारी संबंधात तरतूद आहे. त्यामध्ये जॉईंट रजिस्ट्रारला कारवाई करण्यासंबंधी अधिकार आहेत. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.पंतगराव कदम यांना मी सांगू इच्छितो की, मोर्चा निमित्त मी बुटीबोरी येथील टाकलघाट येथे श्री.ठाकरे यांच्या घरी गेलो होतो. त्या ठाकरे यांच्यावर कर्ज असल्यामुळे त्यांनी त्यांची बकरी 500 रुपयांना विकली. परंतु त्यांना ते पैसे न मिळाल्यामुळे त्यांनी तक्रार केली. परंतु तेथील एस.पीं.नी ठाकरे यांना सावकार समजून त्यांना पकडले. तेव्हा मी एस.पीं.ना फोन केला. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, "आम्हाला एक टारगेट दिलेले आहे". सभापती महोदय, नाबार्ड बँकेकडून भूविकास बँकेला कर्ज रिफायनान्स होते. या देशामध्ये कृषि संदर्भातील वित्त पुरवठा नाबार्ड बँकेकडून होतो. नाबार्ड बँक सहा टक्के दराने कर्ज देते आणि जिल्हा सहकारी बँका शेतकऱ्यांकडून दामदुपटीने व्याज घेते. वाह रे सरकार ! 150 कोटींचे घोटाळे आहेत आणि ते पैसे शेतकऱ्यांकडून वसूल करुन घेता. पाच टक्के नाबार्डचे, तीन टक्के राज्य सहकारी बँकेचे, तीन टक्के जिल्हा सहकारी बँकेचे आणि तीन टक्के सेवा सहकारी सोसायटीचे असे सर्व मिळून 14 टक्के व्याज शेतकऱ्यांच्या माथी मारले जाते. सभापती महोदय, आपल्याला मर्सिडीज गाडी खरेदी करावयाची असेल तर त्यासाठी सहा टक्के दराने कर्ज दिले जाते. ट्रॅक्टर खरेदीसाठी तेरा टक्के व्याज घेता. याला कोण जबाबदार आहे ? सभापती महोदय, मा.श्री.अटलबिहारी वाजपेयी यांनी एक कोटी वीस लाख शेतकऱ्यांना किसान विकास पत्रे दिली. श्री.पतंगराव कदम आपण शेतकऱ्यांचे पुत्र आहात. शेतकऱ्यांना तेरा टक्के दराने कर्ज मिळते हे आपल्याला माहीत आहे. राज्य सहकारी बँकेने एक टक्का, जिल्हा सहकारी बँकेने एक टक्का आणि सेवा सहकारी सोसायटीने अर्धा टक्के व्याज घ्यावे असे आदेश काढले तर शेतकऱ्यांना सात-आठ टक्के दराने कर्ज उपलब्ध होऊ शकेल.जर तुमची इच्छा असेल तर हे होऊ

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

शकेल. परंतु तुम्हाला कोणी काम करु देत नाहीत. आपण दिलेल्या आदेशांचे पालन अधिकारी करीत नाहीत. तुम्ही माझे मित्र आहात. तुम्हाला बाजुला सारण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरु आहे. तुमच्या पासून आणि श्री.राणे यांच्यापासून काही लोकांना भीती वाटते. तुम्ही केलेले आदेश खाली येत नाहीत. ऊस लावण्यासाठी कर्ज घ्यावयाचे झाले तर त्यासाठी 14 टक्के व्याज घेतले जाते, कापूस लावावयाचा झाला तर 14 टक्के व्याज, सोयाबीन लावावयाचे झाले तरी सुध्दा 14 टक्के व्याज, ट्रॅक्टर खरेदी करावयाचा झाला तर 13 ते 14 टक्के व्याज आकारले जाते. विहीर खोदण्यासाठी कर्ज घ्यावयाचे झाले तर त्यासाठी 14 टक्के व्याजाने कर्ज घ्यावे लागणार. काल मी यवतमाळ जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने केलेल्या आत्महत्येसंबंधी उल्लेख केला होता. श्री.मनोहर नाईक आपण यवतमाळ जिल्ह्यातील आहात. आपण आम्हाला सांगावे की, वाईन फॅक्टरीसाठी 7 टक्के दराने कर्ज उपलब्ध आहे. वाईन हे "शीतपेय आहे की मद्य" आहे यावर वाद सुरु आहे. श्री.पंतगराव कदम मी आपल्याला सांगतो की, मी साखर कारखाना टाकला आहे. लोकांनी ऊस लावावा म्हणून गावा गावांत फिरलो. परंतु शेतकऱ्यांच्या सात-बारा उताऱ्यावर कर्जाचा उल्लेख असल्यामुळे बँक त्यांना कर्ज देत नाही. बँका कर्ज देण्यास तयार नाहीत तेव्हा शेतकरी कोठे जाणार ?

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित.... 13:55

श्री.नितीन गडकरी....

जिल्हा सहकारी बँक कोणाची ? भू-विकास बँक कोणाची ? राज्य सहकारी बँक कोणाची ? या बँकांवर कोणाचा आदेश चालतो ? माननीय पतंगराव कदम आपल्या एका फटकाऱ्यानिशी संचालक मंडळ बरखास्त होऊ शकते आणि नवीन संचालक मंडळ नियुक्त होऊ शकते. या बँकांचे धोरण तुम्ही ठरविता. आपण मला सांगा भू-विकास बँकेचे धोरण तुम्हाला माहीत आहे काय ? भू-विकास बँकाच्या प्रत्येक कर्जदाराचा आराखडा तयार करा. ज्यांनी 10 हजार रुपयांचे कर्ज घेतले त्यांच्यावर 80 हजार रुपयांची वसूली आहे. ही त्यांची अमानवीय पिळवणूक आहे. मी एका कारखान्याच्या युनियनचा अध्यक्ष आहे. त्या ठिकाणी 4500 कामगार काम करतात. त्यांच्यावर 1700 कोटी रुपयांचे कर्ज होते, परंतु ते कर्ज नंतर 700 कोटींवर सेटल झाले. तब्बल 1000 कोटी रुपये माफ झाले. माननीय फुंडकर साहेब हे त्यांच्या जिल्हयातील सूत गिरणीचे अध्यक्ष आहेत. श्री.टापरेंची ती गिरणी होती. त्या गिरणीवर 750 कोटी रुपयांचे कर्ज होते, नंतर ते 2800 कोटी रुपयांपर्यंत गेले. नंतर ते 2800 कोटी रुपयांचे कर्ज 650 कोटी रुपयांवर सेटल झाले. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण रिझर्व्ह बँकेचे धोरण लावा. ज्यांनी कर्ज घेतले आहे त्यातील 30 टक्के शेटयुल्ड कास्टचे आहेत, तर 10 टक्के शेडयुल्ड ट्राईबचे आहेत. तुम्ही शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेणारे असताना शेतकऱ्यांशी असे वागताना तुम्हाला लाज वाटत नाही. तुमचे जिल्हाधिकारी आणि एस.पी. खोटे रिपोर्ट आणि पंचनामे तयार करीत आहेत. 950 खोटे रिपोर्ट आणि पंचनामे या राज्यातील अधिकाऱ्यांनी तयार केले आहेत. मी मागे श्री.शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांना सांगितले होते की, तुम्ही या रिपोर्टस् आणि पंचनाम्यांवर विश्वास ठेऊ नका. मागे राणेसाहेब आमच्यासोबत होते. जे रिपोर्ट तयार करण्यात आलेले आहेत त्याबाबत काल माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, 1042 शेतकऱ्यांच्या आत्महत्यास नापिकी कारणीभूत आहे. मला वाटते हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. हायकोर्टामुळे सरकारचे डोके ठिकाणावर आले आहे. शासनाचे जे मानसिक संतुलन बिघडले होते ते या रिपोर्टमुळे ठिकाणावर आले आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी तर अशी मागणी करीत आहे की, आत्महत्या करणाऱ्या परिवाराला तुम्ही कमीत-कमी 2 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी. याकामी केवळ 20-21 कोटी रुपये लागतील. भुजबळसाहेब आपण इटालीयन टाईल्स आणि मार्बलचा वापर करुन बंगला तयार केला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

10-12 कोटी रुपये आपण त्या बंगल्यावर खर्च केला आहे. या अधिवेशनावर 70 ते 80 कोटी रुपये खर्च करीत आहात. अशा अनेक गोष्टी आहेत की त्यावर हे शासन नाहक खर्च करीत आहे. पण महाराष्ट्रात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या परिवाराला देण्यासाठी शासनाकडे 20 कोटी रुपये नाहीत. किती भुक्कड हे सरकार आहे. इतकी शासनाची हालत खालावली आहे काय ? या शासनाकडे मनाचा मोठेपणा नाही. कोणतीही संवेदनशिलता नाही.

अधिवेशनापूर्वी सरकारने आम्हाला चहा-पानासाठी आमंत्रित केले होते. मी सन्माननीय रामदास कदम आणि भाऊसाहेब फुंडकर यांना म्हटले की, राज्यात शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, त्यामुळे त्या शेतकऱ्यांच्या घरी जाऊन त्यांचे सांत्वन केले पाहिजे. त्यांच्याप्रती संवेदना व्यक्त केल्या पाहिजेत. आम्ही ज्यावेळी मृत शेतकऱ्यांच्या घरी गेलो त्याचवेळी सरकार हसत-खेळत चहा-मिठाई घेत होते. आपण मला सांगा की, राज्यात पालकमंत्री अस्तित्वात आहेत की नाहीत ? किती पालकमंत्री मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना भेटले ? अहो, पैसे तर सोडाच साधे सांत्वन करण्याची दानत या शासनाने दाखविली नाही. असे कसे हे राज्यकर्ते आहेत ? मी जे पुस्तक लिहीले आहे त्याचे नाव "असहाय प्रजा आणि मुर्दाड सरकार" आहे. मुर्दाडपेक्षा दुसरा शब्द वापरता येत नाही, नाहीतर तोसुध्दा वापरला असता.

नंतर श्री.गायकवाड....

श्री.नितीन गडकरी ......

संवेदनशीलता गमावलेले हे सरकार आहे आणि ही परिस्थिती का निर्माण झाली आहे ? मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांनी एक बैठक घेतली होती.त्या बैठकीत असा विषय होता की महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील मतदारसंघ कमी झालेले आहेत.तेव्हा सगळया विरोधी पक्षातील लोकांनी त्या बाबतीत भूमिका घेतली पाहिजे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्य घटनेमध्ये असे लिहिलेले आहे की,"या नंतर मतदारसंघाची पुनर्रचना लोकसंख्येच्या आधारावर होईल".महात्मा गांधी असे म्हणावयाचे की, "हिन्दुस्थान गावामध्ये आहे.85 टक्के जनता ग्रामीण भागात राहते आणि 15 टक्के जनता शहरी भागात राहते." 1947 सालापासून ते 2005 सालापर्यन्त राज्य कोणाचे आहे ? मधल्या चार पाच वर्षाचा कालावधी सोडला तर संपूर्ण कालावधीमध्ये कॉंग्रेस पक्षाचे राज्य होते. बैलजोडी ही कॉंग्रेसची निशाणी होती त्यामुळे लोकांनी त्यावर शिक्के मारले होते.त्यानंतर गाय वासरु ही कॉंग्रेसची निशाणी होती. त्यामुळे लोकांनी त्यावर शिक्के मारले होते. त्या नंतर पंजा ही निशाणी होती त्यामुळे त्यांवर लोकांनी शिक्के मारले होते.अशा प्रकारे आपल्या पक्षाचे राज्य सत्तेवर आले होते. कॉंग्रेस पक्षात अर्स कॉंग्रेस आली, रेड्डी कॉगेंस आली पण नंतर पुन्हा सगळे एकच झाले. बाकीचे सर्वजण किरकोळ आहेत. कॉगेस पक्ष मात्र एक आहे त्यांचे विचार एक आहेत.1947 सालापासून आतापर्यन्त चार पाच वर्षाचा कालावधी सोडला तर कॉंग्रेस पक्षाने राज्य केलेले आहे.परंतु त्यामुळे काय झाले आहे ? 35 टक्के ग्रामीण भागातील लोकसंख्या शहरात गेली व त्या ठिकाणी बकाल झोपडया निर्माण

झाल्या.प्रधानमंत्री ग्राम सडक योजना बनविण्यासाठी श्री.अटल बिहारी वाजपेयी यांनी माझ्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती.रिझर्व्ह बॅन्केचे डेप्युटी गव्हर्नर आणि नाबार्डचे अध्यक्ष त्या समितीमध्ये होते.केन्द्र सरकाच्या महिला व बाल कल्याण विभागाचे सचिवसुध्दा त्या समितीमध्ये होते.त्यांनी असे सांगितले की," आदिवासी भागात रोज एक एअर बस डॅश होईल इतक्या म्हणजे 320 महिला रोज मृत्यूमुखी पडतात.आदिवासी भागातील दलित ,पीडित आणि शोषित समाजाच्या महिला मृत्युमुखी पडतात कारण डिलीव्हरीसाठी दवाखान्यात जाण्यासाठी त्या भागात रस्ते उपलब्ध नसतात.58 वर्षा पैकी 53 वर्षे कॉंग्रेस पक्षाने राज्य केले होते. या पक्षाने गरिबी हटावाचा नारा दिला होता.त्यामुळे शेतक-याची, दलितांची गरिबी हटली नाही, शेतमजुरांची गरिबी हटली नाही परंतु तुमच्या पक्षातील कार्यकर्त्याची गरिबी मात्र हटली आहे.मी सांगू इच्छितो की,

.डॉ.बाबासाहेब आंबेडकर झिंदाबाद असा नारा वारंवार दिला जात असतो परंतु

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ......

आपल्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी 40 लाख रुपये द्यावे लागतात. इजिनिअरीग कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी दोन लाख रुपये द्यावे लागतात. बी.एड. कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याकरता दोन लाख रुपये द्यावे लागतात. डी.एड. च्या प्रवेशासाठी 50 हजार रुपये द्यावे लागतात .प्राथमिक शाळा असेल तर तेथील शिक्षकाचा अर्धा पगार तुम्ही आणि अर्धा पगार आम्ही. गावोगावी राष्ट्रवादी आणि कॉग्रेस पक्षाची रोजगार हमी असे चालले आहे. ज्याला हे मिळाले नाही त्याला देशी दारुचे दुकान दिले जाते.सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे यांच्या सारखे एखादे गरीब सदस्य मात्र तसेच राहिलेले आहेत. त्यांना कोणीही विचारले नाही.बाकीच्या लोकांना मात्र इंजिनिअरींग, मेडिकल डी.एड., बी.एड. कॉलेजेस दिले गेले आहेत आणि त्यातून त्यांचे चांगले पोट भरते.सुरुवातीला 200 ते 300 कोटी रुपयांचे सहकार सम्राट होते त्यानंतर साखर सम्राट आणि शिक्षण सम्राट निर्माण झाले आहेत. या ठिकाणी आल्यानंतर मात्र महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराजांच्या नावाचा ते वारंवार उल्लेख करतात.या ठिकाणी येऊन ते पोपटासारखे बोलत असतात.सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना मी खूप संवेदनशील समजत होतो. परंतु हा माझा गैरसमज दूर झाला आहे. सन्माननीय सदस्य श्री.आदिक यांना माझे म्हणणे मान्य होईल.कारण ते बिचारे संवेदनशील आहेत.तुम्ही ऐकत नाही म्हणून हा बहाद्दर गडी शेतक-यांना न्याय मिळावा म्हणून उपोषणाला बसला होता त्याला भेटण्यासाठी जाण्याचे सौजन्य कोणी दाखवले नाही . तुमच्या पक्षातील लोकांनी सल्ला दिला होता परंतु तो सल्ला तुम्ही ऐकला नाही.हा सत्तेचा उन्माद होता.ही परिस्थिती का निर्माण झाली

आहे ?पंडित जवाहरलाल नेहरु हे मोठे नेते होते ते मोठे साहित्यिक होते.मी त्यांच्या साहित्याचा आणि काव्याचा प्रशंसक आहे.जवाहर लाल नेहरु जागतिक कीर्तीचे नेते होते. त्यावेळी तीन विषयांवर चर्चा होत असे. मी मंत्री असतांना श्री.आर.आर.पाटील व श्री.जयंत पाटील मला असे विचारावयाचे की," राज्य बी.ओ.टी.वर चालविण्याकरता का देत नाही." आज हे दोघेही जण मंत्रीपदावर आहेत. पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यावर रशियाचा प्रभाव होता व त्यावेळी तीन विचारांची चलती होती साम्यवाद ,समाजवाद आणि एक पूंजीवाद. अमेरिकेकडे आम्ही पूंजीवादी म्हणून पहात होतो.रशिया आणि चीन हे साम्यवादी देश होते कॉग्रेस .....

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ......

पक्षाने समाजवाद स्वीकारला होता परंतु त्याची काय वाट लागली ती आपल्याला दिसत आहे.1947 पासून 2005 पर्यन्त 5 हजार 60 हजार कोटी रुपये कॉंग्रेसच्या सरकारने टेक्स्टाईल मिल्स,स्टील फॅक्टरी, पॉवर प्रोजेक्ट व हॉटेल्स इत्यादीवर खर्च केले आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अप्रसिद्ध/अधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ D/ RJW/ श्री.गायकवाड नंतर --- 14:05

श्री. गडकरी ....

साडेसहा लाख गावे या देशात आहेत परंतु यांच्या 52-53 वर्षांच्या काळात राज्यात केवळ 1 लाख 43 हजार गावांमध्येच रस्ते केले गेले. गावांमध्ये साधे पिण्याचे स्वच्छ पाणी देखील आपण देऊ शकला नाहीत. परंतु आमचे उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील हे कितीही चांगले, गोड भाषण करीत असतील, पण मी त्यांना सांगू इच्छितो की, तुमच्या राज्यामध्ये आपण जनतेला शुद्ध पाणी देखील देऊ शकलेला नाहीत. मात्र देशी दारूच्या बाटल्या कोठेही उपलब्ध करून दिल्या. महात्मा गांधी जिंदाबाद. गावात शाळेची इमारत नाही, इमारत असेल तर त्यामध्ये शिक्षक नाहीत, इमारत आणि शिक्षक असेल तर तेथे शिक्षण नाही अशी आपल्या शाळांची अवस्था आहे. हाच प्रकार आरोग्य विभागाच्या बाबतीतही आहे. कोठे गेले आपले आरोग्य मंत्री ? परवाच मी मेळघाटमध्ये गेलो होतो. तेथे दोन हजारावर मुले कुपोषणामुळे मृत्यूमुखी पडलेली आहेत. आमचे डॉ.सुनील देशमुख आता राज्यमंत्री आहेत. त्यांना मी विचारू इच्छितो की, हे खरे आहे की नाही ? मेळघाट मध्ये आज काय स्थिती आहे ? मेळघाटातील दवाखान्यांची स्थिती काय आहे ते तरी आपण सांगावे. त्या भागामध्ये श्रीमती सोनिया गांधी येणार होत्या म्हणून मग कोठून कोठून डॉक्टर आणून ठेवले गेले. मी मेळघाटामध्ये गेलो होतो. तेथे आरोग्य अधिकाऱ्यांना विचारले की, तुमच्याकडे किती जागा भरलेल्या आहेत, सर्व डॉक्टर आहेत का ? त्यावर त्यांनी सांगितले की, 8 जागा अजूनही रिक्त आहेत. एका दवाखान्यामध्ये गेलो. तेथे एक डॉक्टर होते. त्यांना विचारले तर ते म्हणाले की, मी नाक-कान-घशाचा डॉक्टर आहे. येथे कोणीच डॉक्टर येत नव्हते आणि श्रीमती सोनिया गांधी येथे येणार म्हणून मग माझी तात्पुरती पोस्टिंग येथे करण्यात आली आहे. सभापती महोदय, त्या मेळघाटामध्ये कुपोषणग्रस्त माता-बालकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे अनेक मृत्यू झालेले आहेत पण तरीही तेथे कोणीही बालरोग तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टर नेमण्यात आलेला नाही. मात्र एका ठिकाणी थर्मोकोलच्या पेटीमध्ये काही मुले ठेवली होती. सभापती महोदय, मी जे काही सांगतो आहे त्यातील एक शब्द जरी चुकीचा असेल तर मला आमचे मित्र सन्माननीय डॉ.सुनील देशमुख यांनी सांगावे. मी माझे शब्द परत घेण्यास तयार आहे. तेथे आपण दोन डॉक्टर नेमले पण त्यातील एक तर नाक-कान-घशाचा डॉक्टर होता. ही आदिवासींची स्थिती आहे. त्या मेळघाटामध्ये दवाखान्याची इमारत नाही, इमारत आहे तेथे डॉक्टर नाहीत, इमारत आणि डॉक्टर दोन्ही असले तर शुश्रुषा करणारी नर्स नाही आणि तिन्ही असतील तर औषधेच नाहीत अशी त्या

.... डब्ल्यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गडकरी .....

मेळघाटातील दवाखान्यांची परिस्थिती आज देखील आहे. एकीकडे शेतकऱ्याचा कापूस स्वस्त आणि त्यापासून तयार होणारे कापड महाग तसेच हे सारे आहे. मग का बरे आपण त्या शेतकऱ्यांना आश्वासन दिले ? आपले नेते माननीय श्री. शरद पवार यांना विचारून आपण ही आश्वासने दिली का ? याबाबतीत आपण त्यांना विचारून कॅबिनेटमध्ये निर्णय घेतला का? मग शेतकऱ्यांना अगोदर शून्य वीजबिले का दिली गेली ? 2700 रूपये भाव कापसाला देण्याचे आपण का जाहीर केले ? अशी आश्वासने देऊन, निवडून आल्यानंतर लाल दिव्याची गाडी घेतली आणि आता म्हणता सॉरी, सॉरी. मग पहले क्यो झक मारी ? आपण शेतकऱ्यांची फसवणूक का केली ? जेव्हा आपल्या पक्षाचा जाहीरनामा झाला तेव्हा मी मुख्यमंत्री नव्हतो असे आता आमचे मुख्यमंत्री सन्माननीय श्री.विलासराव देशमुख सांगत आहेत. आणि प्रदेशाध्यक्षा श्रीमती प्रभा राव तर म्हणतात की, ती प्रिंटींग मिस्टेक झाली. काय तुमचे हे सरकार ? सभापती महोदय, तरीही मी येथे आमचे मित्र सन्माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांची हुशारी मान्य करतो, त्यांच्या हुशारीला मी दाद देतो. जेव्हा जेव्हा असे बेसिक विषय आले वा येतात तेव्हा तेव्हा ते दुसराच कोणता तरी विषय काढून तो महत्त्वाचा विषय बाजूला टाकतात. आता ते सावकारांना अटक करू लागले आहेत. पण पोलीस तरी काय ? ते तुमच्या आदेशाचे पालन करीत आहेत. मी आपल्याला विचारू इच्छितो की, हे जे 1024 शेतकरी आहेत, ज्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यांच्यावर जिल्हा सहकारी बँक, भूविकास बँक, सेवा सहकारी सोसायटी यांची किती कर्जे आहेत ते आपण माहीत करून घ्या. माझ्याकडे याचा रेकॉर्ड आहे, रिपोर्ट आहे. वाटल्यास तो मी आपल्याला देऊ शकतो. सभापती महोदय, माझ्या 7-12 उताऱ्यावर एक ट्रॅक्टरचे कर्ज असेल तर मला दुसरी बँक कर्ज देत नाही. परंतु या शेतकऱ्यांच्या नावे दोन-तीन बँकांची कर्जे आहेत. शेवटी या जिल्हा सहकारी बँक काय आणि अन्य सहकारी सोसायट्या काय तुमच्याच हाती आहेत. त्या बँकांमध्ये आपल्या लोकांनी काय घोटाळे करून ठेवले आहेत तेही जगजाहीर आहे. आपल्या पवनराजेंनी तर हवेमध्ये ऊस लावला होता आणि आपणही किती बाणेदारपणे सांगितले तरी अशा प्रकरणांमध्ये कारवाई काही होत नाही. सभापती महोदय, मी येथे अत्यंत जबाबदारीने सांगतो आहे की, या राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या झालेल्या आहेत वा होत आहेत त्या बँकांच्या कर्जामुळे झालेल्या आहेत. जिल्हा सहकारी बँकेचे वसुली अधिकारी, श्री.पवार नावाचे अधिकाऱ्याने घरी जाऊन शेतकऱ्यांना धमकावले आहे.

.... डब्ल्यू 3 ...



KBS/ D/ RJW/ श्री.गायकवाड नंतर --- 14:05

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

आता आमचे मंत्री सन्माननीय डॉ.पतंगराव कदम येथे आम्हाला सर्क्युलर वा पत्र दाखवितील. पण तुमच्या सर्क्युलरला कोण विचारतो ? आपण ही माहिती घ्या की, खरोखरी आत्महत्या झालेल्या त्या प्रत्येक शेतकऱ्याकडे एकंदर किती बँक-सोसायट्यांचे किती कर्ज होते. मी डॉ.पंतगराव कदम यांना सांगू इच्छितो की, आपले हे जे मंत्रालयातील प्रशासन आहे त्याला तुम्ही अजून नीटसे ओळखलेले नाही. लातों के भूत बातों से नही मानते अशी या प्रशासनाची गत आहे. त्याची भाषाच वेगळी आहे. त्यांच्या मनामध्ये ठरलेले असते. तुमच्या समोर ते हो म्हणतील. पण तुम्ही गेल्यानंतर काहीही करीत नाहीत. मला माफ करा, पण डॉ.पतंगरावांचा इनोसंटपणा मला भावतो. आपण खरोखरी चांगल्या मनाचे आहात. ....

( यानंतर श्री.सरफरे ..... एक्स 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

परंतु त्यांनी तुमच्या सर्क्युलरची वाट लावली. त्या सर्क्युलरप्रमाणे काही कारवाई, अंमलबजावणी झाली नाही. तुम्ही सर्क्युलर काढून सांगितले की, 10 टक्क्यावर कुणाकडूनही व्याज घेतले जाणार नाही, आणि घेतले जात असेल तर सरकार त्यांचेवर कारवाई करील. "बोलाची कढी आणि बोलाचा भात" तुमचे कुणी ऐकले नाही, एकाही बँकेने ऐकले नाही. तुमच्या सर्क्युलरप्रमाणे पालन केले असे एका तरी बँकेचे नाव आपण मला सांगा. माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांची संगत लावून घेतल्यामुळे आपली गडबड झाली आहे, ही तुमची अडचण आहे. कारण ते कशातही सिरियसनेस घेत नाहीत. त्यांच्या सहवासात राहून तुम्ही नॉन सिरियस झालात. त्यामुळे खोलात जाऊन तुम्ही रिव्हयू मिटींग घेत नाही. त्यामुळे तुम्हाला सत्य कळले नाही. आज रिझर्व्ह बँकेच्या गाईडलाईन्सप्रमाणे सेटलमेंट सुरु आहे. आमच्या राज्यापासून राज्य भू विकास बँकेला नाबार्ड फायनान्स करीत नाही. मी नाबार्ड 1, नाबार्ड 2, नाबार्ड 3 व नाबार्ड 4 योजना आणल्या.त्यावेळी नाबार्डकडून 3 ते 4 हजार कोटी आणले.नाबार्डवाले असे म्हणतात की, आम्ही भू विकास बँकेला फायनान्स करु परंतु त्याची गॅरंटी महाराष्ट्र सरकारने घ्यावी. परंतु तुम्ही ती घ्यायला तयार नाही. आता घेतली असेल...

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, नाबार्डला गव्हर्नमेंटची गॅरंटी देण्याचा पहिला नकार युती सरकारने दिला. त्यावेळेपासून गॅरंटी दिली गेली नाही. हे पाप असेल तर ते या सरकारचे नाही. त्याची सुरुवात तुमच्या काळात झाली आहे. उलट गॅरंटी देण्याबाबत आम्ही विचार करायला लागलो आहोत.

श्री. नितीन गडकरी : हे पाप आमचे असेल.परंतु तुम्ही सहा वर्षे काय केले? तुम्ही याचा विचार केला काय? हे आमच्या नावावर खपविता काय? आमच्या काळात गॅरंटी देण्याचा विषय होता ही गोष्ट खरी आहे. त्यावेळी अर्थ विभागाने सांगितले होते की, आम्ही हे पैसे बेअर करु शकत नाही. त्यावेळी मी बरेच प्रयत्न केले होते. आमच्या पी.डब्लू.डी.ला पैसे पाहिजे होते. तुमचे म्हणणे बरोबर आहे परंतु तो आमचे राज्य जाण्याच्या शेवटच्या सहा महिन्यांतील विषय होता. परंतु तुम्ही 6 वर्षे आहात. या 6 वर्षामध्ये भू विकास बँक बंद पडली आहे. नाबार्डचे 5 टक्के व्याजाचे पैसे 7 टक्क्याने तुम्हाला देता आले असते. याचा विचार तुम्ही कां केला नाही? आम्ही हे केले नाही म्हणता तर मग तुमचे राज्य असतांना तुम्ही कां केले नाही? आता सहा वर्षे तुम्ही विचार करीत आहात, पुढील आठ वर्षात निर्णय करा. त्या शेतकऱ्यांना मरु द्या, अजून 50 हजार



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ RJW/ 14:10

श्री. नितीन गडकरी...

शेतकऱ्यांना आत्महत्या करु द्या, त्यांना विष पिऊ द्या. मग तुमच्या डोक्यात प्रकाश पडेल. मानसिक संतुलन कुणाचे बिघडले? महाराष्ट्रात सावकार कोण आहे? तुमची भू विकास बँक, तुमची राज्य सहकारी बँक, तुमच्या जिल्हा सहकारी बँका यांचें तुम्ही मालक आणि तुमचेच कर्ज. याबाबत सुप्रिम कोर्टाचा निर्णय आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील आपल्याला विनंती करतो की, सुप्रिम कोर्टाचा निर्णय मी वाचून दाखविणार आहे. 10 हजार रुपयांचे कर्ज असेल तर 10 हजार रुपयेच व्याज घेता येईल. याठिकाणी माननीय डॉ. हिराणी पासून डॉ. सुनिल देशमुखांपर्यंत सर्व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माझे सहकारी आहेत. माननीय श्री. गडाख साहेब आपण सहकार चळवळीतील आहात आपण मला सांगा की, 10 हजार रुपये कर्ज आणि 10 हजार रुपये व्याज यावर आपण केस क्लोज केली आहे कां? माननीय श्री. जयंत पाटील साहेब आपण जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष आहात, आपण सांगा की, 10 हजार रुपये कर्जावर 10 हजार रुपये व्याज घेवून केस क्लोज केली आहे कां? असेल तर या केसेसची आपण यादी द्या. सुप्रिम कोर्टाचा निर्णय आहे, आणि आपल्या विभागाचे आदेश आहेत. 10 हजार रुपयांचे कर्ज त्यावरील व्याज 70 हजार, 80 हजार वसूल केल्यानंतर त्याच्या घरातील मडके, खुडके, टी.व्ही. पलंग तुम्ही जप्त करता. हा कोणता न्याय आहे? 1700 कोटींचे उद्योगपतींचे कर्ज असतांना तुम्ही वर्धमध्ये 700 कोटींवर सेटल करता. आमचे भाऊसाहेब चेअरमन असलेल्या सूतगिरणीचे 26 कोटींचे कर्ज 6 कोटी सेटल झाले. आणि 10 हजार रुपयांच्या कर्जावर 70 हजार रुपये व्याज भरुन तुम्ही त्याच्या घरातील भांडी-कुंडी जप्त करता हा कोणता सामाजिक न्याय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर,महात्मा फुले आणि शाहू महाराज यांचे नाव घेऊन तुमच्या राज्यात सर्रास शेतकऱ्यांचे शोषण सुरु आहे याचे आपण उत्तर द्या

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे, तुमचे सर्क्युलर आहे. तुमचे पालकमंत्री कधीतरी रिव्हयू बैठक घेतात का ? मी मध्यंतरी "सहारा"टी.व्ही.वर गेलो होतो. त्यावेळी मी माननीय श्री.कृपाशंकर सिंह यांना विचारले की, मुंबईचे पालकमंत्री कोण आहेत ? नाव माहिती आहे का ? आपण यांना पाहिले आहे का ? त्यांना ओळखले का ? प्रत्यक्षात तुमचे एकही पालकमंत्री बैठक घेत नाहीत, रिव्हयू घेत नाहीत, चर्चा करीत नाहीत. काही नाही, प्रश्न नाही. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना भेटण्यासही हे तयार नाहीत. मी एक विनंती करतो. याठिकाणी माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील उपस्थित नाहीत. पण मागच्या वेळी याच सभागृहामध्ये कापसाच्या प्रश्नावर बोलत असताना माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी मला शब्द दिला की, विदर्भामध्ये ज्याठिकाणी 50 टक्क्या पेक्षा कमी आणेवारी आहे, तेथील कर्ज वसूली स्थगित करण्याचे कडक आदेश शासनाने वितरीत केलेले आहेत. गुरुनाथजी, असा त्यांनी शब्द दिला होता, तुमच्या लक्षात आहे. याबाबतीत माझ्या कडे रिपोर्ट आहे. खरे म्हणजे हा रिपोर्टच सर्व सन्माननीय सदस्यांना देण्यात यावा. या रिपोर्ट प्रमाणे सतत चार वर्षे यवतमाळ जिल्हयात दुष्काळ आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटीलसाहेब, मी आपल्याला हात जोडून विनंती करतो कारण हा राजकारणाचा मुद्दा नाही. आत्महत्या या सरकारला, राज्यकर्त्यांना भूषणावह नाहीत, तसेच त्या विरोधी पक्षालाही भूषणावह नाहीत. राज्यातील या आत्महत्या म्हणजे तुम्हाला आम्हाला सर्वांना शरमेने मान खाली घालावयास लावणाऱ्या आहेत, अमानवीय आहेत. आम्ही विरोधी पक्षामध्ये आहोत, तुम्ही राजे आहात, सरकार आहात, त्यामुळे तुमच्या हातात काही कृती करण्यासारखी स्थिती आहे. या रिपोर्टमध्ये काय म्हटलेले आहे ते मी आपल्याला वाचून दाखवितो. "Attitude of the Government : The crisis in agriculture is widespread, and the number of farmers committing suicide is on the increase. The situation only seems to be getting worse. What has been the response of the government to the unfolding consequences of the crisis in agricultural sector? Despite the letters and faxes sent by us to the district collectors (except Mumbai citing the order of the Honourable High Court....." राणेसाहेब, मुंबईचे जिल्हाधिकारी सोडून सगळे जिल्हाधिकारी चीफ जस्टीसकडून आलेल्या ऑर्डरबाबत एकत्रितपणे बसले. पण त्यांनी माहिती --

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिली नाही. या ठिकाणी स्पष्ट म्हटले आहे की, "Despite the letters and faxes sent by us to the district collectors (except Mumbai citing the order of the Honourable High Court to solicit basic information regarding the deaths, only two Collectors (Jalna and Dhulia disttricts) got back with a resplonse. This is despite the direction of the Honourable High Court asking the TISS to submit its report on the possible causes behind the suicides of the cultivators. We received information from the Divisional Commissioner Nagpur Commissioner Agrciculture and Jt. Director, APC. Otherwise, there is a general lack of sensitivity to the situation that the farmers are facing." काय तुमचे वर्णन आहे ? तुम्ही तुमच्या एस.पी.नां आणि जिल्हाधिकाऱ्यांना खोटे पंचनामे करावयास सांगितल्यावर ते घाबरले. खरे पाठवावे तर अडचण. त्यांनी तुमचे आदेश पाळले आणि येथे हाय कोर्टाने सत्य काय आहे ते दिले तर आपण अडचणीत येऊ. आता मी जर माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेबांना प्रश्न विचारला की, ज्या एस.पी.आणि जिल्हाधिकाऱ्यांनी खोटे पंचनामे केले आहेत, त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे का ? तर यांना "होय" असे म्हणण्याशिवाय काहीच इलाज नाही. म्हणजे या सगळयांवर कारवाई होणार. म्हणजे तुम्ही या गोष्टी दाबावयाचे काम केले. तसेच दारुच्या अतिसेवनामुळे, मानसिक संतुलन बिघडल्यामुळे असे होत आहे आणि तुम्ही तर "लोकसत्ता" मध्ये लेख लिहीला. कोणाचे मानसिक संतुलन बिघडलेले आहे हो ? कोणत्या सावकाराची पाठ सोलावयाची आहे? या राज्यातील सावकार तुम्ही, पतंगराव आणि विलासराव. तुम्ही मालक आहात, भूविकास बँक, जिल्हा बँक आणि हे सर्व तुमच्या राज्यात सुरु आहे. कोर्टाचे रिपोर्ट आहेत. ही तुमची संवेदनशीलता आहे. माझी विनंती आहे की, टाटा इन्स्टीटयुट ऑफ सोशल सायन्सेस आणि इंदिरा गांधी शोध संस्थान यांच्या रिपोर्टवर याठिकाणी चर्चा व्हावयास पाहिजे. त्यात सरकारबद्दल काय-काय आलेले आहे ? तुम्हाला चीफ जस्टीसनी डायरेक्शन्स् दिल्या आणि आता तुम्ही पाच वर्षानंतर मान्य करता की, नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे 1042 आत्महत्या झाल्या आहेत. हे पाप कुठे भराल ? खरे म्हणजे मानसिक

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संतुलन कोणाचे बिघडलेले आहे हे लोकांनी ठरविले पाहिजे. कोणाची पाठ सोलावयाची आहे हे लोकांनी ठरविले पाहिजे.आर.आर.पाटीलसाहेब, सावकार जबाबदार आहेत. त्यांच्यावर जरुर कारवाई करा. पण सावकारा पेक्षा 14 टक्क्यांनी पैसे देणाऱ्या भूविकास बँक, राज्य सहकारी बँक, जिल्हा सहकारी बँक यांचे काय करणार आहात ? सहकारातील सर्व संस्था मग त्या जिनिंग-प्रेसिंगच्या असतील किंवा सूत गिरण्या असतील किंवा साखर कारखाने असतील, त्यांचे ओ.टी.एस.करावे. आहो यात काय गुन्हा आहे. There are two types of defalcation. One is bonafide and other is malafide. If it is malafide, then sack him. He may belong to any political party, sack him. But, if it is bonafide, तर मग त्याला न्याय द्या.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ RJW/ 14:20

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

हे इतके लोक बसलेले आहेत. ते कर्तृत्ववान आहेत, ते चांगले प्रकल्प चालवितात. मीसुध्दा प्रकल्प चालवितो. चार प्रकल्प चांगले चालले आणि एक प्रकल्पामध्ये कोठेतरी माणूस अडचणीत येतो, त्याला सवलत मिळाली पाहिजे. हे केंद्र सरकारचे धोरण आहे. रिझर्व्ह बँकेने धोरण ठरवून राष्ट्रीकृत बँकांना दिलेले आहे. ते नाबार्डने आपल्याला कळवून आपल्या को-ऑपरेटिव्ह सचिवांनी, जॉईन्ट रजिस्ट्रारनी याचे पालन का केले नाही ? आपण आधीचे सर्क्युलर आमच्या तोंडावर फेकू नये. त्यामुळे काही होणार नाही. आपण एक काम करु शकता. आपण जिल्ह्याजिल्ह्यामध्ये आवाहन करुन जनता दरबार घ्यावा. सगळ्या केसेस घेऊन त्यावर तात्काळ स्पॉटवर निर्णय करावा. तसे केले तर श्री.पतंगराव कदम साहेब, आपण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नाही तर देशाचे प्रधानमंत्री झाल्याशिवाय रहाणार नाही, ही आपण गोष्ट लक्षात ठेवा. आपल्यामध्ये क्षमता आहे, पण हे करण्याचे धाडस आपल्यामध्ये नाही. आपण मुख्यमंत्री पदाची अपेक्षा सोडा, आपल्यामध्ये ते बसणारे नाही. पण आपण प्रधानमंत्री व्हाल. आपल्याला हे करायचे असेल तर...श्री.राणे साहेब, आपल्याला सहकार्य करतील. काळजी करु नका. माझी आपल्याला विनंती राहील की,आपण जिल्ह्याजिल्ह्याची आकडेवारी घ्या. मी जनता दरबार घेणार आहे. नागपूर जिल्ह्यामध्ये जनता दरबार घेऊन शेतकऱ्यांनी सहकारी बँकांकडून घेतलेल्या कर्जाची यादी घेणार आहे आणि मी आपल्याकडे येणार आहे. पुढच्या सोमवारी 1 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत त्यांच्या विधवा पत्नींना आपल्यासमोर घेऊन येणार आहे. सन्माननीय मंत्री श्री.राणे साहेब हे माझ्याबरोबर होते. श्री.राणे साहेब, मी आणि श्री.उध्दव ठाकरे, श्री.प्रमोद महाजन असे मिळून आम्ही यवतमाळ जिल्ह्यामध्ये गेलेलो होतो. शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्त्येच्या संदर्भात श्री. राणे साहेब आणि आम्ही जाऊन त्यांच्या परिवाराला 25-25 हजार रुपयाची मदत केलेली आहे. ही संवेदनशीलता श्री.राणे साहेबांजवळ होती, आजही तशी त्यांच्याजवळ आहे, पण मला गाणे म्हणण्याची वेळ आलेली आहे. "काय होतास तू, काय झालास तू, कारे, वेड्या असा बहकलास तू". आपण खरा आमचा मर्द गडी. आपण त्यांना मदत केली. या सर्वश्री मा.मुख्यमंत्री विलासराव देशमुख, आर.आर.पाटील यांना काही सांगा. श्री.राणे साहेब आपण एक काम करा, ते तुम्हीच करु शकता. या 1,024 लोकांना 2 लाख रुपये तीन दिवसाच्या आत कलेक्टरनी दिले पाहिजेत, अशाप्रकारचे आदेश

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु.....

आपण काढावेत. तुमच्या प्रशासनामध्ये आम्ही काम केलेले आहे. ते यांचे काम नाही. त्यांना सेक्रेटरी सांगतील सर, मॅटर सब-ज्युडीस आहे, ते सांगतील की, इट इज व्हेरी डिफीकल्ट; इट इज नॉट पॉसिबल वगैरे वगैरे. परंतु मी त्यांना सांगितले की काय पॉसिबल नाही, फाईल काढा. दिली ऑर्डर, करा सही. असे जर केले तरच काम होते. नाही तर होणार नाही. यांचे काही खरे नाही. मी श्री.राणे साहेबांबरोबर काम केलेली आहे. मी असेच केलेले आहे. मला पटले की, हे काम झाले पाहिले असा आग्रह धरुन दुसरे काही ऐकणार नाही, असे सांगत असे. त्यावर नाही, साहेब हे फार डिफिकल्ट आहे, हे फार अडचणीचे आहे, असे सांगितले जात होते. मला एका मुख्य सचिवांनी सांगितले की, आम्ही असे करतो की,पहिल्यांदा मंत्र्यांच्या चेहरा पहातो. त्यांच्या मनात काय आहे ते पहातो. काम करायचे असेल तर तसे उत्तर देतो, काम करायचे नसेल तर तसे उत्तर देतो. आमच्यासारखे हुशार कोणी नाही. मंत्र्यांचे तोंड बंद करायचे असेल तर असे सांगायचे की, सर, इट इज व्हेरी डिफीकल्ट, मॅटर इज सब-ज्युडिस, देअर विल बी ए कंटेम्प्ट. त्यावर मंत्री म्हणतात की, जाऊ दे, जाऊ दे. मी मंत्री असतांना कॅबिनेटमध्ये सचिवांनी सुप्रीम कोर्टाच्या ऑर्डर असल्याचे सांगितले. त्यावर सुप्रीम कोर्टाच्या काय ऑर्डर आहेत,अशी विचारणा करुन ते वाचून दाखवा असे सांगितले., सुप्रीम कोर्टाच्या जज्जनी समुद्राच्या काठावर असलेल्या 2200 स्क्वे.फू.च्या ब्लॉकमधील तिन्ही खिडक्यातून हवा शिरली पाहिजे असे सांगितले आहे काय ?अशी विचारणा करुन हे मला पटत नाही असे त्यांना सांगितले. पुढे असेही सांगितले की, फालतू वकीली करायची नाही,मला कायदा काय आहे, हे माहीत आहे. ही अशी जबरदस्ती चालणार नाही, असेल कोर्ट. त्यांचे अधिकार त्यांना आणि आमचे आम्हाला आहेत. मी कायद्याचा विद्यार्थी आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी साहेब या विषयावर आपले आणि माझे एकमत आहे. आपण आपल्या मर्यादा ओलांडायच्या नाहीत आणि कोर्टाने त्यांच्या मर्यादा ओलांडायच्या नाहीत. आम्हाला काही समजत नाही म्हणून मोठमोठे गठ्ठे आपल्याकडे हे अधिकारी पाठवितात. आपण आपले मत नोंदवितो. परंतु बिचाऱ्या राज्यमंत्र्यांना कोणी विचारत नाही. मला गोव्यामधील चौपाटीवर राज्यमंत्री श्री.दयानंद मस्के साहेब भेटले होते. मी निवडणुकीच्या प्रचाराला आलो असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्याकडे काही कामच नाही. बिचाऱ्या राज्यमंत्र्यांची अवस्था काय आहे, हे मला सांगायचे नाही. कितीही झाले तरी शेतकऱ्यांसारख्या आत्महत्त्या कोणी करु

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SKK/ D/ RJW/ 14:20
श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु.....

नयेत. सभापती महोदय, माझी एकच विनंती आहे. कापसाचा चढउतार निधी म्हणून 700 कोटी रुपये आपल्याकडे जमा आहे. हे माझे चूक आहे की बरोबर आहे, ते मंत्री महोदयांनी सांगावे. 1974 पासून 700 कोटी रुपये व्याजासहित जमा झालेले आहेत.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

विदर्भातील, मराठवाडयातील कापसाच्या शेतक-याचे 700 कोटी रुपये व्याजासहीत ताबडतोब वापस करा. 14 टक्के व्याज लावून 700 कोटीचा हिशेब करुन ते पैसे त्या शेतक-यांना परत करा. दुसरी गोष्ट आत्महत्या करणा-या शेतक-यांना दोन लाख रुपये मदत द्या.आणि तिसरे कापसाला 2700 रुपये भाव देऊ असे तुम्हीच कबूल केले आहे.त्यामुळे कापसाला 2700 रुपये पर क्विन्टल भाव द्या. या तीन मागण्या पूर्ण करुन या दोन्ही रिपोर्टसच्या आधारावर. आत्महत्त्येची ग्रॅासरुट कारणे काय अहेत हे शोधण्यासाठी विधिमंडळाची एक समिती नेमा. आम्ही काही अभ्यास केला आहे. शासनानेही काही अभ्यास करावा आणि याबाबतीत शेतक-यांना निश्चितपणे न्याय द्यावा.जर तुम्ही या नागपूरमध्ये अधिवेशनासाठी आल्यानंतर रोज शेतकरी तुमच्यासमोर येऊन आत्महत्या करणार असतील, रोज लोकांचे रक्त सांडणार असेल, रोज शेतकरी बलिदान करणार असतील तर तुमच्या येण्याचा फायदा नाही आणि आमच्या राहण्याचा फायदा नाही. जर या अधिवेशनात शेतक-यांना न्याय द्यावयाचा नसेल तर या अधिवेशनाला काही मतलब नाही. जर तुम्हाला शेतक-यांना न्याय द्यावयाचा नसेल तर खड्यात गेले काम. तुम्ही मुंबईला जा आम्ही घरी जाऊ. फालतू वांझोटा संभोग करण्यात आम्हाला इंटरेस्ट नाही. काही गरज नाही. जर तुम्ही न्याय देणार असाल तर या सभागृहात बोला. नसाल देणार तर विषय संपवा. या अधिवेशनाची आम्हाला गरज नाही. शेतक-यांच्या तीव्र भावना आहेत. हा राजकीय विषय नाही. या बाबतीत सामुहिक जबबदारीतून सगळेजण संवेदनशीलतेचा परिचय देऊन या आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या परीवाराला न्याय द्यावा. शेवटचा मुद्दा श्री. आर.आर.पाटील साहेबांना मी सांगू इच्छितो. आंध्र प्रदेशच्या शेतक-यांनी आत्महत्या केल्या तेव्हा शेतक-यांचे मसिहा, शेतकरी राजा आमचे श्री. शरद पवारसाहेब, कृषिमंत्री आहेत. मला श्री. पवार साहेबांबद्दल आदर आहे. श्री. मनमोहनसिंग साहेब आंध्र प्रदेशमध्ये गेले. परवा पारव्यला माझी सभा होती. महाराष्ट्राजवळच आंध्र प्रदेश आहे. आदिलाबाद जिल्यामध्ये शेतक-याने आत्महत्या केली. प्रधान मंत्री श्री. मनमोहनसिंग साहेबांनी 600 कोटी रुपयाची मदत केली. आणि 7 कोटी रुपयाचे पॅकेज आत्महत्या करणा-या परिवाराकरिता दिले. तेथे ते भेट द्यायला गेले.आणि विदर्भातील शेतक-यांनी आत्महत्या केल्या तर प्रधानमंत्री श्री. मनमोहरसिंग साहेब सोडा, शरद पवारसाहेब सोडा, आर.आर.पाटील साहेब तुम्ही देखील आत्महत्या करणा-या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

शेतक-याला विचारावयाला गेला नाहीत. मुख्यमंत्री तर गेलेच नाहीत. तुम्हीही गेला नाहीत. श्री. राणे साहेब आमच्याबरोबर होते तेव्हा गेले होते. आता ते त्याठिकाणी गेले होते की, नाही मला माहीत नाही.सभापती महोदय, श्री. आर.आर.पाटील यांना माझा प्रश्न असा आहे की, आंध्र प्रदेशच्या शेतक-याच्या अंगातून रक्त वाहते आणि विदर्भातील कापूस उत्पादक शेतक-यांच्या अंगातून पाणी वाहते काय? कां आमच्यावर अन्याय केला? आमचा जन्म कोल्हापूर, सांगली, साता-यात झाला नाही हे आमचे पाप आहे का? जेव्हा तिकडे दुष्काळ पडला (अडथळा) मी समर्थक आहे.. ऊसाच्या भावाचाही समर्थक आहे. तुमचे बरोबर आहे पण. वेगळया विदर्भाची भावना कां निर्माण होते. म्हणे आत्महत्या कुठे आहेत.अकोला, अमरावती, बुलढाण, यवतमाळ, वर्धा आणि वाशिम या सहा जिल्हयात आत्महत्या आहेत. आणि थोडया आत्महत्त्या नागपूर जिल्हा,चंद्रपूर, भंडारा आणि गडचिरोली या क्षेत्रात आहेत. महाराष्ट्रातील आत्महत्त्येपैकी 85 टक्के आत्महत्या विदर्भातील आहेत.कां बरे आम्हाला न्याय नाही.? तुम्ही आमचा बॅकलॉग देत नाही. कबूल करुन कापसाला भाव देत नाही. आम्ही आमचे रक्त सांडले, बलिदान केले पण तुम्ही मदत करायला देखील तयार नाही. मग येथील जनतेमध्ये वेगळेपणाची भावना कां निर्माण होणार नाही? तुम्ही याचा शांतपणे विचार करावा. यात मानसिक संतुलन शेतक-याचे बिघडले नही तर सरकारचे बिघडले आहे. शासनाचे डोके ठिकाणावर नाही. सावकारामुळे आत्महत्या झालेल्या नाहीत. डॉ. पंतगराव कदमाच्या नेतृत्वाखाली असणा-या सहकार क्षेत्रातील बँकानी आमची सगळी वाट लावलेली आहे. त्याबाबतीत कां निर्णय घेत नाही. नाबार्डचा फायनान्स 5 टक्के आहे तो डायरेक्ट शेतक-याला 6 टक्के दिला. म्हणजे एक टक्का जास्त दिला. यासाठी कशाला एवढया सिस्टिम पाहिजेत. कमिशन खाणारे मध्ये कशासाठी पाहिजेत. त्यांची काय गरज आहे? त्यांना जगवले पाहिजे. 150-150 कोटी रुपयाचा भ्रष्टाचार ज्यांनी केला तो वसूल झाला पाहिजे. नांदेडची बँक 250 कोटी रुपये, उस्मानाबाद 150 कोटी रुपये, वर्धा जिल्हा 50 कोटी रुपये, नागपूर जिल्हा 150 कोटी रुपये हा सगळा घाटा आत्महत्या करणा-या गरीब शेतक-याची पिळवणूक करुन तीन टक्के त्यांना कमिशन द्यावयाचे आणि दुरुस्त करावयाचे हा कुंठला न्याय ? दुसरी मागणी करतो. शासनाने

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

निर्णय घ्यावा. नाबार्डकडून शेतक-याला साडेसहा-सात टक्क्याने ताबडतोब फायनान्स झाला पाहिजे. असे होऊ शकते पण तसे करण्याचा निर्णय शासनाला घ्यावा लागेल. आज शेतक-याची जी स्थिती आहे ती बघता ती संवेदनशीलता शासनाने दाखवावी आणि या मागण्यांचा शासनाने गंभीरपणे विचार करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख (स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन, राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या ज्या घडत आहेत त्याबद्दल आणि एकंदरित या शेतकऱ्याची अवस्था आणि परिस्थिती यासंदर्भात चर्चा उपस्थित झालेली आहे, त्या चर्चेच्या निमित्ताने मी माझे विचार या ठिकाणी मांडणार आहे.

**तालिका सभापती (श्री. जगन्नाथ शेवाळे)** : अडीच तासाची चर्चा सभागृहासमोर सुरु आहे. अजुन ब-याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे सभागृहाची वेळ वाढवावी लागेल.

श्री. यशवंतराव गडाख : महोदय, माननीय विरोधी पक्षनेते आणि माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी यासंदर्भात आपली मते व्यक्त केली आहेत. मागील अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मी एक लक्षवेधी सूचना दिली होती आणि त्यासंबंधाने माझे मत व्यक्त केले होते. आज मी जरी सत्ताधारी बाकावर असलो तरी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून या ठिकाणी माझे विचार मी व्यक्त करणार आहे. मी सभागृहाला या निमित्ताने सांगू इच्छितो की, सहा महिन्यापूर्वी कटाव या देशामध्ये महाराष्ट्र मंडळाने मला प्रमुख पाहूणे म्हणून बोलाविले होते. त्या ठिकाणी मी अगदी जोरात भाषण केले आणि त्यात महाराष्ट्र राज्य तसेच आपल्या देशाने अन्नधान्याच्या बाबतीत कशी प्रगती केली वगैरे सांगितले. परंतु त्या वेळी मला एका व्यक्तीने विचारले की, एवढी जर प्रगती आपल्या देशात झालेली आहे तर या देशातील शेतकरी आत्महत्त्या का करीत आहेत, त्या प्रश्नाचे उत्तर मात्र मला देता आले नाही. परंतु ही जरी परिस्थिती असली तरी आणि या ठिकाणी जी भाषणे झाली त्यांच्या खोलात जाऊन विचार करण्याची सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची गरज होऊन बसलेली आहे. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी शेतीच्या विकासाचा दर 0.3 टक्के एवढा होता. त्यावेळी ब्रिटीश राज्य होते, सावकारशाही अस्तित्वात होती. पण त्यानंतरच्या काळात देशात जे घडले त्यामध्ये काहीच घडले नाही या मताशी मात्र मी सहमत नाही. त्यानंतर आपल्या देशात पंचवार्षिक योजना झाल्या, धरणे झाली, वीज आली, शेतकऱ्यांनी कष्ट केले आणि आज अभिमानाने आपल्याला सांगावेसे वाटते की, संपूर्ण जगात एक नंबरचे दूध आपले देश तयार करतो, एक नंबरची साखर आपला देश तयार करतो. या देशातील शेतकऱ्यांनी कष्ट केले, शासनाची मदत मिळाली, योजना झाल्या आणि म्हणूनच आज संपूर्ण जगात दुधाच्या बाबतीत, अन्नधान्याच्या बाबतीत 100 कोटी

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख..........

जनतेला पुरेल इतके धान्य आपण पिकविले आणि आज 16 देशांना आपण अन्नधान्याची निर्यात करतो. परंतु आजची अवस्था आपण पाहिली आणि या ठिकाणी जी मते व्यक्त केली गेली, शेतकरी आत्महत्त्या करतात, ते सेवा सोसायटया, जिल्हा बँका अशा दुष्टचक्रात अडकलेले आहेत यासंबंधाने विचार करणे योग्य होणार नाही असे मला वाटते. कारण ही सिस्टीम आपणच मान्य केलेली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्याला या विविध कार्यकारी सेवा सोसायटयांच्या माध्यमातून तीन दिवसात कर्ज उपलब्ध करुन देतात, अशी ही सेवा सोसायटी संस्था आहे. आणि या संस्था आहेत म्हणूनच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कर्जाचा पुरवठा होऊ शकतो. आज राज्यात शेतीसाठी जो अर्थपुरवठा होतो त्यात जवळपास 67 ते 70 टक्के एवढा अर्थपुरवठा या सहकार क्षेत्रामार्फत होतो, सहकारी बँकेमार्फत होतो, हे दुर्लक्षून चालणार नाही. राष्ट्रीयकृत बँका ग्रामीण भागातील श्रीमंत शेतकऱ्यांनाच कर्ज पुरवठा करतात, जो गरीब शेतकरी आहे, जो थकलेला आहे त्याला त्या बँका कर्जपुरवठा करीत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे, ती सभागृहाने नजरेआड करुन चालणार नाही. यासंबंधात विचार केला तर आज जी अवस्था शेतकऱ्यांची होत आहे त्याला फक्त राज्यशासन, मुख्यमंत्री अथवा सहकारी मंत्री हे कोणीही जबाबदार नाहीत तर यासंदर्भातील एक प्रकारचे मुलभूत धोरण आपल्याला ठरवावे लागणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख .....

ही मूलभूत धोरणे घेतली तरच या देशातील शेतकरी वाचू शकेल. सभापती महोदय, आपण पाहिले तर आपल्याला हे समजून येईल की, जर आपल्या शेतक-यांने 100 रुपयांचा माल पिकवला असेल आणि तो विकण्यासाठी मार्केटमध्ये गेला तर त्याला 20-25 रुपये मिळतात. परंतु जपान, युरोप या ठिकाणच्या शेतक-याने 100 रुपयांचा माल पिकविला आणि तो विकावयास मार्केटमध्ये गेला तर त्याला 140 ते 150 रुपये मिळतात. आज प्रत्येक देश शेतक-यांना मोठया प्रमाणात सबसिडी देत आहे. सबसीडीच्या संदर्भातील आकडेवारी पाहिली तर आपल्याला सर्व परिस्थिती समजून येईल. यांसदर्भात जागतिक व्यापार परिषदेमध्ये आकडेवारी सादर झालेली आहे. त्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, भारतीय शेतक-यांना वजा 86 टक्के सबसिडी दिली जाते. परंतु बाहेरच्या देशातील शेतक-यांना 22 ते 53 टक्क्यापर्यंत सबसिडी दिली जाते. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, अमेरिकेत एकदा मोठया प्रमाणात गहू पिकला होता त्यावेळी तेथे गव्हाचे दर कमी झ ााले नाही उलट अमेरिकेतील सरकारने हा गहू विकत घेवून तो समुद्रात टाकला होता. त्यामुळे शेतक-यांच्या मालाला भाव मिळाण्याच्या दृष्टीने विचार करणे जरुरीचे आहे. शेतक-याच्या मालाला जर भाव मिळाला नाही तर तो आत्महत्या करणार नाही तर काय करेल? त्यामुळे यादृष्टीने विचार होणे जरुरीचे आहे. आपल्याकडे आज जी सिस्टीम आहे त्या सिस्टीमला दोष देणे बरोबर होणार नाही असे मला वाटते. सरकारने शेतक-यांसाठी 6 टक्क्याने कर्ज उपलब्ध करुन दिले पाहिजे. आपण शेतक-यांना 6 टक्क्याने कर्ज देऊही शकतो. परंतु यासंदर्भात सरकारने मानसिकता बदलली पाहिजे. आज आपल्याकडे नाबार्डकडून जिल्हा सहकारी बँकेला कर्ज पुरवठा होतो. त्यांचे व्याज कमी केले तर 6 टक्क्याने आपण शेतक-यांना कर्ज पुरवठा करु शकतो. मी यासंदर्भात एक रिपोर्ट सुध्दा दिलेला आहे. विविध कार्यकारी सेवा सोसायटयांनी खर्च कमी केला पाहिजे, जिल्हा बँकेने खर्च कमी केला पाहिजे, राज्य बँकेने खर्च कमी केले पाहिजे., व्याजाचे दर 2-3 टक्क्यांनी कमी केले पाहिजे, सेवा सोसायटयांच्या निवडणुका सरकारने घेतल्या पाहिजेत, त्यांचे ऑडीट सरकारने केले पाहिजे. . नोकर भरती कमी केली पाहिजे, भांडवली खर्च कमी केला पाहिजे. असा जर आपण निर्णय घेतला तर आपण शेतक-यांना 6 टक्क्याच्या दराने कर्ज देण्यात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. अनेक देशामध्ये शेतक-यांना 4 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. नैसर्गिक आपत्तीमध्ये, दुष्काळामुळे व्याजाचे दर वाढले जातात. अशा

..2.....

श्री.यशवंतराव गडाख पुढे सुरु..........

वेळेस जिल्हा बँक सेवा सोसायटयांना कर्ज देते. ते खरे म्हणजे जुगारच खेळतात. नाबार्डकडून देण्यात येणा-या कर्जावरील व्याज जे राज्य सहकारी बँका शेतक-यांना आकारते ते राज्यसरकारने आणि केंद्रसरकारने सोसले पाहिजे या मताचा मी आहे. त्यामुळे यादृष्टीने निश्चितपणे शासनाने विचार करण्याची गरज आहे. यासंदर्भात मी जाहीरपणे देखील बोललो आहे की, शेतक-यांना 12-13-16 टक्क्याने कर्ज दिले जाते. खरे म्हणजे हे अनैतिकच आहे. कर्जाचे दर आणि शेतक-याच्या मालाला मिळणारे भाव याचा कधीही मेळ बसत नाही. मी विचारु इच्छितो की, शेतक-याच्या कांद्यांला जर 2-3 रुपये दराने भाव मिळाला तर शेतक-याने कांद्याला जे पोते लावलेले असते ते देखील त्याला मार्केटमधून परत आणता येत नाही.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख....

कांद्याचे थोडेफार दर वाढले तर वर्तमानपत्रात रकानेच्या रकाने भरून येतात. काद्यांला रुपये 20/- ते रुपये 40/- इतका भाव मिळाला पाहिजे अशी मानसिकता आपण का बदलवत नाही ? साखरेचे थोडे फार भाव वाढले तर ती बातमी होते. जगामध्ये साखरेला प्रति किलो रुपये 90/- इतका भाव आहे. साखरेला प्रति किलो रुपये 20 ते 25 इतका दर असला पाहिजे अशी मानसिकता आपण जनतेमध्ये का निर्माण करत नाही ? कांद्याचे, साखरेचे थोडे जरी दर वाढले तरी वर्तमानपत्रामध्ये अग्रलेख लिहिले जातात. त्यामुळे आज दरासंबंधी लोकांची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. अमेरिकेमध्ये प्रतिकिलो टोमॅटोचा भाव रुपये 290/-, बटाटयाचा भाव रुपये 39/-, कांदयाचा भाव रुपये 73/-, दुधाचा भाव रुपये 39/- आणि वनस्पती तेलाचा भाव रुपये 161/- इतका आहे, तर भारतामध्ये तो फक्त रुपये 50/- इतका आहे. आपल्या देशातील शेतकऱ्यांच्या मालाला जर कमी दर मिळणार असेल तर तो जगाच्या बाजारपेठेमध्ये स्पर्धेसाठी टिकू शकेल अशी परिस्थिती नाही. म्हणून यासंबंधी शासनाने विचार केला पाहिजे. शेतकऱ्यांचे कर्ज अनैतिक समजले पाहिजे असे मी म्हटले आहे. श्री.यशवंत सिन्हा हे देशाचे अर्थमंत्री होते. त्यांनी संसदेमध्ये प्रश्न विचारला होता की, भांडवलदारांनी देशातील किती बँकांचे पैसे बुडविले आहेत ? त्यावेळी त्यांनी सागितले होते की, या देशातील भांडवलदार व उद्योगपतींनी अनेक बँकांना लुटलेले आहे. हे त्यांनी जाहिरपणाने सांगितले होते. यासंबंधीची आकडेवारीसुध्दा श्री.सिन्हा यांनी सभागृहाला दिलेली आहे. त्यावेळी त्यांनी मारडीया ग्रुपने 1400 कोटी, लॉईडस् ग्रुपने 1012 कोटी, उषा इस्पात कंपनीने 900 कोटी आणि मारडीया केमिकल्सने 1400 कोटी रुपये कर्ज उचलले असून त्याची परतफेड केलेली नाही. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांमध्ये तूट निर्माण झाली. त्यांच्या बॅलन्स-शीटमधील तूट भरून काढण्यासाठी केंद्र शासनाने स्वत:चा निधी बँकांना देऊन त्यांची बॅलन्स-शीट क्लिअर करून घेतली. या देशातील सहकारी संस्था, सहकारी बँका, सेवा सोसायटया शेतकऱ्यांना कर्ज देऊन आज जुगार खेळत आहेत. पण त्यांची बॅलन्स-शीट क्लिअर केली जात नाही. ती जर क्लिअर केली तर फार बरे होईल. बँकेचे कर्ज काढाले म्हणून कुठल्याही उद्योगपतीने आत्महत्या केलेली नाही. मात्र शेतकऱ्यांनी कर्ज काढले म्हणून आत्महत्या केलेली आहे. उद्योगपती कर्ज काढल्यानंतर उद्योग दिवाळखोरीत गेला असे दाखवून मोकळा होतो. पण शेतकऱ्याला कर्जातून

..2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख.....

सूट मिळत नाही.  म्हणून मी अनैतिक कर्ज असा उल्लेख मघाशी केला आहे. तेव्हा या सर्व गोष्टींचा खोलात जाऊन विचार केला पाहिजे अशी माझी विनंती आहे. आज 6 टक्के व्याज दर देणे शेतकऱ्याला परवडणारे नाही, हे कृपा करून लक्षात घेतले पाहिजे. तेव्हा त्या दृष्टीने शासनाने निश्चितपणे विचार केला पाहिजे. विदर्भ, मराठवाडा येथील शेतकरी आत्महत्या का करतात ? याचे आत्मनिरीक्षण केले पाहिजे, असे मी जाहीरपणे सांगू इच्छितो. मी पश्चिम महाराष्ट्रातील आहे. सन 1972 साली माझ्या जिल्हयात दीड लाख लिटर दूध तयार होत होते. आज माझ्या नगर जिल्हयात सहकारी क्षेत्रामुळे 14 लाख लिटर दूध तयार होत असून त्याची किंमत जवळ जवळ 250 ते 300 कोटी रुपये इतकी असून 600 कोटी रुपयांची साखर सुध्दा नगर जिल्हयामध्ये होते. आम्ही सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते आहोत. आम्ही शहरामध्ये राहत नाही.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख.........

आम्ही लोकांमध्ये राहतो. लोकांमध्ये काम करतो. सहकारी संस्था कशा चालवावयाच्या हे शिकवितो. आज महाराष्ट्रातील सहकारी बँकांची परिस्थिती पाहिली तर त्याबाबतीत कडक धोरण अवलंबिण्याची गरज आहे. बँकेमध्ये ठेवीदारांचे पैसे मिळत नसतील तर त्या संस्थेच्या संचालकांना पाठीशी घालणे हे बरोबर नाही. हे पुन्हा याठिकाणी मी सांगू इच्छितो. आपण जर कडक धोरण अवलंबिले नाही तर या शेतकऱ्यांना कोणी वाली राहणार नाही. त्रिस्तरीय संस्था टिकली पाहिजे. परंतु त्यांचा खर्च कमी केला पाहिजे आणि व्याजाचा दर निश्चितपणे कमी केला पाहिजे. याचे सर्वांनी आत्मपरीक्षण करावे अशी आपणा सर्वांना विनंती आहे. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या ही अत्यंत गंभीर घटना आहे. महाराष्ट्रासारख्या अग्रेसर राज्याला ही गोष्ट भूषणावह नाही. म्हणून यामध्ये ज्या काही त्रुटी आहेत त्या एकत्रित बसून दूर करण्याची आवश्यकता आहे. ज्या भागांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत त्या भागातील कार्यकर्त्यांनी त्यांना मदत केली पाहिजे. कारण प्रत्येक गोष्ट सरकार करु शकणार नाही. त्या भागातील कार्यकर्त्यांनी तेथील शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सरकारने आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना दोन लाख रुपयांची मदत केली पाहिजे याच्याशी आम्ही सहमत आहोत. शेतकरी आत्महत्या का करतात याचा खोलामध्ये जाऊन विचार करण्याची निश्चितपणे गरज आहे आणि हे जर केले तरच भविष्यात शेतकरी आत्महत्या करणार नाहीत एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-----------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या, कापसाला मिळणारा कमी भाव या विषयांवर चर्चा करण्यासाठी आज आपण सुरुवात केलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, माजी विरोधी पक्ष नेते श्री.नितीन गडकरी आणि सहकारी क्षेत्रातील नावाजलेले कार्यकर्ते श्री.यशवंतराव गडाख यांनी आपले विचार याठिकाणी मांडलेले आहेत. सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेता. या संदर्भात आम्ही जी नोटीस दिली होती त्या नोटीसमध्ये म्हटले आहे की, कापसाला 2700 रुपयांऐवजी जास्तीत जास्त 1980 रुपये भाव देऊन क्विंटल मागे शेतकऱ्यांचे 700 रुपयांचे नुकसान केलेले आहे. या हंगामात 1980 रुपये भाव देण्यासाठी पुरेशी कापूस खरेदी केंद्रे सुरु केलेली नाहीत. तसेच गतवर्षीच्या कापूस चुकाऱ्याचे पैसे देखील दिलेले नाहीत हे एक कारण आहे. शेतकऱ्यांना वीज नाही, सिंचनाची अपुरी व्यवस्था, सततची नापिकी, सक्तीची कर्ज वसुली यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या केलेल्या आहेत. 1999 पासून म्हणजे आघाडीचे सरकार आल्यापासून महाराष्ट्रात किती लोकांनी, विदर्भातील किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या याची आकडेवारी माझ्याकडे आहे. 1999 साली 127 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. सन 2000 मध्ये 146, 2001 मध्ये 163, 2002 मध्ये 178, 2003 मध्ये 195, 2004 मध्ये 214 आणि 2005 मध्ये आतापर्यंत 143 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. म्हणजे गेल्या पाच-सहा वर्षात एकूण 1166 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

यानंतर श्री.बोर्डे........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ RJW/ पूर्वी श्री.अजित.... 14:50

श्री.मधुकर सरपोतदार....

या आघाडी सरकारच्या राजवटीत मोठया प्रमाणावर आत्महत्या झालेल्या आहेत. प्रत्येकवेळा या विषयावर चर्चा होते. मला वाटते यावर वारंवार चर्चा करण्यापेक्षा या आत्महत्या आपण कशा थांबवू शकतो याबाबत विचार-विनिमय करणे आवश्यक आहे. आज या ठिकाणी चर्चा होत असली तरी, पुन्हा पुढील वर्षी ज्यावेळी डिसेंबरमध्ये या ठिकाणी येऊ त्यावेळी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा कदाचित दुप्पट झालेला असेल. या आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीने कसल्याही प्रकारची उपाययोजना झालेली नसेल. या सरकारने निवडणुकीपूर्वी मोफत वीज, कापसाला 2700 रुपये भाव देण्याबाबत आश्वासन दिले हाते. परंतु ती सर्व आश्वासने खोटी दिली गेल्याचे निदर्शनास आले आहे. जे सत्तेवर येऊन बसले आहेत, तेच या राज्यातील जनतेला सुखापासून वंचित ठेवीत आहेत. कोणत्याही सवलती न देता, त्यांचे जीवन जगणे अशक्य कसे होईल याबाबतचा प्रयत्न या सरकारकडून चालू आहे. परंतु त्यावर कोणताही ईलाज केला जात नाही. सभागृहात एखादी गोष्ट मान्य करावयाची आणि बाहेर अंमलात आणावयाची नाही यावरच या शासनाचा भर आहे. या ठिकाणी सांगावयाचे की आम्ही आदेश दिले आहेत, परंतु त्या आदेशाची खरोखरच अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्याचे साधे कष्ट सुध्दा या सरकारकडून घेतले जात नाही.

आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांकडून पत्र आले की, अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहा-पानासाठी उपस्थित राहावे. आज राज्यात शेतकरी आत्महत्या करीत आहेत, शेतकरी, कामगार सुखी नाही, विद्यार्थी आनंदी नाही, अशा परिस्थितीत आम्ही चहा-पानासाठी जावे काय ? राज्यात शेतकरी, कामगार, नागरिक, विद्यार्थी सुखी किंवा आनंदी होण्याच्या दृष्टिकोनातून कसलेही काम सुरु नाही. तरी सुध्दा चहा-पानाला बोलावयाचे आणि गप्पा मारुन परत जाण्याचे जे धोरण महाराष्ट्र शासनाने अवलंबिले आहे ते भयानक आहे. शासन याचा अर्थ काय ? कशासाठी राज्य शासन असावे ? मुंबईमध्ये लोकसभेचा सुवर्ण महोत्सव साजरा झाला होता. त्यावेळी मी प्रश्न उपस्थित केले होते. मी त्यावेळी म्हणालो होतो की, आपल्याला स्वातंत्र्य कशासाठी मिळाले ? स्वातंत्र्यानंतर आम्ही राज्यावर आलो, ते राज्य कोणासाठी आणि कशासाठी करतो ? त्याचा उद्देश काय आहे ? त्यातून आपल्याला काय मिळवावयाचे हा महत्वाचा प्रश्न आहे. पाच वर्षाच्या राज्यकारभारामध्ये अमुक घोषणा महाराष्ट्रासाठी आणि देशासाठी केल्या, देशातील कारभार सुधारावा, देशातील जनतेचे दारिद्रय दूर व्हावे, जनता सुखी व्हावी, देश सुरक्षित व्हावा आणि समस्या कमी व्हाव्यात या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

दृष्टिकोनातून जे प्रयत्न केले जात आहेत ते पुरे आहेत काय ? या प्रयत्नातून जनतेला सुख मिळते की, त्रास होतो याविषयी कोणी चर्चा करते काय ? कर्जाच्या संदर्भात वन टाईम सेटलमेंटची व्यवस्था करण्यात आली आहे. सहकारी बँकाचा एन.पी.ए.कमी करा अन्यथा खाते गोठवून कार्यवाही करु असे सांगितले जाते. सहकारी बँकांचा एन.पी.ए.10 टक्क्यांपेक्षा खाली असला पाहिजे अशी सूचना सर्व बँकांकडून येऊन सुध्दा आमच्या बँकात कोणत्या सुधारणा झाल्या हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. शेतकरी कर्जापोटी आत्महत्या जरी करीत असला तरी ते कर्ज का वाढले ? त्यावरील व्याज का वाढले ? याबाबत विचार करणे आवश्यक आहे. कर्जदाराचे कर्ज वन टाईम सेटलमेंट करावयाचे असेल तर त्या कर्जदाराने कर्ज घेतल्यापासून प्रामाणिकपणे हप्ते भरले काय, हप्ते भरण्याची त्यांची इच्छा होती काय हे पाहिले जाते. हप्ते किंवा कर्जापेक्षा व्याज जास्त होत असेल तर वन टाईम सेटलमेंट केले जाते. आताच गडकरी साहेबांनी सांगितले की, ज्या कर्जदाराने 10 हजार रुपयांचे कर्ज घेतले असेल त्याच्याकडून 80 हजार रुपयांची वसुली केली जाते. तुम्ही त्यांना फाशी देत नाही, परंतु त्यांना आत्महत्या कराव्या लागतात.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...

तेव्हा यासंबंधीची काळजी शासनाला आहे काय ? असा मला प्रश्न विचारावयाचा आहे. शेतकरी आत्महत्या का करतात ? आत्महत्या केल्यानंतर शेतक-याचे संपूर्ण कुटुंब उघडयावर येते.

शेतक-याची जमीन गहाण पडलेली असते. त्याला दुसरीकडून कोठूनही पैसे मिळू शकत नाही त्याला जगण्याचे कोणतेही साधन उपलब्ध राहू शकत नाही आणि ज्यावेळी जगण्याचे सर्व मार्ग बंद होतात त्यावेळी नाईलाज म्हणून त्याला आत्महत्या करावी लागते. 1990- 91 आणि 1991-92 साली दंगली झाल्या होत्या. त्या वेळी या दंगली घडविणारे जे गुंड मृत्यूमुखी पडले त्यांच्या कुटुंबियांना शासनाने दोन लाख रुपयांची मदत दिली होती. परंतु जीवन जगणे अशक्य झाल्यामुळे नाईलाज म्हणून ज्या शेतक-यांनी आत्महत्या केल्या होत्या त्या शेतक-यांच्या कुटुंबियांना मदत देण्याच्या बाबतीत मात्र शासन शेतक-यांची शोभा करते. या शेतक-यांच्या आत्महत्तेच्या बाबतीत वाटेल तसे रिपोर्ट मागवून घेतले जातात. ज्या शेतक-यांनी आत्महत्या केलेली असेल त्या

शेतक-यांला दारुचे व्यसन होते, त्याचे प्रेम प्रकरण होते, त्याने बायका ठेवल्या होत्या म्हणून तो कर्जबाजारी झाला आणि त्याने आत्महत्या केली त्यामुळे त्याच्या कुटुंबियांना मदत देता येणार नाही असे शासनाकडून सांगण्यात येते आणि अशा प्रकारे त्या शेतकऱ्याच्या दु:खावर डागण्या देण्यात येतात.याचा अर्थ असा आहे की ,थापा मारुन फक्त निवडून यावयाचे आणि सत्ता उपभोगावयाची आणि सत्तेवर आल्या नंतर कोणाचीही पर्वा करावयाची नाही अशा प्रकारे गेंडयाच्या कातडीचे धोरण या सरकारने स्वीकारलेले आहे त्याला पायबंद घालण्यासाठी हा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे.या शेतक-यांचे जीवन इतके साधे आहे काय ? शेतकरी उध्वस्त झाला तरी शासनाला

त्याची काहीही काळजी नाही या दृष्टीकोनातून त्याकडे पाहिले जाते. शेतक-यांचे मरण म्हणजे आमचे स्थान मजबूत अशा प्रकारची भावना शासनामध्ये काम कणा-यांची झालेली आहे काय ? असा मला त्यांना प्रश्न विचारावयाचा आहे ? शासन चालविणे हे निश्चितच कठीण काम आहे हे काम सोपे आहे असे मी मानत नाही.परंतु मनुष्य संवेदनशील बनला की त्याच्यावर काहीही परिणाम होत नाही. त्या माणसाला इलेक्ट्रीकचा शॉक दिला तरी त्याच्यावर परिणाम हो त नाही अशा प्रकारची मानसिकता शासनकर्त्याची झालेली आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर शासनकर्त्यानी देण्याची आवश्यकता आहे. या प्रश्नाचे जर उत्तर त्यांनी दिले नाही तर त्यांना राज्य करण्याचा अधिकार नाही.संवेदनशून्य बनून जर शासन काम करणार असेल तर महाराष्ट्रात ही भयानक

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...

परिस्थिती आहे असे म्हणावे लागेल. महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य असून संपूर्ण देशामध्ये हे राज्य आघाडीवर आहे असे आपण नेहमीच म्हणत असतो.या राज्यामध्ये 1166 शेतक-यांनी गेल्या पाच सहा वर्षात आत्महत्या केल्या आहेत. तेव्हा हे प्रगतीशील राज्याचे लक्षण आहे काय ? अमुक इतक्या आत्महत्या झाल्या म्हणजे ते राज्य प्रगतीशील आहे अन्यथा ते राज्य प्रगतीशील नाही असे आपण काही निकष लावलेले आहेत काय ? हा प्रश्न नेहमीच माणसाला सतावत असतो.गेल्या अनेक वर्षातील गोष्टी जर आपण पाहिल्या तर एक गोष्ट आपल्या लक्षात येईल की, आत्महत्या होण्याच्या पाठीमागे काही कारणमिंमासा आहे त्याचा कोणी अभ्यास केला आहे काय ? या आत्महत्या होऊ नयेत यासाठी इलाज योजण्याचा कोणी प्रयत्न केला आहे काय ? या शेतक-यांना कोणी असे आश्वासन दिले होते काय की तुझी काही समस्या असेल तर आत्महत्या करण्यापूर्वी तू माझ्याकडे ये.कदाचित त्याच्यावर पोलीस केस दाखल होईल. आत्महत्या करीत असतांना पकडला गेला की , त्याच्याविरुध्द पोलीस केस करता येईल व तो कॉग्नीझेबल ऑफेन्स होऊ शकतो आत्महत्या केल्यानंतर जर ती व्यक्ती मरण पावली तर त्याच्याविरुध्द कोणतीही कारवाई करता येत नाही.आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे हा गुन्हा आहे, तसेच आत्महत्या करणे हा सुध्दा गुन्हा आहे.परंतु त्या गुन्हयावर कोणता इलाज आहे ? आत्महत्या करण्याची कारणे काय आहेत कोणत्या कारणासाठी त्याने आत्मइहत्या केली आहे ? हे पाहण्याची जबाबदारी शासनावर आहे.डॉ.पतंगराव कदम यांना मी सांगू इच्छितो की ,ही जबाबदारी तुम्हा सर्वाची आहे.प्रत्येकाला असे वाटते की, मी मुख्यमंत्री बनावे आणि मुख्यमंत्री बनण्यासाठी तो सतत प्रयत्न करीत असतो त्यासाठी अनेक माणसे विकत घेतली जातात.खरेदी विक्रीचा धंदा महाराष्ट्रात तेजीत आहे. मात्र त्याचा परिणाम राज्यकारभारावर विपरित होत असतो .सगळया गोष्टी पैशाने करु शकतो ही भावना मनात आली की माणसाला फक्त सत्ता व सत्ताच दिसते सेवाधर्म सपूर्णपणे नष्ट होऊन जातो.या दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे पाहण्याची आवश्यकता आहे.सध्या सहकार खात्याची काय परिस्थिती आहे.? सहकार खात्यातील निबंधक आणि उपनिबंधक प्रामाणिकपणे काम करतो असे चित्र पहावयास मिळत नाही.सहकार .खाते हे भ्रष्टाचाराने आकंठ बुडालेले आहे. डॉ.पतंगराव कदम या ठिकाणी बसलेले आहेत. तुमच्या समोर मी याचा उल्लेख करीत आहे आणि त्यासंदर्भात मी आपल्याला उदाहरण सुध्दा देऊ शकतो.आज कोणाचा कोणावरही कन्ट्रोल राहिलेला नाही

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...

मघाशी सन्माननीय सदस्य श्री गडकरी बोलले की, एखाद्या आय.ए.एस. अधिका-याने शासनाला रिपोर्ट दिला की त्याप्रमाणे कामकाज केले जाते.आपल्या देशातील कारभार त्या अधिका-यांच्या सल्ल्यानेच चालतो. त्या अधिका-याने एखादी गोष्ट होणार नाही असे सांगितले की, मंत्रीमहोदय सुध्दा तेच सांगतात की," ती गोष्ट होणार नसेल तर ती राहू द्या त्या बाबतीत नंतर पाहू".त्यामुळे हा प्रश्न पुढे ढकलला तर ज्याच्या संबंधात हा विषय असतो त्या व्यक्तीला आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय राहत नाही. तेव्हा अशा परिस्थितीमध्ये मंत्रिमहोदयांनी आपली बुध्दिमत्ता वापरुन काही मार्ग काढला पाहिजे.मंत्रीपद मिळाले की मला आयुष्यातील सर्व काही मिळाले आहे. मुख्यमंत्री पद मिळाले की मला आयुष्यातील सर्व काही मिळाले आहे त्यामुळे मी काहीही गोंधळ घालू शकतो अशा प्रकारची भावना कोणाच्या मनात असेल तर ती वेळीच दूर
झालेली बरी.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार ....

हळूहळू लोक नाही म्हटले तरी सूज्ञ होत चालले आहेत आणि त्याचा फटका जे असेच समजून काम करीत आहेत त्यांना मिळाल्याशिवाय राहणार नाही. लोकप्रतिनिधी बनल्यानंतर काहीच काम करावयाचे नाही., कोठल्या तरी पुण्याईवर निवडून यायचे आणि निवडून आल्यावर मात्र सगळ्या कर्तव्याकडे पाठ फिरवायची हा जो सर्वत्र बदल होत चालला आहे त्याबद्दल माझ्या मनामध्ये खूप काळजी आहे. सभापती महोदय, दोन दिवसापूर्वीच सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी एक पुस्तिका छापली आहे. त्यामध्ये त्यांनी काही बिगर शासकीय संस्थांचे, उदा. टाटा इंस्टिट्यूटचा, इंदिरा गांधी इंस्टिट्यूट या संस्थेचा अहवाल दिलेला आहे. त्यामध्ये सगळी कारणे त्यांनी दिलेली आहेत. हे सगळे मृत्यू कशामुळे घडले आहेत हेही त्यांनी त्यात सांगितले आहे. पण शासन याबाबत जे सांगत आहे ते मात्र चुकीचे आहे. तेव्हा हे अहवाल शासनाने, मंत्र्यांनी शांतपणे वाचले तर आपल्या हे लक्षात येईल की, खरोखरी ही समस्या किती गंभीर आहे आणि म्हणून ही खरी समस्या आपण बाजूला ठेवू नका. आज या समस्येकडे अनेक लोकांचे लक्ष वेधले आहे. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी खूप मोठे, लांबलचक भाषण करून सरकारच्या या सगळ्या वर्मावर बोट ठेवले आहे. तेव्हा आपण सरकार म्हणून या समस्येबाबत काय करणार आहात ? नाही तरी या राज्यामध्ये, मध्यंतरीची युती सरकारची 5 वर्षे आणि त्यापूर्वी 24 महिने त्यावेळचा समाजवादी पक्ष किंवा सन्माननीय श्री.शरद पवार यांचे राज्य होते ते सोडले तर सर्व काळ काँग्रेस पक्षाचेच राज्य होते. आता तुमचे आघाडीचे सरकार म्हणून राज्य आहे. पण आतापर्यंत आपण महाराष्ट्रातील जनतेला पिण्याचे पाणी तरी नीटपणे आणि स्वच्छ असे देऊ शकला आहात काय ? सर्वांना शिक्षण चांगले आणि सारखे मिळेल अशी परिस्थिती निर्माण केली काय ? चांगल्या प्रकारे हौसिंग योजना राबवून सगळ्यांना घरे दिली आहेत का ? आजही अनेक लोक फुटपाथवर झोपड्या बांधून राहत आहेत. म्हणजे राज्यातील जनतेला आपण आजवर निवारा, अन्न, पाणी देऊ शकला नाहीत आणि शिक्षणाचा तर पत्ताच नाही. दुसरीकडे आरोग्याच्या बाबतीत तर येथे इतर सगळ्यांनीच सांगितले आहे. मेळघाट वगैरे ठिकाणी कुपोषणाचे बळी जात आहेत. आताच सन्माननीय सदस्य श्री.गडाख म्हणाले की, आमचा देश हा अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. परंतु तरीही अन्न मिळत नाही म्हणून स्वत:चे प्राण गमाविणारे लोक देखील या राज्यात किती आहेत हे आपण पाहिले आहे का ? आपल्या कोठारांमध्ये धान्य भरपूर भरलेले आहे पण जनते

..... एचएच 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

पर्यंत ते पोहोचले जात नाही. दामाजीपंतासारखे काम खरे तर अशा प्रसंगी सरकारने केले पाहिजे. दुष्काळाच्या काळामध्ये दामाजी पंतांनी उपाशी जनतेसाठी धान्यकोठार उघडून दिले होते. त्यावेळेस त्यांचेवर मोगलाई सत्ताधीशांनी कारवाई केली तशीच कारवाई आजचे हे सरकार करीत आहे. म्हणजे मोगलाईचे राज्य आणि आपल्या सरकारचे राज्य यामध्ये फरक तो काय राहिला ? तो फरक आपण दाखवून द्या. तो फरक नसेल तर मग तुम्ही येथे मोगलाई करीत आहात, लोकशाहीमध्ये काम करीत नाही. तुमचे राज्य मोगलाईचे राज्य आहे, हम करे सो कायदा असेच राज्य आपण करीत असाल तर मग आपल्याला आपल्या मर्यादा दाखवून देण्याचे काम करण्यासाठीच मी उभा आहे. तुम्ही काय करीत आहात आणि कोणत्या प्रकारचे खेळ या महाराष्ट्रात चालले आहेत, कशा प्रकारे आपण राज्य यचालविले आहे हे आम्ही आपल्याला दाखवून देत आहोत. महसूल विभागाकडून आज कलेक्टरनाआदेश दिले की, हे जे आत्महत्येचे प्रकार घडत आहेत त्याबाबतीत खोटे पंचनामे करा, त्यासाठी एसपी ची मदत घ्या. म्हणजे गृह खाते आणि महसूल खाते एकत्र येऊन, हातामध्ये हात घालून शेतकऱ्यांच्या होत असलेल्या या आत्महत्त्यांच्या प्रकरणांचे खोटे अहवाल राज्य सरकारला देत असेल तर तो देखील फार मोठा गुन्हा आहे. राज्य सरकारकडे सरकारी अधिकाऱ्यांकडून येणारे अहवाल आणि बाहेर सामाजिक संस्थांकडून तयार केले जात असलेले अहवाल यामध्ये मोठी तफावत आहे. सामाजिक संस्थांचे अहवाल सरकारच्या अहवालापेक्षा निराळे आहेत. शासनाचे अहवाल हे संपूर्णतया निराधार आणि दिशाभूल करणारे आहेत. तेव्हा असे अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्यांना आपण कोणती सजा करणार आहात ? सहकारी बँकांमध्ये कोट्यवधी रूपयांचा भ्रष्टाचार झाला, उस्मानाबाद सहकारी बँकेमध्ये 1100 कोटी रूपयांचा भ्रष्टाचार झाला. त्यावर येथे मोठी चर्चा झाली, समिती नेमली गेली आणि अहवाल देखील आला. पण पुढे कारवाई त्या बाबतीत काय झाली ? काहीही नाही. न्यायमूर्ती सावंत यांनी या प्रकरणी आपला अहवाल दिला. या प्रकरणी नेमके कोण दोषी आहेत ते बोट ठेवून सांगितले. त्यामुळे काही मंत्री बाहेर गेले, पण अजूनही काही मंत्रिमंडळात आहेत. चौकशी समितीने दिलेल्या अहवालावर सरकारकडून काय कारवाई करण्यात आली याचा ॲक्शन टेकन अहवाल खरे तर येथे सादर व्हायला पाहिजे. ज्या भ्रष्टाचारावर येथे चर्चा होते, सरकारकडून त्यासंबंधात चौकशी समिती नेमली जाते, तिचा अहवाल येतो तेव्हा त्या नुसार काय कारवाई केली

..... एचएच 3 ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

गेली आहे याचाही अहवाल सादर करू म्हणून येथे सांगितले गेले होते पण तसा अहवाल अद्याप पर्यंत दिला जातच नाही. ....

( यानंतर श्री.सरफरे ....आयआय 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

कारण पुढील ॲक्शन घेतली जात नाही. भ्रष्टाचार तसाच स्वच्छंदपणे, मोकळेपणे चालू आहे. जावे त्या ठिकाणी भ्रष्टाचाराची गंगा दुथडी भरुन वहात आहे. त्यावर कुणाचेही नियंत्रण नाही, कुणामध्येही क्षमता नाही असा त्याचा अर्थ आहे. त्यामध्ये बहुतांशी लोक गुंतले आहेत. ते म्हणतात तुझेही भले होऊ दे, माझेही भले होऊ दे. दोघांनी मिळून निर्भेळपणे राज्य करु. अशा पध्दतीने या प्रश्नाकडे पाहिले जात आहे याचे खूप दु:ख होत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्तेच्या संदर्भात माझ्याकडे अहवाल आहे. त्यामध्ये 1166 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्तेचे कारण सहकारी बँका आणि त्यांचे अधिकारी जरी असले तरी सर्वात शेवटी शासन त्याला जबाबदार आहे आणि शासन आपली जबाबदारी टाळू शकत नाही ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे. मुद्दाम सांगावयाचे की, माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी बँकेच्या व्याज दराबाबत सांगितले. मध्यंतरी राज्यामध्ये महापूर आला. त्यामध्ये अनेक जिल्हयातील शेती वाहून गेली. त्या व्यतिरिक्त अनेक ठिकाणी नैसर्गिक आपत्ती आली, महापूर आला त्यामुळे शेतकऱ्याचे पिक येऊ शकत नाही. ती जमीन नापिक झाली आहे. त्यावर कोणता इलाज करावयाचा याबाबत सरकारने योजना तयार केली नाही.भविष्य काळात जर असे संकट आले तर त्याला कसे सामोरे जायचे याबाबत कोणत्याही प्रकारची कारवाई सरकारकडून होत नाही. फक्त आजचे संकट उद्यावर कसे ढकलता येईल, त्याला तात्पुरत्या स्वरुपामध्ये उत्तर कसे देता येईल हे पाहिले जाते. परंतु भविष्य काळामध्ये कायम स्वरुपी योजना कशी आखता येईल याबाबत या सरकारकडे कोणतीही योजना नाही. आजचा दिवस मारुन नेला, आजच्या दिवशी इलाज केला, उद्या काय ते बघू अशापध्दतीने हे सरकार चालले आहे कां हा खरा प्रश्न आहे? या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविल्या पाहिजेत यासाठी कोणते इलाज करता येतील या बाबत शासनाने काही उपाय सुचविले आहेत काय, त्यावर इलाज केले आहे काय? आज अमरावती जिल्हयामध्ये एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. आपण विधानसभेचे हिवाळी अधिवेशन विदर्भामध्ये कशासाठी भरवितो? हे अधिवेशन भरविण्यामागील उद्देश काय? विदर्भाचे जास्तीत जास्त प्रश्न मार्गी लागले पाहिजेत, विदर्भातील सर्व रखडलेल्या योजना मार्गी लागल्या पाहिजेत. विदर्भातील प्रश्न शिल्लक असतील, पैसे शिल्लक असतील तर ते त्यांना देऊन त्यांच्या योजना मार्गी लावाव्यात हा उद्देश आहे. परंतु आज विदर्भ, कोकण व मराठवाडा हे तिनही विभाग मागासलेले राहिले आहेत. या देशाला स्वातंत्र्य

श्री. मधुकर सरपोतदार...

मिळून 58 वर्षे झाली तरीसुध्दा देशाची तीच परिस्थिती कायम आहे. आपल्याकडे पैसा नाही असे नाही, भरपूर प्रमाणात आहे. परंतु तो पैसा ज्या जिल्हयात वापरला जातो त्या ठिकाणी वापरला जातो व इतरांकडे दुर्लक्ष होते. या विदर्भामध्ये बावनथडी प्रकल्प अपूर्णावस्थेत आहे. त्या प्रकल्पाला मी भेट दिली आहे. त्या प्रकल्पावर शासनाने 100 कोटी रुपये खर्च केले तर हा प्रकल्प मार्गी लागेल. मध्यप्रदेश व महाराष्ट्र या दोन राज्यातील हा संयुक्त प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी असलेले महाराष्ट्र राज्याचे कॉट्रीब्युशन गेले पाहिजे ते जात नाही. त्यामुळे हा प्रकल्प रेंगाळत पडला आहे. तो पूर्ण न झाल्यामुळे त्यामधून पाणीपुरवठा होणार नाही. त्यामधून जे जलस्त्रोत उपलब्ध होणार आहे, सिंचन क्षमता निर्माण होणार आहे, ही जलशक्ती आपल्याकडे असतांना ती वापरली जाणार नाही ही वस्तुस्थिती आहे. प्रत्येक वेळी राज्याचा अर्थसंकल्प तयार केला जातो, त्यामध्ये पैशाची वाटणी केली जाते. ती करीत असतांना विदर्भाकडे पूर्णत: दुर्लक्ष होते. त्यामुळे विदर्भाच्या अनेक योजना मार्गी लागत नाहीत. म्हणून हे विदर्भ स्वतंत्र करा अशाप्रकारची मागणी या विदर्भातून निर्माण होते. ही मागणी आपण अन्य मार्गाने नाकारतो. याची कारणे आपण शोधली पाहिजेत. आपण वैधानिक मंडळांची निर्मिती केली, त्यांच्यामार्फत जो निधी विदर्भासाठी मिळाला पाहिजे तो मिळत नाही. कोकणासाठी निधी मिळाला पाहिजे तो मिळत नाही, मराठवाडयासाठी निधी मिळत नाही. हा निधी कुठे जातो तो कशापध्दतीने खर्च केला जातो या संदर्भात या सदनामध्ये अनेक वेळा चर्चा झाली आहे. परंतु या चर्चेमधून काहीही बोध घेतला जात नाही. हा प्रस्ताव याठिकाणी आणला आहे त्यामधून तरी आपण बोध घेणार आहात काय? उद्यापासून या राज्यामध्ये एकही आत्महत्या होणार नाही असे या राज्याचे उपमुख्यमंत्री जाहीर करणार आहेत काय? त्यासाठी जे शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत त्यांच्या कुटुंबियांना त्यांनी जाऊन भेटावे, महसूल मंत्र्यांनी जाऊन भेटावे, सहकार मंत्र्यांनी जाऊन भेटावे. त्यांच्या समस्या कोणत्या आहेत, त्या जाणून घेऊन त्यावर इलाज करु अशाप्रकारचा दिलासा त्यांना द्यावा. परंतु तुम्ही आत्महत्या करु नका असे आपण त्यांना जाऊन सांगा. अशाप्रकारचे धोरण राज्यकर्ते स्वीकारणार आहेत काय? कारण आपल्याला या शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले पाहिजेत. आज कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्याच्या मुलीचे लग्न होऊ शकत नाही. बापाने आत्महत्या करु नये म्हणून मुलगी आत्महत्या करते. अशाप्रकारची भयानक परिस्थिती महाराष्ट्र राज्यामध्ये निर्माण झाली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

याबद्दल आपण विचार करावयास नको का ? असा विचार करण्याची आपली क्षमता नसेल तर "महाराष्ट्र राज्य खूप अग्रेसर आहे" अशा प्रकारची भाषा वापरण्याचा आपल्याला कोणता अधिकार पोहोचतो ? संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य हे अग्रेसर आहे. हे बिहारपेक्षा अग्रेसर आहे. पण जे बिहारमध्ये घडते, ते महाराष्ट्रात घडावे अशी अपेक्षा असेल तर मग भविष्यातील संकटांचा वेध घेऊन आपण कोणत्या प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करु शकतो याचाही विचार करण्याची गरज आहे. मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रगती झालीच नाही असे नाही. पण ज्या मुलभूत गोष्टी झाल्या पाहिजेत त्याकरता कोणती पावले उचलली आहेत ? शेतकरी हा महत्वाचा घटक आहे आणि देशातील 75 टक्के जनता शेती व्यवसायावर अवलंबून आहे. आज डब्ल्यु.टी.ओ.च्या सर्व प्रकारच्या जाचामुळे आपल्या देशात दलाली सुरु झाली आहे. आज दलालांच्या टोलेजंग इमारती उभ्या रहात आहेत आणि दुसरीकडे दूध,कापूस,ज्वारी,गहू पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाबतीत प्रश्न निर्माण होत आहेत.आज अशी स्थिती आहे की, दलालांनी संपूर्ण महाराष्ट्र गिळंकृत केलेला आहे ही गोष्ट आपण नाकारु शकतो का ? 1972 मध्ये कापूस एकाधिकार योजना सुरु झाली. असे सांगितले जात आहे की, यासंबंधात पाच हजार कोटी रुपयांचे कर्ज झालेले आहे. हे मान्य आहे. पण हे कर्ज कोणासाठी झाले ? का झाले ? कशासाठी झाले ? कापसाच्या बाबतीत कोणी खेळ चालविलेला आहे ? पूर्वी कापसाला 1800 रुपये भाव दिला जात होता, तो युती शासनाच्या काळामध्ये 2100 रुपये करण्यात आला. तसे केल्याबरोबर तुम्ही सर्वांनी विधानसभेमध्ये 2100 रुपयाऐवजी 2500 रुपये भाव दिला पाहिजे अशी मागणी करुन युती शासनाला धारेवर धरले होते. त्यासाठी तुम्ही आंदोलने करीत होतात, सदनामध्ये वेल मध्ये येत होतात. या मागणीसाठी तुम्ही सर्व प्रकारच्या गोष्टी केल्या आणि तुम्ही सत्तेवर आल्यानंतर कापसाला 2700 रुपये भाव जाहीर केला असताना आज 1800 रुपयावर का आलात ? केंद्र शासनाच्या हमी योजनेप्रमाणे पैसे देऊ असे का सांगत आहात ? केंद्र शासनाच्या गाईड लाईनप्रमाणे भाव देणार होतात तर मग कापूस एकाधिकार योजना कशासाठी सुरु ठेवली ? परंतु शेतकऱ्यांसमोर जाऊन आम्ही ही योजना बंद करीत आहोत असे सांगण्याचे तुमच्यामध्ये धाडस नाही. यासाठी वाम मार्गाने शेतकऱ्यांची नाकाबंदी करुन तुम्हाला ही योजना बंद करावयाची आहे. कारण कापूस एकाधिकार योजना ही महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाप्रमाणे जे धोरण ----

. . . .2जे -2



असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

स्विकारलेले आहे, त्याच्या विरुध्द आहे हे आपणही जाणता. ही योजना केंद्र शासन पुढे चालू ठेऊ इच्छित नाही ही वस्तुस्थिती आहे. पण आपण हे शेतकऱ्यांसमोर जाऊन सांगू शकत नाही. यासाठी आपण योजना सुरु ठेवली आहे. आपण शेतकऱ्यांना असेही सांगितले की, हमी भावाने पैसे देऊ, या पेक्षा जास्त देणार नाही. अगोदर 750 रुपये जाहीर केले आणि आता 700 रुपयावर आला आहात. बाकीचे ॲडव्हान्स म्हणून देऊ. नंतर असे सांगितले की, हमी भावाने पैसे देऊ, तुम्ही खरेदी केंद्रावर कापूस आणावा. आता याठिकाणी माननीय पणन मंत्री उपस्थित नाहीत. माझा असा प्रश्न आहे की, महाराष्ट्रात आज किती ठिकाणी कापूस खरेदी केंद्रे सुरु झाली आहेत ? तुम्ही कर्मचाऱ्यांना व्ही.आर.एस.देऊन बाहेर काढले आहे. आज तुमच्याकडे किती कर्मचारी काम करीत आहेत ? आज खरेदी केंद्रावर निरनिराळया प्रकारची कॉन्ट्रॅक्ट सिस्टीम सुरु केली आहे. अशा वेळी केंद्रावर आलेला कापूस कोणत्या ग्रेडचा आहे हे ठरविण्यासाठी कॉन्ट्रॅक्टरची माणसे ग्रेडर म्हणून घेतली जाणार आहेत. असे असेल तर मग तुम्ही शेतकऱ्यांना कसा न्याय देणार आहात ? अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना न्याय मिळणे अशक्य आहे. जर तुमच्यामध्ये धाडस असेल तर असे जाहीर करावे की, आम्ही योजना बंद करीत आहोत. जर तशा प्रकारचे धाडस नसेल तर मग जी योजना चालवावयाची आहे, ती नीट चालवावी. शेतकऱ्यांना 2700 रुपये भाव द्यावा आणि त्याचवेळेला शेतकऱ्यांनी बँकाकडून घेतलेले कर्ज वसूल कसे करावयाचे यासाठी योजना तयार करा. आज खाजगी व्यापारी शेतकऱ्यांचा माल खरेदी करीत आहेत आणि त्यांना 2200 रुपये भाव देत आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू...

त्यांना प्रत्यक्षात भाव देतांना आपण वजनामध्ये धोका देतो, परिणामी ग्रेड ठरविताना धोका देतो, या सगळ्या गोष्टी तपासून पहाण्याची आवश्यकता आहे. वस्तुस्थितीला आपण सामोरे गेले पाहिजे.आपण कल्पित केलेले आहे. परंतु प्रत्यक्षात काय करु शकतो, शेतकऱ्यांना कसे लुबाडायचे या बद्दलची स्पष्ट भूमिका शासन घेणार आहे काय ? हा प्रश्न आहे. शासन आणि शेतकरी या दोघांमध्ये एकत्र जिव्हाळ्याचा संबंध असला पाहिजे. शेतकऱ्यांच्या मतांवर आपण निवडून येतो परंतु त्यांना बनवितो, टोप्या घालतो, त्यांना चुकीची माहिती देतो. त्यांच्यावर वसुलीची कारवाई करत आहात, अशाप्रकारची डबल स्टॅन्डर्ड भूमिका घेतो. राज्यकर्त्यांमध्ये अशाप्रकारचा प्रामुख्याने गुण दिसून येतो. "बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले", असे तुकाराम महाराज म्हणतात. परंतु या उलट परिस्थिती येथे आहे. "बोले तैसे न चाले त्याची वंदावी पाऊले", असा प्रकार आहे. अशाच प्रकारचा संपूर्ण राज्य कारभार चाललेला आहे. त्याचा परिणाम म्हणून आज शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत आहेत. असे अनेक विषय आम्ही घेऊन येत आहोत. शासनाकडून त्यासंबंधाने काही उत्तर दिले जात नाही. याचा अर्थ असा लावता येईल की, शासन जनकल्याणासाठी नाही तर स्व-कल्याणासाठी तोड करुन राज्य करत आहे. आम्ही हा प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावाला उत्तर दिले जात असतांना मा.मुख्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक होते. खालचे सभागृह चालत नाही, खालच्या सभागृहामध्ये कोणी मंत्री असत नाहीत. आज त्या ठिकाणी काय घडले ? लोकप्रतिनिधींनी अंगावर रॉकेल घेऊन स्वत:ला जाळून घेण्याचा प्रयत्न केला. याचा अर्थ गंभीर आहे.शासन याचा विचार करणार आहे काय ? राज्य शासनाने प्रामाणिकपणे काम केले तर आम्ही चांगल्या कामाबद्दल चांगले म्हणू. परंतु शासनाने गेंड्याचे कातडे पांघरलेले आहे. कोणतेही संकट आले तर सहज झेलू, त्याचा परिणाम होत नाही,अशापध्दतीने शासन वागत आहे. परिणाम शून्य, संवेदना शून्य आहे,असे शासन आहे. परंतु लोक आपण समजता तसे राहिलेले नाहीत. जितक्या म्हणून आत्महत्त्या होतील, तितके आपले दिवस कमी कमी होत चाललेले आहेत. या पध्दतीचा मेसेज बाहेर जात आहे. चांगल्या कारभाराचे कौतुक विरोधी पक्ष प्रामाणिकपणे करेल. आता संकटग्रस्त झालेला समाज आहे, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे, गिरणी कामगारांचे प्रश्न शिल्लक आहेत, कामगारांचे आज जीवन उध्वस्त झालेले आहे, शेतकऱ्यांचे जीवन उध्वस्त होत आहे या सगळ्या बाबी समोर आहेत. बेकारीचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी बेळगाव-कारवारचा प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. आम्ही त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एसकेके/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु ....

आंदोलनामध्ये स्वत: झोकून दिलेले आहे. या आंदोलनामध्ये कितीतरी हुतात्मे झालेले आहेत. माझे मित्रही त्यामध्ये आहेत. हा विषय चर्चेला येईल तेव्हा बोलेन. आत्महत्त्येच्या संबंधाने सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी अतिशय विस्ताराने मुद्दे मांडलेले आहेत. त्यांनी मांडलेले मुद्दे रिपीट करण्यामध्ये स्वारस्य नाही. शासनाला विनंती आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या या थांबल्या पाहिजेत. त्यासाठी ज्या काही उपाययोजना करावयाच्या असतील त्या कराव्यात. कापूस एकाधिकार योजना प्रामाणिकपणे चालवायची असेल तर ती चालू ठेवावी. ती चालवावाची नसेल, बंद करावयाची असेल तर तसे आपण धाडस दाखवावे. केंद्र सरकारच्या खाजगीकरणाच्या धोरणामुळे महाराष्ट्र शासन ही योजना बंद करत आहे, असे म्हणावयाचे असेल तर तसे म्हणावे. आपण ही कापूस एकाधिकार योजना चालवायची म्हणता, परंतु सरकार खाजगी व्यापाऱ्यांकडे शेतकऱ्यांना पाठवत आहे. शेतकऱ्यांना मदत करत नाही, त्यांना सहकार्य करत नाही, त्यांच्या कापसाचे पैसे वेळेवर देत नाही, अशा परिस्थितीमध्ये कर्जबाजारी होऊन त्यांनी आत्महत्त्या कराव्यात, अशाप्रकारचे भयानक चित्र दिसत आहे ते बदलण्याची आवयकता आहे. यासाठी कोणत्या उपाययोजना करणार आहात ? विविध खात्यांचे यासाठी सहकार्य घ्यावे लागले तर घ्यावे. सहकार खात्याचे सहकार्य घ्यावे, महसूल खात्याचे सहकार्य घ्यावे, गृह खात्याचे सहकार्य घ्यावे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

अशा प्रकारे सर्व खात्यांनी आपापली भुमिका स्पष्ट करुन स्पष्ट चित्र सदनामध्ये मांडण्याची खूप आवश्यकता आहे. आपण ते चित्र मांडून सदनाला दिलासा द्यावा. शेतक-यांना दिलासा द्यावा. संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी चिंत्तेत राहणे, वंचित राहणे, दुर्लक्षित राहणे कधीही योग्य नाही. शेती हा मूळ विषय आहे. शेतक-यांच्या जीवावर आपले राज्य पुढे जाऊ शकते. सुदैवाने केंद्रातील कृषि मंत्री हे आपल्या महाराष्ट्रातील एक कर्तबगार व्यक्तिमत्व आहे. कृषि मंत्री महाराष्ट्रातील ऊस कारखान्यांना पॅकेज आणून देऊ शकतात तर ते या कापसाच्या बाबतीत एखादे पॅक्ेज आणून सगळया शेतक-यांना दिलासा देण्यासाठी पाठपुरावा करतील अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करुन माझ ो दोन शब्द संपवितो. जयहिंद. जय महाराष्ट्र.

----

**तालिका सभापती** : चार वक्त्यांच्या भाषणामध्ये या अल्पकालीन चर्चेसाठी देण्यात आलेला अडीच तासाचा वेळ संपुष्ठात आलेला आहे. या चर्चेसाठी आणखी वेळ वाढविण्याची सभागृहाची इच्छा आहे. सभागगृहाच्या संमत्तीने या चर्चेसाठी आणखी दीड तासाने वेळ वाढविण्यात आलेली आहे. आणखी 12 वक्ते बोलणार आहेत. म्हणून या विषयावर बोलू इच्छिणा-या सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी 5-5 मिनिटात आपले भाषण पूर्ण करावे. त्यानंतर मंत्री महोदयांची उत्तराची भाषणे होतील.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास तडस (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन नियम 289 खाली अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर आज या ठिकाणी चर्चा होत आहे. हे अधिवेशन विदर्भात होत आहे आणि विदर्भात कापूस हे महत्वाचे पीक आहे. विदर्भातच सगळयात जास्त आत्महत्या झालेल्या आहेत. यामागचे कारण शोधणे सुध्दा महत्वाचे आहे. यावर्षी कापूस फक्त 25 टक्के पिकला आहे. कापसाला भाव नसल्यामुळे सातत्याने विदर्भात आत्महत्या होत आहेत हे विसरता कामा नये. या ठिकाणी विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, बँकेच्या कर्जामुळे शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. मी या ठिकाणी एक उदाहरण देतो. सावकाराने शेतक-याला जो पैसा दिला त्यामधूनच जास्त आत्महत्या झालेल्या आहेत. पूलगाव येथील एका सावकराकडे 20 वर्षे एक एकर सुध्दा जमीन नव्हती. परंतु सावकारीच्या पैशावर त्याने हजारो एकर जमीन घेतली आणि मागच्यावर्षी त्याने 60 लाख रुपयाचा कापूस लावला. त्याच्या घरावर धाड घालण्यात आली. मी स्वत: पोलिसांना घेऊन तेथे गेलो होतो. त्यावेळी जवळ जवळ 160 स्टॅम्प आणि 47 कोरे चेक त्याच्याकडे सापडले. जवळ जवळ 150 शेतक-यांचे स्टॅम्प आणि कोरे चेक त्या ठिकाणी सापडले. या संदर्भात मी स्वत: एस.पी.साहेबांना भेटलो आणि आमची काही मंडळी सोबत घेऊन ती धाड टाकली होती. परंतु कोर्टाने दुस-या दिवशी रात्री 11.00 वाजता त्या सावकाराला जामीन दिला. रात्री 11.00 वाजेपर्यंत कोर्ट चालू रहाते आणि रात्री 11.00 वाजता जामीन दिला जातो. आम्ही पुन्हा कोर्टात गेलो, पुन्हा केस टाकली आणि पुन्हा तो जेलमध्ये गेला. आम्ही तेवढयावर थांबलो नाही तर त्याचे कारण आम्ही शोधले. सावकार सर्व शेतक-यांकडून पैसे घेतात परंतु त्यासंबंधात कोणी तक्रार करीत नाहीत. म्हणून त्या सावकारावर कारवाई होत नाही. मी आर.आर.पाटील साहेबांचे अभिनंदन करतो की, त्यांनी त्या घाडीनंतर यासंदर्भात एक धडक मोहीम आखली आणि वर्धा जिल्हयात 20 ते 22 सावकार पकडण्यात आले.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास तडस .....

सभापती महोदय, यावर्षी विदर्भामध्ये पाऊस भरपूर झालेला आहे परंतु आठ आठ तास लोड शेडींग असल्यामुळे शेतकऱ्यांना रब्बीचे पीक गहू, चणा वगैरे घेता येत नाही, हे देखील या आत्महत्त्यांमागील कारण सांगता येईल. सन्माननीय सदस्य श्री. गडाख साहेबांनी सांगितले की, कापूस सोडून इतर पिके घ्यावीत परंतु विदर्भातील शेतकरी हा 90 टक्के कोरडवाहू शेती करतो, त्याला सिंचनाची सोय नाही त्यामुळे त्याला कापसाशिवाय दुसरे पीक घेता येत नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, या कोरडवाहू शेतकऱ्याला कमीत कमी दराने शेतीसाठी कर्जपुरवठा करावा तरच या शेतकऱ्याला काही तरी दिल्यासारखे होईल. मी या निमित्ताने एका घटनेचा उल्लेख करु इच्छितो ती म्हणजे आमच्या भागात श्री. सुंदरलाल खुराणा म्हणून एक कृषि उत्पन्न बाजार समितीचे सदस्य आहेत. त्यांनी सन 2001 मध्ये त्यांनी एका शेतकऱ्याला जिवंत मारुन टाकले होते परंतु पोलिसांनी ती केस आत्महत्तेची म्हणून ट्रीट केली याचाही विचार शासनाने करावा अशी माझी विनंती आहे. हा शेतकरी या खुराणा नांवाच्या व्यक्तीकडे पैसे मागायला गेला होता, त्याने त्याला पैसे तर दिले नाहीच परंतु त्याला ढकलून दिले व तो शेतकरी मेला आणि ती केस आत्महत्त्येची म्हणून प्रकरण दाबून टाकण्यात आले, म्हणून या व्यक्तीला शिक्षा झाली पाहिजे. ती व्यक्ती सुटल्यानंतर जवळजवळ 100 लोकांना धमक्या आल्या, पोलिसांचा त्यासंदर्भातील अहवाल आहे, त्या शेतकऱ्याचा अहवाल आहे परंतु अद्यापही त्याच्यावर कुठलीही कारवाई झालेली नाही. या खुराणा नांवाच्या व्यक्तीने यावर्षी एकूण किती कापूस विकला यासंबंधीची आकडेवारी माझ्याकडे आहे. त्याने या वर्षामध्ये 50-60 लाखाचा कापूस विकला आहे, हा कापूस कोठून आला याची चौकशी होणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर 20-20 हजारामध्ये ट्रॅक्टर्स ठेवून घेतल्याचे उदाहरण म्हणून मी सांगू इच्छितो की, श्री. राजू डफळे नांवाचा बिडी या गावचा शेतकरी आहे त्याने एक ट्रॅक्टर घेतला होता. तो ट्रॅक्टर स्टॅम्प पेपरवर लिहून घेतला व तो त्याने घेऊन टाकला होता, त्याचा रिपोर्ट दिला तरी देखील कारवाई मात्र झालेली नाही व त्या सावकाराला धडा मिळाला नाही. आपण केवळ बँकांना दोष देऊन चालणार नाही, बँका कधी ना कधी कर्ज माफ करतातच हे शेतकऱ्यांना माहिती असते पण सावकाराचे कर्ज माफ होणे शक्यच नसते त्यामुळे आत्महत्त्या होतात म्हणून सावकारांना धडा शिकविणे हे फार महत्वाचे आहे. यासंदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी जे पाऊल उचलले ते अत्यंत स्तुत्य असे आहे. विदर्भामध्ये यावर्षी पाऊस जरी जास्त

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास तडस .......

झाला तरी कापसावर लाल्या नांवाचा रोग आल्यामुळे सर्व शेतकरी लाल झाले ही परिस्थिती आहे. आजच्या परिस्थितीत या खरीपाच्या हंगामात बी.टी. कॉटन नांवाचा जो कापूस आहे त्याची सरासरी एकरी एक क्विंटल सुध्दा लागली नाही, ती सरासरी मागच्या वर्षी 13 क्विंटल लागली होती. आम्ही जिनींग प्रेसिंग टाकले, त्यासाठी कर्ज काढले, आज सर्व त्यासाठी गहाण पडलेले आहे, शासनाला आजच्या परिस्थितीत जिनींग प्रेसिंग भाडयाने देखील देत नाही, कारण शासनाने अजून त्याचे भाडयाचे पैसेच दिलेले नाहीत. आमचे पैसे तीन तीन, चार चार वर्षे अजूनही थकितच आहेत. आम्ही त्यांना काल सांगितले की, जोपर्यन्त शासनाकडून पैसे मिळत नाहीत तोपर्यंत आम्ही कापूस उचलू देणार नाही. तीन तीन दिवसांपासून एक एक लाखासाठी चकरा मारतो परंतु आम्हाला आमचे पैसे मिळत नाहीत. पणन महासंघाकडे शासनाकडून कुठलाही पैसा मिळत नाही, ही आजची परिस्थिती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास तडस ...

सभापती महोदय, या विषयावर पुष्कळ बोलण्यासारखे आहे परंतु आता या विषयावर जास्त बोलून सभागृहाचा मी वेळ घेणार नाही. शासनाने साखरेवर 60 टक्के आयात कर लावलेला आहे त्याच प्रमाणे कापसाच्या आयातीवर सुध्दा 60 टक्के आयात कर लावला जावा. असे जर केले गेले तर कापसाला 2500 रुपये भाव मिळू शकेल. यासंदर्भात माझी एवढीच मागणी आहे की, सुंदरलाला खुराना हे कृषी उत्पन्न बाजार समितीची सदस्य आहेत त्यांचे पद काढून घ्यावे तसेच त्यांचे सदस्यत्वाचे पद रद्द करण्यात यावे तसेच त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी एवढीच मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन अतिशय महत्वाच्या प्रश्नावर या सभागृहात जी चर्चा सुरु झालेली आहे त्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात राजकीय आणि सामाजिक जीवनामध्ये विकृती आलेली आहे. या विकृतीच्या संदर्भातील उपाययोजनांवर विचार होत असतांना शासन तात्पुरत्या उपाययोजनेवर विचार करणार आहे की, त्याच्या मुळात जे विष आहे त्याचा सुध्दा विचार करणार आहे का ? असा प्रश्न सुध्दा या चर्चेच्या निमित्ताने मला मांडावयाचा आहे. तात्पुरत्या उपाययोजनांचा विचार तर झालाच पाहिजे कारण तो त्वरित रिलीफ देणारा आहे. परंतु ही जी विकृती महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनामध्ये निर्माण झालेली आहे तिची मूळ कारणे काय आहेत यासंबंधी जर विचार होणार नसेल तर ती नष्ट होण्याचा विचार सुरुच होणार नाही. मी ठामपणाणे हा विचार मांडू इच्छितो की, या ज्या आत्महत्या झालेल्या आहेत त्यातील एखादा दुसरा अपवाद सोडला तर कोडवाहू शेतीचे जे कर्जबाजारी कास्तकार आहेत त्यांनीच या आत्महत्या केलेल्या आहेत. यासंदर्भातील जे रिपोर्ट आहेत ते मी वाचलेले आहेत. त्याचा सर्व तपशील मी येथे मी सांगू इच्छित नाही. सभागृहामध्ये जी टक्केवारी उद्धृत करण्यात आलेली आहे तिच्याशी मी सहमत आहे. ढोबळ मानाने आपण विचार केला तर एखादा दुसरा अपवाद सोडला तर अन्य सर्व कास्तकार हे कोरडवाहू शेती करणारे कर्जबाजारी कास्तकार आहेत. माझे प्रतिपादन असे आहे की, महाराष्ट्राच्या निर्मिती नंतर महाराष्ट्राचा ज्या पध्दतीने विकास झाला त्याची ही कटू फळे आहेत. आपल्याला हे कितीही कटू वाटले तरी त्याच्या मुळाशी गेल्याशिवाय त्यावरच्या उपाययोजना करता येणार नाही. सातत्याने वाढणा-या प्रादेशिक असमतोलाच्या विषारी वृक्षाला आलेली ही कटू फळे आहेत. मी एक गोष्ट या सभागृहात अनेक वेळा सांगितलेली आहे ती आजही पुन्हा सांगतो. साधारणपणे अनुशेषाच्या प्रमाणात या आत्महत्या आहेत. ज्या भागामध्ये कोरडवाहू शेती जास्त आहे अशा विदर्भातील आणि मराठवाडयातील भागामध्येच आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. हेच याचे मुळ कारण आहे. महाराष्ट्राचा विकास झाला नाही असे नाही. हयूमन डेव्हलपमेंट 2002 संबंधीचा मोठा रिपोर्ट महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केला आहे. या अहवालाचे सुदैव असे आहे की, त्यातील इंडिकेटर हे महाराष्ट्राने ठरविलेले नाहीत. युएनडीपी ही युनोची ऑर्गनायझेशन आहे. या ऑर्गनायझ ेशनने जगाला सांगितले की, मानवी विकास किती झाला आहे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGJ

प्रा. बी.टी.देशमुख........

यासंबंधीचा अहवाल प्रोफॉर्मानुसार तयार करावा. त्या प्रमाणे अतिशय महाग असा रिपोर्ट तयार झाला त्याचा खर्च तिघा जणानी उचललेला आहे. 1/3 खर्च हा युएनडीपीने उचललेला आहे तर 1/3 भारत सरकारने उचललेला आहे आणि 1/3 खर्च महाराष्ट्र शासनाने उचललेला आहे. मानवी विकासाची जगाने मान्य केलेली एकमताची व्याख्या अहवालामध्ये कोट करण्यात आलेली आहे. विद्यमान वित्तमंत्र्यांची जी प्रस्तावना आहे त्या प्रस्तावनेमध्ये त्यांनी मान्य केलेले आहे की, महाराष्ट्राचा विकास झालेला असला तरी फार मोठया प्रादेशिक असमतोलामुळे महाराष्ट्रातील सर्व भागाला विकासाची फळे चाखता आलेली नाहीत, हे त्या अहवालामध्ये अनेक ठिकाणी निरनिराळया परीने मांडण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

मानवी विकासाचा निर्देशांक जगाने मान्य केलेला आहे. मनुष्याला मिळणाऱ्या विकासाच्या संधीचा परिघ वाढणे म्हणजे त्याचा विकास होणे ही व्याख्यासुध्दा जगाने मान्य केलेली आहे. विकासामध्ये पहिले स्थान हे शिक्षणाच्या संधीला आहे, दुसरे स्थान हे उत्तम आरोग्यासह दीर्घायुष्य जगण्याच्या संधीला आहे आणि तिसरे स्थान हे उपजीविकेच्या साधनांच्या संघीला दिलेले आहे. उपजीविकेच्या साधनांवर दबाव आल्यामुळे काही भागांना अत्यंत कटू अशा परिस्थितीला तोंड द्यावे लागले आहे. मी येथे मुद्दाम उल्लेख करू इच्छितो की, ज्याच्या घरामध्ये 4 दुभती जनावरे आहेत, अशा कास्तकाराच्या मनामध्ये आत्महत्या करण्याचा विचार एकाएकी येत नाही. ज्याच्या शेतामध्ये पाण्याचे पाट आहेत, अशा कास्तकाराच्या मनामध्ये आत्महत्या करण्याचा विचार एकाएकी येत नाही. ज्याचा ऊस साखर कारखान्याने कापून नेलेला आहे, असा शेतकरी आत्महत्या करण्याचा एकाएकी विचार करीत नाही. श्री. गडाख साहेबांनी सांगितले की, उपजीविकेच्या साधनांच्या उपलब्धतेमध्ये शासनाने कर्तृत्वाने आणि मजबुतीने उभे राहणे महत्त्वाचे असते. ज्याने त्याने आपला चेहरा आरशामध्ये पाहून विकास करण्यासाठी ठामपणाने उभे राहिले पाहिजे. पण त्याच बरोबर यामध्ये शासनाची भूमिकासुध्दा अत्यंत महत्त्वाची असणे आवश्यक आहे. सातत्याने विषम वाटप केल्यामुळे काही भागांवर अन्याय झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी नगर जिल्हयातील साखरेच्या व दुग्धविकासाच्या बाबतीतील प्रगतीची जी आकडेवारी सांगितलेली आहे ती बरोबर आहे. मी सन 1980 साली या सभागृहात आलो. त्यावेळी 11 नगरपालिकांपैकी साडेदहा नगरपालिकेची पाण्याची व्यवस्था डिप बोअरवर होती. हे मी पुन्हा रिपीट करतो. सन 1980 मध्ये या सभागृहामध्ये आलो त्यावेळी मी ज्या भागाचे प्रतिनिधीत्व करतो तेथील 11 नगरपालिकांपैकी साडेदहा नगरपालिकेची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ही डीप बोअरवर होती. त्यामुळे साखर, दूध हे तर फार दूर राहिले. मी ज्यावेळी आलो त्यावेळी माणसांना प्यायला पाणी नव्हते त्यावेळी जनावरांना पाणी कोठून देणार अशी परिस्थिती होती. चांदूर रेल्वे या एका नरगपालिकेला वानखेडच्या तलावातून थोडेसे पाणी मिळत होते. मी ज्या गावामध्ये रहात होतो त्या गावात 450 ते 500 डीप बोअर होत्या. हर्डनबर या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या पाणी पुरवठा तज्ज्ञाने म्हटले आहे की, भूपृष्ठावरील जलाशय हा पिण्याच्या पाण्याचा उत्तम सोर्स आहे. ...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, आमच्या नगर जिल्हयामध्ये 10 ते 12 इंच पाऊस पडतो. आमचा जिल्हा हा दुष्काळी आहे. सन 1972 साली दुष्काळ आला होता त्यावेळी 5 लाख लोक दुष्काळी कामावर होते. माझा म्हणण्याचा उद्देश असा होता की, सरकारच्या योजना असल्या तरी सुध्दा लोकांच्या सहभागातून आणि कार्यकर्त्यांच्या आधारावर आम्ही काम केले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी जे दोन मिनिटात सांगणार होतो, तेच सन्माननीय सदस्यांनी आता सांगितले आहे, त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. 1972 मध्ये जी दुष्काळी परिस्थिती होती ती मी सांगणार होतो ती त्यांनी सांगितलेली आहे. त्यांनी जे सांगितले आहे त्याबद्दल मी धन्यवाद दिलेले आहेत. त्यात काहीही चूक नाही. प्रत्येकाने आपले मत हे आग्रहाने मांडले पाहिजे. मी फक्त एवढेच मांडत होतो की, साडेदहा नगरपालिकांची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ही डीप बोअरवर होती. त्यामुळे जनावरांसाठी पाणी आणि शेतीसाठी पाणी हा विषयच नव्हता. सुदैवाने यातील निम्या नगरपालिका हया सरफेस वॉटरवर आलेल्या आहेत. त्यासाठी लोकप्रतिनिधींनी प्रयत्न केले आहेत. एवढेच नव्हेतर सभागृहाने सुध्दा न्याय दिलेला आहे. दोन-चार वर्षामध्ये या नगरपालिकांना सरफेस वॉटर वरुन पाणी पुरवठा करण्यात येईल. मी मघाशी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या तज्ञाचे मत सांगत होतो. ज्या मानवी समूहाला भूपृष्ठावरील पाणी पिण्यासाठी उपलब्ध असते त्या मानवी समूहाचे पारंपरिक उद्‌भव हे संपन्न होत जातात आणि ज्या मानवी समूहाला पिण्यासाठी डीप बोअर मधून पाणी घ्यावे लागते त्याचे पारंपरिक उद्‌भव उध्वस्त होत जातात. महाराष्ट्रातील ज्यांचे उद्‌भव उद्‌ध्वस्त झालेले आहेत, तेथे आत्महत्येच्या घटना घडतात. मी सिध्दांत म्हणून विचार मांडलेला आहे आणि सिध्दांत म्हणून देखील तो खोडता येतो आणि खोडता देखील येत नाही

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख........

राज्यकर्ते याकडे कोणत्या दृष्टीने पाहतात हे महत्वाचे आहे. माझ्याकडे आकडेवारी आहे. सन 1982 च्या सरासरीमध्ये अमरावती जिल्हा 134 हजार हेक्टरने मागे होता, 1990 मध्ये 170 हजार हेक्टरने मागे होता, 1992 मध्ये 174 हजार हेक्टरने मागे होता, 1994 मध्ये 219 हजार हेक्टरने मागे होता. नगर जिल्ह्याचे मी उदाहरण सांगितले. सात जिल्हे असे आहेत की ते कधीच मागे नव्हते ते नेहमीच पुढे होते. राज्यकर्त्यांचे धोरणसुध्दा उपजीविकेच्या साधनांना समृध्द करण्यामध्ये किंवा उद्ध्वस्त करण्यामध्ये महत्वाची कामगिरी बजावित असतात. 1982 च्या सरासरीच्या तुलनेत अकोला जिल्हा 92 हजार हेक्टरने मागे होता. सन 1990 मध्ये 144 हजार हेक्टरने मागे होता. 1992 मध्ये 150 हजार हेक्टरने मागे होता. 1994 मध्ये 181 हजार हेक्टरने मागे होता. सन 2004 मध्ये 217 हजार हेक्टरने मागे होता. दोन्ही गोष्टींचे हे फेअर कॉम्बीनेशन असते. उपजिवीकेच्या साधनांनी प्रभावीत होणाऱ्या व्यक्तींनी व्यक्तीश: आणि सामुहिकरित्या केलेले प्रयत्न हे तर महत्वाचे असतातच पण राज्य शासनाची धोरणे सुध्दा त्याबाबतीत महत्वाची असतात. मी सिध्दांत म्हणून हा विचार मांडू इच्छितो की, किती टक्के लोकांचे शेती हे उपजिवीकेचे साधन आहे याची टक्केवारी सांगण्याची गरज नाही. ती सांगितलेली आहे. या उपजिवीकेच्या साधनांना शासनाकडून होणाऱ्या मदतीच्या बाबतीत फार मोठ्या प्रमाणावर असमतोल निर्माण झालेला आहे त्याला आलेली ही कटू फळे आहेत. यामध्ये काही दुरुस्ती करावयाची असेल तर आपल्याला कायम स्वरुपी उपाययोजना करावी लागेल. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार म्हणाले की, यापुढे एकही आत्महत्या होणार नाही असे स्टेटमेंट मा.मुख्यमंत्र्यांनी करावे. असे स्टेटमेंट केल्यामुळे आत्महत्या होणार नसेल तर मला अतिशय आनंद होईल. पण या हत्येचे विष समूळ नाहिसे करणारे निवेदन म्हणजे यापुढे राज्यामध्ये माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे निधीचे वाटप केले जाईल, त्यामध्ये बदल केला जाणार नाही. पाटबंधाऱ्याचा निधी वाटप करीत असताना ते विष अंगात चढायला जितकी वर्षे लागली तितके वर्षे ते उतरायला लागतील. निवेदन केल्यामुळे आत्महत्या थांबणार असतील तर मला अतिशय आनंद होईल. परंतु तसे होणार नाही. आपला पाय गेल्यावर आपण फिजिओथेरेपिस्टकडे जातो त्यावेळी तो प्रथम आपल्याला विचारतो की, तुमचा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

पाय किती दिवसांत गेला ? मग आपण सांगतो की, मागच्या वर्षी किंवा दोन-चार वर्षापूर्वी गेला. मग तो सांगतो की यायला सुध्दा तेवढाच वेळ लागेल. सभापती महोदय, मी या सदनात गेली 20-22 वर्षे आहे. एखाद्या प्रकल्पाला मान्यता मिळायची, परंतु त्यामध्ये काही वन जमीन असायची. या वन जमिनीच्या संदर्भात केंद्राची मान्यता मिळाल्याशिवाय निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही असे उत्तर मी येथे वर्षानुवर्षे येथे ऐकत आलो आहे. एक प्रकल्प असा आहे की, महाराष्ट्रात त्याचे दोन प्रकारे प्रोसेसिंग झालेले आहे. एक म्हणजे सरळ सरळ टेंडर काढून कंत्राटदाराला कंत्राट द्यायचे आणि त्याच्यावर मान्यता आणण्याची जबाबदारी सोपवावयाची. त्याशिवाय त्याला काम सुरु करता येणार नाही. गेल्या 20-22 वर्षातील हा पहिला प्रकल्प आहे की, ज्याच्याबाबतीत असे सांगितले गेले आहे की, आम्ही कंत्राट देऊ आणि त्याच्यावर जबाबदारी सोपवू. हे उत्तर मी गेल्या 20 वर्षात पहिल्यांदाच म्हणजे दिनांक 14 जुलै 2005 रोजी ऐकले. त्यावेळी मी सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर मा.मंत्रिमहोदय श्री.अजित पवार यांचे आभार मानले होते. नाहीतर आम्ही वर्षानुवर्षे येथे भांडत आहोत की वन जमिनीला मान्यता मिळाली काय ? यावर उत्तर देण्यात येत होते की, अधिकारी केंद्रामध्ये गेले होते त्यांना इंचामध्ये माहिती आणावास सांगितली. जे लाल शाईत दाखविले होते ते हिरव्या शाईत दाखवायला सांगितले. तेव्हा राज्यकर्त्यांनी सर्व विभागांकडे समतोल न्यायाने पाहणे आवश्यक आहे आणि याचा मापदंड एकच आहे तो म्हणजे निधीचे वाटप समन्यायी पध्दतीने झाले पाहिजे. ही अतिशय महत्वाची मागणी मी या निमित्ताने करु इच्छितो. आज डॉ.पद्मसिंह पाटील सभागृहात नाहीत. या मुद्दावर मी त्यांच्याशी अनेकदा भांडलो.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

उस्मानाबाद जिल्हा 1982 च्या सरासरीप्रमाणे 91 हजार हेक्टरने मागे होता. परंतु त्यानंतर 1990 मध्ये 112 हजार हेक्टर, 92 मध्ये 116 हजार हेक्टर, 94 मध्ये 116 हजार हेक्टर आणि 2004 मध्ये 50 हजार हेक्टरने मागे आहे. जे जिल्हे मागे होते त्या जिल्हयांत उस्मानाबाद जिल्हा दुसऱ्या-तिसऱ्या क्रमांकावर राहात होता, परंतु तो जिल्हा आता 13 व्या क्रमांकावर गेला आहे. त्या जिहयातील हा रिपोर्ट यापुढे कमी येईल ही आनंदाची गोष्ट आहे. ज्या जिल्हयांची अनुशेषामधील वाटचाल पुढे गेलेली आहे, त्याबाबतीत ज्या उपाययोजना सांगितल्या त्यांना मी मनापासून पाठिंबा देतो आणि कायमस्वरुपी उपाययोजना होण्याच्या बाबतीत शासनाने धोरणात्मक निर्णय जाहीर करावा एवढी विनंती करुन, माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्यासंदर्भात आणि खास करुन विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश या भागांमध्ये शेतकऱ्यांच्या दुरावस्थेबद्दल अनेक अधिवेशनामध्ये आम्ही सातत्याने आवाज उठवीत आहोत. राजकीय लोकांची वाटचाल आणि अधिवेशनाची वाटचाल पाहिली तर अनेक वेळा असे वाटते की, शेतकऱ्यांच्या किंवा सामान्य लोकांच्या आयुष्यामध्ये याचा खरोखरच काही फरक पडतो की नाही, याचे आपणच आपले परीक्षण करायला पाहिजे. अधिवेशन असताना महाराष्ट्रातील प्रत्येक गावात चर्चा असते की, अमुक प्रश्न प्रलंबित आहे आणि आपण अधिवेशनाला गेलो पाहिजे. लोकांच्या ज्या अपेक्षा असतात त्यातून ते कामकाजाकडे पाहतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात ज्यावेळी चर्चा करतो त्यावेळी मला पुढील दोन ओळी आठवतात त्या अशा,

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे |
अकस्मात तोही पुढे जात आहे |

मग त्या आत्महत्या महिलांच्या असोत किंवा शेतकऱ्यांच्या असोत. खरेतर आज 6 डिसेंबर, हा दिवस महापरिनिर्वाण दिन आहे. भय आणि भूक यापासून मुक्त असणारा समाज पाहणे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते. अशा पध्दतीतून आपण धोरण आखले पाहिजे. कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी नगर जिल्हयाच्या कार्यक्रमात उल्लेख केला होता. जागतिक स्तरावर जी चर्चा चालली आहे त्यामध्ये भारताचा आर्थिक विकास दर हा तुलनेपेक्षा चांगला वाढतो आहे, असे चित्र गेल्या काही वर्षांमध्ये निर्माण होत आहे. भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना तसेच इतर मित्र पक्षांचे आघाडी सरकार केंद्रात असताना ज्याप्रकारे आर्थिक विकास धोरण आखले गेले त्यातून असे चित्र दिसते की, युरोप किंवा इतर देशांपेक्षा आपला आर्थिक विकास दर चांगला आहे. परंतु शेतीचा विकास दर मात्र दीड टक्क्यांपेक्षा वर गेला नाही. आपण स्वामीनाथन समितीचा दाखला देतो. या ठिकाणी वारंवार टाटा रिसर्च इन्स्टिटयूट आणि इंदिरा गांधी रिसर्च इन्स्टिटयूट बाबत उल्लेख केला जातो. जे काही होईल ते केंद्रात होईल, व्यवस्थित होईल असे मानले जाते. परंतु त्यासाठी जे निकष आहेत, त्याकडे मला लक्ष वेधावयाचे आहे. शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या झालेल्या आहेत, त्यांचा विभागीय आयुक्तांच्या स्तरावर "एक खिडकी पध्दती" ने एक महिन्याच्या आत निपटारा केला तरच या चर्चेला अर्थ राहील. कर्त्या शेतकऱ्याची आत्महत्या झाली असेल आणि 7/12 च्या उताऱ्यावर खातेफोड झाली नसेल तर त्याला नुकसान भरपाई मिळत नाही.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..

याबद्दल सातत्याने कार्यकर्ते, राजकारणी लोंक चर्चा करतात तसेच मिडियामध्ये सुध्दा चर्चा होत असते परंतु हे निकष बदलण्याच्या बाबतीत या दोन्ही अहवालामध्ये ज्या सूचना करण्यात आलेल्या आहेत त्यांची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे काय ? जर अंमलबजावणी सुरु झाली नसेल तर त्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत यासबंधीचा प्रश्न मला उपस्थित करावयाचा आहे याचे कारण असे आहे की,ज्या कुटुंबातील शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत त्या कुटुंबातील व्यक्तींनी त्या शेतक-याला काही ताण तणाव निर्माण केला होता काय याची देखील पाहणी केली जाते.अतिवृष्टीमुळे ज्याप्रमाणे अस्मानी संकट आले होते त्याप्रमाणे शासनाच्या निकषामुळे सुलतानी संकट आले आहे की काय याची तपासणी केली पाहिजे.टाटा इन्स्टिटयूटने जो अहवाल दिला होता त्या अहवालामध्ये प्रत्येक तालुक्यात या अडचणीत असलेल्या शेतक-यांच्या कुटुंबात काही ताण तणाव असतील तसेच जो शेतकरी थकबाकीदार आहे त्यांच्यासाठी मदत केन्द्रे सुरु करण्याच्या बाबतीत सुध्दा सूचना करण्यात आलेली आहे .तेव्हा ही मदत केन्द्रे सुरु करण्यासाठी शासनाने कोणती पावले उचलली आहेत याची माहिती या चर्चेच्या निमित्ताने मला शासनाकडून अपेक्षित आहे.पेरणीच्या वेळी शेतक-यांना जास्त कर्जाची आवश्यकता भासत असते.परंतु या वर्षी अतिवृष्टीमुळे शेतक-यांच्या पिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे त्यामुळे लॉग टर्म धोरण आखणे आवश्यक आहे. शेतक-यांच्या संदर्भात आता पर्यन्त ज्या संस्थांनी तपासणी करुन अहवाल तयार केलेले आहेत त्या अहवालाच्या बाबतीत मी तर असे म्हणेन की , ज्याप्रमाणे पाहुणे आल्यानंतर चांगल्या कप बशांचा आपण वापर करतो त्याप्रमाणे हे अहवाल आहेत. पुनर्वसन,कृषी,सिंचन या विभागाच्या अधिका-यांनी त्या अहवालाचा अभ्यास करुन त्या अहवालात सुचविलेल्या सूचनांची कितपत अंमलबजावणी केलेली आहे यावर त्या अहवालाची मजबुती आणि ताकद अवलंबून आहे.केवळ आमची धूळफेक करण्यासाठी या अहवालाचा उपयोग करता कामा नये.शासनाच्या अधिका-यांनी या अहवालाच्या माध्यमातून स्वत:चे सक्षमीकरण केले तर त्या अहवालाला काही तरी अर्थ राहील. शेतक-यांच्या आत्महत्तेच्या संदर्भात लॉग टर्म धोरण आखत असतांनाच ताबडतोबीने मदत करण्याचे धोरण आखले पाहिजे. त्याचबरोबर मदत देतांना जे निकष लावण्यात येतात ते सुध्दा बदलण्यात आले पाहिजेत व या संदर्भात शासनाने तातडीने घोषणा केली पाहिजे. त्याचप्रमाणे संवेदनशील राहून या विषयाकडे पाहिले गेले पाहिजे. काही ठिकाणी पती

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे...

आणि पत्नी अशा दोघांनी मिळून आत्महत्या केलेल्या आहेत.तेव्हा शेतक-यांचे पुनर्वसन करीत असतांना मला एक मुदद्‌ा मांडावयाचा आहे. भूकंपात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाचे पुनर्वसन वा शेतक-याने आत्महत्या केलेल्या कुटुंबाचे पुनर्वसन, पुरामध्ये ज्या व्यक्ती मरण पावलेल्या आहेत त्या कुटुंबातील व्यक्तीचे पुनर्वसन , बॉम्ब स्फोटामध्ये मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबातील व्यक्तीचे पुनर्वसन एकाच पध्दतीने केले जात आहे. ज्या प्रमाणे ग्रामीण भागात एखादी व्यक्ती आजारी पडल्यानंतर डॉक्टर त्याला लाल रंगाचे एकच औषध देतो त्याप्रमाणें हे पुनर्वसनाचे धोरण राहणार आहे काय ? की वेगवेगळया परिस्थितीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबाचे पुनर्वसन वेगवेगळे राहणार आहे आणि त्यासबंधी वेगवेगळे निकष राहणार आहेत काय.? या व्यक्तींना आपण भावनिक आधार कशा पध्दतीने देणार आहोत ? त्यांची विचारपूस कशा पध्दतीने करणार आहोत ? याचा विचार केला पाहिजे. ज्या कुटुंबात अशी दुर्देवी घटना घडलेली असेल त्या कुटुंबातील मुली उघडयावर येऊन त्यांच्यावर दुरावस्था कशी येणार नाही या बाबतीत पुनर्वसन विभागाने जास्त काम केले पाहिजे असे मला या निमित्ताने आवर्जून सांगावयाचे आहे. एवढे बाोलून मी माझे भाषण संपविते. जय भीम. जय महाराष्ट्र.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

श्री. श्रीकांत जोशी ( औरंगाबाद विभाग पदवीधर ):सभापती महोदय,या ठिकाणी मांडण्यात आलेल्या प्रस्तावा वरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. शेतक-यांनी केलेल्या आत्महत्येच्या प्रश्नाचे गांभीर्य किती आहे याची कल्पना अजूनही शासनाला आलेली दिसत नाही. टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सच्या अहवातील चार ओळी मी या ठिकाणी वाचून दाखवतो. त्यात असे म्हटलेले आहे की,

"Similarly, a farmer committed the fateful act on August 15, 2004, the Independence Day. The farmer felt dejected at not being able to meet his daughter's demand for a new dress that she wanted to wear for the flag hoisting ceremony. Inability to cater to such a simple demand was a loan of Rs.3,000/- for which interest alone amounted to Rs.7000/-. Crop failure made loan repayment impossible and with passing time even meeting daily household expenses was difficult. His daughter's demand exposed his unfreedom. He chose to end his life on the day India attained freedom."

या देशाचा स्वातंत्र्य दिन ज्यावेळी साजरा केला जात होता त्यावेळी फाटलेले कपडे घालून जाण्या ऐवजी चांगले कपडे घालून स्वातंत्र्य दिनाच्या समारंभाला जावे असे एका शेतक-याच्या मुलीला वाटले आणि ते कपडे देऊ शकत नसल्यामुळे एका शेतक-याने आत्महत्या केली होती. अजूनही परिस्थितीचे गांभीर्य सरकारच्या लक्षात येत नसेल तर मी असे सांगतो की, फार दिवस शेतकरी आत्महत्या करीत राहतील असे नाही.पुढच्या पिढीतील शेकतक-यांची मुले आपल्या गळयाला फास देऊन तुम्हाला भर चौकात फासाला लटकावतील तेव्हा तुमचे डोळे उघडतील आणि तो काळ फार लांब राहिलेला नाही.सत्तेवर कोणता पक्ष आहे हे महत्वाचे नाही. कापूस हा विषय न समजल्यामुळे ही वेळ आलेली आहे.हे कृपया आपण लक्षात घ्यावे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ...

कापूस हा विषय समजणारा असा कोणी मंत्री या मंत्रिमंडळामध्ये आहे काय ? केवळ सन्माननीय राज्यमंत्री श्री.दांडेगावकर हे कदाचित कापूस हा विषय समजणारे असतील. आज कापूस क्षेत्रातील एकही मंत्री मंत्रिमंडळामध्ये नाही आणि मी आपल्याला सांगू इच्छितो की, सर्वात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या या कापूस क्षेत्रामधील शेतकऱ्यांच्याच झालेल्या आहेत. .. मी हे आकडेवारीने येथे सिद्ध करून दाखवू शकतो. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करीन की, त्यांनी माझे म्हणणे पूर्ण ऐकून घेतल्यानंतर बोलावे. ...

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मंत्रिमंडळामध्ये कोणाला कापूस हा विषय माहीत नाही असे जे सन्माननीय सदस्यांनी मत व्यक्त केले ते रेकॉर्डवर येऊ नये. कापूस हा विषय माहीत नाही असा कोणीही या मंत्रिमंडळामध्ये नाही. तरीही मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांना या विषयासंबंधात काही उत्तरे पाहिजे असतील तर आपण जरूर प्रश्न मांडा, आम्ही त्याची उत्तरे आपल्याला देऊ आणि ती दिली नाहीत तर मग आपण असे म्हणू शकता.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी माझ्या भाषणातून काही प्रश्न मंत्री महोदयांना जरूर विचारणार आहे आणि त्याची त्यांनी उत्तरे द्यावीत अशी माझी त्यांना विनंती आहे. मी या ठिकाणी केवळ मराठवाडा विभाग डोळ्यासमोर ठेवून काही आकडेवारी देणार आहे. कारण येथे अन्य वक्त्यांच्या बोलण्यातून मराठवाडाच रिप्रेझेंट झालेला नाही. विदर्भाविषयी अनेक जण येथे बोलले आहेत. म्हणून मी मराठवाड्यापुरते येथे सांगणार आहे. सभापती महोदय, नांदेडला सगळ्यात जास्त म्हणजे 40 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यानंतर जालनामध्ये 35, संभाजीनगर-औरंगाबाद मध्ये 14, बीड मध्ये 10, लातूर 3, हिंगोली 11 आणि उस्मानाबाद मध्ये 1 आत्महत्याचे प्रकार घडले आहेत. मराठवाड्यामध्ये लातूर-उस्मानाबादचे पर कॅपिटा उत्पन्न सर्वात कमी आहे पण तेथे आत्महत्येचे प्रमाण त्या मानाने कमी आहे आणि ज्या सगळ्या आत्महत्या झ ालेल्या आहेत त्या सगळ्या गावांची नावे घेऊन मी सांगू इच्छितो की, लोहा असेल नाही तर कन्नड मधील जेवूर असेल, या ठिकाणी आत्महत्या करणारे सगळे शेतकरी हे कापूस उत्पादकच होते. एखादा अपवाद वगळता त्यातील 90 टक्के शेतकरी हे कापूस उत्पादक होते ही वस्तुस्थिती आहे. आपण खोलात गेलात, हा रिपोर्ट आपण नीट वाचून काढलात तरी आपण या निष्कर्षाप्रत याल याची मला खात्री आहे. मग हे असे का झाले ? याचा आपण विचार केला आहे का ? मी

...... एसएस 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी ...

आपल्याला सांगितले की, गेल्या वर्षी माननीय कृषी मंत्री माननीय मुख्यमंत्र्यांच्या समवेत होते. तेव्हा कृषी मंत्र्यांना मी सांगितले की, आपले कृषी खाते सांगते आहे की, मराठवाड्यामध्ये केवळ 600 कोटी रूपयांचा कापूस झाला. पण 1700 कोटी रूपयांचा कापूस पणन मंत्र्यांनी मराठवाड्यामध्ये विकलेला आहे. मात्र आपले कृषी खाते आपल्याला बोगस आकडेवारी देत आहे. कृषी खात्यातील अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराशिवाय दुसरे काही करणे जमत नाही. सभापती महोदय, मराठवाड्यातील पर कॅपिटा उत्पन्न मग कमी का आहे ? तेथे यील्ड 1 क्विंटल का आले ? बीटीजी बोगस बियाणे का आले ? संपूर्ण मराठवाड्यामध्ये बियाणांची एकच प्रयोगशाळा आहे. मराठवाड्यामध्ये एकंदर साडेआठ हजार खेडी आहेत आणि त्यातील साडेपाच हजार गावांमध्ये कापूस पिकविला जातो. आमच्याकडील बोगस बियाणांचा प्रश्न गेली सात वर्षे सातत्याने सगळ्याच सभागृहात मांडतो आहे. खरीपच्या बैठकीमध्ये अक्षरश: हाताला चुना लावून बोंबलावे लागते की आपण याबाबत कारवाई का करीत नाही म्हणून. आता या ठिकाणी सन्माननीय श्री.गोविंदराव आदिक नाहीत, पण ते त्यावेळी कृषी मंत्री होते. त्यांना मी म्हटले की, कापसाची डिमांड वाढते आहे, बियाणांचा स्टॉक नाहीए. उघड्या डोळ्यांनी लोक सरकी म्हणून बियाणे विकताहेत, आपण सरकार म्हणून या विरोधात काय करीत आहात ? सभापती महोदय, संपूर्ण मराठवाड्यामध्ये बियाणांची एकच प्रयोगशाळा आहे आणि त्यातून 60 दिवसांनंतरच बियाणांचे सर्टिफिकेशन होऊ शकते, तोपर्यंत काही केले जाऊ शकत नाही. तेव्हा माझा प्रश्न आहे की, या बाबतीत सरकार झोपले आहे का ? आपण सगळ्या ठिकाणी कॉम्प्युटराईज्ड यंत्रणा का ठेवली नाही ? सगळ्या सीड कंपनींच्या मालकांना आपण का बोलाविले नाही ? त्यांना आपण का सांगितले नाही की, आपल्याला एका विशिष्ट ठिकाणी डिव्हिजन प्लेसला वा डिस्ट्रिक्ट प्लेसला एका ठिकाणी कॉम्प्युटराईज्ड एंट्री करून पॅकेट देण्याची व्यवस्था केली जाईल. या रिपोर्टमध्ये दिले आहे की, यवतमाळ मध्ये 1100 पेक्षा जास्त कृषी सेवा केंद्रे आहेत आणि फक्त एक कृषी इन्स्पेक्टर आहे. तो इन्स्पेक्टर ब्रम्ह आहे का देव आहे की जो इतक्या सर्व ठिकाणी जाऊन भेट देऊन बोगस बियाणांचे प्रकार थांबवू शकेल ? तेव्हा पूर्वीपासूनच शेतकऱ्यांची बियाणांमध्ये फसवणूक झालेली आहे आणि त्यामुळेच ईल्ड कमी झाले आहे. परिणामी शेतकऱ्याला आत्महत्येशिवाय पर्याय राहिला नाही. ज्याप्रमाणे बियाणांमध्ये फसवणूक शेतकऱ्यांची झाली .. या एकाच विषयावर बोलावयाचे म्हटले तरी खूप काही बोलता येऊ शकेल, त्यासाठी किमान अर्धा

....... एसएस 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तास तरी लागेल इतका हा गंभीर विषय आहे. सभापती महोदय, गेल्या वर्षी परभणी मध्ये बियाणे विक्री करणाऱ्या दुकानावर हल्ला झाला होता. त्याबाबतीत मी येथे नियम 93 अन्वये सूचना देखील दिली होती. त्या कंपनीच्या मालकाला मी फोन करून विचारले की, तुम्ही अशा प्रकारे बोगस बियाणे का देता ? पहिली कंपनी चांगली होती, तिचेच बियाणे तुम्ही का दिले नाही ? यातून तुम्ही तुमचे स्वत:चेही नुकसान करता आहात आणि शेतकऱ्यांचेही नुकसान करीत आहात आणि त्यातून शेतकऱ्याला आत्महत्येला प्रवृत्त करीत आहात. त्यांनी मला सांगितले की, जोशीसाहेब माझ्याकडे याबाबतची सगळी आकडेवारी आहे. पण अशा पद्धतीने बोगस बियाणांची विक्री चालू आहे की, मी त्याबाबत काहीच करू शकत नाही. आय ॲम हेल्पलेस, युवर गव्हर्नमेंट इज नॉट को-ऑपरेटिव ॲट ऑल टू मी. सरळ सरळ त्या कंपनीच्या नावावर लाखो रूपयांचा बोगस बियाणांचा व्यवहार झ ाला. सन्माननीय राज्यमंत्री श्री.दांडेगावकर साहेब या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना कदाचित हा सगळा प्रकार माहीत असावा. तेव्हा यील्ड जे कमी झाले ते काही परमेश्वरी कृपेने किंवा पाऊस कमी झाला म्हणून झालेले नाही तर त्याला आपण देखील तितकेच जबाबदार आहात हे मला या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांना आवर्जून सांगावयाचे आहे. यामध्ये बोगस बियाणांची जशी कथा आहे तशीच ती बोगस खतांची देखील आहे. संपूर्ण मराठवाड्यामध्ये खतांचे एकच व्हेरिफिकेशन आहे. क्लेमध्ये केवळ क्लेच मिसळला जातो. एनपीके मिळतच नाही. एन म्हणजे सोडीयम पोटेशिअम आणि कॅल्शिअमचा तर पत्ताच नसतो. येते ती डायरेक्टली मातीच येते. पण अजूनही तीन तीन महिने झाले तरी खतांचे रिपोर्ट आपल्याला कंपनी पाठवित नाही हे मला या ठिकाणी कृषी मंत्री श्री.थोरात यांना सांगावयाचे आहे. असे असेल तर शेतकऱ्यांनी आत्महत्याशिवाय दुसरे काय करायचे ? आपले कृषी खाते झोपलेले आहे. आपले कृषी सचिव, कृषी आयुक्त आणि इतर सर्व अधिकारी यांची एक चेन आहे आणि त्यातील एखाद दुसरा अपवाद वगळता पैसे खाण्या शिवाय दुसरे काम कुणी करीत नाही. तेव्हा शेतकरी आत्महत्या करीत आहे त्याला आपणच जबाबदार आहात. सन्माननीय श्री.राणे साहेबांकडे महसूल खाते आता नव्याने आलेले आहे. तेव्हा माझा आपल्याला एकच सल्ला आहे. खरे तर मी आपल्यापेक्षा वयाने लहान आहे त्यामुळे मी आपणास सल्ला देऊ शकत नाही. पण तरीही मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण निवडून आल्यानंतर अनेक वृत्तपत्रांतून अनेकांनी आपल्याबद्दल चांगले लेख दिले होते. एकदा ते सारे

...... एसएस 4 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी .....

अग्रलेख आपण वाचावेत, आपल्याला ते खूप आवडतील. त्यातून खूप सुंदर व चांगले सल्ले त्यांनी आपल्याला दिले होते. आपल्या महसूल खात्याने खते आणि बियाणे यांच्या बाबतीत थोडेसे लक्ष देण्याचे ठरविले असते तरी मी आपल्याला सांगतो की, मराठवाड्याचे पर कॅपिटा इन्कम हे किती तरी वाढू शकले असते. सभापती महोदय, या आत्महत्या काही उगीचच झालेल्या नाहीत. माझी या निमित्ताने सूचना आहे की, प्रत्येक तालुका पातळीवर सीडस् सर्टिफिकेशन आणि फर्टिलायझर एक्झामिनेशनची प्रायव्हेटायझेशनची सेंटर्स आपण उभारू शकता त्याप्रमाणे ती उभारली जावीत. तसेच मागे सन्माननीय सदस्य श्री.गडाख यांनी सांगितले की, आपल्या कार्यकर्त्यांनी खरे तर अशा चळवळी उभारल्या पाहिजेत. पश्चिम महाराष्ट्राने 16 हजारापैकी 14 हजार कोटी रूपये इतकी बँक हमी उचलली आणि मराठवाडा व विदर्भाला हजार कोटीचा देखील पल्ला गाठता आला नाही. ..

( यानंतर श्री.सरफरे ..... टीटी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ पूर्वी श्री. सुंबरे 16:00

श्री. श्रीकांत जोशी...

पतंगरावजी आपले सरकार कां पुढे येत नाही? मराठवाडयातील कापसाचे पिक हे वर्ल्ड कॉपिटेटीव्ह होण्यासाठी त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व तपासण्या करण्यासाठी व सहकारी चळवळीला मदत करण्यासाठी कुठेही तालुका पातळीवर सोसायटी असेल तिला अत्याधुनिक करुन त्यांचेमार्फत पुरवठा होणाऱ्या बियाणे व खतांची निश्चितपणे तपासणी करण्यासाठी आपण जर लॅबॉरेटरीज एस्टॅब्लिश केल्या असत्या तर मराठवाडयातील शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागल्या नसत्या. आपण म्हणालात आम्हाला कापूस कळतो. मला आपल्या उत्तरात सांगा की, माईक प्रॉपर्टी म्हणजे काय? कापसाच्या कोणत्या प्रॉपर्टीज वर्ल्ड कॉंपिटेटीव्ह आहेत? माझ्या मोबाईलवर मेसेज आलेला आहे. 31 एमएम च्या पुढील स्टेपलला 24 हजार रुपयांपेक्षा जास्त भाव कोट झालेला आहे. 24 हजार रुपये पर कॅंडी भाव होणार असेल तर 3 हजार रुपयांना कापूस घेणे सरकारला परवडले असते. आज 31 एमएम चे उत्पादन देणारे मराठवाडयातील भोकरदन, सिल्लोड, जाफराबाद हे सर्व तालुके इथपासून ते माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड यांच्या तळणीमध्ये सुध्दा काही गावे, तालुके 31 स्टेपल देणारे आहेत हे खरे आहे की नाही सांगा? माझ्या मराठवाडयामध्ये 31 एमएम स्टेपल देणारी किमान हजार गावे असतील तर त्या हजार गावांना आपण 2700 रुपये भाव कां देत नाही? कारण यांच्या फेडरेशनबाबत मला शब्द वापरता येत नाही इतका गोंधळ आहे. गाढवाचा गोंधळ म्हटला तर गाढव म्हणते माझी सुध्दा काही इज्जत आहे. तुम्ही त्याच्यापुढे वाटोळे करुन टाकले. इतक्या बेकार पध्दतीने फेडरेशनचे काम चालले आहे. आता याठिकाणी सांगण्यात येत होते की, एच 4 आणि इतर कोणकोणत्या जाती आहेत. हे जग स्टेपलवर चालते, अर्ध्या अर्ध्या स्टेपलने जगाचे भाव ठरतात. रोज इंडेक्स चेंज होत असतो. एनवायसी म्हणजे काय हे माननीय महसूल मंत्री श्री. राणे साहेबांनी सांगावे. आजचा एनवायसी इंडेक्स किती आहे? दर मिनिटाला माझ्याकडे आकडे येतात. तुम्हाला कापसाच्या भावाची जाणीव आहे. प्रत्येकाला ती असली पाहिजे याबद्दल मला माहिती नाही. निदान या खात्याला तरी विचारुन एनवायसी चा आजचा इंडेक्स किती आहे ते सांगा? मला जर याचे उत्तर दिले तर मला आपला अभिमान आहे. हा प्रश्न मी राजकारणापेक्षा वेगळा समजतो. कापूस हा आमच्या मराठवाडयाचा आत्मा आहे. या कापसाचे नीट कल्टिवेशन, प्रोसेसिंग, मार्केटींग केले तरच मराठवाडयातील शेतकरी आत्महत्तेपासून वाचू शकेल. नाहीतर मराठवाडयातील शेतकऱ्यापुढे आत्महत्या नाहीतर स्थलांतर हे दोनच मार्ग राहिले आहेत. माननीय श्री. अजितदादा पवार यांना मी मागील वेळी एक

श्री. श्रीकांत जोशी...

विषय सांगितला. जायकवाडीच्या बाबतीत सांगतो की, 1 लाख 80 हजार हेक्टरवरुन 24 हजार हेक्टरवर सिंचन आले होते. आता त्यांनी प्रकल्पाची डागडुजी केली असली तरी अजून शेतीला पाणी मिळाले नाही. परभणी हा एकच जिल्हा 1 हजार कोटींचा कापूस पिकवू शकतो आणि वर्ल्ड मार्केट करु शकतो. त्या कॅनॉलला अजून गती यायची आहे. त्यासाठी आपण प्रयत्न सुरु केले आहेत. तेव्हापासून 7 प्रकल्पाची माणसे माझ्याकडे आली आहेत. नांदेडमध्ये ज्या चाळीस योजना झ ााल्या आहेत त्यापैकी अप्पर पैनगंगेचे पाणी शेतकऱ्यांना मिळत नाही. मराठवाडयात सुध्दा सहकारी चळवळ आणि सहकारी कारखाने चालविणारे चांगले लोक आहेत. माननीय श्री. गोपिनाथरावजी मुंडे, माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख आहेत. त्यांनी मांजरा साखर कारखाना चांगल्या प्रकारे चालविला आहे. त्यांनी जगामध्ये रेकॉर्ड केले आहेत. परंतु मराठवाडयात जेव्हा ही सहकारी चळवळ जोम धरते, जेव्हा शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय होतात त्यावेळी त्या निर्णयांना चांगला हात देण्याऐवजी कुठेतरी आष्टीच्या दूध संघामध्ये राजकारण आणून 1 लाख 39 हजार लिटर रोजचे दूधाचे कलेक्शन व 100 कोटींची रोजची उलाढाल असलेला संघ अडचणीत कसा येईल हे पश्चिम महाराष्ट्राकडून बघितले गेले आहे. कुणीही उदार मनाने आपला मराठवाडा हा आमचा सख्खा भाऊ आहे यालाही आपण मोठे केले पाहिजे, आणि त्या भागातील कापसाला न्याय दिला पाहिजे. फक्त आम्ही ऊसाचे प्रेमी नाहीत, कापसाचे सुध्दा तेवढेच प्रेमी आहोत. अशाप्रकारची भूमिका गेल्या 50 वर्षात घेतली गेली आहे काय? तुम्ही गुजरात राज्याकडे बघा. त्या राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. मोदी यांना तुम्ही डिवचता. महाराष्ट्राच्या निम्मा असलेला गुजरात कापसाच्या पिकाच्या बाबतीत महाराष्ट्राच्या पुढे निघून जात आहे. यावर्षी 1 कोटी बेल्सचे मार्केट करण्याचे त्यांनी टारगेट ठरविले आहे. आपण 60 लाख बेल्सच्या पुढे गेलो नाही. आपल्यापेक्षा निम्मा असलेला गुजरात जर महाराष्ट्राच्या नाकावर टिच्चून पुढे गेला तर कुठल्या दृष्टीकोनातून आपण "जय महाराष्ट्र" म्हणायचे? हा मला प्रश्न विचारावयाचा आहे. मराठवाडयातील शेतकऱ्यांना जर ताकद द्यायची असेल तर मराठवाडयातील 60 टक्के कापूस पिकाकडे नीट लक्ष देऊन वर्ल्ड कॉंपिटेटीव्ह मार्केटींग होण्यासाठी प्रोसेसिंग, स्टॉकींगकडे लक्ष दिले पाहिजे. आपण 1 हजार कोटींचे कापड विकत घ्या, व गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना गणवेश म्हणून द्या. त्या ठिकाणी मोठमोठया फॅक्टरीज कां येत नाहीत? त्याची ईक्विटी सरकार कां टाकीत नाही? त्यांना काही महत्वाच्या गोष्टी मोफत कां देत नाही? हा सगळा कापूस सरकार खाऊ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

शकणार नाही. त्या फेडरेशनच्या हातामध्ये देऊन या कापसाची माती करण्यापेक्षा काही दमदार पाऊले हे सरकार उचलणार आहे की नाही? आणि कापसाच्या पिकाच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या सरकार वाचविणार आहे की नाही याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो..

--

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/RJW/D पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:05

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात आणि कशामुळे होतात याची भरपूर चर्चा झालेली आहे. या चर्चेच्या वेळी बँकावर देखील भरपूर टीका झाली आहे. पण महाराष्ट्रात काही बँका चांगल्या प्रकारे काम करीत आहेत आणि त्याबाबतीत हे शासन अभ्यास करणार आहे की नाही ? याठिकाणी मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, मागच्या हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी वन टाईम सेटलमेंटचे आश्वासन दिले होते. याठिकाणी माननीय मंत्री श्री.अजित पवार उपस्थित आहेत. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, त्यावेळेला वन टाईम सेटलमेंटचे जे आश्वासन दिले होते ते सर्व सहकारी बँकासाठी, फक्त भूविकास बँकेसाठी नाही आणि त्याची या सभागृहाच्या कामकाजामध्ये नोंद आहे. या सर्व बाबींवर आजच्या या चर्चेच्या माध्यमातून शासना कडून उत्तर मिळाले पाहिजे असे माझे म्हणणे आहे. या सहकार चळवळीमध्ये कार्य करणाऱ्या विविध सहकारी संस्था आहेत, यांची उन्नती झाली, म्हणजे अगोदर जिल्हा बँक मग राज्य बँक आणि त्या नंतर नाबार्डकडे जाता येते. नाबार्ड डायरेक्ट फायनान्स करु शकत नाही, त्यांच्याकडे वसुलीची यंत्रणा नाही. वसुली हा यातील महत्वाचा घटक आहे म्हणून मी निश्चितपणे सांगेन, मी माझ्या बँकेमध्ये जो प्रयोग केला आहे, त्याचे यासंदर्भात उदाहरण देऊ इच्छितो आणि त्यासाठी मला पाच मिनिटांचा जास्त वेळ द्यावा. माझ्या तालुक्यामध्ये जेव्हा आमच्या पक्षाने बँक ताब्यात घेतली, तेव्हा 32 हजार सभासद हे थकबाकीदार होते. हे सभासद 1962 सालापासून म्हणजे मी पाच वर्षाचा होतो तेव्हापासूनचे आहेत. पण मी अभिमानाने सांगू इच्छितो की, आज त्यांच्याकडून केवळ 2 हजाराची वसूली राहीलेली आहे आणि पुढच्या वर्षी वसुलीच्या बाबतीत 100 टक्के टारगेट वसूल करीत आहोत. ही थकबाकी कोणती आहे ? तर 1980 मध्ये माजी मुख्यमंत्री माननीय श्री.अंतुले यांनी कर्जमाफी केली होती. त्यानंतर 1989 मध्ये माननीय श्री.विश्वनाथ प्रताप सिंग पंतप्रधान असताना त्यांच्या मंत्रीमंडळानेही माफी जाहीर केली होती. त्यामुळे 1991 सालापासून 2006 सालापर्यंतची ही थकबाकी आहे. म्हणजे यासाठी जास्त मागे जाण्याचे कारण नाही तर मागील 10-12 वर्षापूर्वीची ही थकबाकी आहे. त्यापूर्वी 100 टक्के कर्जमाफी करण्यात आली होती. याचे संशोधन करावयास पाहिजे. याठिकाणी माननीय महसूल मंत्री उपस्थित आहेत. त्यांनी मुख्यमंत्री असताना खरीप आणि रब्बीच्या संदर्भात बैठक घेतली होती. त्यावेळी मी आमदार नव्हतो पण बँकेचा चेअरमन म्हणून या बैठकीसाठी रत्नागिरीला गेलो होतो. त्यांनी प्लॅनिंग केले की,

. . . .2यु-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

याठिकाणी कोणती आणि किती लागवड करावयाची ? मी निश्चितपणे सांगेन की, आपण केलेत तर ते निश्चितपणे होऊ शकते हे दाखवून दिलेले आहे. आज कोकणात आंबा आणि इतर फळांची लागवड मोठया प्रमाणात होत आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, सिंधुदूर्गमध्ये लोक दगड फोडून तेथे आंब्याची लागवड करीत आहेत आणि त्याचे जास्त पीक येत आहे. यासाठी बँका 100 टक्के अर्थसहाय्य करीत आहेत आणि त्याची वसुलीही 100 टक्के होत आहे. याठिकाणी या सगळयाची नोंद घेतली गेली पाहिजे. आम्ही 32 हजार शेतकऱ्यांची थकबाकी वसूल केली आहे. आम्ही आमच्या बँकेमार्फत 8 ते 9 हजार शेतकऱ्यांना कर्ज देतो आणि त्याची 100 टक्के वसुली करीत आहोत. सहकारामध्ये काम करणाऱ्या अनेक बँका आहेत. त्यातील 13 बँका चांगल्या असून त्यात पश्चिम महाराष्ट्रातील 6 आणि कोकणातील 5 बँका आहेत आणि बाकीच्या बँकांची परिस्थिती वाईट आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील हे एम.एस.सी.बँकेच्या बैठकीसाठी आले होते. जर पुढच्या वर्षी ही बँक बरखास्त झाली तर शेतकरी कुठे जाणार आहेत ? अशा वेळी शेतकरी सावकाराच्याच दारात जाणार आहे. त्यामुळे बँक जिवंत कशी राहील हे आपण प्रामुख्याने पाहिले पाहिजे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (पुढे सुरु....

बुलढाण्याची जिल्हा बँक डबघाईस गेली. ती का डबघाईला गेली तर ती थकबाकीमुळे गेली. शेतकरी त्या ठिकाणी कर्ज घेऊ शकत नाही, ही परिस्थिती आहे, याचा गांभीर्याने सहकार खात्याने विचार करण्याची गरज आहे. जे लोक बँक चांगली चालवितात,त्यांचा पाठपुरावा आपण केला पाहिजे. मी मघाशी सांगितले की, सहकाराचा आत्मा हा विविध कार्यकारी संस्था आहेत. या विविध कार्यकारी संस्था व्हायबल आहेत की नाही, हे पहाण्याचे काम आपण शासनाकडून केले पाहिजे. तसे काम मी माझ्या जिल्ह्यामध्ये केलेले आहे. 700 विविध कार्यकारी संस्था होत्या त्या कमी करुन 150 केल्या. त्या संस्था व्हायबल करण्याचे काम करतो आहोत. पुढल्या वर्षी या संस्था जिल्हा बँकेशी इंटनेटद्वारा जोडण्याचा आमचा प्रयत्न आहे. संस्था व्हायबल नाहीत तरी त्या चालू ठेवतो,याचे कारण आपण मतांसाठी त्या ठेवतो. हे सगळे चित्र बदलले पाहिजे, याकडे गांभीर्याने पाहिजे पाहिजे. खरीपची बैठक आणि पीक कर्ज धोरण या संदर्भात बोलायचे तर पीक कर्ज धोरणाची बैठक सहा महिन्यांनी होते. शासन सांगते, त्याप्रमाणे आम्ही कर्ज देतो आहोत. बँक किंवा आम्ही सर्व नाही तर त्याचा अभ्यास प्रामुख्याने अधिकाऱ्यांकडून झाला पाहिजे. माझी सहकार मंत्र्यांना नम्रपणे विनंती आहे की, राजकारण आपण करु नये. राष्ट्रवादी, काँग्रेस आय, हा चेअरमन कोणाचा आहे ? राष्ट्रवादीचा आहे की काँग्रेसचा आहे, की शे.का.पक्षाचा आहे, हे पाहू नये. या ठिकाणी बँका या टिकल्या पाहिजेत, सहकार चळवळ टिकली पाहिजे, नाही तर शेतकरी सावकाराच्या दारामध्ये जातील, मग आपण डोक्याला हात लावून पहात बसू. अशी गंभीर परिस्थिती महाराष्ट्रामध्ये होईल. मी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचा ॲक्टीव्ह सदस्य म्हणून काम करतो आहे. सर्वांचे मार्गदर्शन घेतले जात आहे. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.विलासकाका पाटील आहेत, सन्माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार आहेत. आपण बँकांवर अन्याय करत आहोत. आज नाबार्डकडे जाण्याची गरज नाही. आज बँकांसमोर दुसरा प्रश्न आहे त्याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा केला पाहिजे. आमच्या बँका या लॉसमध्ये जाणार आहेत. आमच्या बँकांकडे सरप्लस पैसे आहेत. आज रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक दर महिन्याला 1 कोटी रुपयांनी लॉसमध्ये जात आहे. आमच्याकडे 194 कोटी रुपये सरप्लस आहेत. आम्ही चार टक्के व्याजाने पैसे ठेवतो आहोत. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे 1400 कोटी रुपये सरप्लस आहेत, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक 400 कोटी सरप्लस आहेत. आमची कर्ज देण्याची लिमिट संपलेली आहे. आता आम्ही शेतकऱ्यांना पैसे देऊ शकत नाही, डायरेक्ट त्यांना फायनान्स करु शकत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील (पुढे चालू...

नाही,अशा विचित्र परिस्थितीमध्ये आम्ही आहोत. या महाराष्ट्रामध्ये सहकार खात्याने याकडें गांभीर्याने पहाण्याची वेळ आलेली आहे. एका बाजूला बँकांची वसुली नाही आणि एका बाजूला वसुली आहे, म्हणून त्या ठिकाणच्या बँका तोट्यात चाललेल्या आहेत, याचा कोठेतरी विचार हे शासन करणार आहे की नाही ? मी या विषयावर बोलणार नव्हतो. परंतु आमच्याकडे 90 टक्के थकबाकी असतांना, 90 टक्के वसुली करतो आणि त्या ठिकाणी बँक उभी करतो. सभापती महोदय, 1400 कर्मचारी पाहिजे असतांना आम्ही 400 कर्मचाऱ्यांवर बँक चालवितो. बाकी ठिकाणी काय परिस्थिती आहे ? याचा विचार अधिकारी करत नाहीत. याचा अभ्यास कोणी करत नाही. फक्त बँका लिक्विडिशनमध्ये काढा आणि त्या ठिकाणी प्रशासक नेमा, चौकशी सुरु करा, एवढेच काम सहकार खात्यामध्ये चालू आहे. हे थांबले पाहिजे, असे माझे म्हणणे आहे. जेणेकरुन सहकार चळवळ टिकली पाहिजे,वाढली पाहिजे, वाढविली पाहिजे. आज महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेवर अन्याय कोणी करु नये. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे 7 हजार कोटी रुपये सरप्लस आहेत. फुकट कोणी पैसे ठेवत नाहीत. एकप्रकारचा त्यांच्यावर विश्वास आहे. हे काम करत असतांना सहकार खात्याचे अधिकारी किंवा हे खाते गंभीरपणे त्याकडे पहात नसेल, निर्णय देत नसेल तर या ठिकाणी आत्महत्त्या या होणारच. बँकांकडे पहाण्याचा शासनाचा दृष्टीकोन जोपर्यन्त बदलत नाही, तोपर्यन्त या ठिकाणची परिस्थिती बदलू शकत नाही. म्हणून सभापती महोदय, जी या सदनामध्ये आश्वासने दिली जातात, याची अंमबजावणी कशी होईल, हे पहाण्याचे काम आपल्या खात्याने करावे. जी आश्वासने दिलेली आहेत, त्यांची 100 टक्के अंमलबजावणी पुढील काळात व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे चार शब्द संपवितो.

---

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

दत्त/वाणी/ थोरात

प्रा. फौजिया खान ( नामनियुक्त ) : माननीय सभापति महोदय, आज हमारे किसान कर्ज के चक्रव्युह में फंसे हुए हैं और दिन पर दिन उनकी आत्म हत्याओं का प्रमाण बढ़ रहा है. इस राज्य के एक करोड़ 10 लाख किसानों के परिवारों में से लगभग 88 हजार परिवार साहूकार के कर्ज पर निर्भर हैं और यह प्रमाण 77 प्रतिशत है.

माननीय सभापति महोदय, मोटर और मोटर साइकिल की खरीदी के लिए ब्याज दर 9 प्रतिशत से साढे 11 प्रतिशत तक है जबकि कृषि कर्ज के लिए ब्याज दर 11 प्रतिशत से 15 प्रतिशत तक है. महाराष्ट्र के आर्थिक पाहणी अहवाल के अनुसार ग्रामीण भाग में रहने वाले 55 प्रतिशत लोगों की प्रति व्यक्ति आय 5339 रुपए प्रतिवर्ष है. इतनी गरीब परिस्थिति आज ग्रामीण भाग में रहने वाले किसानों की है.

माननीय सभापति महोदय, आज यहां पर किसानों द्वारा की जाने वाली आत्महत्याओं से संबंधित विषय पर चर्चा हो रही है. इन आत्महत्याओं के पीछे सिर्फ एक कारण नहीं हो सकता. क्योंकि एक तरफ तो उनसे निसर्ग नाराज है और दूसरी तरफ जागतिक परिस्थिति है. आज किसानों को उनके उत्पादित माल का योग्य भाव बाजार में नहीं मिल पाता है. उत्पादन खर्च से कम दाम आज किसानों को बाजार में मिलता है. जिसकी वजह से हमारे किसान एक दुष्कचक्र में फंसे हुए है. हमारा किसान कृषि उत्पादन के लिए कर्ज लेता है लेकिन उसके उत्पादित माल का उचित भाव उसे बाजार में यदि नहीं मिलेगा और उसके उत्पादित माल से उसे नफा नहीं होगा तो फिर वह कर्ज का भुगतान कैसे करेगा ? इस तरह की परिस्थितियों में फंसे होने की वजह से ही हमारा किसान आज आत्महत्या करने के लिए प्रवृत्त हो रहा है.

माननीय अध्यक्ष महोदय, शेतकरी जब अपने माल को बाजार में ले जाता है तो करीब 55 हजार करोड़ रुपए के शेतीमाल का नुकसान होता है. यह नुकसान करीब 30 प्रतिशत है. इसके अलावा किसानों के लाभ का एक बहुत बड़ा हिस्सा बाजार में उपस्थित दलालों की जेब में चला जाता है. इन सब बातों को ध्यान मे रखते हुए हमें एक अच्छा धोरण किसानों के उत्पादित माल के संबंध में बनाना चाहिए. हमारा कहना है कि किसानों और ग्राहक के बीच से मिडिल मेन को हटाया जाना बहुत आवश्यक है. मीडिल मेन की जेब में जाने वाला मुनाफा किसान को ही मिलना चाहिए. किसान का जो माल वेस्ट हो रहा है उस माल पर प्रक्रिया करने के संबंध में कोई धोरण

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धी नाही

प्रा. फौजिया खान.....

सरकार को बनाना चाहिए. सरकार द्वारा इस संबंध में कोई उचित धोरण अपनाकर किसनों की मदद करना जरुरी है. इसके अलावा क्वालिटी की तरफ ध्यान देकर भी वेल्यु एडिशन के द्वारा भी किसान की मदद की जा सकती है. यदि इन बातों पर ध्यान दिया गया तो कर्ज के दुष्चक्र में फंसे अपने किसानों को हम बाहर निकाल सकते हैं.

माननीय अध्यक्ष महोदय, मेरा यह भी सुझाव है कि महिलाओं के जो स्वयं सहायता गट हैं उनके माध्यम से शेती माल पर प्रक्रिया करने के काम को प्रोत्साहन दिया गया तो यह किसानों को समाधान देने वाला एक कदम होगा. महिलाओं के जो स्वयं सहायता गट हैं उनको मजबूत किया जाना चाहिए. इसके अलावा कम ब्याज दर पर किसानों को कर्ज दिलाना भी बहुत आवश्यक है. आज किसानों को कम ब्याज दरों पर तथा बैंको से आसानी से कर्ज नहीं मिलता है. जिसकी वजह से उस गरीब किसान को साहूकारों का दरवाजा खटखटाना पड़ता है. उस गरीब किसान को 11 से 15 प्रतिशत तथा कभी - कभी तो उसे 36 प्रतिशत से 40 प्रतिशत की ब्याज दर से कर्ज लेना पड़ता है. इसी वजह से वह कर्ज के इस दुष्चक्र में फंसा हुआ है, ऐसा मुझे लगता है. मानानीय सभापति महोदय यह बात हम सब जानते है कि खाजगीकरण और उदारीकरण का असर स्वाभाविक रुप से एग्रीकल्चर तथा उससे जुड़ी घटनाओं पर हो रहा है और इसकी सबसे ज्यादा मार किसानों पर पड़ रही है. आज के जागतिक धोरणों का मुकाबला करने के लिए हमें सक्षम होना होगा. बैंक तथा दूसरी सहकारी संस्थाओं से सुलभ कर्ज किसानों को मिले, इस तरह की व्यवस्था हमें अपने यहां पर डॅवलप करनी होगी. यदि किसानों को आत्महत्या करने से रोकना है तो उसे दिये जाने वाले कर्ज की ब्याज दर में कटौती करनी होगी, शेतीमाल पर प्रक्रिया करके किसानों को वाजिब दाम दिलाने के लिए कदम उठाना भी आवश्यक है. साथ ही बाजार में जो दलाल हैं उनको भी बीच में से हटाना होगा. सरकार द्वारा ये तीन कदम उठाना बहुत जरुरी है, ऐसा मुझे लगता है.

माननीय सभापति महोदय, केन्द्र सरकार की तरफ से बहुत सारे कदम उठाए गए हैं लेकिन उन उठाए गए कदमों का यहां पर कोई उल्लेख नहीं किया गया है. केन्द्रीय कृषि मंत्री माननीय शरद पवार साहब ने हार्टिकल्चर मिशन के अंतर्गत 15 हजार करोड़ रुपए किसानों को

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिए हैं. इस में से 50 प्रतिशत रकम उनको अनुदान के रुप में दी गयी है. उससे भी किसानों को काफी मदद मिलेगी. इसके अलावा केनद्र सरकार द्वारा स्माल फार्मर्स के लिए 80 हजार करोड़ रुपए की जो बजट प्रोवीजन की गयी थी उसको भी बढ़ाकर अब एक लाख 60 हजार करोड़ रुपए किया गया है. हमें इस बात पर ध्यान देना चाहिए कि कृषि के क्षेत्र में हम किस तरह से एक क्रांति ला सकते हैं, इस बात पर यहां पर चर्चा होने की आवश्यकता है. मैं यहां पर फिर से एक बार कहना चाहूंगी कि महिलाओं के स्वयं सहायता गट के माध्यम से एक बहुत ही अच्छी सोशल मूवमेंट हो सकती है. उस के माध्यम से इन सारी समस्याओं का हल निकल सकता है. स्वयं सहायता गट को एम्पावर करना जरुरी है. इस तरह की मेरी विनती शासन से है. इतना कहकर मैं अपनी बात खत्म करती हू. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-0-

xx 1

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, एक हजारापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी राज्यामध्ये आत्महत्त्या केल्या, ही गोष्ट शरमेची तर आहेच परंतु संतापजनक देखील आहे. संतापजनक यासाठी की, स्वतंत्र भारतामध्ये घटनेत सर्व नागरिकांना "राईट टू लाईफ" म्हणजेच जगण्याचा मुलभूत हक्क मिळालेला आहे. आणि या देशामध्ये आम्हाला जर अशा प्रकारे आपला प्राण द्यावा लागत असेल, स्वत:ला मृत्युदंड द्यावा लागत असेल तर ती लोकशाहीची शोकांतिका आहे. विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे एवढया शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झाल्या परंतु किती सरकारी नोकरांच्या नोकऱ्या गेल्या हा संशोधनाचा विषय आहे. मी एकाच विषयावर शसनाचे लक्ष वेधू इच्छितो आणि ते म्हणजे यासंदर्भात अकाऊंटेबिलिटी निश्चित होणे आवश्यक आहे. प्रशासन याला जबाबदार आहे की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. आणि असे जर नसेल तर कितीही लोकांनी आत्महत्त्या केल्या तरी प्रशासनाला काहीही फरक पडत नाही, ही आजची अवस्था आहे. म्हणून हा जो बेदरकारपणा आहे, जो निष्काळजीपणा आहे तो कुठेतरी थांबला पाहिजे व त्यासंदर्भात शासनाला काहीतरी ठोस भूमिका घ्यावी लागणार आहे. नाही तर या आत्महत्त्या होतच राहतील, विधिमंडळात चर्चा आपण करु, झालेल्या घटनांचा निषेध करु असे चक्र सुरुच राहणार आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी बऱ्याच गोष्टींचा उहापोह केला पण त्यांना एकच सांगावयाचे आहे की, केवळ शासनाकडे बोट दाखवून प्रश्न संपणार नाही, कारण प्रशासन तेच आहे, सरकार बदलत असते. मी त्यांना आठवण करुन देऊ इच्छितो की, शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र खरे तर युतीच्या काळात सुरु झाले. या राज्याला कर्जबाजारी करण्याचे पाप कोणी केले असेल तर ते त्याच काळात, हे लक्षात ठेवावे लागेल. या देशात साखर आयात करण्याची भूमिका आपल्याच काळात घेतली आहे. महत्वाची गोष्ट अशी आहे की, याबाबत शासनाला कुठेतरी ठोस पाऊल उचलून हा प्रश्न कायमचा सोडवाला लागणार आहे, नाही तर आत्महत्त्या होत राहणे हे कोणालाच परवडणारे नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत .....

म्हणून मला एका विषयावर आपले लक्ष वेधावयाचे आहे. आपले जे कृषी धोरण आहे त्याच्यामध्ये म्हणजे 1991 नंतर आमूलाग्र बदल झाला. मला वाटते याकडे शासनाचे लक्ष नाही. 1991 नंतर आपल्या देशामध्ये लिब्रलायझेशन आणि ग्लोबलायझेशनच्या अर्थव्यवस्थेमध्ये अंमलबजावणी झालेली आहे. गॅट करारावर सही झाली त्यामुळे W.T.O.चा जन्म झाला. आज आपण W.T.O.च्या युगात वावरत आहोत. यात महाराष्ट्राच्या आणि भारताच्या शेतक-याचे कोणते स्थान आहे याचा आपण कधी विचार केला आहे का? या महिन्यात जागतिक W.T.O. च्या मंत्र्यांची मिटिंग आहे. ही मिटिंग कृषीच्या संदर्भातच आहे. यामध्ये आपण महाराष्ट्रातील शेतक-यांच्या संदर्भात कोणती भूमिका घेतली आहे हे आजपर्यंत आपल्याला माहिती नाही. आता स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगात भारतातील, महाराष्ट्रातील शेतक-यांची स्पर्धा अमेरिका, युरोप सारख्या देशातील शेतक-यांशी आहे. अमेरिका आणि युरोपमधील शेतक-यांना 2-3 टक्क्याच्या दराने कर्ज उपलब्ध होत असते. परंतु आपल्याकडे किती टक्क्याने कर्ज मिळते याची कधीतरी आपल्याला तुलना करावीच लागणार आहे. आज आपल्याकडे मोठया प्रमाणात आंबा पिकतो परंतु तो जगामध्ये पोहोचत नाही. जागतिक स्पर्धेत आपल्याला मॅक्सिकोच्या आंब्याशी स्पर्धा करावी लागणार आहे. मार्केटमध्ये दुसरा आंबा येऊ नये यासाठी दुसरे देश लक्ष देतात परंतु आपण यासंदर्भात काहीही करीत नाही. खरे म्हणजे हा सबसिडीचा प्रश्न आहे. युरोपमध्ये 300 टक्के तर अमेरिकेमध्ये 150 टक्क्याने सबसिडी दिली जाते. परंतु यासंदर्भात आपल्या देशातील शेतक-यांना आणि महाराष्ट्रातील शेतक-यांना प्रत्यक्षात किती टक्के सबसिडी मिळते याचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. आपल्या शेतक-याला दुस-या देशातील शेतक-यांशी स्पर्धा करावयाची असेल तर या स्पर्धेच्या युगामध्ये आपल्याला शेतक-यांना संरक्षण द्यावे लागणार आहे. त्यामुळे यादृष्टीकोनातून शासनाचे धोरण काय आहे याबद्दल माहिती असणे आवश्यक आहे. तिसरी गोष्ट म्हणजे W.T.O.च्या युगात उत्पादन हे डिमांड रिलेटेड असले पाहिजे. जागतिक बाजारपेठेत, देशाच्या बाजारपेठेत कोणत्या शेतीमालाला भाव मिळेल , शेतक-याने कोणते पीक घ्यावे यासंदर्भातील माहिती शासनाने शेतक-यांना दिली पाहिजे तसेच कोणते पीक घ्यावे यासंदर्भात मार्गदर्शन सरकारला करावे लागणार आहे. परंतु अशा प्रकारचे मार्गदर्शन आज होत

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत .....

नाही. मार्केटमध्ये कांद्याला जर 200 रुपये क्विंटल भाव मिळाला तर शेतक-याला शासन कोणत्याही प्रकारचे संरक्षण देत नाही. एवढा कमी भाव कांद्याला मिळाला तर कांद्याला लावलेले पोते देखील शेतक-याला घरी आणता येत नाही. अशावेळी शासनाने शेतक-याला संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. म्हणून डिमांड रिलेटड बॅकवर्ड लिन्केजेसच्या आधारावर आपल्याला पुढील शेती करावी लागणार आहे. केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे जे शेती धोरण आहे ते उत्पादनावर आधारित आहे ते बाजार पेठेवर अवलंबून नाही. हे धोरण उत्पादनावर आधारित असल्यामुळे शेतकी विद्यापीठ असू दे, रिसर्च असू दे हे सर्व उत्पादनावर अवलंबून आहे. आपल्या शेतक-याला जर जगातील शेतक-याशी स्पर्धा करावयाची असेल तर मार्केटची जी व्यवस्था आहे त्यामध्ये जी साखळी आहे, डिमांडस् आहे त्या सर्वांचा आपल्याला अभ्यास करावा लागणार आहे व तसे निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आजच्या चर्चेमध्ये प्रामुख्याने मला 6 गोष्टीची मागणी सरकारकडून करावयाची आहे. आज शेतक-यांच्या ज्या आत्महत्या होत आहेत त्यासंदर्भात चौकशी करण्याची आपल्याकडे कोणती यंत्रणा आहे? पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर रेकॉर्ड कोठल्या पध्दतीने होते तसेच शेतक-याने आत्महत्या कर्जबाजारीपणामुळे केली आहे हे सिध्द करण्याची यंत्रणा आपल्याकडे काय आहे याची प्रोसिजर सर्वांना माहीत असणे आवश्यक आहे. तसेच जर शेतक-यांनी आत्महत्या केली तर कलेक्टरवर, प्रांतावर, मामलेदारावर कोणती ॲक्शन घेतली जाते? यामध्ये त्यांच्यावर कोणती जबाबदारी आहे? शासकीय यंत्रणेच्या दुर्लक्षपणामुळे शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होत आहेत त्यामुळे यास त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरूध्द कारवाई करण्याचे प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत....

तिसरी गोष्ट म्हणजे यामध्ये विधिमंडळाचे काय काम आहे ? टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सने जो अहवाल दिला आहे त्यातील काही मुद्दे श्री.गडकरी साहेबांनी येथे वाचून दाखविले आहेत. त्यामुळे यासंबंधी विधिमंडळाची नवीन समिती निर्माण करण्यासंबंधी निर्णय घेतला पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स आणि इंदिरा गांधी सामाजिक संस्था या दोन खाजगी संस्थांना शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येसंबंधी अहवाल सादर करण्यासंबंधीचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिला होता. त्यानुसार त्यांचा रिपोर्ट आलेला आहे. तो माननीय मुख्यमंत्र्यांना देखील मिळालेला आहे. काल परवा 1042 शेतकऱ्यांनी जमीन नापिक झाल्यामुळे आत्महत्या केल्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केलेले आहे.

कर्नल सुधीर सावंत : शेवटी कोर्टाला ही गोष्ट सांगावी लागली आहे. विरोधी पक्ष आज शासनाकडे, एग्झिक्युटीव्ह, ज्युडिशिअरीकडे बोट दाखवित आहे. त्यामुळे यासंबंधी विधिमंडळाची एक समिती असणे आवश्यक आहे. 6 टक्के व्याज दर देण्याची जबाबदारी शासनाने स्वत:वर घेतली पाहिजे. पाचवी गोष्ट म्हणजे WTO मध्ये केंद्रीय मंत्र्यांनी महाराष्ट्रा विषयीचे धोरण सांगण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. सहावी गोष्ट म्हणजे आज शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. तेव्हा त्याचे कर्ज माफ करण्याचे धोरण जाहीर करणे आवश्यक आहे व त्याची अंमलबजावणी प्रत्येक जिल्हयामध्ये होणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

.....

**तालिका सभापती (श्री.जगन्नाथ शेवाळे)** : सभागृहाची अतिरिक्त वाढविलेली दीड तासाची वेळ संपलेली आहे. अजून काही सन्माननीय सदस्यांसह मंत्र्यांना देखील आपले विचार मांडावयाचे आहेत.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

आपल्या भावना शासनाच्या लक्षात आल्या आहेत. मी आता सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना बोलण्यास अनुमती देत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, विधान परिषद नियम 289 अन्वये सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. या चर्चेमध्ये अनेक गोष्टी पुढे आलेल्या आहेत. त्यातील अनेक विषयाबाबत चर्चा देखील झालेली आहे. आत्महत्या का होते ? ती रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली पाहिजे या विषयी सदनातील सर्व सन्माननीय सदस्य बोलले आहेत. माझा जो मुद्दा आहे, त्याकडे कोणी लक्ष दिलेले नाही असे मला वाटते. कदाचित माझे हे निवेदन चुकीचेसुध्दा असू शकेल. आपण जे पैसे देणार आहात, त्याचे जे निकष आहेत, ते अत्यंत क्लिष्ट आहेत. सर्वसाधारण अडाणी शेतकरी त्याची पूर्तता करू शकेल की नाही यासंबंधी माझ्या मनामध्ये भिती आहे. एखादा माणूस जीव देण्यासाठी कधी तयार होतो, ज्यावेळी त्याच्या जीवनाचा ताप त्याला असहय होतो त्यावेळी. ज्यावेळी माणूस इमोशनली डिस्टर्ब् होतो, त्यावेळी तो जीव देण्यास तयार होतो. प्रत्येक माणूस आपले जीवन जगण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत असतो. महाराष्ट्र हा कृषि प्रधान देश आहे. तरी देखील 1166 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे आपल्या कृषि प्रधान राज्याला भूषणावह नाही.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.........

आपण आकडेवारी पाहिली तर सन 2001 मध्ये दर 10 दिवसाला एकाची आत्महत्या होत होती. सन 2005 मध्ये दीड दिवसाला एकाची आत्महत्या होत आहे. म्हणजे 180 दिवसांमध्ये 143 आत्महत्या झाल्या. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.पतंगराव कदम हे मान्य करतील. सभापती महोदय, न्यायमूर्ती दलवीर भंडारी आणि न्यायमूर्ती श्री.वजिफदार यांच्या खंडपीठासमोर मुख्य सचिवांना आपल्या प्रतिज्ञापत्रामध्ये 524 पैकी केवळ 300 आत्महत्येची चौकशी पूर्ण झाली असे सांगावे लागले. ज्या अधिकाऱ्यांनी कामामध्ये कुचराई केली त्या अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? याचे उत्तर मंत्रिमहोदयांच्या भाषणात अपेक्षित आहे. टाटा इन्स्टीटयुट ऑफ सोशल सायन्स आणि इंदिरा गांधी सामाजिक संशोधन संस्थेने ज्यावेळी रिपोर्ट दिला त्यावेळी आपण ॲक्सेप्ट केले. सभापती महोदय, आत्महत्या केलेल्या 71 शेतकऱ्यांपैकी फक्त 17 कुटुंबियांना नुकसान भरपाई दिली गेली. याची सुध्दा चौकशी होणे गरजेचे आहे. भिलई गावामध्ये एका शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येमुळे हे सर्व प्रकरण बाहेर आले आणि सरकारने 1100 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्याचे कबूल केले. भिलई येथील आत्महत्या करणारा शेतकरी हा मॅट्रीक्युलेट होता. मी स्वत: त्याठिक्‍़ाणी जाऊन आलेलो आहे. त्याने इंग्रजीमध्ये सही केली होती. तो इंग्रजी जाणणारा होता. त्याच्यावर आत्महत्या करण्याची वेळ का आली ? त्याचे नातेवाईक सांगत होते की, त्याच्या घरी कर्जाची वसुली करण्यासाठी माणसे आली होती. त्यांनी त्याला धमकी दिली की, "48 तासांच्या आत पैसे दिले नाही तर आम्ही तुझ्या घरावर जप्ती आणू, घरातील भांड्यांचा लिलाव करु." शेवटी त्या माणसाने आपल्या स्वत:च्या शेतात जाऊन आत्महत्या केली. ज्या अधिकाऱ्यांनी त्या व्यक्तीस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले त्यांचेवर कलम 302 लावले पाहिजे. सभापती महोदय, शेतकऱ्यांना जी मदत दिली जाते त्याच्या अटी क्लिष्ट आहेत. त्यातील एक अट अशी आहे की, आत्महत्या केलेल्याचे नाव 7/12च्या उताऱ्यामध्ये असले पाहिजे. त्याच्या नावावर किती जमीन आहे याचा उल्लेख पाहिजे. त्याचे आर्थिक उत्पन्न किती आहे याचे अनुमान काढून त्यानंतर त्याला मदत देणार हे घृणास्पद आहे. त्याचा मृत्यू नैसर्गिक आहे की त्याने आत्महत्या केली हे पोलिसांनी अहवाल दिल्यानंतर तहसीलदार ठरविणार. शवविच्छेदन रिपोर्ट ठरविणार. दुसरी एक अट अशी, त्याने पतपेठी किंवा राष्ट्रीयकृत बॅंकेचे कर्ज घेतले असेल

..2..

डॉ.दीपक सावंत.........

त्याला मदत मिळणार. हा नियम सुध्दा क्लिष्ट आहे. जर 7/12 उताऱ्यावर कर्ज घेतले असेल तर बॅंका पुन्हा कर्ज देत नाही. त्याने एखाद्याला वायदा केला असेल ते कर्ज शेतीसाठी सुध्दा असू शकेल. आणखी एक नियम असा आहे की, वडिलांच्या नावावर 7/12 असेल आणि त्याची खातेफोड झाली नसेल आणि त्याच्या मुलाने जर आत्महत्या केली तर त्याच्या कुटुंबियांना मदत मिळणार नाही. तो नुकसान भरपाईस पात्र ठरणार नाही.  बहुतेक वेळा वडिलांच्या नावावर शेती असते परंतु वडील शेती करीत नाहीत. परंतु खातेफोड झाली नसल्यामुळे त्याच्या मुलाला नुकसान भरपाई मिळत नाही ही शोकांतिका आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

ही शोकांतिका आहे. अर्थसहाय्य देण्यापूर्वी तपासणी केली जाते की, त्याला आत्महत्या करण्यास कोणी प्रवृत्त केले काय, एवढेच नव्हेतर त्याच्या बायका-मुलांची सुध्दा चौकशी केली जाते. या अर्थसहाय्याचे रिकमंडेशन विभागीय आयुक्तांनी केल्याशिवाय अर्थसहाय्य मिळत नाही. विभागीय आयुक्तांनी खरोखरच त्या व्यक्तीने आत्महत्या केली आहे असे प्रमाणपत्र दिल्याशिवाय कुटुंबियांना अर्थसहाय्य दिले जात नाही. शेवटी प्रमाणपत्रासाठी पुन्हा भ्रष्टाचार होणार. येत्या भविष्यकाळामध्ये लोकांची मानसिकता समजावून घ्यावयाची असेल आणि शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करावयाचे असेल तर या मुद्याचा विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, प्रसिध्दी माध्यमांद्वारे बी-बियाणे, फर्टिलायझरच्या जाहिराती केल्या जातात. जाहिरात होणाऱ्या बी-बियाणे आणि खतांची खरेदी करण्यासाठी शेतकरी कर्ज काढतो. अमूक बी-बियाणे किंवा खते वापरल्यास शेतात सोने पिकेल अशी जाहिरात केली जाते. जाहिरातींसाठी तर सिनेअभिनेते नाना पाटेकर यांचा देखील वापर केले गेला, हे देखील घृणास्पद आहे. अशा जाहिरातींतून शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे. त्यामुळे कोणते बी-बियाणे, खते खरेदी करावीत यादृष्टिकोनातून शासनाने मार्गदर्शक तत्वे आखण्याची आवश्यकता आहे. या चर्चेच्या अनुषंगाने व्याज दराच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. मी माननीयश्री.आर.आर.पाटील साहेबांना सांगू इच्छितो की, सावकारांवर बडगा उचलताना, बँकींग सिस्टीम जिवंत ठेवणार असाल तर जरुर सावकारी नष्ट करा, एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मनमाडमध्ये डॉ.बाबासाहेबांची प्रकृती बिघडल्यामुळे ते आराम करण्यासाठी रेस्ट हाऊसवर जात होते. त्यावेळी खेडयातील गोरगरीब लोकांना याबाबत काहीच माहीत नव्हते. परंतु ज्यावेळी लोकांना याबाबत माहीत झाले त्यावेळी जनता रेस्ट हाऊसजवळ हजारोच्या संख्येने उपस्थित झाली. त्याचवेळी मोटार आली, फाटके कपडे घातलेली मंडळी त्या ठिकाणी उपस्थित होती. त्यावेळी "मे" महिना होता वरुन रखरखते ऊन होते. त्या गरीब जनतेजवळ ज्वारीची भाकरी, कांदा, मिरची होती. त्या जनतेला बघितल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर पाश्चिमात्य देशातील विद्वानांना आणि प्राध्यापकांना म्हणाले, तुम्हाला ग्रंथ आणि प्रबंध लिहावयाचा असेल तर या कांदा-भाकर आणि शेतकऱ्यांच्या जीवनावर लिहा. आज आंबेडकरांना श्रध्दांजली वाहण्याचा दिवस आहे. दिनांक 18 जुलै, 1956 रोजी डॉ.आंबेडकरांनी एक पाव सुध्दा खाल्ला नव्हता, पाणी सुध्दा प्याले नव्हते. सुर्यास्त झाल्यानंतर त्यांचे पी.ए. श्री.रितू यांनी डॉ.बाबासाहेबांना विचारले की, आज आपण काहीही सेवन केले नाही. त्यांनी डॉ.आंबेडकरांच्या प्रकृतीबद्दल विचारपूस केली. त्यावेळी डॉ.आंबेडकर म्हणाले रितू मला गुडघ्याचा त्रास आहे, अनेक रोगांमुळे मी जर्जर झालो आहे. अशा परिस्थितीत गोरगरीब लोकांना संदेश कोण देईल, त्यांना जागृत कोण करेल ? आणि हेच प्रश्न आज माझ्या डोळयासमोर रेंगाळत आहेत. सभापती महोदय, या दिवसाच्या पाच महिन्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महानिर्वाण झाले. ज्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर बॅरीस्टर होऊन आले त्यावेळी त्यांनी सर्वात प्रथम रामूला दूडू-दूडू धावणाऱ्या त्याच्या दोन वर्षाच्या बाळाला बोलाविण्याबद्दल सांगितले. त्यावेळी रामु म्हणाला बाळाला ताप आला होता म्हणून त्याला दवाखान्यात घेऊन गेलो होतो व डॉक्टरांना विनंती केली की, पोराला वाचवा. परंतु डॉक्टरांनी सांगितले की, पूर्वीचेच पैसे अजून दिले नाहीत, त्यामुळे मी त्याच्यावर उपचार करीत नाही, तुम्ही त्याला म्युन्सिपाल्टीच्या हॉस्पीटलमध्ये घेऊन जा.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे ..

त्याला त्या हॉस्पिटलमध्ये नेण्यात यावे असे तेथील डॉक्टरांनी सांगितले होते.त्याला जेव्हा हॉस्पिटलमध्ये नेण्यात येत होते तेव्हा तो तळमळत होता ,रडत होता. तुमची आठवण काढत होता. शेवटी " बाबा बाबा " म्हणत त्याने प्राण सोडला असे त्यांच्या पत्नीने सांगितल्यावर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर रडावयास लागले. तेव्हा त्यांची पत्नी रामू त्यांना असे म्हणाली की,"एका मुलासाठी तुम्ही रडत आहात परंतु 7 कोटी दलिताचे तुम्ही वडील आहात,गरिबांचे वडील आहात. संपूर्ण भारतातील लोक तुम्हाला " बाबा " म्हणतात तेव्हा त्यांच्यासाठी तुम्हाला काही तरी करावयास पाहिजे."महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांचा महाराष्ट्र आहे असे सांगण्यात येते. या महाराष्ट्रात शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत ही अत्यंत दुर्देवाची गोष्ट आहे.अतिवृष्टीमुळे भंडारा,गोदिया,रामटेक या भागातील सोयाबिन,ज्वारी इत्यादी पिकाचे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर व-हाडातील कापसाचे मोठया प्रमाणावर नुकसान

झाले आहे.त्यामुळे महाराष्ट्रातील गोर गरीब शेतक-यांची मोठी दैनावस्था झाली आहे.तेव्हा या शेतक-यांच्या दुःखद जीवनाचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.गेल्या चाळीस वर्षापासून मी सतत मंत्रालयात येत असलो तरी आता मला मंत्रालयात एक गोष्ट जरुर जाणवली आहे. को-ऑपरेटिव्ह सेक्टर असो वा अन्य सेक्टर असो त्या विभागाचे अधिकारी जे काही सांगतील तेच मंत्रीमहोदय सांगतात.अधिका-यांनी फाईलवर निगेटीव्ह लिहिलेले आहे त्यामुळे शेतक-याला मदत देता येत नाही असे मंत्रीमहोदय आम्हाला सांगतात.पटवा-या पासून वरिष्ठ अधिका-यापर्यन्त जे चॅनल आहे त्या चॅनलवर वचक ठेवण्याचे काम मंत्रिमहोदयांनी केले पाहिजे. मंत्रिमहोदयांचा जर या कर्मचा-यांवर वचक नसेल तर लोकांचे कल्याण होऊ शकणार नाही.पटवा-याने लिहिलेले असेल तेच तहसीलदार लिहितो व त्याने जे लिहिले असते तेच कमिशनर लिहितो व त्याने लिहिलेले सचिव सांगत असतो. खालपासून वर पर्यन्त फाईलवर निगेटीव्ह लिहिलेले असते.त्यामुळे शेतक-यांना मदत देता येत नाही. या चर्चेच्या निमित्ताने मी एका गोष्टीचा उल्लेख करु इच्छितो .बाळासाहेब तिरपुडे उपमुख्यमंत्री होते. तेव्हा त्यांनी आम्हाला सांगितल्यामुळे आम्ही गोदियाच्या अधिका-याला भेटावयास गेलो. तेव्हा त्या अधिका-याने आम्हाला असे सांगितले की," मी बाळासाहेब तिरपुडे यांना ओळखत नाही.तेव्हा आपल्याला जे काही पाहिजे आहे त्याबाबतीत त्यांचा आदेश घेऊन या. मला त्यांचे पत्र पाहिजे."

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे...

तेव्हा ही गोष्ट आम्ही तिरपुडे साहेबांना सागितली होती.तेव्हा त्यांनी असे सांगितले की," त्या अधिका-याला आताच्या आता सस्पेन्ड करण्याचे आदेश देण्यात यावेत."तेव्हा त्या अधिका-याला सस्पेन्ड केल्याबद्दल जेव्हा टेलिग्राम मिळाला तेव्हा तो अधिकारी तिरपुडे साहेबांकडे गेल्यानंतर त्यांना असे विचारले की," तुम्ही मला सस्पेन्ड का केले ? तेव्हा त्यांनी असे सांगितले की," माझी ओळख व्हावी यासाठी मी तुला सस्पेन्ड केले आहे.सहा महिन्यानंतर तुम्ही माझ्याकडे यावे." अशा प्रकारे माननीय मंत्रिमहोदयांची भाषा कडक स्वरुपाची पाहिजे.मंत्रिमंडळातील दहा बारा मंत्र्यांचा फार वचक आहे हे मला माहीत आहे.तेव्हा गोर गरीब शेतक-यांचे प्रश्न सोडवत असतांना, गरीब लोकांचे प्रश्न सोडवत असतांना हातात जळते कंकण बांधा आणि त्यांचे तप्त आसू पुसा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

**तालिका सभापती ( श्री.जगन्नाथ शेवाळे )** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावत बोलतील व ते शेवटचे वक्ते असतील.त्यानंतर मंत्रीमहोदयांचे उत्तर सुरु होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुडकर यांनी या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी येथे उभा आहे. या चर्चेत भाग घेत असतांना सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी,श्री बी.टी.देशमुख व श्री.यशवंतराव गडाख या तिघांच्या भाषणाचा मी खास करुन उल्लेख करु इच्छितो.शेतक-यांच्या आत्महत्तेच्या संदर्भात आज जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्या बाबतीत माझ्या डोळयासमोर दोन विषय येतात . त्यातील एक विषय हा तात्काळ उपाययोजने संबंधीचा असून दुसरा विषय हा दीर्घ कालीन उपाययोजने संबंधीचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सैध्दांतिक भूमिका मांडली होती.इतर सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती मांडली होती. आपल्याकडे शेती असून सुध्दा 1960 साली अन्नधान्याच्या बाबतीत आपल्याला
दुस-या देशावर अवंलंबून रहावे लागत होते.त्यावेळी आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी नव्हतो परंतु आज मात्र आपल्याकडे मोठया प्रमाणावर अन्नधान्य पिकत आहे.चन्द्रावर जाऊ शकतो इतका आपला विकास झाला आहे तसेच शेतीच्या बाबतीत आपण बरेच समृध्द झालो आहोत..ज्या शेतक-यांनी ही किमया केली आहे तो किमयागार आज इच्छा मरणाच्या सुळक्यावर उभा आहे. शेतक-यांच्या आत्महत्तेला इच्छा मरण असे दुर्देवाने म्हणावेसे वाटते.डॉ.स्वामीनाथन यांनी
शेतक-यांच्या बाबतीत पहाणी करुन एक अहवाल तयार केला होता.शेतकरी जर कर्ज मागावयास गेला तर त्यांना कर्ज मिळत नाही आणि मिळाले तर त्या बॅन्काचे कर्जाचे दर जास्त असतात याबाबतीत येथे चर्चा झाली असून त्या खोलात मी आता जाऊ इच्छित नाही ..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

परंतु ते वायफळ गावामध्ये गेले. तेथील शेतकऱ्यांनी त्यांना दोन प्रश्न विचारले. एकाने विचारले की, तुम्हाला नेमके काय अधिकार आहात ते सांगा. तुम्हाला काही अधिकार नसतील तर तुम्ही आमच्याशी कशासाठी ही चर्चा करता ? आणि दुसऱ्या शेतकऱ्याने त्यांनासांगितले की, मी कर्ज मागण्यास गेलो असता मला कर्ज मिळाले नाही. पण तेथील कारकुनाने मला सांगितले की, तू कृषी केंद्र काढ म्हणजे मग तुला कर्ज मिळेल. मग त्याने त्यासाठी 5-50 रुपये खर्च केले आणि कृषी केंद्र काढले आणि त्याला कर्ज मिळू शकले. ही सारी वस्तुस्थिती डॉ.स्वामिनाथन् समोर शेतकऱ्यांनी मांडली. म्हणून याबाबतीत जेव्हा विषय येतो तेव्हा वाईट वाटते की, निवडणुकीमध्ये आपण आश्वासन दिली, वचने दिली, जाहीरनाम्यातून वचने दिली पण ती वचने पूर्ण केली नाहीत, आश्वासने पाळली नाहीत. खरे तर अशा प्रकारे वचनभंग करणे हाही एक गुन्हाच आहे आणि तो सरकारने केला आहे, त्याचे सरकारला काहीच वाटत नाही. सभापती महोदय, मला या ठिकाणी आणखी एक विषय महत्त्वाचा वाटतो. तो विषय सन्माननीय सदस्यांनी येथे मांडला आहे. त्याबाबत बोलताना आपण एक अतिशय चांगला असा मुद्दा मांडला आणि तो म्हणजे सबसिडीचा. ही सबसिडी 220 मायनस आहे, प्लस नाही. ही सबसिडी 220 मायनस असेल तर मग शेती उत्पादनाचा खर्च, खतांचा खर्च, त्यांचे वाढलेले भाव... आज युरिया 400 रूपये किलो झालेला आहे., तसेच वीजेचे वाढलेले भाव आणि होणारे भारनियमन वगैरे सगळे लक्षात घेता या सगळ्याचा परिणाम शेती उत्पन्नावर होतो. एक तर उत्पन्न वाढत नाही. शेतीचे उत्पन्न वाढले पाहिजे आणि त्यासाठी लागणाऱ्या वस्तुंचे भाव कमी झाले पाहिजे तरच शेतकऱ्यांना त्यातून काही फायदा होऊ शकेल. आपण धरणे पूर्ण केली पण कालवे मात्र अजूनही झालेले नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. तेवहा त्या द्श्टीने चर्चेला वाव आला पाहिजे. सभापती महोदय, सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बोगस खते आणि मनी लेंडर्सचा. मधल्या काळामध्ये बियाणे मिळत नव्हते आणि ते मिळाले पाहिजे म्हणून जेवढ्या खाजगी बियाणे उत्पादकांना आपण संधी दिली त्यातून खोटे वाण शेतकऱ्यांना दिले गेले. अशा प्रकारे बोगस बियाणे दिल्याबद्दल बियाणे उत्पादकांना आणि त्याची विक्री करणाऱ्यांवर आपण काय कारवाई केली आहे वा करता ? दुसरे म्हणजे 1946 मध्ये आपण मनी लेंडींग ॲक्ट केला. त्या कायद्यानुसार आज गावोगावी किती सावकार सावकारी करीत आहेत ? याची आपण माहिती घेतली आहे काय ? ते अधिकृत सावकार आहेत का हे आपण पाहिले आहे काय ? पण

...... 3डी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

तुम्ही तर आता त्यांना ढोपरापासून कोपरा पर्यंत सोलायला निघाला आहात. आज हे सावकार वर्षाला 60 टक्के व्याज घेत आहेत, हे कितपत योग्य आहे हेही आपण पाहिले पाहिजे. या संदर्भात कदाचित असे वाटते की, बँकेकडून शेतकऱ्याला कर्ज मिळत नाही म्हणून मग तो खाजगी सावकाराकडे वळतो. मग शेवटी बँकेकडूनही त्याचेवर अन्याय होतो आणि मग सावकार बरा पण सहकार नको अशी त्याची मानसिकता होऊन जाते हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.गडाख म्हणाले की, सावकार पद्धत पूर्णपणे बंद केली तर कदाचित आत्महत्या आणखी वाढतील. म्हणून या मनी लेंडर्स ॲक्ट आहे त्यानुसार सावकार अधिकृत आहे का आणि असेल तर तो मर्यादेपेक्षा अधिक व्याज घेणार नाही या दृष्टीनेही आपण काही केले पाहिजे, त्यादृष्टीने आपण काही कराल का  हा एक मुद्दा आहे. शेतकऱ्याचे मरण हे सरकारचे धोरण झाले आहे म्हणून आता कापसाला भाव द्यायचा असेल तर माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांचे बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी जो उल्लेख केला की, 60 टक्के आयात कर लावू असे केंद्रीय कृषी मंत्र्यांनी सांगितले त्याप्रमाणे खरोखरी आपण हा आयात कर लावला तर निश्चितपणे यामध्ये परिणाम होईल. सभापती महोदय, राज्यकर्ते जेव्हा आपल्या डोळ्या समोर आव्हानांना तोंड देण्यास असमर्थ ठरतात तेव्हा मूळ विषयापासून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवावे हा कौटिल्याचा सल्ला या सरकारने आणि मंत्र्यांनी बरोबर अमलात आणलेला आहे आणि म्हणूनच शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय मोठ्या प्रमाणत चर्चेत असताना त्याला बगल देण्यासाठी म्हणून सरकार आता जाणीव पूर्वक सावकार, सावकार करीत आहे, ते सरकारने थांबवावे आणि ज्या शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेली आहे त्यांच्या कुटुंबियांना आपण भरपाई द्या आणि या चर्चेमध्ये जे अनेक दीर्घकालीन उपाय सुचविण्यात आले आहेत ते अमलात आणावे एवढे बोलून मी भाषण संपवितो.

**तालिका सभापती** (श्री.जगन्नाथ शेवाळे) : यानंतर विरोधी पक्ष सदस्यांच्या आग्रहाच्या विनंतीनुसार मी केवळ सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांना बोलण्याची संधी देणार आहे. मात्र त्यानंतर उत्तरादाखल मंत्र्यांची भाषण होतील.

अस्थापित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री.सरफरे .... 3इ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता (अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, एकेकाळी वऱ्हाड म्हणजे सोन्याची कुऱ्हाड होती, आज ती आत्महत्तेची खाण होत आहे. मी आपल्या माध्यमातून या विषयावर भाषण न करता केवळ एकाच विषयाकडे माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतो. ज्यावेळी कापसाच्या पिकावर बोंड अळीचा प्रादुर्भाव झाला होता त्यावेळी 1996-97 मध्ये माननीय श्री. राणे साहेब आपण महसूल मंत्री होता. त्यावेळी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पहिल्यांदा नग्द स्वरुपामध्ये मदत करण्याचा क्रांतिकारक निर्णय आपण घेतला होता. तीच परिस्थिती आज पुन्हा या कापूस उत्पादक, कष्टकरी शेतकऱ्यावर उद्‌भवली आहे. बी.टी. कॉटन नावाचे बियाणे वापरले तर कोणत्याही प्रकारचा रोग होणार नाही अशाप्रकारच्या मोठ मोठया जाहिराती केल्या जात आहेत व शेतकऱ्यांना आमिष दाखवून त्यांची फसवणूक केली जात आहे. अमरावती जिल्हयामध्ये 2 लाख 41 हजार हेक्टरमध्ये हे बियाणे पेरले गेले. त्यापैकी 55 टक्के क्षेत्रामध्ये त्या पिकावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाला. याबाबत माननीय सदस्य श्री. रामदास तडस साहेबांनी स्वत:चा अनुभव सांगितला आहे. मागील वर्षी 13 क्विंटल पिकले परंतु यावर्षी एकही क्विंटल पिकले नाही अशी परिस्थिती आहे. तेव्हा आपल्याला भविष्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवावयाच्या असतील तर कापूस उत्पादक, कष्टकरी शेतकरी या लाल्या रोगामुळे लाल झाला आहे त्याला 1996-97 मध्ये केलेल्या घोषणेच्या धर्तीवर नगद स्वरुपामध्ये मदतीचा हात देण्याची घोषणा केली तर आत्महत्तेस प्रवृत्त होणाऱ्या शेतकऱ्याला निश्चितपणे दिलासा मिळेल. ही तात्पुरती उपाययोजना करीत असतांना आपल्या कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून एक नवीन कोर्स सुरु करण्याची आवश्यकता आहे. त्या माध्यमातून आपले कापसाचे उत्पन्न कसे वाढेल, नवीन प्रकारचे बियाणे कसे आणता येईल यादृष्टीने संशोधन करण्याची आवश्यकता आहे. शेतीच्या अर्थकारणाबरोबर शेतीचे उत्पादन कसे वाढविता येईल, शेती हा धंदा म्हणून कसा वाढविता येईल याकरिता महाविद्यालयाच्या माध्यमातून आपण प्रयत्न केले तर भविष्यामध्ये त्याचा चांगला उपयोग होईल. शेवटी माननीय महसूल मंत्री श्री. नारायणराव राणे साहेबांना विनंती करतो की, याठिकाणी अमरावती जिल्हयाचे उदाहरण दिले आहे. त्याप्रमाणे संपूर्ण विदर्भात लाल्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे शेतकरी लाल झाला आहे त्याला दिलासा द्यावा अशी विनंती करतो व आपण वेळ दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

---

06-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )3E 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम (सहकार, पुनर्वसन व मदत मंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी अतिशय एका अतिशय महत्वाच्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा घडवून आणली आहे. राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहे ही बाब या सरकारला, विरोधकांना कुणालाही भूषणावह नाही. ती निश्चितपणे लांच्छनास्पद आहे. या प्रश्नाचा राजकारण विरहीत विचार झाला पाहिजे. या प्रश्नाकडे अतिशय गांभीर्याने पहात असतांना त्यावर कोणते मार्ग, कोणती उपाययोजना करावी याबाबत विचार करण्याची खरी गरज आहे. त्यादृष्टीकोनातून अनेक फॅक्टर आपल्यापुढे आहेत. त्यामध्ये शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज व त्यावर बसणारे व्याज त्याची करावयाची परतफेड यासंबंधी या सदनामध्ये मागील अधिवेशनामध्ये चर्चा झाली आहे. आणि या सदनाला भूविकास बँकेच्या बाबतीत आश्वासन दिले होते की, वन टाईम सेटलमेंट भू विकास बँकेमार्फत केले जाईल. अशाप्रकारची कायद्यात तरतूद नसतांना सुध्दा या सदनामध्ये आश्वासन दिल्यानंतर ते पाळण्यासाठी कायद्यात दुरुस्ती केली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम . . . .

आणि दिनांक 25 ऑगस्ट 2005 मध्ये त्याचे गॅझेटमध्ये रुपांतर झालेले आहे आणि या शासनाने एक लाखापर्यंत वन टाईम सेटलमेंट करण्याचा निर्णय घेतलेला आहे. कर्ज पुरवठयाच्या बाबतीत सांगावयाचे तर या कर्जावरील व्याज माफ करण्याच्या दृष्टीने शासनाने बोल्ड निर्णय घेतला आणि शासनाने या राज्यातील 353 कोटी रुपयांचे व्याज माफ करण्याचे मंजूर केलेले आहे. या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य, माजी विरोधी पक्षनेते, बी.जे.पी.चे अध्यक्ष आणि आमचे मित्र श्री.नितीन गडकरी म्हणाले की, सरकार आदेश काढते पण त्याची पुढे कार्यवाही काय झाली ? मी त्यांना नम्रपणे सांगू इच्छितो की, यासंदर्भात सर्व अधिकाऱ्यांच्या विभागवार बैठका घेतलेल्या आहेत. कोणत्या पध्दतीने कर्ज पुरवठा झाला ? कोणत्या अडचणी आल्या ? याची माहिती घेऊन कार्यवाही केली. पण दुर्दैवाने विदर्भामध्ये सहकार चळवळ वीक असल्यामुळे अकोला येथेही सर्व अधिकाऱ्यांची, जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेतली. नागपूर येथेही बैठक घेतली. त्यावेळी कर्जाच्या बाबतीत ट्रान्फरन्टपणे जे रिपोर्ट आले, त्याबाबतीत सक्त सूचना दिल्या होत्या की, याबाबतीत ट्रान्सफरन्ट माहिती पाहिजे, राजकीय दृष्टीकोनातून माहिती नको. जे घडले आहे ते लपवू नका. कर्जाच्या बरोबरच व्याजाच्या संदर्भात सुध्दा सन्माननीय सदस्य . . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आता जी माहिती दिली, त्या सूत्राप्रमाणे प्रत्येक जिल्हयात किती लोकांचे कर्ज माफ केले आहे याची आकडेवारी दिली तर बरे होईल.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी ही आकडेवारी देतो. सन्माननीय सदस्यांना संपूर्ण महाराष्ट्राच्या संदर्भातील माहिती हवी आहे की विदर्भाच्या संदर्भातील माहिती हवी आहे? मी ही माहिती सभागृहाच्या पटलावरही ठेऊ शकतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी विदर्भाच्या संदर्भात माहिती द्यावी.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, ठीक आहे. विदर्भाच्या संदर्भात सांगावयाचे तर अमरावती विभागात 26 कोटी 22 लाख, नागपूर विभागात 19 कोटी 61 लाख रुपयांचे व्याज माफ केलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण जे व्याज माफ केले, त्याबद्दल मी

. . . .3 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

म्हणत नाही. तुम्ही ओ.टी.एस.बाबत आदेश दिला आहे, मी दोन मुद्दे मांडले होते की,10 हजाराच्या कर्जावर 80 हजार रुपये वसूल झाले आहेत.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी ज्या केसेस मांडलेल्या आहेत, त्या आम्ही तपासून घेऊ.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे सांगितले,तर त्या सूत्राप्रमाणे तुम्ही जिल्हावार किती शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले आहे. अमरावती मध्ये 10 हजार शेतकरी, वर्धा जिल्हयात 4 हजार शेतकरी वगैरे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, यासंबंधातील सर्व माहिती सभागृहाच्या पटलावर ठेऊ.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याला नम्रपणे सांगतो की, असे काहीही झालेले नाही.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, जे आदेश काढले आहेत, ते आम्ही तपासून पाहू आणि ज्यांनी कार्यवाही केलेली नाही त्यांच्यावर ॲक्शन घेऊ. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांनी विचारले की, सावकारी कायदा कोणत्या खात्याचा आहे ? तर हा कायदा सहकार खात्याचा आहे आणि सहकार खात्याने कलेक्टर,एस.पी. आणि डी.डी.आर.यांची कमिटी नेमली आहे आणि त्यादृष्टीने त्याची कार्यवाही होत आहे. माननीय श्री.आर.आर.पाटील हे गृहमंत्री असल्यामुळे पोलिसांनी अधिक सतर्क रहावे यादृष्टीने त्यांनी सूचना दिल्या आहेत तर त्यात काही बिघडले आहे असे मला बिलकूल वाटत नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सहकार कायद्याच्या ॲक्टप्रमाणे तुमच्याकडे अधिकार आहे तर त्याची अंमलबजावणीही तुम्हीच करावयाची. पण त्याची अंमलबजावणी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील करीत आहेत. म्हणजे माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम हे याबाबतीत कमी पडत आहेत. तुमच्याकडे अधिकार असताना मात्र तुम्ही कारवाई करीत नाही आणि ज्यांच्याकडे अधिकार नाही ते कारवाई करीत आहेत. ती कारवाई काय करतात. त्यांना तुमच्या अधिकाऱ्यांकडून रिपोर्ट कसा जातो ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सकाळीच सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन

. . . .3 एफ-3



APR/SBT/MHM 17:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम . . . .

गडकरीसाहेबांना मी सांगितले आहे की, ही संयुक्त जबाबदारी आहे. आमच्याच खात्याचा कायदा आहे आणि त्याची अंमलबजावणी आम्हीच करणार आहोत. परंतु कलेक्टर, एस.पी.आणि डी.डी.आर.यांची कमिटी नेमल्यामुळे त्याअनुषंगाने संबंधित खात्यातील अधिकाऱ्यांना माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सूचना दिल्या आहेत. सतर्क राहून ॲक्शन घ्या असे सांगितले आहे. यामध्ये काही वावगे झाले आहे असे मला वाटत नाही. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत मी निश्चितपणे समर्थ आहोत. याबद्दल आपण काळजी करण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी आपल्या भाषणात जे सांगितले ते सत्य आहे. कारण ही सिस्टीमच अशी आहे की, याचा आपण विचार केला पाहिजे. हे सहकार चळवळीचे शताब्दीचे वर्ष आहे, सहकार चळवळ सुरु होऊन 100 वर्षे झाली. देशातील एकूण सहकारापैकी 60 टक्के सहकार महाराष्ट्रात आहे.

**सभापतीस्थानी - मा.उपसभापती**

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (पुढे सुरु...

राज्यातील जनतेपैकी 65 टक्के जनता ही सहकारी संस्थांचे सदस्य आहेत. महाराष्ट्रामध्ये फार महत्वाचे परिवर्तन करण्याची भूमिका सहकाराने बजावलेली आहे, यामध्ये काहीच गैर नाही, काही चुकीचे नाही, असा दावा मी करणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील म्हणाले त्याप्रमाणे सहकार विभागाकडे पहात असतांना तेथील संचालक हे राष्ट्रवादी पक्षाचे आहेत काय, काँग्रेसचे आहेत काय, शेतकरी कामगार पक्षाचे आहेत काय, बी.जे.पी.चे आहेत काय, शिवसेनेचे आहेत काय, याचा विचार केला जात नाही. या क्षेत्रामध्ये काम करणारे जे कार्यकर्ते आहेत, त्यांना प्रोत्साहन देणे, चांगल्या संस्थांना प्रोत्साहन देणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या सुधारण्याची संधी देणे हे पाहिले जाते. परंतु जे सुधारणारच नाहीच, त्यामध्ये जी अपप्रवृत्ती आलेली आहे, त्याबाबतीत ते कोणत्या पक्षाचे आहेत याचा विचार न करता त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

श्री.मधुकर चव्हाण (बसून) : अशा किती लोकांवर कारवाई केलेली आहे, त्याची माहिती द्यावी.

डॉ.पतंगराव कदम : ती माहिती आपल्याला मी देऊ शकेन.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

...(अडथळा)...

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांचे भाषण चालू असतांना त्यांच्या भाषणामध्ये कोणी अडथळा आणला नाही. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांचे पूर्ण उत्तर ऐकून घ्यावे. त्यानंतर काही बोलायचे असेल तर बोलावे. त्यांच्या भाषणामध्ये कृपया अडथळा आणू नये.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय मंत्री भाषण करत असतांना त्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांकडून मधेच संवाद केला जातो, त्यामुळे मंत्री महोदयांच्या भाषणामधील लिंक तुटते, हे योग्य नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्यांच्या अगोदर माझा हरकतीचा मुद्दा होता. सभापती महोदय, आपल्यासमोर शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचा विषय आहे. आम्ही प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या विषयावर चर्चा मागितलेली आहे. मंत्री महोदयांकडून अशी अपेक्षा आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येच्या विषयामध्ये सहकाराचा संबंध आहे, त्या संदर्भाने त्यांनी उत्तर दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु....

पाहिजे. परंतु त्यांनी सहकार खाते केव्हापासून जन्माला आले हा सगळा इतिहास सांगण्याची आवश्यकता नाही, असे मला सांगावयाचे आहे.

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार साहेबांनी ऐकून घ्यावे. आत्महत्त्येची कारणे अनेक आहेत. मी सहकाराशिवाय काही माहिती घेण्याचा प्रयत्न केला. मला असे वाटते की, या सगळया प्रश्नांचा विचार करता, शेतकऱ्यांना कापूस पिकाच्या ऐवजी दुसरा पर्याय शोधला पाहिजे. कापसाला दर मिळाला नाही तर अडचणीचे होते. त्यांनी त्याच्यावर अवलंबून राहू नये म्हणून पर्याय शोधला पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये अल्टरनेट दुधाचा पर्याय घेतलेला आहे,पोल्टीचा पर्याय घेतलेला आहे. हा प्रश्न सोडवायचा असेल तर शेतकऱ्यांना आपल्याला पर्याय द्यावा लागेल. विदर्भामध्ये शेतकरी आता ऊस लावायला लागलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांनी साखर कारखाना काढलेला आहे. मी विदर्भातील साखर कारखान्याच्या संदर्भाने एक बैठक घेतली. विदर्भामधील 20 साखर कारखान्यांपैकी 19 साखर कारखाने बंद आहेत. यापूर्वी ऊस लावण्यासाठी दोन-दोन कोटी रुपये दिलेले होते. त्यामधील काही पैसे परत आलेले आहेत, काही आलेले नाहीत. आता हे सर्व कारखाने पॅकेजमध्ये आले पाहिजेत म्हणजे त्या साखर कारखान्यांना मदत देता येईल. आपण शेतकऱ्यांना पर्याय दिल्याशिवाय हा आत्महत्त्येचा प्रश्न सुटेल असे मला वाटत नाही. आता सोयाबीनचा प्रश्न आला. मंत्रीमंडळाने दुधाच्या संदर्भातील पॅकेज विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यांना फक्त कापसावर अवलंबून राहून चालणार नाही.

श्री.नितीन गडकरी : कोणता पर्याय आहे ते जाहीर करावे.

डॉ.पतंगराव कदम : काही अल्टरनेटिव्ह पर्याय द्यावे लागतील.

श्री.नितीन गडकरी : ऊस लावायचा म्हटला तर शेतकऱ्यांना कर्ज घेतले पाहिजे. परंतु बँकांचे कर्ज सातबारावर नोंदलेले असल्यामुळे आता बँका त्यांना कर्ज द्यायला तयार नाहीत. मग शेतकरी कसा ऊस लावणार ?

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : नुसती भूविकास बँक नव्हे तर सावकाराच्या प्रश्नासंबंधीसुध्दा आपण आणि श्री. फुंडकरसाहेब व इतर सर्व सदस्यांनी अतिशय महत्वाचे मुद्दे मांडलेले आहेत. त्याला पर्याय काय ? तो पर्याय देण्याच्यादृष्टीने सुध्दा सहकार विभागाने काही विचार केलेला आहे. ते विचार असे आहेत की, अर्बन बँकेमध्ये 65 हजार कोटी रुपयाच्या ठेवी आहेत. पतसंस्थांमध्ये 35 हजार कोटी रुपयाच्या ठेवी आहेत. म्हणून त्यांनासुध्दा हा पतपुरवठा करण्याची परवानगी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय आमच्या विभागाने घेतलेला आहे. आमचे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील म्हणाले की, राज्य सहकारी बँक असो, जिल्हा बँक असो

श्री. नितीन गडकरी : अर्बन को-ऑपरेटिव्ह बॅंकेने मागच्या वर्षी मला ऊसाकरिता सात कोटी रुपये दिलेले आहेत. अर्बन बँका पैसे देतात. त्यामध्ये काही अडचण नाही....

डॉ. पतंगराव कदम : या सावकारीला खरे उत्तर अर्बन बँक नसून पतसंस्था हेच आहे.

श्री.नितीन गडकरी : आता अर्बन बँकाही कर्ज द्यायला तयार नाहीत. शेतक-यांच्या सातबाराच्या उता-यावर अर्बन बँकांच्या सगळया नोंदी झालेल्या आहेत. त्यामुळे आता पैसे द्यायला एकही अर्बन बँक तयार नाही.

डॉ. पतंगराव कदम :सभापती महोदय, मला आपल्याकडून संरक्षण पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे ती कुठली बँक आहे हा चर्चेचा विषय आणि ते सगळे तपासण्याची बाब आहे. परंतु शसनाने याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे आणि अर्बन बँका आणि पतसंस्थांनासुध्दा कर्ज पुरवठा करण्याची परवानगी दिलेली आहे. दुसरा महत्वाचा विषय असा की, ...

श्री. नितीन गडकरी : पतसंस्थांच्या बायलॉजमध्ये कृषि बागाकरिता कर्ज देता येते काय, याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.तुम्ही त्याबाबतचा आदेश काढला आहे काय?

डॉ. पतंगराव कदम : होय, अर्बन बँका आणि पतसंस्था कर्ज देऊ शकतात.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पतसंस्थेचे 18 टक्के व्याज आहे. श्री. पवारसाहेब माननीय मंत्रिमहोदयांना जरा समजून सांगावे....

डॉ. पतंगराव कदम : मला समजून सांगण्याची गरज नाही. मला यासबंधीची पूर्ण माहिती आहे. यापध्दतीचे शासनाचे धोरण आहे. कर्जाच्या बाबतीतसुध्दा व्याजाचे दर कसे कमी करता

..2..



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम...

येतील याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. गडाख समितीने शासनाला जो अहवाल दिलेला आहे त्यामध्ये काही शिफारशी केलेल्या आहेत. नाबार्डकडून राज्यबँक आणि जिल्हाबँकेमध्ये पैसे येतील आणि त्यांच्यकाडून कमीत कमी व्याजाने, काटकसर करुन कसे कर्ज देता येईल यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल. सचिवांसाठी गडाख समिती नेमली होती. त्या अहवालामध्ये त्यांनी अनेक शिफारशी केलेल्या आहेत आणि त्या शासनाकडे आलेल्या आहेत.(अडथळा)

श्री. आर. आर. पाटील :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या नकलापासून त्यांची सगळी भाषणे आम्ही ऐकलेली आहेत. प्रश्न विचारण्याचा सन्माननीय सदस्यांना अधिकार आहे. परंतु संबंधित मंत्र्यांची भाषणे संपल्यानंतर सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलले आहेत त्यापैकी ज्या मुद्यांचे उत्तर आलेले नाही, त्यासंदर्भात ते प्रश्न विचारु शकतात.परंतु अशा प्रकारे मंत्रिमहोदयांच्या उत्तरामध्ये सारखा व्यत्यय निर्माण करणे बरोबर नाही. सन्माननीय सभापती महोदय, आपण मंत्रिमहोदयांना संरक्षण दिले पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : जिल्हयात मंत्रिमहोदयांना त्रास देता .येथेही त्रास देऊ नका?

डॉ. पतंगराव कदम : आपल्या सहानुभूतीबद्दल मी आभारी आहे. पण माझे उत्तर जरा ऐकून घ्या म्हणजे ती खरी सहानुभूती होईल. सभापती महोदय, भूविकास बँकेच्या बाबतीत वन-टाईम सेटलमेंटचा निर्णय घेण्यात आला आहे. कर्ज घेतल्यानंतर त्यावर चक्रवाढ व्याज लावून त्या शेतक-याची काय परिस्थिती होते, याबाबतची अनेक उदाहरणे याठिकाणी दिलेली आहेत. म्हणून राज्य बँक असो, जिल्हा बँक असो अथवा पतसंस्था असो, या सर्व ठिकाणी वन-टाईम सेटलमेंट करण्याचा निर्णय हा विभाग घेईल आणि या पध्दतीने या सहकार क्षेत्रामार्फत कर्ज, त्यावरील व्याज आणि सावकारीला पर्याय देण्याचा एक खंबीर प्रयत्न या महाराष्ट्रात निश्चितपणाने केला जाईल, एवढेच बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..



कु.थोरात/ प्रथम श्री. किल्लेदार... 5-10

( काही सदस्य प्रश्न विचारण्यासाठी एकाच वेळी उभे असतात.)

**उपसभापती** :सगळया मंत्री महोदयांची उत्तरे झाल्या नंतर सदस्यांनी प्रश्न विचारावेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, वन-टाईम सेटलमेंटची घोषणा मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी केलेली आहे ती गेल्या अधिवेशनामध्ये पण केली होती.

**उपसभापती** :ते सगळे सेटलमेंट आपण ॲट-ए टाईम करु. प्रथम सर्व मंत्र्यांना उत्तर देऊ द्यावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मागच्यावेळी तुमच्या उपस्थितीमध्ये डॉ. पतंगराव कदमसाहेबांनी हीच घोषणा केली होती. सभापती महोदय, आपण रेकॉर्ड काढून बघावे.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : हा केवळ भूविकास बँकांबाबतचा त्यावेळी प्रश्न होता, मात्र आता त्यामध्ये इतर बँकांचाही आपण विचार करीत आहोत.

श्री. जयंत प्र. पाटील : हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन असे आदेश काढेल काय ?

डॉ. पतंगराव कदम : याबाबतचे आदेश काढण्यापूर्वी ज्या ज्या संस्था कन्सर्न आहेत, त्यांच्याशी चर्चा करावी लागणार आहे, त्यामुळे ठराविक कालावधी सांगता येणे शक्य नाही.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा तसेच खानदेश या भागातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्त्यांच्या संदर्भात आणि त्या अनुषंगाने काही अन्य विषय या सदनात उपस्थित केले आहेत. पणन विभागाच्या वतीने कापसाच्या संदर्भात देखील काही प्रश्न चर्चेच्या माध्यमातून उपस्थित झाले आहेत. माननीय विरोधी पक्षनेते तसेच माननीय श्री. गडकरी साहेब व इतर सदस्यांनी कापसाच्या संदर्भात मुद्दे उपस्थित केले आहेत. त्या अनुषंगाने सुरुवातीलाच मी असे सांगू इच्छितो की, आजपर्यंत राज्यात आपण 128 कापूस खरेदी केंद्रे विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश भागात सुरु केली असून आतापर्यन्त 1,13,632 क्विंटल कापसाची खरेदी या योजनेतून केलेली आहे आणि येत्या चार आठ दिवसांत 122 नवीन संकलन केंद्रांना, तीन चार असुविधा केंद्रांसह मान्यता देण्यात येईल. जवळपास 1980 कोटी रुपये एवढी रक्कम आपण खरेदी केलेल्या कापसाच्या 100 टक्के हमी भावासाठी मंजूर केली आहे. 460 कोटी एवढी रक्कम देण्याचे मान्य केले आणि येत्या 19 तारखेपर्यंत 5 कोटीचे पेमेंट सुध्दा हमी भावाप्रमाणे 100 टक्के दिलेले आहेत. कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून नवीन 35 सेंटर्स सुरु करण्यास मान्यता दिली आहे. केंद्रसरकारने ठरवून दिलेल्या हमी भावाप्रमाणे यावर्षी कापूस खरेदीचे धोरण राहिल असे कापसाच्या पेरणीपुर्वीच शासनाने जाहिर केलेले आहे आणि त्याप्रमाणे ही व्यवस्था आज आपण संपूर्ण विदर्भ, खानदेश आणि मराठवाडयासाठी केलेली आहे. एक गोष्ट खरी आहे की, आज हमी भावापेक्षा सुध्दा जास्त भाव कापसाचा आहे. माझ्याजवळ असलेल्या आकडेवारीनुसार 1711 रुपये भाव ओपन मार्केटचा शेतकऱ्यांना दिलेला आहे परंतु प्रत्यक्षात 2000 ते 2200 रुपये एवढा भाव शेतकऱ्यांना मिळत आहे, अशा प्रकारची व्यवस्था या कापूस खरेदी योजनेच्या माध्यमातून शसनाने केलेली आहे. या ठिकाणी दोन तीन प्रश्न उपस्थित केले आहेत. या वर्षी काही प्रमाणात कापसाचे उत्पादन घटलेले आहे, मागील आठ दिवसात कापूस पणन महासंघाच्या जवळपास 8 लाख गाठी सुध्दा आपण विकल्या आणि 16 लाख गाडी आता शिल्लक आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर कापसाचे भाव वाढू लागले आहेत म्हणून आपण सुध्दा आपल्या राज्यात तशी पर्यायी व्यवस्था केलेली आहे. त्या अनुषंगाने जवळपास 400 कापूस खरेदी केंद्रांचा आराखडा आपण तयार केला आहे. या ठिकाणी कापसाचे ग्रेडींग करण्यासाठी माणसे नाहीत असा मुद्दा निघाला. मी त्यासंदर्भात सांगू इच्छितो की, बी.एससी आणि एम.एससी ॲग्रीकल्चर असे

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ........

पदवीधर लोक आहेत त्यांना आपण या कामासाठी ट्रेनिंग दिलेले असून त्यांच्या माध्यमातून कापसाचे ग्रेडिंग आणि स्टोअरेज टर्म फी वर करण्याचे आपण ठरविलेले आहे. त्याचबरोबर 3 सन 1995 पर्यंत या योजनेच्या माध्यमातून जी 3 टक्क्याची रक्कम आपण शेतकऱ्यांकडून कपात करीत होतो त्यासंदर्भातही या ठिकाणी मुद्दा उपस्थित करण्यात आला. या रकमेपोटी आपल्याकडे 700 कोटीच्या जवळपास रक्कम असून आता ही रक्कम कपात करणे थांबविलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ......

नागपूर उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल झालेली आहे त्याच्या माध्यमातून शासनाने आपली बाजू मांडलेली आहे. गेल्या 10 वर्षापासून 700 कोटीच्या रक्कमेची आपण कपात करीत नाही. पूर्वीची जी रक्कम आहे त्यासंदर्भातील निर्णय उच्च न्यायालयाकडून अपेक्षित आहे. यामध्ये आपण 3 टक्क्याची रक्कम कपात केलेली आहे. ही रक्कम कपात करीत असतांना कापूस पणन महासंघाचे बॅलन्स शिट आज लॉस मध्ये आहे. ज्या संस्थेचे बॅलन्स शिट लॉसमध्ये असते त्या संस्थेमधून अशा प्रकारची रक्कम देता येत नाही यासंदर्भात आपल्याकडे नियम आहे. कपात केलेल्या रक्कमेच्या संदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल झालेली आहे त्यामुळे ही न्यायप्रविष्ट बाब असल्यामुळे मला या बाबतीत निर्णय करता येणार नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. 700 कोटी रुपये वापस मिळावे म्हणून न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेली आहे हे मला मान्य आहे. परंतु तुम्ही 700 कोटी रुपये परत देण्याच्या संदर्भात उच्च न्यायालयाने तुम्हाला स्थगनादेश दिलेला आहे का, की हे पैसे वाटू नका, देऊ नका म्हणून. सुमोटो मॅटर जरी सबज्यूडीअस वाटत जरी असले तरी तुम्ही याबाबतीत निर्णय घेऊ शकता. यासंदर्भात उच्च न्यायालय तुम्हाला परवानगी देईल. कशा करता तुम्ही येथे उच्च न्यायालयात बाब असल्यामुळे निर्णय करता येणार नाही असे म्हणणे योग्य नाही. तुम्हाला शेतक-यांचे पैसे परत द्यावयाचे आहे का हा माझा प्रश्न आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कापूस पणन महासंघाच्या बॅलन्स शिटवर 5768 कोटी रुपयांचा संचित तोटा आहे. हा जो तोटा आहे तो जोपर्यंत वाईप आऊट होत नाही तोपर्यंत ही रक्कम देता येणार नाही.

श्री. पांडूरंग फुंडकर : सभापती महोदय,जो चढउतार निधी 3 टक्के कापला गेला आहे त्याचा चढउतार किंमत निधीशी तोटयाचा कोठेही संबंध नाही. वेळोवेळी शासनाने हे मान्य केले आहे की, या योजनेत नफा झाला तर तो शेतक-याचा आणि तोटा झाला तर तो सरकारचा हे तत्व तुम्ही मान्य केलेले आहे. हा जो पैसा आहे तो शेतक-याच्या मालकीचा आहे. हा पैसा घाटयात टाकून शेतक-याचा पैसा तुम्ही बुडविणार आहात काय? वास्तविक या चढऊतार निधीवर व्याज

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ

श्री. पांडूरंग फुंडकर.........

देऊन ही रक्कम शेतक-याला परत करावयास पाहिजे. हे पैसे कापतांना तुम्ही कबूल केले नव्हते की, हा निधी तोटयात टाकू म्हणून. जर तुम्ही ही योजना बंद करावयास निघाला असाल तर शेतक-याचा हा पैसा तुम्ही त्वरीत परत केला पाहिजे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, राज्य सरकार ही योजना कोणत्याही परिस्थितीत बंद करणार नाही. 3 टक्के चढऊतार निधी जो घेतलेला आहे त्यासंदर्भात एक याचिका उच्च न्यायालयात दाखल झालेली आहे. 700 कोटीच्या आसपास 3 टक्क्याप्रमाणे चढऊतार निधी जमा आहे. 5768 कोटी रुपयांचा यामध्ये संचित तोटा आहे.

श्री. नितीन गडकरी : मी पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या मुद्यावर बोलण्यासाठी ऊभा आहे. कापूस एकाधिकार खरेदी योजनेचा कायदा विधीमंडळाने 1972 मध्ये पास केला होता. त्यावेळचे मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक तसेच सहकार मंत्री यशवंतराव मोहिते यांनी असे जाहीर केले की, फायदा झाला तर शेतक-याचा आणि तोटा झाला तर तो सरकारचा. कापूस एकाधिकार खरेदी योजनेचा कायद्यामध्ये लिहिले आहे की, फायदा शेतक-याचा आणि घाटा सरकारचा. त्या ॲक्टमध्ये तुम्ही अजून दुरुस्ती केलेली नाही.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

कॉटन मोनोपॉली ॲक्टमध्ये लिहिले आहे की, फायदा शेतकऱ्याचा आणि घाटा सरकारचा. या ॲक्टमध्ये आपण अजून पर्यंत दुरुस्ती केलेली नाही. हे ऑन रेकॉर्ड आहे. त्यामुळे चढ उताराचे पैसे शासन संचित घाटयामध्ये ॲडजेस्ट करू शकत नाही. आता मंत्रिमहोदय जे सांगत आहेत, ते कायद्याच्या विरोधात आहे. त्यामुळे मंत्रिमहोदयांनी सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती येथे देऊ नये.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, संचित तोटयामध्ये रक्कम ॲडजेस्ट झाली असा सन्माननीय सदस्यांचा जो समज आहे, तो चुकीचा आहे. संचित तोटा हा कॉटन फेडरेशनला झालेला आहे. 5768 कोटीचा जो तोटा आहे, तो खरेदीमधला जो फरक आहे, त्यातील तोटा आहे. चढउतार निधीतील 3 टक्केप्रमाणे 700 कोटीच्या आसपास निधी येतो. हा निधी आपण शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने परत करू.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर शासन त्यांना मदत करणार आहे का ?

**उपसभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना कळकळीची विनंती आहे की, आपले भाषण सुरू असताना सत्तारूढ बाजूच्या कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी अडथळा आणला नाही. त्यांनी शांतपणाने आपले भाषण ऐकले आहे. मंत्रिमहोदयांचे उत्तर झाल्यानंतर मी आपल्याला संधी देतो.

श्री.नितीन गडकरी : महोदय, माननीय मंत्र्यांनी कायद्याच्या विरोधात बोलणे बरोबर आहे का ? ते आम्हाला सांगावे. मी आताच सांगितले की, कापूस एकाधिकार योजनेच्या कायद्यात जे लिहिले आहे ते शासन कसे काय बदलवत आहे. जे कायद्यात लिहिले आहे, ते शासनावर बंधनकारक आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी जे काही म्हटले आहे ते सन्माननीय सदस्यांनी समजून घ्यावे. मी असे म्हटले की, 5768 कोटी रुपयाचा संचित तोटा योजनेला झालेला आहे. ॲक्टमध्ये तरतूद स्पष्ट आहे की, तोटा हा सरकारचा आणि फायदा हा शेतकऱ्याचा. परंतु, कॉटन फेडरेशनच्या बॅलन्सशीटमध्ये दरवर्षी तोटा हा आलेला आहे. तो कॅरीफॉरवर्ड करत करत 5768

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

कोटी एवढा आलेला आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, चढउतार निधी हा जो शब्द आहे, तो या कामासाठी नाही. पणन महासंघाने जर चूक केली असेल तर ती त्यांना दुरूस्त करायला सांगा. हायकोर्टामध्ये गेल्यामुळे शेतकरी भरडले गेले अशी भूमिका शासनाने घेऊ नये. शासनाने असे सांगावे की, वर्षानुवर्षे कापलेला जो 3 टक्के निधी आहे, तो 4 महिन्यात देण्यात येईल. मघाशी बोलता बोलता मंत्रिमहोदय म्हणाले की, हा निधी टप्प्याटप्प्याने देऊ. माझे म्हणणे काय आहे लोक आज मरायला लागले आहेत त्यामुळे टप्प्याटप्प्याने निधी देण्याचे बंद करून तो 4 महिन्यामध्ये देण्यात येईल,असे शासनाने सांगावे. कारण शासनाची ती कृती ही कायद्याच्या विरोधातील आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, शेतकऱ्यांची 3 टक्के रक्कम आपण जमा केली आहे, त्यावर शेतकऱ्यांना आपण व्याज दिले आहे. (अडथळा)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, असे जर असेल तर एकही मंत्री उत्तर देणार नाही. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलायचे असेल तर त्यांनी बोलून घ्यावे. ही काय पध्दत झाली का ? एकाही मंत्र्यांना भाषण करू दिले जात नाही. भाषण ऐकू न देण्याची विरोधी पक्षाला सभागृहाने मोनोपॉली दिली आहे का ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आज सगळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

**उपसभापती** : मी परत परत सर्वांना सांगत आहे की सभागृहामध्ये शांतता राखावी. (गोंधळ) मी आपल्याला 3-3 वेळा विनंती केली की, मंत्रिमहोदयांचे उत्तर होऊ द्या. आपल्याला जे काही मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत ते नंतर करावेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदय सतत चुकीचे उत्तर देत आहेत.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : कोणत्या वर्षापर्यंत व्याज दिले हे येथे सांगावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, व्याजाची सर्व माहिती मी पटलावर ठेवतो.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, इतका महत्वाचा विषय असताना माननीय मंत्रिमहोदय माहिती पटलावर ठेवीत आहेत हे बरोबर नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या रकमेच्या संदर्भात नागपूर उच्च न्यायालयात एक याचिका दाखल झालेली आहे. ही बाब न्यायप्रविष्ठ आहे. जो संचित तोटा आहे ती राज्य सरकारची जबाबदारी आहे. याबाबत वित्त विभागाला विनंती करण्यात येऊन पुढील कारवाई करण्यात येईल.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा महत्वाचा विषय असताना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधीची माहिती मंत्रिमहोदय पटलावर ठेवीत आहेत हे बरोबर नाही याचा निषेध करुन मी सभात्याग करीत आहे.

( सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख सभात्याग करतात. )

------------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ( कृषि मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्येसंबंधी उपस्थित केलेल्या चर्चेमध्ये दोन्ही बाजुच्या 15 सन्माननीय सदस्यांनी भाग घेताना या विषयावर सखोल चर्चा केली. शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणमीमांसा खोलवर जाऊन मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या संदर्भात हे निरनिराळे अहवाल आले त्याचा सुध्दा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. सभागृहापुढे हे सर्व मुद्दे आलेले आहेत. आज महाराष्ट्रातील शेतकरी अडचणीत आहे. इतर राज्यांच्या तुलनेत येथील शेतकरी जास्त अडचणीत दिसत आहे. भारतामध्ये ज्या राज्यांमध्ये शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्यामध्ये महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या राज्यांचा समावेश आहे. या अगोदर सुध्दा या विषयावर चर्चा झाली होती. सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्येस दोन प्रकारची कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे नैसर्गिक आपत्ती. महाराष्ट्रातील मान्सून सिझन लहरी स्वरुपाचा आहे. श्वाश्वत स्वरुपाचा नाही. दुसरे कारण म्हणजे आपल्या येथील सिंचन क्षमता खूप कमी आहे. ही सिचंना क्षमता वाढवावयाचे म्हटले तर पाण्याचा वापर पाहता ही क्षमता 25 टक्केपेक्षा पुढे जाईल अशी परिस्थिती नाही. तसेच आपल्याकडील मातीचा पोत हलका आहे. या नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाऊन त्यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्याचे काम करावे लागणार आहे हे त्यावेळी सांगितले होते. आणखी एक महत्वाचे म्हणजे पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमास गती देण्याचा प्रयत्न आहे. .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी याठिकाणी सांगू इच्छितो की, मा.राज्यपालांचे आदेश पाळले जात नाहीत. त्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे पैशांचे वाटप होत नाही. त्यांच्या आदेशांना केराची टोपली दाखविली जाते..

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आता जो निधी येत आहे तो अनुशेषाच्या निदेशाप्रमाणे वापरला जात आहे. आम्ही पाणलोट क्षेत्र विकाससंबंधी पाच वर्षाचा आराखडा सहा महिन्यात देणार आहोत. त्यामध्ये आपल्याला 4 हजार पाणलोट क्षेत्र कसे बांधता येतील यादृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत. मातीचा पोत सुधारण्याचा आमचा प्रयत्न आहे. बियांणाचे नुतनीकरणाचे काम तसेच बिजोत्पादनाचा कार्यक्रम घेण्याचे काम आम्ही करीत आहोत. एकात्मिक कीड



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात....

व्यवस्थापनामध्ये कमीत कमी खर्च कमी करुन जास्तीत जास्त उत्पादन कसे वाढेल हे पाहिले जाणार आहे.ज्यावेळी हरित क्रांती आली त्यावेळी नवीन खते आली., नवीन बियाणे आले, कीटक नाशके आली. ही खते किंवा कीटक नाशके बागायत भागात कदाचित परवडत असतील परंतु जिराईत भागातील शेतकऱ्यांना ती परवडत नाही. त्यावर खर्च जास्त होतो. परंतु त्या प्रमाणात उत्पन्न मिळत नाही. या सर्व शेतकऱ्यांना वेगळ्या दिशेने नेण्याची जबाबदारी आम्ही घेत आहोत. याकरिता आम्ही महापिक अभियान राबवीत आहोत. हे अभियान राबवित असताना सर्व कृषि अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत की, विधानमंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना तुम्ही करीत असलेले काम दाखवा. त्यांना प्रत्यक्ष तेथे घेऊन जा.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात....

कोणत्याही विधानमंडळाचा सदस्य तुमच्या तालुक्यात आला तर तुमचे काम दाखवा असे आम्ही अधिकाऱ्यांना सांगितले आहे. जर काम दाखविले गेले नाही तर त्याबाबत मला पत्र द्या असेही सांगितले आहे.

श्री.नितीन गडकरी : आपण मला सांगा की, ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यापैकी किती शेतकऱ्यांच्या कुटुंबियांची आपण भेट घेतली ?

श्री.बाळासाहेब थोरात : शेतकऱ्यांची परिस्थिती बदलणे ही आजची गरज आहे. आम्ही शेती शाळा केंद्र स्थापन करणे, विज्ञान कृषी केंद्र स्थापन करणे, बिजोत्पादनाचा सगळयात मोठा कार्यक्रम शासनाने राज्यात घेतला आहे. हे काम करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी बीयाणे-खतांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. यावर्षात शासनाने काय काम केले याबाबतची त्यांना पूर्ण माहिती मिळाली नसेल असे मला वाटते. सभापती महोदय, खतांच्या तपासणीबाबतचा सगळयात मोठा ड्राईव्ह शासनाने यावर्षी घेतला आहे. कमी प्रतीचे खत बाजारात येऊन त्याचा शेतकऱ्यांना पुरवठा होत आहे. आम्ही राज्यात 6304 खतांचे नमुने घेतले, त्यामध्ये अप्रमाणित....

श्री.श्रीकांत जोशी : 4500 गावासाठी केवळ एक खत तपासणी केंद्र आहे. एका केंद्रावर एवढे प्रचंड काम होऊ शकत नाही. आपल्याला ड्राईव्हमध्ये जे अप्रमाणित नमुने सापडले त्यातील किती मालकांवर आपण कारवाई केली ? किती मालकांना गजाआड केले ?

श्री.बाळासाहेब थोरात : महोदय, अप्रमाणित मिळालेल्या नमुन्यांपैकी 13 लायसन्स सस्पेंड केले आहेत. त्यांच्यावर कोर्ट केसेस दाखल करण्याची प्रोसेस सुरु आहे. यापुढे अप्रमाणित खते शेतकऱ्यांना मिळणार नाहीत. राज्यात 2 लाख रुपयांचे बोगस बी.टी.बियाणे जप्त केले आहे आणि याबाबतीत सुध्दा केसेस दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. कोणत्याही परिस्थिती शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बी-बियाणे मिळाले पाहिजे हा यामागील उद्देश आहे.

कमी व्याजाच्या दराबाबत सुध्दा या ठिकाणी उल्लेख झाला. कमी व्याज दराने कर्ज मिळण्यासंदर्भात प्रयत्न करावे लागतील. आधारभूत किंमत नव्याने करण्यासंदर्भात केंद्र सरकारशी पाठपुरावा करीत आहोत. आपली उत्पादकता कमी आणि खर्च जास्त आहे त्यामुळे आम्हाला आधारभूत किंमत वेगळी द्या असा केंद्र सरकारसमवेत पत्रव्यवहार करीत आहोत. विम्याचे संरक्षण....

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, पूर्ण तालुक्यात 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी असेल तरच पीक विम्याचे पैसे दिले जातात. परंतु नियम असा केला आहे की, अशी जर परिस्थिती उद्‌भवली तर विचारणा होते की, अमूक एक व्यक्ती मृत्युमुखी पडली आहे हे खरे आहे, परंतु बाकीचे मृत्युमुखी पडले आहेत काय ? बाकीचे मृत्युमुखी पडले असतील तरच आम्ही पैसे देऊ. उदा. एक आमदार मरण पावला आहे त्यामुळे मदत दिली जाणार नाही, बाकीचे आमदार मरण पावले तरच मदत दिली जाईल असा नियम आपण लावणार आहात काय ? त्यामुळे नियमातील हा जो दोष आहे तो आपण दूर करणार आहात काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : विम्यासाठी चांगले संरक्षण असावे यासाठी प्रयत्न करु.

श्री.पांडुरंग फुंडकर : आपण प्रत्येक शेतकऱ्यांकडून विम्याचा प्रिमीअम कापून घेता. परंतु, रिफंड देताना संपूर्ण तालुक्याची आणेवारी 50 टक्क्यांच्या आत असेल तरच रिफंड देता.

श्री.बाळासाहेब थोरात : विम्याचे चांगले मॉडेल तयार करण्याचे काम सुरु आहे. हा विषय केंद्र सरकारशी निगडीत आहे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात...

अध्यक्ष महाराज,कर्जबाजारी झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करतात. पिकांसाठी घेतलेले कर्ज आणि लग्नासाठी किंवा आजारपणासाठी घेतलेले कर्ज.असे या कर्जाचे दोन प्रकार आहेत. हे कर्ज सुध्दा आत्महत्या करण्या मागचे एक महत्वाचे कारण आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : आम्ही शेतक-यांच्या पीक कर्जा संबंधी बोललो आहोत. पीक विम्याचा प्रिमियम त्यांच्याकडून स्वतंत्रपणे कापून घेण्यात येतो आणि त्याला नुकसानभरपाई देत असतांना मात्र संपूर्ण तालुक्याचा विचार केला जातो.तालुक्यातील आणेवारी 50 टक्याच्या आत आली असेल तर त्याला नुकसानभरपाई मिळते.अन्यथा त्याला नुकसान भरपाई मिळत नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : पीक विम्याची भरपाई देण्याची पध्दत आणेवारीवर अवलंबून नाही त्यासाठी उंबरठा उत्पन्न काढले जाते.त्यासाठी वेगळी पध्दत आहे. त्यामध्ये काही अडचणी असून तो स्वतंत्र चर्चेचा विषय आहे.शेतक-यांना जास्तीत जास्त मदत कशी देता येईल यासाठी केन्द्र सरकारच्या मदतीने आमचे प्रयत्न चालू आहेत. लग्नाचे कर्ज सुध्दा आत्महत्येचे एक मुख्य कारण आहे.हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

श्री.नितीन गडकरी :माननीय मंत्रीमहोदय नगर जिल्हयातील आहेत तसेच ते सज्जन आहेत.1024 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्या आत्महत्तेचे कारणा टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सने आणि इंदिरा गांधी इन्स्टिटयूशनने शोधून काढले आहे आणि त्यांनी लग्नाच्या कर्जामुळे आत्महत्या केल्या आहेत असे कारण दिलेले नाही.

श्री.बाळासाहेब थोरात :सगळा अहवाल आल्या नंतर एकत्रितपणे ज्या गोष्टी पुढे आल्या होत्या त्या मी सांगितल्या आहेत.

**उपसभापती** : रेकॉर्डवर चुकीची माहिती जाऊ नये म्हणून मी सांगतो . माननीय मंत्री सज्जन आहेत असे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी म्हटलेले आहे.मला असे म्हणावयाचे आहे की, सगळेच मंत्री सज्जन आहेत. त्यामुळे एकच मंत्री सज्जन आहेत असे रेकॉर्डवर येऊ नये.

श्री.नितीन गडकरी :मी चांगल्या भावनेतून बोललो आहे.ते सरळ आणि सज्जन आहेत असे माझे प्रामाणिक मत आहे. सगळेच मंत्री सज्जन आहेत परंतु त्यापैकी हे मंत्री उजवे आहेत.त्यांच्या धोरणाबद्दल माझा आक्षेप असेल परंतु ते सिनसिअरली ऐकतात.असे मला सांगावयाचे आहे.

2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना मी असे सांगतो की, आपण मंत्री असतांना सज्जन होता आणि आता विरोधी पक्षात असतांनासुध्दा आपण सज्जनच आहात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेत असतांना सन्माननीय विरोधी पक्षाचे नेते श्री.पांडुरंग फुंडकर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, प्रा.बी.टी.देशमुख आणि अन्य सन्माननीय सदस्यानी या चर्चेत भाग घेतला. शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या हा राज्यातील ज्वंलत प्रश्न असून या प्रश्नावर या ठिकाणी चर्चा झाली.शेतक-यांच्या आत्महत्या हा ज्वलंत प्रश्न असून हा प्रश्न कायम स्वरुपी सुटावा आणि महाराष्ट्रामध्ये भविष्यकाळात शेतक-यांनी आत्महत्या करु नये या दृष्टीने मार्गदर्शन करीत असतांना विरोधी पक्षाच्या नेत्यांनी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी ब-याचशा सूचना केल्या आहेत. त्याचबरोबर काही सन्माननीय सदस्यांनी टीकासुध्दा केली आहे.मी असे म्हणेन की, महाराष्ट्रात शेतक-यांच्या आत्महत्या होतात हे सत्तारुढ पक्षाला, विरोधी पक्षाला व अन्य नागरिकांना भूषणावह नाही. महाराष्ट्रात आत्महत्या होता कामा नये ही जबाबदारी जेवढी सरकारची आहे तेवढीच जबाबदारी विरोधी पक्षाची आणि अन्य नागरिकांचीसुध्दा असली पाहिजे अशी माझी भावना आहे आणि तसे माझे या सबंधीचे विचार आहेत.शेतकरी आत्महत्या कशामुळे करतात यासंबंधीचा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केलेला आहे त्याचबरोबर या

शेतक-यांच्या आत्महत्या होता कामा नयेत असे वाटत असेल तर काय करावयास पाहिजे हे सुध्दा सांगितले आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, ही चर्चा होत असतांना अनेक गोष्टी गैरसमजातून टीकेच्या स्वरुपात पुढे आलेल्या आहेत. सरकारने अमुक गोष्टी केल्या पाहिजेत असे सांगण्यात आले आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ....

सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी सांगितले की, एक हजार कोटीचे कापड घ्या आणि वाटा. सभापती महोदय, बोलताना या गोष्टी आपल्याला सोप्या वाटतात पण प्रत्यक्षात तसे करणे अवघड असते. एक हजार कोटी रूपये घ्या आणि अमुक करा वगैरे म्हणणे सोपे आहे. परंतु हे हजार कोटी रूपये शेवटी आपल्याकडे जनतेच्या खिशातून जमा केलेले असतात. ते अशा प्रकारे घेऊन एकाच वेळी खर्च आपल्याला करता येत नाही, नियमाने देखल असे वाटप आपल्याला करता येत नाही. तेव्हा या ठिकाणी जी टीका झालेली आहे त्याबद्दल मी एवढेच म्हणेन की, अशा टीके ऐवजी विधायक सूचनाकेल्या असत्या तर ते अधिक उचित झाले असते. अशा सूचना जरूर या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी केल्या आहेत. तेव्हा टीकेबरोबरच अशा सूचनाही आल्या असत्या तर ते अधिक बरे झाले असते आणि या संदभ्र्ात उपाय योजना करण्याच्या दृष्टीने ते प्रभावी ठरले असते इतकेच मी या बाबत म्हणेन. सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या जणू काही 2001 सालापासून होत आहेत असेही दर्शविण्याचा प्रयत्न येथे झाला. मी काही दिवसापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांच्या बाजूला होतो, त्यांच्याच विचाराचा होतो. परंतु आता मी इकडे, सत्तारूढ बाजूला आलो आहे आणि माझे विचार आणि प्रवृत्ती मध्ये बदल झाल्यामुळेच मी येथे आलो आहे. अर्थात विरोधी पक्षामध्ये असताना विरोधी पक्षाची म्हणून एक जबाबदारी असते, काही कर्तव्ये असतात त्याचप्रमाणे सत्तेमध्ये आल्यावर सत्तारूढ पक्षाच्याही काही जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये असतात आणि ती पार पाडणेही आवश्यक आहे. म्हणूनच मी येथे सांगू इच्छितो की, या आत्महत्या 2001 सालापासूनच नाही तर त्यापूर्वी म्हणजे जवळपास 1996-97 यपासून नजरेस आलेल्या आहेत. किंबहुना त्याही पूर्वीपासून हे प्रकार चालू आहेत. मात्र त्यावेळी त्यांची संख्या नगण्य स्वरूपात असल्याने, काही लाखामागे 20-25 आत्महत्येची संख्या असल्याने त्या विशेषत्त्वाने, गांभीर्याने घेतल्या जात नव्हत्या. आता तेच प्रमाण 53-55 पर्यंत वाढत गेलेले असल्याने त्याचे गांभीर्य आपल्याला जाणवू लागले आहे. या वर्षी कापसाला भाव दिला नाही, पण आपण केंद्रीय आधारभूत किंमत जी होती तीच म्हणजे 1780 रूपये भाव दिला म्हणून या आत्महत्यांची संख्या वाढली असे सांगण्यात आले. पण मग गेल्या वर्षी कापसाला जो भाव दिला त्यातून जवळपास 4800 कोटीचे वाटप झाले आहे पण तरीही तेव्हा 524 आत्महत्या झालेल्या आहेत. आता डिसेंबर 2005 पर्यंत ही संख्या 50 पर्यंत गेली. म्हणजे

...... 3ओ - 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणे ....

कापसाला चांगला भाव दिला होता तेव्हा आत्महत्या कमी झाल्या असाही मुद्दा यामध्ये पटण्यासारखा नाही. म्हणून या ठिकाणी उल्लेख झाला की, हा मुद्दा कायम स्वरूपी सोडविण्यासाठी सरकारने प्रयत्न केले नाहीत असे नाही. मघाशी या ठिकाणी माहिती देण्यात आली की, या आत्महत्यांच्या प्रकरणामागील वस्तुस्थिती समोर येण्यासाठी हायकोर्टाने टाटा रिसर्च इंस्टिट्यूट या संस्थेकडे काम दिले. ही गोष्ट खरी आहे. पण त्यानंतर इंदिरा गांधी रिसर्च इंस्टिट्यूट या संस्थेकडे मात्र शासनाने स्वतःहून हे काम दिले आहे हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. जेव्हा असे कळले की, कोर्टाने असे असे आदेश दिले आहेत, तेव्हा या प्रकरणांच्या मुळामध्ये जाण्यासाठी राज्य सरकारने हे काम इंदिरा गांधी रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेकडे दिले. या आत्महत्या होण्यामागील कारणे काय आहेत हे त्यांनी शोधावे आणि त्यामागे जी काही कारणे असतील मग ती आर्थिक असतील, सामाजिक असतील, कर्जापोटी असतील, त्यासाठी सरकारने काय करावे याचा देखील अहवाल सरकारला प्राप्त झालेला आहे. हे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, या बाबतचा अहवाल आमच्याकडे आलेला आहे. तेव्हा या आत्महत्यांमागील कारणे काय आहेत हे याद्वारे समजून आल्यानंतर आता शासन म्हणून आपली एक जबाबदारी आहे आणि त्याप्रमाणे याबाबत कायम स्वरूपी उपाय योजना करण्याचे सरकारने ठरविले आहे. आता आपण म्हणाल की, आज ही चर्चा येथे होत आहे तेव्हाच याबाबत सरकारने निर्णय घ्यावा. आजच्या आज या संबंधात कापसाला काय भाव देणार आहे, मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना काय मदत देणार आहे असे विचारले तर त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, राज्य सरकारने हा विषय गांभीर्याने घेतलेला असून ज्या संस्थांनी याबाबत अहवाल देऊन मार्गदर्शन केलेले आहे., ... त्यातून जवळपास 14 ....

श्री. नितीन गडकरी : मला एकच विनंती करावयाची आहे की, आपल्या विभागाने जवळपास 900 पंचनामे खोटे केलेले आहेत. ....

श्री. नारायण राणे : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी येथे राजकीय भाषण करणार नाही. तर मी आपल्याला इतकेच सांगत होतो की, या अहवालातून या संदर्भात कोणकोणत्या उपाय योजना करावयाच्या या संबंधात 14 मुद्दे आलेले आहेत. म्हणजे सरकार या संबंधात स्वस्त बसले आहे, संख्या ऐकून गप्प बसले नाही तर आत्महत्या होणे हे राज्याला निश्चितच भूषणावह नाही.

(नंतर श्री.सरफरे..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे....

शेवटी महाराष्ट्र हे प्रगतिशील राष्ट्र आहे, या प्रगतिशील महाराष्ट्र राज्यामध्ये आत्महत्या होणे ही अभिमानास्पद गोष्ट नाही. ही समस्या कायम स्वरुपी संपावी म्हणून हे राज्य सरकार हे अधिवेशन संपण्यापूर्वी या 14 मुद्दयांबाबत या सरकारची योजना काय असेल हे जाहीर करील. याठिकाणी माननीय सहकार मंत्र्यांनी व्याजाच्या मुद्दयाबाबत सांगितले. आज 14 टक्के व्याज आकारुन पैसे दिले जातात. खाजगी सावकारामार्फत व सहकारी बँकामार्फत वेगवेगळया प्रकारे व्याजाचे दर लावले जातात, हे व्याजाचे दर कमी झाले पाहिजेत हा विषय आपल्या विचाराधीन आहे. आणि नाबार्ड अमूक इतक्या व्याजदराने कर्ज देत आहे त्या पध्दतीने 7, 8 व 9 टक्क्यापर्यंत व्याज असावे काय हा विषय देखील शासनाच्या विचाराधीन आहे. तो विषय आम्ही सोडून दिलेला नाही. त्यासाठी आम्ही 3 ते 6 महिन्यांचा कालावधी मागत नाही तर या अधिवेशनाच्या असलेल्या कालावधीमध्ये आम्ही हा निर्णय घेणार आहोत.

सभापती महोदय, याठिकाणी वादाचा असलेला दुसरा मुद्दा आपणासमोर मांडू इच्छितो. आजपर्यंत 1 हजार 42 आत्महत्या झाल्या आहेत हे शासनाच्या रेकॉर्डवर आहे. आपण म्हणता की, 223 जणांना शासनाने पैसे दिले. पैसे देण्याच्या बाबतीत शासनाचे निकष ठरलेले आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, महसूल खात्यातर्फे, पोलीसांतर्फे तपासणी केली जाते त्यामध्ये काही अटी घातल्या जातात. परंतु त्या अटींची पूर्तता होत नाही. आपणास माहीत आहे की, 7/12 चा उतारा त्या शेतकऱ्याच्या नावे असला पाहिजे, त्यावर त्याने कर्ज घेतल्याचा पुरावा पाहिजे. शेजारी असलेल्या लोकांनी साक्ष दिली पाहिजे. या ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्या तपासल्या जातील. सभापती महोदय, या 1 हजार 42 केसेस मी स्वत: तपासून पाहीन. आणि एकही केसच्या बाबतीत त्यांना पैसे नाकारले गेले अशाप्रकारची घटना भविष्यामध्ये आपल्या नजरेस येणार नाही. सभापती महोदय, मी यानिमित्ताने आपणास एक उदाहरण सांगतो की,...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नापिकी व कर्जबाजारीपणामुळे या आत्महत्या झालेल्या आहेत अशाप्रकारचा अहवाल टाटा इंस्टिटयुट ऑफ फंडामेंटल रिसर्च या संस्थेने दिला आहे व मुंबई हायकोर्टाने निर्णय दिला आहे. याबाबतचे डॉक्युमेंट मी आपणाकडे पाठवितो.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, कोर्टाने सांगितले म्हणून मी सांगतो. आपण माझे ऐकून घेतल्यानंतर भरपूर बोला. आपण माझ्याबरोबर चर्चा करण्यासाठी बसावे मी आपणास वेळ



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नारायण राणे....

देतो. एकही व्यक्ती अशी असेल की, त्या व्यक्तीने आत्महत्या केल्यानंतर सरकारने त्यांच्या कुटुंबियांना जाणुनबुजून पैसे देण्याचे टाळले आह असे एखादे प्रकरण आपण माझ्या नजरेस आणावे. असे भविष्यात होणार नाही अशी मी या सदनाला हमी देतो. तुम्ही अशा केसेस नजरेस आणा, त्यांना पैसे देण्याची जबाबदारी शासनाची आहे. सभापती महोदय, कधी कधी गैरसमज कसे होतात याचे एक उदाहरण मी याठिकाणी देतो. मी युतीच्या काळात महसूल मंत्री असतांना प्रत्येक केसचा अभ्यास केला. काही वेळेला अशा काही केसेसमध्ये त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना सपोर्ट मिळावा, सरकारकडून काही मदत मिळावी म्हणून अनेक मार्गाने साक्ष देण्यासाठी लोक पुढे येतात. त्यामध्ये त्या विभागातील लोकप्रतिनिधी देखील त्यांना पाठींबा देतात. अशाप्रकारची अनेक उदाहरणे माझ्याजवळ आहेत. परंतु ती सांगून मी या सभागृहाचा वेळ घेणार नाही. मी याठिकाणी एकच उदाहरण देतो की, रंगाराव धाकडे या अमरावती जिल्हयातील लसनापूरच्या माणसाने 19 सप्टेंबर 2005 रोजी विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्याने आत्महत्तेचा प्रयत्न कशासाठी केला? याची चौकशी करण्यात आली त्यावेळी अहवाल असा आला की, रंगाराव धाकडे हा आत्महत्तेच्या प्रयत्नात वाचल्यानंतर त्याने जबानी अशी दिली की, मला मूळव्याधीचा आजारी असल्यामुळे त्या आजाराला कंटाळून मी विष घेतले. जर ही व्यक्ती मृत पावली असती तर आपण त्या व्यक्तीने कर्ज घेतले, त्या कर्जाची परतफेड करु शकला नाही असे आपण म्हणाला असता. मुळात त्याच्याकडे जमीन होती कां? तो भूमिहीन होता, त्याच्या अंगावर कोणतेही कर्ज नाही. आत्महत्तेच्या प्रयत्नामध्ये तो वाचला ही चांगली गोष्ट आहे. जर तो मृत पावला असता तर त्याच्या अंगावर कर्ज असल्यामुळे त्याला शासनाने 1 लाख रुपयांची मदत करावी अशाप्रकारची मागणी घेऊन आपण आला असता. अशाप्रकारचे उदाहरण अपवादात्मक स्वरुपामध्ये 1 टक्का असू शकेल, 100 टक्के आहे असे माझे म्हणणे नाही. सभापती महोदय, या सदनामध्ये चर्चेत भाग घेतलेल्या काही माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये चांगले मुद्दे आले आहेत. त्यामध्ये प्रा. देशमुख साहेबांनी एक चांगला मुद्दा मांडला. ते राजकीय बोलण्यापेक्षा चांगले बोलून गेले. आत्महत्या हे मूळ धरुन त्याबाबत कायम स्वरुपी उपाययोजना करा, ती तात्पुरती करु नका.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे . . . .

मी त्यांच्या या मताशी सहमत आहे. म्हणून राज्य सरकार आता या दृष्टीकोनातून कायम स्वरुपी उपाययोजना करण्यासाठी, जसे आत्महत्या प्रकरणाबाबत कर्जमाफीच्या प्रस्तावाबाबत आता माननीय सहकार मंत्र्यांनी सांगितले. त्यासंदर्भात त्यांनी जी आकडेवारी दिली त्यानुसार 350 कोटी रुपये माफ केले. यवतमाळ आणि अमरावतीबाबत 24 कोटी व 19 कोटी अशी आकडेवारी दिली. याबाबतीत समाधान झाले नाही तर त्यादृष्टीने सूचना येऊ शकतात. पण सरकार करुच शकणार नाही किंवा सरकारची क्षमताच नाही असे म्हणणे म्हणजे जर विश्वासार्हताच नसेल तर असे प्रस्ताव चर्चेला . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, विश्वासार्हता कशी राहील कारण तुम्ही कापसाला 2700 रुपये भाव देतो असे सांगितले, पण तो दिला नाही. जाहीरनाम्यातील वचन मोडण्याकरता असते, देण्याकरता नसते असे तुमच्या नेत्या श्रीमती प्रभा राव म्हणतात. मग तुमच्या वर कसा विश्वास ठेवणार ? दिलेला प्रत्येक शब्द या सरकारने पाळलेला नाही. यांचे पाप तुम्ही तुमच्या अंगावर कशासाठी घेता ? यांची काय विश्वसनीयता आहे ? दिलेल्या एकेका शब्दाच्या बाबतीत त्यांनी विश्वासघात केलेला आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, एकतर संसदीय लोकशाहीमध्ये सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालावे असे मला वाटते. नाहीतर या चर्चेला काही महत्व राहणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी त्यांना जे बोलावयाचे आहे, ते त्यांनी बोलावे. त्यासाठी जेवढा वेळ घ्यावयाचा असेल तेवढा घ्यावा. याठिकाणी माननीय मंत्री महोदयांना उत्तर द्यावयाचे असते. यापूर्वी मागे काय झाले, त्यावरुन पुढे काही होणार नाही असा त्यांनी समज करुन घेण्याचे कारण नाही. माझ्याकडे युतीच्या काळातील देखील प्रोसीडींग आहे. त्यावेळी मी तिकडेच होतो, त्यामुळे माझेच प्रोसीडींग मी काय वाचू ? त्यावर्षी 1998 मध्ये . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यावेळी तुम्ही शेतकऱ्यांच्या घरी चेक घेऊन गेला होतात. पण हे भेटावयास देखील गेले नाहीत.

श्री.नारायण राणे : पण आता मी इकडे आलो आहे. तेव्हा काही होणार नाही असे कसे म्हणता ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यावेळी युती शासनाचे महसूल मंत्री म्हणून

. . . .3 क्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

तुम्ही शेतकऱ्यांच्या घरी चेक घेऊन गेला होतात. पण आता माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर. आर.पाटील आणि इतर मंत्री महोदय त्यांना भेटावयास देखील गेले नाहीत.

श्री.नारायण राणे : पण आता कोणी जाणार नाही असे कसे म्हणता ?

श्री.नितीन गडकरी : तुम्ही कोणाची बाजू घेत आहात ? तुम्ही त्यांचे ओझे आपल्या अंगावर कशासाठी घेत आहात ? त्यांचे ओझे त्यांच्या अंगावर द्या.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय,माझे ओझे माझ्याच अंगावर घेत आहे. मी दुसऱ्याचे घेत नाही. पण माझे म्हणणे आहे की, आतापर्यंत झाले नाही म्हणजे भविष्यात होणार नाही असे आपले म्हणणे आहे का ? मी उद्यापासून जाईन. मी चेक बुक घेऊन जाणार नाही का ? कालपर्यंत झाले हे मी मान्य करतो.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

मी चेकवर सहया घेऊनच जाईन. कोणाच्या सहया घ्यावयाच्या हे मला माहिती आहे. तेवढे मला चांगले माहिती आहे. 1998 मध्ये 82 आत्महत्या झाल्या आणि आपण 23 जणानांच पैसे दिले होते. मी या वादात जात नाही. तुम्ही केले, आम्ही केले यामध्ये मी जात नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी तुम्हाला एक मित्र म्हणून सांगतो की, त्यांचे ओझे तुमच्यावर घेऊ नका.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, हे सभागृह आहे. शासनाने ज्या गोष्टी करावयाच्या ठरविल्या आहेत त्यानुसार हा प्रश्न कायमस्वरुपी सोडवावा यादृष्टीने गांभीर्याने हा विषय घेतला आहे. याबाबतीत रिसर्च करणाऱ्यांकडून कर्जाचे पाच हप्ते पाडून द्यावे अशा ज्या सूचना आल्या आहेत, त्याप्रमाणे कर्जाचे पाच हप्ते पाडून देऊन नवीन कर्ज मंजूर करण्यासंबंधीचा मुद्दा आमच्या विचारात आहे. अल्प भूधारक शेतकऱ्यांना कमी दराने कर्ज देण्याचा विचार आहे. तसेच ग्रामीण पतपुरवठयाबाबत विषय मांडला. आम्हाला पत संस्थेचे नियम काय आहेत हे माहिती आहेत. त्या 18 किंवा 22 टक्क्यापर्यंत कर्ज देतात. पण आम्ही त्यांना आणून काय करणार ? म्हणून कमी दराने पतपुरवठा होईल अशा प्रकारची उपाययोजना करण्याचा प्रयत्न होईल. तसेच जे जोडधंदे आहेत, पूरक धंदे आहेत ते विदर्भामध्येही सुरु व्हावेत यादृष्टीने पॅकेज तयार करताना सरकार विचार करणार आहे. जसे पशु संवर्धनाच्या माध्यमातून दूध उत्पादन व्हावे, गोट उत्पादन

. . . .3 क्यु-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्हावे, अन्य पोल्ट्रीचे पूरक धंदे चालावेत यादृष्टीकोनातून विचार सुरु आहे. शेतीवर आधारीत उद्योगांना विशेष सवलती देण्याचा विचार आहे. सन्माननीय सदस्यांनी सिंचनाच्या बाबतीत कालव्यांच्या दुरुस्तीसाठी मुद्दा मांडला होता. तर त्याबाबतीत मदत करण्याचे शासनाने ठरविले आहे. तसेच सामाजिक प्रबोधन करण्याचेही ठरविले आहे. आपण सांगितले की, जरी आर्थिक बाबीमुळे, कर्जामुळे या आत्महत्या होत असल्या तरी अनेक कारणे आहेत. यात सामाजिक विषयही आहेत, त्याबाबतीतही प्रबोधन करावे हाही एक मार्ग आहे. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारच्या आत्महत्या होऊ नयेत यादृष्टीकोनातून सरकारने हे अधिवेशन संपण्याच्या आत विविध उपाययोजना करण्याचे ठरविले आहे. ते पॅकेज जाहीर केल्यानंतर त्यात काही कमतरता असेल, उणीवा असतील तर आपण जरुर मार्गदर्शन करु शकता,सूचना करु शकता. पण प्रत्येक गोष्टीमध्ये एकच म्हणावयाचे की, येथे भ्रष्टाचारच सुरु आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (पुढे सुरु..

आत्महत्त्येचा विषय आहे. या विषयामध्ये नैसर्गिक आपत्तीचा विषय आणत आहोत. परंतु सरकारने जे या विषयामध्ये काम केलेले आहे ते चांगले केलेले आहे. परंतु माणूूसकीचा धर्म पाळलेला आहे. सरकारने काहीच काम केलेले नाही कॉंग्रेस सरकार भ्रष्टाचारच करते असे दाखविण्याचा प्रयत्न केला जातो. दोन बोटे दाखवत असतांना तीन बोटे ही आपल्याकडेही असतात...

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय श्री.राणे साहेब आपल्याला वकिली करावी लागते. इतके त्यांना वाईट दिवस आलेले आहेत.

श्री.नारायण राणे : सनमाननीय श्री.गडकरी साहेब, दुसऱ्याचे ओझे आपण आपल्या अंगावर कशाला घेता. आपण उपस्थित केलेल्या मुद्यांवर उत्तर दिले गेलेले आहे. आता मी दुसरीकडे वळतो. काल आपण मोर्चा काढला. आपण चांगला विषय हातामध्ये घेतलेला होता परंतु आज लोकप्रतिनिधींनी अंगावर रॉकेल ओतून घेतले.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय श्री.मुंडे साहेबांकडे लवकर पहा.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, विषय गंभीर आहे. या गंभीर विषयाला कलाटणी देण्याचा प्रयत्न केला गेला. हा विषय केवळ सरकारचा नाही तर संपूर्ण राज्याचा आहे म्हणून त्याचा विचार केला पाहिजे. नैसर्गिक आपत्ती ही जशी राज्यावरील संकट आहे तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या हे राज्यावर आलेले संकट आहे. हे संकट कायमस्वरुपी दूर करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन त्यावर विचार करुन, त्यावरील सूचना, मार्गदर्शन घेऊन सरकारला योजना कार्यान्वित करता येतील. हा प्रश्न कायमचा सुटला पाहिजे. या संदर्भाने ज्या काही अटी असतील त्या कमी करण्याच्यादृष्टीने आपल्याकडून जरुन सूचना केल्या जाव्यात. महसूल मंत्री म्हणून त्याचा जरुर विचार करेन. एखाद्या योजनेचा दुरुपयोग केला जाऊ नये, दुरुपयोग होत असेल तर तसे आपण सांगावे त्यामध्ये सुधारणा करता येतील. विरोधी पक्षाकडून आलेल्या चांगल्या सूचनांचा जरुर स्वीकार करु. जनतेला दिलासा मिळावा, जनतेला त्याचा फायदा व्हावा, आत्महत्त्या केलेल्या कुटुंबाला फायदा व्हावा या सदभावनेने, या प्रश्नांवर संवेदनाशील असल्याचा प्रत्यय आणून दिल्याशिवाय रहाणार नाही, एवढी आजच्या प्रसंगी ग्वाही देतो. या संदर्भाने पॅकेज जाहीर झाल्यानंतर त्या संदर्भाने काही सूचना आल्या तर त्याचा जरुर विचार केला जाईल. मा.मुख्यमंत्री या संदर्भातील पॅकेज जाहीर करतील. एवढेच या प्रस्तावावर बोलून ज्यांनी मार्गदर्शन केले आणि टीकाही केली त्यांचे आभार मानतो. धन्यवाद.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, मा.मंत्र्यांचे भाषण ऐकल्यानंतर असे वाटते की, "खाया-पिया कुछ नहीं, ग्लास फोडा आठ आणा".

श्री.आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी थोडक्यात बोलणार आहे. सभापती महोदय, सभागृहामध्ये राज्यातील अतिशय गंभीर विषयावर आज सदनाने चर्चा केलेली आहे. अधिवेशनाच्या अगोदरपासूनच या विषयावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी तसेच विविध सामाजिक संस्था, वर्तमानपत्रातील अग्रलेखाद्वारे खूप व्यापक चर्चा केलेली आहे. सभागृहामध्ये देखील अनेक वेळा शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येबद्दल चर्चा झालेल्या आहेत. 17 डिसेंबर 1998 रोजी मी या विषयावर चर्चा घडवून आणली होती. त्यावेळेला सन्माननीय श्री.नारायण राणे साहेबांनी महसूल मंत्री म्हणून उत्तर दिलेले होते. त्यावेळेला मी सुध्दा आपल्यापेक्षा थोडे कठोर शब्दामध्ये कडक भाषण केले होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येच्या संबंधाने श्री.राणे साहेब उत्तर देत असतांना सन्माननीय श्री.गडकरी साहेब उपस्थित होते. त्यावेळेला एक गोष्ट स्पष्ट केलेली होती की, यापूर्वी आत्महत्त्या झालेल्या आहेत, त्याबाबतची 1992 ची आकडेवारी देतो. अमरावती विभागामध्ये सरासरी 450 ते 550 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत, नागपूर विभागामध्ये  आत्महत्त्या झलेल्या आहेत. 1995 ते 1997 पर्यन्तची मी आकडेवारी देतो. अमरावती विभागमध्ये 563 जणांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. सभ्ांपती महोदय, विधानसभेमध्ये श्री.राणे साहेबांनी जे उत्तर दिलेले आहे त्याचे प्रोसिडींग आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

त्या दिवशी बांधकाम विभागाचा प्रश्नोत्तराचा तास होता. सभापती महोदय, आपणही सदनामध्ये होतात. त्यावेळच्या युती शासनाने अशी माहिती दिलेली आहे की, 1992 साली 563 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. 1997-98 साली तितक्याच शेतक-यांनी आत्महत्या केल्या होत्या. प्रश्न इतकाच आहे की, आगोदरच्या पंचवार्षिकमध्ये आत्महत्या होतच होत्या. युतीच्या राज्यामध्येही त्या तितक्याच झालेल्या आहेत. गेल्या वर्षीही त्या तितक्याच झालेल्या आहेत.

श्री. नितीन गडकरी : आर.आर.पाटील, मी तुमचा सन्मान करतो. पण श्री. राणेसाहेबांचे जे स्टेटमेंट आहे त्यावेळचे सरकारी रेकॉर्ड काढून आपण बघावे. त्यावेळी आत्महत्या झाल्या होत्या पण ती संख्या तीन आकडयात नव्हती. म्हणून आपण पुन्हा एकदा ते स्टेटमेंट तपासून घ्यावे.

श्री. आर.आर.पाटील : हे प्रोसिडिंग विधानसभेचे आहे आणि विधानसभेतील प्रोसिडिंगमधील काही चूकीचे असेल तर संबंधित मंत्र्यांना आणि विधानसभेतील सगळया सन्माननीय सदस्यांना ते दुरुस्त करण्याची संधी असते. परस्पर कधीही भाषणे छापली जात नाहीत. श्री.राणे साहेबांचे विधानसभेतील हे प्रोसिडिंग आहे. मी माझ्या नोटमधील काहीही सांगत नाही. 1995 ते 1997 पर्यतची आकडेवारी मी देत आहे. अमरावती विभागामध्ये 563 जणांनी आत्महत्या केलेल्या आहेत. अध्यक्ष महोदय, मी आपल्या मार्फत हे प्रोसिडिंग माननीय नितीन गडकरीसाहेबांकडे पाठवतो. ते प्रोसिडिंग माझे नाही. ते विधानसभेचे आहे. यूतीच्या काळात आत्महत्या होत होत्या असे मी म्हटलेले नाही. मी 1992 चा दाखला एवढयाचसाठी दिला की, त्याही आगोदरच्या पंचवार्षिकमध्ये शेकडो लोकांच्या आत्महत्या होत होत्या.. युतीच्या राजवटीमध्येही आत्महत्या होत होत्या आणि यावर्षी जितक्या आत्महत्या झालेल्या आहेत. त्याच्या दुप्पट आत्महत्या गेल्या वर्षी झालेल्या आहेत. ज्या वर्षी जास्त आत्महत्या आहेत त्या वर्षी प्रश्न पोडतिडिकेने मांडला पाहिजे. गेल्य वर्षीच्या तुलनेत यावर्षी जर आत्महत्या कमी झाल्या असतील तर आपण कोणत्या उपाययोजना केल्यामुळे आत्महत्या कमी व्हायला लागल्या आहेत हेही बघण्याची आवश्यकता होती. पण अध्यक्ष महोदय, गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी आत्महत्या कमी झाल्या म्हणून मी समाधान मानत नाही. या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये एकाही शेतक-याने आत्महत्या करणे हे या सिस्टिमचे पाप मानले पाहिजे. कुणा एकाला दोष देऊन हा प्रश्न आजपर्यंत संपलेला नाही. आज तुम्ही ज्या पोटतिडिकेने.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

बोललात. त्याच पोटतिडिकेने त्या बाजूला बसून आम्हीही त्यावेळी बोललो होतो. मरणा-या प्रत्येक शेतक-याने नापिकीमुळे किंवा कर्जबाजारीपणमुळे आत्महत्या केलेली नाही त्यामुळे प्रत्येकाला एक लाख रुपयाची मदत देण्याची कोणतीही आवश्यकता नाही, असे उत्तर दिले होते. युतीच्या काळातील महसूल मंत्र्यांनीसुध्दा हेच उत्तर दिले होते. आलटून पालटून प्रश्न विचारणारे आणि उत्तरे देणारे बदलत आहेत. पंचवार्षिक योजनामागून योजना निघून जात आहेत. पण आत्महत्या करणा-या शेतक-यांची स्थिती मात्र तीच आहे. तुम्ही किंवा आम्ही राजकारण थोडेसे बाजूला ठेवून या प्रश्नावर चर्चा करण्याची आवश्यकता आहे. केवळ नाटकीपणाने भाषणे रंगतील वर्तमानपत्रात रकाने भरुन येतील पण आत्महत्या थांबतील काय ? हे बघण्याची गरज आहे. मला 1991 सालची गोष्ट आठवते. सनमाननीय सरपोतदारसाहेब सदनामध्ये होते. दुष्काळाच्या प्रश्नावर शेतकरी भुकेकंगाल आहे म्हणून शिवसेनेच्या सदस्यांनी आणि इतर अनेक सदस्यांनी अत्यंत फाटके-तुटके कपडे घालून एक अभिनव मोर्चा घेऊन याच सदनामध्ये प्रवेश केला होता. विधानसभेचा रेफरन्स विधान परिषदेमध्ये देण्याची आवश्यकता नाही. पण त्यावेळची विधानसभाच या सदनामध्ये भरत होती म्हणन मी या सदनाचाच रेफरन्स देत आहे. फाटके-तुटके कपडे घालून अंगाला काळे फासून शेतकरी राजा, बळीराजा उपाशी मरतोय आणि सरकार सुस्त आहे अशा पध्दतीच्या घोषणा देत काही लोकांनी सभागृहात प्रवेश केला आणि सभागृहाचे कामकाज थांबले. त्यात श्री. गुलाबराव गावंडेसुध्दा होते. दुस-याच दिवशी सन्माननीय भूजबळसाहेबांबरोबर काही जणांनी कॉन्ग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यातही श्री.गुलाबराव गावंडे पहिल्याप्रथम होते. आदल्यादिवशी शिवसेनेच्या मोर्चात शेतक-यांची बाजू घेऊन फाटके-तुटके कपडे घालून सभागृहात प्रवेश केला आणि दुस-याच दिवशी एकदम या बाजूला सत्ताधारी पक्षात कॉन्ग्रेसमध्ये प्रवेश केला होता. अध्यक्ष महोदय, शेतक-यांची परिस्थिती बदलली नव्हती. राजकीय भूमिका बदलल्या होत्या.

यानंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.........

उत्तरंही तीच आहेत, आणि प्रश्नही तेथेच आहेत. मी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांना विनंती करीन आणि मी यापूर्वीच बोललो होतो की, या राज्यामध्ये काही प्रश्न राजकारणाच्या पलिकडचे असले पाहिजेत आणि त्याला त्यांनी होकार सुध्दा दिला होता. मी आपल्याला धन्यवाद देईन की, शासनाच्या वतीने ज्यावेळी काही प्रश्न निर्माण केले जातात, काही उपाययोजना करण्याच्या दृष्टीने विश्वासात घेण्याचा प्रयत्न होतो त्यावेळी आपण नेहमीच मान्य केले, प्रतिसाद दिला आहे. या राज्याचे हित साधत असतांना प्रत्येक वेळी राजकीय अभिनिवेष बाळगलाच पाहिजे असे नाही. शेवटी राज्याचा विचार करीत असतांना राजकारणाचे जोडे बाजूला ठेवून एकत्रित बसून उपाययोजना करण्याची गरज असते. मला व्यक्तिगतरित्या विचारले तर मी असे सांगेन की, या राज्यातील इतर सर्व कामे बाजूला ठेवून शेतकरी आत्महत्या करणार नाहीत, कास्तकार, कष्टकरी मरणार नाही अशी निती आणि योजना आखावी लागेल आणि ती आखण्यासाठी शासनाची काहीही करण्याची तयारी आहे म्हणून आपण अगोदर अशी उपायोजना करण्याच्या दृष्टीने एकत्र बसण्याची भूमिका स्वीकारु या आणि यातून एकत्र मार्ग काढू या. आज या ठिकाणी मंत्रिमंडळातील माझ्या चार सहकाऱ्यांनी अतिशय सविस्तरपणे या विषयासंबंधीची शासनाची भूमिका मांडली आहे, केलेल्या उपाययोजना सांगितल्या आहेत. सर्वात जास्त आत्महत्या या गेल्यावर्षी झाल्या होत्या, कापूस एकाधिकार खरेदी योजनेला सर्वात जास्त तोटा म्हणजे 1800 कोटी एवढा तोटाही मागील वर्षीच झाला होता. मागील वर्षी 1800 कोटीचा तोटा या योजनेवर झाला तेवढा या योजनेच्या इतिहासात कधीच झाला नव्हता. एवढया मोठया प्रमाणात तोटा सहन करुन सुध्दा शेतकरी आत्महत्या करीत आहेत याचा सरळ अर्थ आहे की, शासनाचे कोटयावधी रुपये खर्च झाले तरी सुध्दा अचूकपणे शेतकऱ्यांच्या खिशात हे पैसे जात नव्हते तर त्यावर दलालच मजबूत होत होते आणि ग्रेडर गब्बर बनत होते. शेतकरी मात्र तेथेच राहिला आहे. या योजनेचा फायदा केवळ व्यापारी आणि दलालच घेत बसले. दलालांनी शेतकऱ्यांना लूटू नये म्हणून यशवंतराव मोहिते यांनी ही कापूस एकाधिकार योजना सुरु केली होती पण अलिकडच्या काही वर्षातील दलालांची मन:स्थिती बघितल्यानंतर तोटयाला शासन जबाबदार आणि फायदा मात्र दलालांच्या खिशात, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. अशाच प्रकारे ही योजना पुढेही चालू राहिली तर यंत्रणेच्या माध्यमातून बाहेरच्या राज्यातून कापूस आणून तो शासनाच्या माथ्यावर मारला जाणार आणि



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील........

त्यासाठी शासनाच्या तिजोरीतून पैसे जाणार परंतु त्यातून शेतकऱ्यांचा फायदा मात्र काहीच होणार नाही. ज्या कापूस खरेदी योजनेसाठी, शेकऱ्यांच्या हितासाठी शासनाने 1800 कोटीचा तोटा सहन करुन देखील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत नसेल तर या शेतकऱ्याला मदत होईल अशी एखादी योजना राज्यात घेण्याची आवश्यकता आहे. अजून शासनाची दानत संपलेली नाही, या राज्यातील शेतकऱ्यासाठी जेवढे करता येईल तेवढे आम्ही कृतीने करुन दाखविण्याची भूमिका स्वीकारु. मी जी भूमिका घेतली, जी धोरणे घेतली त्याबद्दल अनेक वेळा माननीय गडकरी साहेबांचे अभिनंदनाचे फोन मला आले पण नेमके याच वेळी सावकारांविरुध्द कठोर भूमिका या शासनाने घेतली त्यासंदर्भात सकाळी खोचकपणे वर्तमानपत्रातून मला आणि मा. मुख्यमंत्री श्री. देशमुख साहेबांबद्दल त्यांनी मांडली, त्यांना एवढे वाईट का वाटावे हेच मला समजत नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, हे सरकार शेतकऱ्यांच्या 7/12 च्या बाजूचे हे नाहीत असे मी म्हणालो. महाराष्ट्राच्या सहकारी बँका आणि भूविकास बँका आपल्या अखत्यारित आहेत, आपण राज्याचे प्रमुख आहात म्हणून या बँकांच्या मार्फत 14 टक्क्याने जे कर्ज शेतकऱ्यांना दिले जाते ते 5-6 टक्क्यांनी आपण देऊ शकता ही वस्तुस्थिती आहे. म्हणून शासनाचे प्रति प्रमुख म्हणून आपण हे करु शकता, असे मत मी मांडलेले आहे व ज्या 14 टक्क्यांनी आपण कर्ज पुरवठा करीत आहात ही सावकारी बंद करा असे मी म्हटले आहे.

श्री. आर.आर.पाटील : मी आपला आभारी आहे. आज विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे कारण बघितले तर पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि व-हाड या भागापेक्षाही जास्त प्रमाण आहे याचा कुठेतरी बेसिकली विचार करणे आवश्यक आहे. एकंदरीत विदर्भामध्ये निसर्गाच्या पाण्यावरच शेती करावी लागते म्हणून या भागात सिंचनाला प्राधान्य देण्याची भूमिका शासनाला स्वीकारावी लागणार आहे. गेली तीन वर्षे पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळ होता, तेथील शेतीला पाणी नव्हते पण इतक्या मोठया प्रमाणावर आत्महत्या त्या भागात झाल्या नाहीत. याचे प्रमुख कारण शोधले तर असे दिसून येईल की, शेतीतील उत्पादन जरी आले नाही तरी तेथील शेतकऱ्यांच्या मदतीला पोल्ट्री होती, दुधाचा धंदा होता, रोजगार हमी योजनेचे काम आणि दुधाचा धंदा तसेच पोल्ट्री मधून मिळणारा पैसा यावर शेतकऱ्याच्या कुटुंबाचा चरितार्थ चालत होता.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

अध्यक्ष महोदय, आज देखील विदर्भातील एकत्रित होणारे दूध आणि एकटया कोल्हापूर जिल्हयात निर्माण होणारे दूध हे जवळ जवळ सारखेच आहे. आपल्याला येथील दुधाचे उत्पादन वाढविता येईल, पोल्ट्री वाढता येईल तसेच अनेक शेतक-यांना पूरक धंदेही देता येतील. आता प्रश्न आहे 7/12 वर कर्ज असतील तर या शेतक-यांना कर्ज कोण देणार? कोणाला टीका करावयाची असेल तर खुशाल करा पण शेतक-यांच्या व्याजाबद्दल देशात अलिकडच्या काळात जर पहिले राजकारणी कोण बोलले असतील तर ते आमचे पवार साहेब बोलले आहेत. 70 टक्के शेतकरी शेती करीत असतांना केंद्रीय बजेटमध्ये 70 टक्के लोकांच्या वाटयाला जर 2.5 टक्के हिस्सा येत असेल तर त्यात वाढ झाली पाहिजे. देशस्तरवर 84 हजार कोटी रुपये उपलब्ध्द करुन दिले जात असतील तर हे प्रमाण तीपटीवर नेले पाहिजे आणि व्याजाचे दर कमी केले पाहिजेत. सभापती महोदय, माझ ी निश्चितपणे खात्री आहे की, येणा-या केंद्रसरकारच्या बजेटमध्ये शेतक-यांच्या आणि शेतीच्या बाबतीत या भूमिका पूर्ण झालेल्या असतील. आज नाबार्डने दिलेले कर्ज राज्य सहकारी बँकेकडे जाते, मध्यवर्ती बँकेकडे जाते, सोसायटयांकडे जाते, टप्प्यावरुन टप्पे वाढत जात आहेत . परंतु मा. जयंत पाटील साहेब मी आपल्या मताशी सहमत आहे की, कर्ज देणा-या आणि कर्ज स्वीकारणा-या यंत्रणा हया असाव्याच लागतील. विदर्भामध्ये सहकाराच्या बाबतीत थोडेसे दुबळेपण आलेले आहे. विदर्भातील सहकार सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आणि सहकार मंत्र्यांनी या पूर्वीच घोषित केलेली आहे. लवकरच एक पॅकेज घोषित करण्यात येईल. जे शेतकरी अल्पभूधारक आहेत, एखाद्या नापिकीने आत्महत्ये पर्यंत प्रसंग येतात. अध्यक्ष महोदय, मी इतकेच सांगतो की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी एक पॅकेज घोषित केले जाईल, ते कृतीत आणले जाईल, प्रसंगी शेतक-यांच्या व्याजाचा बोजा सरकारला सोसावा लागला तरी बेहत्तर पण शेतक-यांना परवडतील अशा दराने कर्ज देण्याची सुविधा महाराष्ट्रामध्ये विशेषत: आत्महत्या होणा-या भागामध्ये निश्चितपणे अशी व्यवस्था निर्माण केली जाईल. मला विदर्भातील शेतकीच्या आणि शेतीच्या फायनान्सबद्दल फारशी कल्पना नव्हती. सर्वपक्षीय खासदारांची बैठक मा. मुख्यमंत्र्यांनी बोलावली होती गडकरी साहेब, आपल्याच पक्षाचे श्री. विजय दर्डा साहेबांनी फार डिटेलमध्ये जाऊन खासदारांच्या बैठकीत राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली होती व त्यात त्यांनी सांगितले की, अव्वाच्या सव्वा दराने सावकार पैसे देत आहेत आणि वसूलीसाठी अब्रुचे धिंडवडे काढीत आहेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

एका खासदाराने माहिती सांगितली की, कर्ज वसूल होत नाही म्हणून एका सावकाराने एका कर्जदाराची मुलगी आणि बायको आपल्या घरात ठेवून घेतली. खासदाराने सांगितलेली माहिती मी माझ्या एस.पी. कडून तपासून घेतली आणि त्यामध्ये तथ्य आढळले. मी सहसा कधी चिडत नाही परंतु ज्यावेळी 18-18 तास काम करणा-या माणसाच्या बायका मुलांना गहाण म्हणून घरात ठेवले जात असेल तर थोडेसे भावनिक होऊन कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढले पाहिजे हे मी बोललो. हे किती संसदीय आहे हे मला महिती नाही परंतु मी ज्यावेळी इतके बोललो तेव्हा माझ्या विभागाने ही बाब अतिशय गंभीरपणाने घेतली. त्यातही हे काम कदत साहेबांच्या विभागाने करायचे की, माझ्या विभागाने काम करायचे, खरे तर आमचे एक सरकार आहे. जे नोंदणीकृत सावकार आहेत त्यांच्या बाबतीत डीडीआर जरुर काम करीत असतो, कार्यवाही करीत असतो. परंतु जे सावकार नोंदणीकृत नाहीत असेही लोक सावकारी करीत होते. प्राथमिक अंदाज असा आहे की, 15000 सावकार विदर्भात आणि मराठवाडयात काम करीत आहेत. राज्यामध्ये एकूण नोंदणीकृत सावकारांची संख्या ही 5 हजार आहे. नोंदणीकृत सावकार किती कर्ज घेतात, किती व्याज घेत आहेत याची तपासणी डीडीआर करीत असतात. पण ज्या सावकाराकडे लायसन्स नाही, जो खाजगीत कर्ज देतो आणि कर्जाच्या नोंदी कोठेही ठेवत नाहीत अशांवर कार्यवाही करावयास सुरुवात केल्यानंतर

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

15 दिवसाच्या आत राज्यामध्ये 424 गुन्हे दाखल झाले. एकूण 594 आरोपी आहेत. 468 लोकांना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. हे सगळे गुन्हे लोकांनी रजिस्टर केले आहेत. हा सावकार फसवतो, गुंड पाठवतो, मारण्याची धमकी देतो अशा प्रकारचे गुन्हे नोंदविलेले आहेत. स्वत:हून पोलिसांनी हात घातलेला नाही. मी नागपूरला आल्यानंतर विदर्भातील सर्व जिल्हाधिकारी व एस.पी.यांना खास बोलाविले होते. मी श्री.गडकरी साहेबांना सांगू इच्छितो की, एका शेतकऱ्याने सावकाराकडून 800 रुपयाचे कर्ज घेतले होते. त्या शेतकऱ्याकडून आतापर्यंत सावकाराने रुपये 38,000 वसूल केले आहेत. आणखी 30 हजार रुपयांसाठी तो सावकार आग्रह करीत आहे. आम्ही जेव्हा त्या सावकाराला अटक केली तेव्हा त्याने एवढे व्याज घेतले आहे हे सांगितले आहे. त्याने त्याचा गुन्हा कबूल केला आहे. आज 40 ते 300 टक्क्याने व्याज घेतले जात आहे, ही गोष्ट महाराष्ट्रामध्ये कोणीही सहन करू शकत नाही. आज सहा तारीख आहे. मी सदनाच्या मार्फत राज्यातील तमाम जनतेला सांगू इच्छितो की, जे विना परवानाधारक अवैधरित्या सावकारी करणाऱ्यांकडून ज्या लोकांनी कर्ज घेतले आहे, त्यांचे कर्ज आताच्या क्षणापासून पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. कुठल्याही माणसाला विना परवानाधारक अवैध सावकाराला कर्जाची परतफेड करण्याची आवश्यकता नाही. ज्या सावकारांकडे लायसेन्स नाही ते कर्ज वसूल करू शकत नाही. काही सावकारांनी तर बनेलगिरी केली आहे. त्यांनी कोऱ्या स्टॅम्पवर कर्ज घेणाऱ्याच्या सहया घेतल्या आहेत. त्यांच्याकडून चेक्स लिहून घेतलेले आहेत. भांडी-कुंडी गहाण ठेवून घेतली आहेत. 20 हजार रुपयाचे कर्ज घेतले म्हणून ट्रॅक्टर गहाण ठेवलेला आहे. एवढेच नव्हे तर पाच हजार रुपयाच्या कर्जासाठी 10 एकर जमीन सावकारांनी स्वत:जवळ घेऊन ठेवलेली आहे. सावकारांनी घेतलेले दस्तऐवज व वस्तू हया आजपासून एक आठवडयाच्या आत परत करायच्या आहेत. त्या परत केल्या नाहीत आणि त्यासंबंधी एक जरी तक्रार आली तरी दरोडयाशिवाय अन्य दुसरा कोणताही गुन्हा नोंदविला जाणार नाही हे सावकारांनी लक्षात घ्यावे. आतापर्यंतचा माझा अनुभव असा आहे की, मला दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी चांगली साथ दिलेली आहे. गोरगरीबांचे धिंडवडे काढून त्यांना जर कोणी लुटत असतील तर संबंधितांविरूध्द निष्ठूरपणाने कठोर कारवाई केली जाईल. त्यासाठी मला दोन्ही सभागृहाच्या सदस्यांचे सहकार्य

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लाभेल अशी मला आशा आहे. आत्महत्या हया युतीच्या राजवटीतसुध्दा होत्या. आताही होत आहेत. काल रात्री मी व माननीय मुख्यमंत्री आणि सहकार मंत्र्यांनी राज्य सहकारी बँकांना शेतकऱ्यांसाठी पर्यायी व्यवस्था करण्याची विनंती केली आहे. आता सहकारी बँकानीसुध्दा शेतकऱ्यांची अडचणी दूर करण्यासाठी अनुकूलता दर्शविली आहे. सहकारी बँकांनी कॅश क्रेडिट देऊ असे सांगितले आहे. कॅश क्रेडिटसंबंधी केंद्र शासनाची योजना आहे. पण ती अर्धवट राबविण्यात आली. तिचा उपयोग गरजू माणसांना पैसा उपलब्ध करून देण्यासंबंधी केला तर राज्यातील शेतकरी कर्जमुक्त होईल. विदर्भ आणि मराठवाडयाचे दुर्दैव असे आहे की, येथे सहकार क्षेत्र दुबळे आहे. सहकाराचे जाळे नाही. दुसऱ्या बाजूने नाबार्डने राष्ट्रीयकृत बँका व शेडयुल्ड बँका यांना कमी व्याजाने शेतकऱ्यांना कर्ज देण्यासंबंधीच्या सूचना दिल्या आहेत. परंतु, या बँकांकडून शेतकऱ्यांना कर्ज दिले जात नाही. शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाची परतफेड होत नसल्यामुळे या बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत. उलट या बँका शेतकऱ्यांना कर्ज वितरित न केल्यामुळे जो दंड भरावा लागतो तो शासनाकडे भरतात. अशा बँकांची विदर्भामध्ये संख्या जास्त प्रमाणात आहे.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

सभापती महोदय, जनतेच्या जीवितांचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे हे आमच्या मंत्रालयाचे काम आहे. ज्या बँका नाबार्ड आणि रिझर्व्ह बँकेने दिलेल्या आदेशानुसार शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत अशा बँकांनी पोलीस संरक्षण मागितले तर ते द्यावयाचे की नाही याचा मी दहा वेळा विचार करीन. तसेच ज्या बँकांनी कर्जे दिले नाहीत अशा बँकांची यादी घोषित करण्याच्या सूचना मी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. त्या बँकेवर लोकांचे मोर्चे गेले तर त्यांचे संरक्षण त्यांनी केले पाहिजे. बँका जर बेकायदेशीरपणे वागत असेल तर त्यांना संरक्षण देण्याची भूमिका सरकार घेणार नाही. केंद्र सरकारची आणि नाबार्डची भूमिका असताना सुध्दा या बँका का मुजोरपणा करीत आहेत ? राष्ट्रीयकृत बँका कर्ज देत नाही, सहकारी बँक कर्ज देत नाही तर मग शेतकरी सावकारांच्या दारात जाणार नाही तर कोठे जाणार ? सावकारांचे दोर तर आम्ही कापून टाकले आहेत. सभापती महोदय, सर्व जिल्हाधिकारी आणि एस.पी. यांचेकडून ज्यावेळी सर्व अहवाल ऐकले त्यावेळी कोणाच्याही डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहणार नाही इतकी वाईट वागणूक शेतकऱ्यांना देण्यात येत होती. माणसे सुखासुखी मरत नाहीत. एखाद दुसरा व्यसनाधीन होऊन मरतो. परंतु मेजॉरीटी ही कष्टकरणाऱ्यांची आहे. कष्ट करणारे नाउमेद होत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या या प्रश्नावर एकत्रित बसायचे आहे. राजकारण नक्कीच करायचे नाही. यावर ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.हर्षवर्धन पाटील बोलत असताना आपण खवळून उठलात. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना धन्यवाद दिले पाहिजेत. त्यांना तो नैतिक अधिकार आहे. कारण तुम्ही सत्तेवर असताना सुध्दा विदर्भातील शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी योग्य भूमिका घेत होता. आम्ही सत्तेवर असताना आम्हाला धारेवर धरण्याचे काम करता. श्री.गडकरीसाहेब आणि आम्ही सोईस्कर भूमिका घेत आलो आहोत. जर हे 20 वर्षापासूनचे चढउताऱ्याचे पैसे असतील तर युतीचे सरकार असताना हे पैसे का दिले नाही ? या प्रश्नाचे उत्तर काय असू शकते.... एकाच नाण्याच्या दोन बाजू...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 1972 पासून चढउतार कापला जात होता. युतीचे सरकार आल्यानंतर चढउतार निधी कापू नये असे सांगितले. हा चढउतार निधी बंद केला आणि या चढउतार निधीवरील व्याज दिले पाहिजे हा निर्णय युतीच्या राजवटीत झाला आणि आम्ही त्यावेळी व्याज दिले होते.

श्री.आर.आर.पाटील : आपण जर माझे शांतपणे ऐकले असते तर हा प्रश्न आपल्याला विचारावा लागला नसता. मी फक्त इतकेच म्हटले की, हा निधी कोणाच्याही काळात जमलेला असतानासुध्दा परत का दिला नव्हता ? आमच्या काळात तो आम्ही वसूल केला नव्हता. आमच्या काळात व्याज दिले. युतीच्या राजवटीत हा निधी शेतकऱ्यांना का दिला नव्हता ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, कारण आम्ही एकाधिकार योजना चालविली. आज ती योजना बंद आहे. आज सर्व खरेदी केंद्रे बंद आहेत. आज एकाधिकार योजना अस्तित्वात नाही. मोनॉपॉली ॲक्ट म्हणजे एक पार्टी परंतु आपण तीन तीन लोकांना खरेदीची परवानगी दिली. एकाधिकार योजना फक्त कागदावर जिवंत आहे. तुम्ही सांगितले की, आम्हाला राजकीय बोलायचे नाही परंतु सत्य स्थिती अशी आहे की, एकाधिकार योजना संपलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : ही एकाधिकार योजना कागदावर सुध्दा जिवंत नाही. मागील अधिवेशनापासून आम्ही आग्रह करीत आहोत की, आपण हे बील आणावे पण आपण ते बील आणत नाहीत. कागदावर कापूस एकाधिकार योजना अस्तित्वात नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ॲक्टमध्ये स्पष्ट तरतूद आहे....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ॲक्टच नाही...

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, आज ॲक्ट नाही. परंतु त्याच बरोबर ही गोष्ट खरी आहे की, ॲक्टमधील तरतुदीप्रमाणे शासनाची कापसाबद्दली धोरणे सुरु आहेत......

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कॉटन मोनोपॉली ॲक्टला दरवर्षी केंद्र सरकारकडून मुदतवाढ मागावयाची असते. यावर्षी केंद्र शासनाने या ॲक्टला मुदतवाढ देऊन सुध्दा शासनाने ऑर्डीनन्स काढलेला नाही, तसेच योजना सुध्दा अस्तित्वात नाही. मी आपल्याला एक उदाहरण देऊ इच्छितो. जर आपल्या राज्यातून मध्य प्रदेशामध्ये कापूस जात असेल तर आपले पोलीस तो कापूस रोखू शकत नाहीत. सूत गिरण्या किंवा जिनिंग प्रेस, एकाधिकाराला परवानगी दिली आणि उद्या पाचवा माणूस आला आणि त्याने कापसाची खरेदी करण्यास सुरुवात केली तर त्याला कायदेशीरदृष्टया आपण थांबवू शकणार नाही. एकाधिकार कायद्याचा ऑर्डीनन्स न काढल्यामुळे तो मृत झाला आहे. तरीही आपण आमच्या डोळयात धुळफेक करीत आहात. हा ॲक्ट मेलेला असताना, तो मुडदा असताना सुध्दा आपण आम्हाला सांगत आहात की, तो जेवतो आहे, तो खातो आहे, तो खेळत आहे. परंतु कायदेशीरदृष्टया तो ॲक्ट मात्र अस्तित्वातच नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कापूस एकाधिकार कायद्याला केंद्र सरकारकडून मुदतवाढ मिळालेली आहे. 1995-99 या कालावधीत एक वर्षासाठी एक्स्टेंशन मिळाले होते तरीसुध्दा आपण ती योजना चालविली होती. या ॲक्टबाबत ऑर्डीनन्स न काढता तो ॲक्ट अस्तित्वात आहे असे गृहीत धरुन तो चालवीत आहे. मी पुन्हा आपल्याला सांगू इच्छितो की, या ॲक्टला एक्स्टेंशन मिळालेले आहे. त्याचे रुपांतर कायद्यामध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सरकारने बील आणण्याबाबत मागील डिसेंबर महिन्याच्या अधिवेशनामध्ये कबूल केले, मार्चच्या अधिवेशनामध्ये कबूल केले तसेच गेल्या जुलै महिन्याच्या अधिवेशनामध्ये देखील कबूल केले होते. परंतु अजून सुध्दा त्याबाबतचे बील आणले नाही आणि ऑर्डीनन्स सुध्दा काढलेला नाही. तरी सुध्दा आपण म्हणत आहात की, कॉटन मोनोपॉली ॲक्ट अस्तित्वात आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : आपण मला सांगा ऑर्डीनन्स न काढता कोणता कायदा अस्तित्वात राहू शकतो ? हे विधानमंडळ आहे, याला कायदेमंडळ म्हटले जाते आणि याच ठिकाणी कायदा केला जाते. कायद्याची मुदत संपलेली असताना आणि ऑर्डीनन्स काढलेला नसताना देखील आपण सांगत आहात की, कायदा अस्तित्वात आहे असे गृहीत धरत आहोत. गृहीत धरायला हा काय बगीचा आहे ? आपण बगीचात बसला आहात काय ? आपण मला सांगा की, आपण अगोदर ऑर्डीनन्स का काढला नाही ? जर ऑर्डीनन्सच काढला नसेल तर तो जीवंत कसा राहू शकतो ? या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदय श्री.आर.आर.पाटील चुकीची माहिती सांगत आहेत.

श्री.हर्षवर्धन पाटील : या कायद्याला केंद्र सरकारकडून तत्वत: एक्स्टेंशन मिळालेले आहे.

श्री.नितीन गडकरी : जर एक्स्टेंशन मिळाले असेल तर आपण ऑर्डीनन्स का काढला नाही ? आपण मला सांगा उद्या सायंकाळपर्यंत यासंदर्भात ऑर्डीनन्स काढणार आहात काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : या कायद्याच्या एक्स्टेंशनबाबत केंद्र सरकारकडून मान्यता मिळाली आहे. याबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे दाखल केलेला आहे. ऑर्डीनन्स जरी काढला नसला तरी आपण कायदा अस्तित्वात असल्याचे गृहीत धरत आहोत.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला आपणाकडून न्याय हवा आहे. आपणच सांगा की, ऑर्डीनन्स निघाला नसेल तर कायदा अस्तित्वात राहू शकतो काय ? आज जरी कायदा अस्तित्वात नसला तरी तो केव्हा अस्तित्वात येईल ? यासंदर्भात आपणच मला संरक्षण द्यावे. कापूस एकाधिकार कायद्याची मुदत संपल्यानंतर, या कायद्याला केंद्र सरकारकडून एक्स्टेंशन मिळाले आहे, परंतु त्याबाबतचा ऑर्डीनन्स मात्र काढला नाही. याबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे अडकला आहे असे मा.मंत्री महोदय या ठिकाणी सांगत आहेत. याबाबतचे बील अडकले आहे, परंतु तरीसुध्दा आपण ऑर्डीनन्स काढला नाही.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

सभापती महोदय, आपण आम्हाला असे सांगा की, कापूस एकाधिकार खरेदी योजनेसंबंधीचा कायदा अस्तित्वात आहे काय ? कापूस एकाधिकार खरेदी योजना कायदेशीर आहे काय ? ऑर्डिनन्स न काढता आपण गृहित धरुन काम करीत आहात हे काय अंबाझरी गार्डनमध्ये फिरण्यासारखे आहे काय ? सभापती महोदय, याबाबतीत आपण खुलासा करावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.आम्ही मंत्रिमहोदयांना सांगत आहोत की, आपण यासबंधी उद्या विधेयक आणावे आम्ही त्याला एकमताने मंजुरी देऊ.हे कायदेमंडळ आहे आणि त्या ठिकाणी काही तरी उत्तर देऊन चालणार नाही. मागच्या वेळी असे आश्वासन देण्यात आले होते की, ऑर्डिनन्स काढण्यात येईल परंतु ऑर्डिनन्स काढण्यात आलेला नाही. आज एकाधिकार मेलेला आहे एकाधिकाराची डेड बॉडी तुमच्या घरात पडलेली आहे.असे असतांना त्याला आंघोळ घातली आहे आणि कपडे घातले आहेत असे सांगून आपण आम्हाला असत्य माहिती देत आहात.तेव्हा हा प्रकार बंद करण्यात यावा.

**उपसभापती** : या संदर्भातील कायदा अस्तित्वात नसल्यामुळे प्रशासकीय अधिकारामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्याला तसे उत्तर दिलेले आहे.तसेच या संबंधीच्या बाबी विधी व न्याय विभागाकडे तपासण्यासाठी त्यांनी दिलेल्या आहेत.

श्री.नितीन गडकरी : त्याला आता एक वर्ष होऊन गेलेले आहे.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

श्री.पांडुरंग फुंडकर : आज कापूस एकाधिकार खरेदी योजनेसंबंधीचा कायदा अस्तित्वात नाही.शासनाकडून दिशाभूल करण्यात येत आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : मी दिशाभूल करत नाही.... अडथळा...सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे व मला माझे म्हणणे मांडू द्यावे. प्रत्येक वेळी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य उठून बोलत आहेत. तेव्हा आता मला बोलू द्यावे. या संदर्भात आपल्याला एक्सटेन्शन मिळालेले असतांनासुध्दा आपण कायद्यात रुपांतर करु शकलेलो नाही. पॉलिसी म्हणून आपण ही योजना चालवत आहोत. गेल्या वर्षीसुध्दा आपण ही योजना राबवली होती विधी व न्याय विभागाचा अभिप्राय आल्यानंतर त्या संबंधीचे विधेयक आणले जाईल.

---

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, गेल्या वर्षी कायदा अस्तित्वात नसतांनासुध्दा आपण कापूस खरेदी केला होता. या वर्षीसुध्दा पॉलिसी म्हणून आम्ही कापूस खरेदी करीत आहोत. शासनाची ही पॉलिसी कायम आहे.सरकाराने पॉलिसीमध्ये बदल केलेला नाही.सरकारच्या पॉलिसीप्रमाणे कापूस स्वीकारला जात आहे तसेच हमी भावाप्रमाणे कापूस खरेदी केला जात आहे.सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, मला 700 कोटी रुपयांच्या बाबतीत सांगू द्यावे.

एक सन्माननीय सदस्य : आम्हाला ते नको.

श्री.आर.आर.पाटील : 700 कोटी रुपये नको असे जरी आपण म्हणाला असला तरी सुध्दा विदर्भातील शेतक-यांना टप्याटप्याने आम्ही हे पैसे देणार आहोत जे पैसे तुम्ही दिलेले नव्हते ते पैसे आम्ही देणार आहोत. केवळ व्यापा-यांची बाजू घेऊन दलालांसाठी कोणाला काही योजना मागावयाची असेल तर ती योजना दिली जाणार नाही.केवळ 1800 कोटीच नव्हे तर त्यापेक्षासुध्दा अधिक पैसे थेट शेतक-यांना देण्यासाठी ज्या काही योजना कराव्या लागतील त्या योजना निश्चितपणे आम्ही करु. हे अधिवेशन संपण्यापूर्वी असे सर्वंकष पॅकेज दिले जाईल. सन्माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी उल्लेख केलेला आहे की, अनेक शेतक-यांना नुकसानभरपाई मिळालेली नाही. शेतक-यांनी आत्महत्या केलेली असली तरी निकषात बसत नाही म्हणून त्यांच्या कुटुबिंयाना नुकसान भरपाई मिळाली नाही. परंतु ज्यावेळी एक शेतकरी मृत्यूमुखी पडतो त्यावेळी त्याचे संपूर्ण कुटुंब उघडण्यावर पडते अशा वेळी त्याच्या वारसदारांचा विचार करुन ज्यांना आजच्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई मिळाली नाही त्यांच्यासाठी निकष शिथिल करुन जास्तीत जास्त लोकांना लाभ कसा मिळेल अशा प्रकारचे धोरण स्वीकारले जाईल. गेल्या वर्षापेक्षा या वर्षी कमी शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या असतांनासुध्दा गेल्यावर्षी विरोधी पक्षाने मोर्चा काढला नव्हता शेतक-यांच्या मढयाच्या टाळूवरील लोणी राजकारणासाठी खाण्याचा हा प्रकार असून तो त्यांनी बंद केला पाहिजे.शेतक-यांच्या बद्दल त्यांना आज जो पान्हा फुटलेला आहे तो पुतणा मावशीचा आहे हे ओळखण्या इतकी महाराष्ट्रातील जनता नक्कीच शहाणी आहे.पक्षाला घरघर लागली ,पक्ष फुटू लागला म्हणून शेतक-यांचे नाव घेतल्यामुळे कोणताही पक्ष सावरला जात नाही हे मी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो.तुम्हाला राजकारण करावयाचे असेल तर राजकीय

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुकाबला करण्यासाठी आम्ही आता सिध्द झालो आहोत. शेतक-यांच्या बद्दल आता त्यांना पान्हा फुटला आहे परंतु त्यांच्याच राजवटीमध्ये शेतक-यांनी आत्महत्या केल्या होत्या. या राज्यामध्ये शेतकरी पुन्हा आत्महत्या करणार नाही अशा प्रकारचे पॅकेज आम्ही त्यांना देऊ.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत "वेलमध्ये " येतात आणि फलक फडकवितात.. गोंधळ ... )

**उपसभापती** :अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : लेखी उत्तरे.

**मु.शी.** : तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

---

सचिव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सोमवार, दिनांक 5 डिसेंबर 2005 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उपसभापती** : दिनांक 5 डिसेंबर 2005 ची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( **प्रेस** : येथे सोबत जोडलेली यादी छापावी. )

...... 3झेड 1a ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये फलक फडकावित घोषणा देत असतात .... गोंधळ .. )

**पृ.शी./मु.शी.** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

--

श्री. अजित पवार (पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2)(अ) अन्वये सन 2005 चा अध्यादेश क्रमांक 6 - मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, 2005 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. अजित पवार : महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2)(अ) अन्वये सन 2005 चा अध्यादेश क्रमांक 7 - महाराष्ट्र माहितीचा अधिकार (निरसन) अध्यादेश, 2005 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये येऊन घोषणा देत असतात ... गोंधळ ... )

श्री. अजित पवार : महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2)(अ) अन्वये सन 2005 चा अध्यादेश क्रमांक 10 - मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, 2005 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. अजित पवार : महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2)(अ) अन्वये सन 2005 चा अध्यादेश क्रमांक 5 - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, 2005 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. अजित पवार : महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2)(अ) अन्वये सन 2005 चा अध्यादेश क्रमांक 8 - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, 2005 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

..... 3झेड 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. अजित पवार : महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2)(अ) अन्वये सन 2005 चा अध्यादेश क्रमांक 11 - मुंबई दारूबंदी (सुधारणा) अध्यादेश, 2005 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. अजित पवार : महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2)(अ) अन्वये सन 2005 चा अध्यादेश क्रमांक 9 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, 2005 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये फलक फडकावित घोषणा देत असतात .... गोंधळ .. )

****

**पृ.शी./मु.शी.** : सन् 2005-06 च्या खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे.

---

श्री. अजित पवार (पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन् 2005-06 करिता खर्चाचे परू विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल सन् 2005-06 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस करीत आहेत.

**उपसभापती** : सन् 2005-06 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

****

.... 3झेड 3 ...

**पृ.शी./मु.शी.** : आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची सूची सभागृहासमोर ठेवणे.

---

श्री. अजित पवार (पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : महोदय, मंगळवार, दिनांक 6 डिसेंबर 2005 रोजी विधानमंडळास दिनांक 2 डिसेंबर 2005 पर्यंत आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या ज्या आगाऊ रकमांच्या संबंधात मागण्या समाविष्ट केलेल्या नाहीत, त्या दर्शविणारी सूची मी सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : सूची सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

***

**पृ.शी./मु.शी.** : सन् 1997-98 करिता खर्चाचे अतिरिक्त विवरणपत्र सादर करणे.

---

श्री. अजित पवार (पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन् 1997-98 करिता खर्चाचे अतिरिक्त विवरणपत्र सभागृहास सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल सन् 1997-98 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस करीत आहेत.

**उपसभापती** : सन् 1997-98 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये फलक फडकावित घोषणा देत असतात .... गोंधळ .. )

*****

...... 3झेड 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी**. : विधेयकांना संमती व अधिसंमती.

---

**उपसभापती** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती / राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधी यादी सचिव वाचून दाखवतील.

सचिव : **(अ)** खालील विधेयकांना राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली. -

1) सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 29 - नागपूर शहर महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, 2004.

2) सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 64 - मुंबई औद्योगिक संबंध (सुधारणा) विधेयक, 2004.

3) सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 65 - वेतन प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,2004.

4) सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 16 - विद्युत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2005.

5) सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 58 - महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (भूतलक्षी प्रभावाने मुदतवाढ व सुधारणा) विधेयक, 2005.

**(ब)** खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली. -

1) सन 2004 चे वि.स.वि.क्रमांक 52 - महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग विधेयक,2004

2) सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 59 - मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधेयक, 2005.

3) सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 60 - मुंबई पोलीस (सुधारणा) विधेयक, 2005.

4) सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 66 - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, 2005.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये फलक फडकावित घोषणा देत असतात .... गोंधळ .. )

...... 3झेड 5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सचिव .....

5) सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 74 - महाराष्ट्र विधान परिषद (सभापती व उपसभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, 2005.

5) सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 13 - महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (सुधारणा) विधेयक, 2005.

6) सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 14 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, 2005.

7) सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 15 - महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद (सुधारणा) विधेयक, 2005.

8) सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 17 - महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक, 2005.

9) सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 18 - महाराष्ट्र सहकारी संस्था विधेयक, 2005.

10) सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 19 - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, 2005.

***

**उपसभापती** : यानंतरच्या कामकाजातील लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आल्या आहेत आणि आता शासकीय विधेयके घेण्यात येतील.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये फलक फडकावित घोषणा देत असतात .... गोंधळ .. )

...... 3झेड 6 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : ग्रामपंचायत (तिसरी सुधारणा) विधेयक, 2003.

**मु.शी.** : सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 16 दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात आलेले विधेयक मागे घेण्याचा ग्रामविकास मंत्र्यांचा प्रस्ताव.

---

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये फलक फडकावित घोषणा देत असतात .... गोंधळ .. )

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो -

" सन् 2003 चे वि.प.वि. क्रमांक 16 - मुंबई ग्रामपंचायत (तिसरी सुधारणा) विधेयक, 2003 हे विधानसभेचे सहमती घेऊन दिनांक 17 मार्च 2004 रोजी दोन्ही सभागृहाच्या 15 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात आल होते. परंतु विधेयकात आणखी काही सुधारणा अंतर्भूत करणे आवश्यक असल्याने सन 2003 चे वि.प.वि. क्रमांक 16 - मुंबई ग्रामपंचायत (तिसरी सुधारणा) विधेयक, 2003 संयुक्त समितीकडून काढून घेऊन मागे घेण्यास अनुमती द्यावी.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

****

.... 3झेड 7 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : माहितीचा अधिकार (निरसन) विधेयक, 2005.

**L. C. BILL NO.XXI OF 2005.**

**( A BILL TO PROVIDE FOR REPEAL OF THE MAHARASHTRA RIGHT TO INFORMATION ACT, 2002 AND FOR CERTAIN MATTERS INCIDENTAL THERETO. )**

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : महोदय, सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 21 - महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 याचे निरसन करण्याची आणि तदानुषंगिक विवक्षित बाबींची तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 21 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये फलक फडकावित घोषणा देत असतात .... गोंधळ .. )

****

...... 3 झेड 8 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सार्वजनिक अभिलेख विधेयक, 2005.

**L. C. BILL NO.XXII OF 2005.**

**( A BILL TO REGULATE THE MANAGEMENT, ADMINISTRATION AND PRESERVATION OF PUBLIC RECORDS OF THE STATE GOVERNMENT, LOCAL AUTHORITIES, PUBLIC SECTOR UNDERTAKINGS, STATUTORY BODIES AND CORPORATIONS, COMMISSIONS AND COMMITTEES CONSTITUTED BY THE STATE GOVERNMENT AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO. )**

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : महोदय, सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 22 - राज्य शासन, स्थानिक प्राधिकरणे (local authorities), सार्वजनिक क्षेत्र उपक्रम, वैधानिक मंडळे आणि राज्य शासनाने घटित केलेली महामंडळे, आयोग व समित्या यांच्या सार्वजनिक अभिलेखांचे व्यवस्थापन, प्रशासन आणि जतन यांचे विनियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 22 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

*****

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये येऊन घोषणा देत असतात.... गोंधळ .. )

....... 3झेड 9 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : कामकाज पत्रिकेवरील यानंतरचे कामकाज, विधेयक आणि अर्धा तास चर्चा, पुढे ढकलण्यात आले आहे.

सभागृहाचे दिवसाचे कामकाज आता संपले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 7 डिसेंबर 2005 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 46 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 7 डिसेंबर, 2005 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही